# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

# शिक्षणशास्त्राचे तत्त्वज्ञानात्मक अधिष्ठान

**(तत्त्वज्ञान आणि शिक्षण)**

**सत्र-१ पेपर-१**

# शिक्षणशास्त्राचे समाजशास्त्रीय अधिष्ठान

**सत्र-२ पेपर-२**

**बी. ए. भाग-१**

## शिक्षणशास्त्र

(शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२०
बी. ए. शिक्षणशास्त्र पेपर १ व २ करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती :** २००

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-93-89327-61-8

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

## दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

■ सल्लागार समिती ■


**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) आर. के. कामत**
I/c अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
I/c अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्य (डॉ.) पी. आर. शेवाळे**
I/c अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
I/c अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. जी. आर. पळसे**
I/c संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. व्ही. टी. पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. ए. अनुसे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ अभ्यासमंडळ : शिक्षणशास्त्र ■


अध्यक्ष – **डॉ. श्रीमती एस. व्ही. काळेबाग**
महावीर महाविद्यालय, कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती पी. एस. पाटणकर**
  शिक्षणशास्त्र विभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती जी. एस. पाटील**
  शिक्षणशास्त्र विभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **प्राचार्या डॉ. श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
  कॉलेज ऑफ एज्युकेशन विटा,
  ता. खानापूर, जि. सांगली

- **डॉ. श्रीमती प्रज्ञा भिमराव पाटील**
  श्री संत कृपा कॉलेज ऑफ एज्युकेशन, घोगाव,
  ता. कराड, जि. सातारा

- **डॉ. अशोक मारूती पाटील**
  वसंत कॉलेज ऑफ एज्युकेशन, इस्लामपूर,
  ता. वाळवा, जि. सांगली

- **डॉ. प्रमोद कलाप्पा लंबे**
  श्री आण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ
  एज्युकेशन, आष्टा

- **डॉ. संभाजी मारुती भोसले**
  इचलकरंजी बी.एड. कॉलेज, इचलकरंजी, जि.
  कोल्हापूर

- **डॉ. बजरंग सिधू घाटगे**
  तात्यासाहेब कोरे शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
  वारणानगर, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर

- **डॉ. विकास गजानन परांजपे**
  इचलकरंजी शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
  इचलकरंजी, जि. कोल्हापूर

- **डॉ. सहदेव यशवंत पुजारी**
  कै. रामराव निकम शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
  इंदोली, ता. कराड, जि. सांगली

- **डॉ. भुषण त्र्यंबक पाटील**
  ३५, आनंदमाई, जयदेवनगर, सिंहगड रोड,
  पुणे ४११०३०

- **डॉ. संभाजी एम. भोसले**
  इचलकरंजी शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
  इचलकरंजी, जि. कोल्हापूर

- **डॉ. बी. पी. मरजे**
  पुतळाबेन शहा कॉलेज ऑफ एज्युकेशन,
  सांगली

- **डॉ. सी. जी. खांडके**
  बी. जी. खराडे कॉलेज ऑफ एज्युकेशन,
  शिवाजी पेठ, कोल्हापूर

- **डॉ. एम. ए. पाटील**
  शिवाजीराव देशमुख शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
  शिराळा, ता. शिराळा, जि. सांगली.

# प्रस्तावना

जून २००७ पासून शिवाजी विद्यापीठाने बहिःस्थ विद्यार्थ्यांसाठी दूर शिक्षण कार्यक्रम राबविण्याचे ठरविले आहे. त्या अनुषंगाने बी. ए. भाग-१ वर्गामध्ये बहिःस्थ अध्ययनार्थी म्हणून प्रवेश घेतलेल्यासाठी ''शिक्षणाचे तत्त्वज्ञानात्मक व समाजशास्त्रीय अधिष्ठान'' ह्या विषयाचे स्वयंःअध्ययन साहित्य तयार केलेले आहे. या विषयातील तज्ज्ञांनी या स्वयंअध्ययन साहित्यात वेगवेगळी प्रकरणे लिहून सदर विषय विद्यार्थीभिमुख करण्याचा प्रयत्न केलेला आहे. या स्वयंःअध्ययन साहित्यात आपणासाठी शिक्षणाची तात्त्विक व समाजशास्त्रीय भूमिका सखोल, सोप्या व सुटसुटीत भाषेत केलेली आहे. मानवी जीवनाची कांही निश्चित ध्येये व उद्दिष्टे आहेत. सदरची ध्येये उद्दिष्टे शिक्षणातून साध्य करावयाची असतात त्या ध्येयांना व उद्दिष्टांना सामाजिक अधिष्ठान असावे लागते, त्याशिवाय मनुष्य समाजाभिमुख होऊच शकत नाही या दृष्टीने लेखन करण्याचा प्रयत्न लेखकांनी तुमच्यासाठी केलेला आहे. वाचकांना विषयाचे ज्ञान व्हावे तसेच आशयाचे आकलन व्हावे, म्हणून आवश्यक त्या ठिकाणी तक्ते, आकृत्या, आलेख काढून विषय अधिक सोपा करून सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

शिक्षणाची तत्त्वज्ञानातील भूमिका विविध स्तरावर शिक्षणाची ध्येये आणि उद्दिष्टे, कार्ये, शिस्त व स्वातंत्र्य, शिक्षणाचे संप्रदाय व कांही शिक्षणतज्ञ, शैक्षणिक समाजशास्त्राचे स्वरूप, व्याप्ती, शिक्षण सामाजिक परिवर्तनाचे साधन, समूह संपर्क साधने, सामाजिक समूह आंतरक्रिया व भारतातील शिक्षणासंबंधीच्या प्रचलित शैक्षणिक समस्यांची सविस्तर चर्चा केलेली आहे.

बहिःस्थ अध्ययनार्थींना विषयाचे त्वरित आकलन व्हावे म्हणून, विषयाची प्रस्तावना, उद्दिष्टे, मांडणी, विषयाची मध्यवर्ती कल्पना, सारांश, स्वयंःअध्ययनासाठी प्रश्न, सरावासाठी प्रश्न व उत्तरे अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तकांची नावे प्रकाशनासह दिलेली आहेत. अशारितीने अध्ययनार्थींनी विषयांचे चांगले आकलन होईल, अशी अपेक्षा आहे.

**– संपादक**

| दूर शिक्षण केंद्र,<br>शिवाजी विद्यापीठ,<br>कोल्हापूर | **शिक्षणशास्त्राचे तत्त्वज्ञानात्मक अधिष्ठान**<br>**शिक्षणशास्त्राचे समाजशास्त्रीय अधिष्ठान** |
|---|---|

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखन सहभाग | सत्र–१<br>घटक क्रमांक | सत्र–२<br>घटक क्रमांक |
|---|---|---|
| **प्रा. यु. डी. पाटील**<br>व्ही. के. चव्हाण-पाटील महाविद्यालय, कारवे,<br>ता. चंदगड, जि. कोल्हापूर | १ | -- |
| **प्रा. जमीर इलाही मोमीन**<br>कला व वाणिज्य महाविद्यालय, सातारा | २ | -- |
| **प्रा. सौ. सुरेखा नंदकुमार धनवडे**<br>आदर्श महाविद्यालय, विटा | ३ | -- |
| **प्रा. वर्षा माने**<br>छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा | ४ | -- |
| **श्री. आर. ए. चित्रकर**<br>कर्मवीर हिरे आर्टस, सायन्स, कॉमर्स अॅण्ड<br>एज्युकेशन कॉलेज, गारगोटी | -- | १ |
| **डॉ. के. बी. पाटील**<br>दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | -- | २ |
| **प्रा. श्रीमती मंजिरी डी. शेटके**<br>महावीर महाविद्यालय, कोल्हापूर | -- | ३ |
| **डॉ. केशव मोरे**<br>आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन, सातारा | -- | ४ |

### ■ संपादन समिती ■

**डॉ. मेघा गुळवणी**
मॉडर्न कॉलेज ऑफ एज्युकेशन, विटा,
ता. खानापूर, जि. सांगली

**डॉ. विद्यानंद खंडागळे**
शिक्षणशास्त्र विभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| | **सेमिस्टर–१** | |
| | **शिक्षणशास्त्राचे तत्त्वज्ञानात्मक अधिष्ठान** | |
| घटक १ | तत्त्वज्ञानाची शिक्षणातील भूमिका | १ |
| घटक २ | शिक्षणाची कार्ये | ११ |
| घटक ३ | शिस्त आणि स्वातंत्र्य | ३६ |
| घटक ४ | शिक्षणतज्ज्ञ व त्यांचे शैक्षणिक योगदान<br>१. कर्मवीर भाऊराव पाटील, २. महात्मा फुले | ५२ |
| | **सेमिस्टर–२** | |
| | **शिक्षणशास्त्राचे समाजशास्त्रीय अधिष्ठान** | |
| घटक १ | समाजशास्त्र व शिक्षण | ६७ |
| घटक २ | शिक्षण व सामाजिक परिवर्तन | ७९ |
| घटक ३ | सामाजिक समुह व संस्कृती | ९९ |
| घटक ४ | भारतातील शिक्षणाच्या संदर्भातील सामाजिक समस्या | १२१ |

■ **विद्यार्थ्यांना सूचना**

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१९-२० पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# घटक – १
# तत्त्वज्ञानाची शिक्षणातील भूमिका
# (Role of Philosophy in Education)

**प्रास्ताविक :**

१. तत्त्वज्ञान व शिक्षण यांच्या संकल्पना

१.१ तत्त्वज्ञानाची संकल्पना

१.१.१ अर्थ

१.१.२ व्याख्या

१.१.३ स्वरूप

१.१.४ महत्व

१.१.५ स्वयंअध्ययन प्रश्न

१.१.६ शाखा

१.२ शिक्षणाची संकल्पना

१.२.१ अर्थ

१.२.२ व्युत्पत्यर्थ

१.२.३ व्याख्या

१.३ शिक्षण प्रक्रियेची वैशिष्ट्ये

१.४ मानवी जीवनात शिक्षणाचे महत्व

१.५ स्वयंअध्ययन प्रश्न

१.६ तत्त्वज्ञान आणि शिक्षण यांच्यातील संबंध

१.७ सारांश

१.८ स्वयंअध्ययन प्रश्न

१.९ स्वयंअध्ययन उत्तरे

**प्रकरण १ :**

## तत्त्वज्ञानाची शिक्षणातील भूमिका

## Role of Philosophy in Education

**प्रास्ताविक :**

तत्त्वज्ञान हा प्राचीन काळापासून ज्ञानाचा एक आदरणीय प्रांत आहे. अंतिम सत्याचे दर्शन घडविणारे ते दर्शनशास्त्र आहे. ज्या समस्यांना दैनंदिन जीवनात आपल्याला तोंड द्यावे लागते, त्या समस्यांचे स्पष्टीकरण, वर्गीकरण व संघटन तत्त्वज्ञान करते. तत्वज्ञान माणूस ओळखायला शिकवते. तत्त्वज्ञानाचा जन्म जिज्ञासेतून झाला आहे. तत्त्वज्ञान ही जीवनाची कला आहे. ती माणसाला जगायला शिकविते. (Art of Living) सुखी व समाधानी, सदाचारी व विवेकी, निश्चयी व निष्ठावंत जीवन जगायचे ते एक प्रभावी व उपयुक्त साधन आहे. जगात प्रत्येक व्यक्तीचे वेगळे असे स्वत:चे तत्त्वज्ञान असते. शिक्षणाचा व तत्त्वज्ञानाचा घनिष्ठ संबंध आहे. शिक्षणावर तत्त्वज्ञानाचा प्रभाव आहे.

**१) तत्त्वज्ञान व शिक्षण यांच्या संकल्पना :**

**१.१ तत्त्वज्ञानाची संकल्पना –**

**१.१.१ तत्त्वज्ञानाचा अर्थ –**

तत्त्वज्ञान या संयुक्त शब्दामध्ये दोन शब्द आहेत. तत्व+ज्ञान तत्व या संस्कृत शब्दाचा अर्थ सत्य किंवा यथार्थ स्वरूप असा होतो. त्यानुसार तत्त्वज्ञान म्हणजे सत्य स्वरूपाचे ज्ञान. संदर्भ : शंकराचार्यांच्या मते, तत्त्वज्ञान म्हणजे तत् म्हणजेच ब्रह्म व त्व म्हणजे भाव किंवा स्वरूप एकूण तत्त्वज्ञान म्हणजे ब्रह्मस्वरूपाचे ज्ञान.

इंग्रजीत तत्वज्ञानाला समानार्थी शब्द म्हणजे Philosophy यातील मूळ लॅटिन शब्द Philos म्हणजे Love व Sophia म्हणजे Wisdom एकूण Philosophy म्हणजे Love of Wisdom (Philosophy = Philos + Sophia) शहाणपणाविषयीचे प्रेम.

**१.१.२ तत्त्वज्ञानाच्या व्याख्या :**

१) बेकन – ''सर्व शास्त्रांचे शास्त्र म्हणजे तत्त्वज्ञान.''

(Philosophy is science of all sciences.)

२) सिसरो – ''तत्त्वज्ञान म्हणजे सर्व कलांची जननी.''

(Philosophy is Mother of all arts.)

३) डॉ. राधाकृष्णन – ''वास्तवतेच्या स्वरूपाचा तर्कशुद्ध शोध म्हणजे तत्त्वज्ञान.''

**१.१.३ तत्वज्ञानाचे स्वरूप :**

तत्वज्ञान हे आदर्शवादीशास्त्र आहे. मानवी जीवनातील आदर्श व मुल्ये तत्त्वज्ञान निश्चित करते. तत्त्वज्ञान अंतिम सत्याचा शोध घेणारे शास्त्र आहे. त्याला दर्शनशास्त्रसुद्धा म्हणतात. तत्त्वज्ञान म्हणजे माणसाचा जीवनाविषयक

दृष्टिकोन. जीवनात इष्ट काय? अनिष्ट काय? योग्य काय? अयोग्य काय? चांगले काय? वाईट काय? याविषयी तत्वज्ञान आपणास मार्गदर्शन करते. विजयात विवेक सांभाळण्यास व अपयशात खचून न जाता धीराने संकटाला तोंड देण्यास आपणाला तत्त्वज्ञानच शिकविते. प्रत्येक माणसाचे जीवनाविषयक स्वत:चे असे तत्त्वज्ञान असते. जसे सज्जनाचे तसेच चोराचेही तत्त्वज्ञान असते. तत्त्वज्ञान म्हणजे प्रत्येकाचा जीवन जगण्याचा मार्ग.

**१.१.४ मानवी जीवनात तत्वज्ञानाचे महत्व :**

तत्त्वज्ञानाचे स्वरूप समजावून घेतल्यानंतर तत्त्वज्ञानाला मानवी जीवनात किती महत्वाचे स्थान आहे. हे आपल्या लक्षात आले असेलच. तत्त्वज्ञान हे स्त्याचा शोध घेऊन त्याच्या प्रकाशात जीवनाचे साफल्य कशात आहे, हे समजावून सांगते. तत्त्वज्ञानाच्या कचाट्यातून कोणीही सुटलेला नाही. एखाद्या दीपस्तंभाप्रमाणे तत्त्वज्ञान माणसाला जीवनाचे ध्येय दाखविते. तत्त्वज्ञानाशिवाय माणसाचे जीवन पशुवत जीवन होईल. तत्त्वज्ञान माणसाला जीवनाचा अर्थ काय, जीवनाचे प्रयोजन काय? हे समजून घेण्यास मदत करते. तत्त्वज्ञानामुळे माणसामाणसातील परस्परसंबंध कसे असावेत. जीवनातील खरी नीतिमुल्ये कोणती हे समजते. व्यक्तींच्या जीवनाला वैचारिक अधिष्ठान प्राप्त होते व त्यातून आचारांना प्रेरणा मिळते. जीवनसंघर्षातदेखील अविचल कसे राहावे हे तत्वज्ञान शिकविते.

**१.१.५ स्वयंअध्ययन प्रश्न :**

**१) रिकाम्या जागा भरा.**

१) तत्त्वज्ञान म्हणजे इंग्रजीत ------- होय.

अ) Psychology ब) Sociology क) Philosophy ड) Economics

२) तत्त्वज्ञान म्हणजे सर्व ------ जननी.

अ) कलांची ब) शास्त्रांची क) शिक्षणाची ड) अभ्यासाची

३) वास्तवतेच्या स्वरूपाचा तर्कशुद्ध शोध म्हणजे तत्त्वज्ञान असे ------ यांनी म्हटले.

अ) सिसरो ब) डॉ. राधाकृष्णन क) बेकन ड) जॉन ड्युई

४) तत्त्वज्ञान ------ सत्याचा शोध घेणारे शास्त्र आहे.


अ) सुरवातीच्या ब) पुढच्या क) मधल्या ड) अंतिम

५) एखाद्या दीपस्तंभाप्रमाणे तत्त्वज्ञान माणसाला जीवनाची ------ दाखविते.

अ) साध्य ब) ध्येये क) कार्ये ड) कामे

## १.१.६ तत्वज्ञानाच्या शाखा :

अंतिम सत्याचा शोध घेऊन त्याच्या आधारे मानवी जीवनाचे स्वरूप व ध्येये यावर प्रकाश टाकणे हे तत्त्वज्ञानाचे कार्य पुरातन काळापासून यावर विचार केला गेला. या विचारातूनच तत्त्वज्ञानाचे विविध पंथ किंवा शाखा उदयास आल्या. त्या पुढीलप्रमाणे आहेत.




**१) अध्यात्मवाद –** भारतीय तत्त्वज्ञानाची सर्वात जुनी शाखा म्हणजे प्राचीन भारतीय अध्यात्मवाद. वेद, उपनिषदे, गीता इत्यादी हिंदू धर्मातील ग्रंथातून तत्त्वज्ञानाच्या या शाखेचा आपणास परिचय होतो. अध्यात्मवादी तत्ववेते परमेश्वराचे अस्तित्व मान्य करतात. विश्वाचा निर्माणकर्ता परमेश्वर आहे. त्याचेच सर्व विश्वावर नियंत्रण असते. जडस्वरूप विश्वापेक्षा ते चैतन्यमय विश्वाला महत्व देतात. मोक्षप्राप्ती व ईश्वरप्राप्ती हेच मानवी जीवनाचे ध्येय आहे, असे ते सांगतात.

**२) आदर्शवाद –** आदर्शवादाचा जन्म ग्रीस देशात झाला. वस्तूपेक्षा त्यामागची कल्पना श्रेष्ठ आहे असे आदर्शवादी मानतात. सत्य, शिव, सुंदर ही मानवी जीवनातील श्रेष्ठ जीवनमुल्ये आहेत. या जीवनमुल्यांच्या आधारेच मनुष्य आपले जीवन आदर्शमय व सुंदर बनवू शकतो. प्लेटो, ॲरिस्टॉटल, सॉक्रेटिस, कांट, हेगेल, फ्रोबेल हे आदर्शवादाच्या तत्त्वज्ञानाचे पुरस्कर्ते परमेश्वराचे अस्तित्व मान्य करतात.

**३) निसर्गवाद –** निसर्गवाद ही तत्त्वज्ञानाची महत्वपूर्ण शाखा आहे. रूसो, ॲडास, पर्सिनन हे निसर्गवादाचे प्रमुख पुरस्कर्ते आहेत. विश्वाचे सर्व व्यवहार निसर्गनियमानुसार चालतात. परमेश्वर आहे, ही संकल्पना निसर्गवाद्यांना मान्य नाही. ते परमेश्वराचे अस्तित्व नाकारतात. निसर्ग हाच सर्वश्रेष्ठ आहे. निसर्गनिर्मित प्रत्येक गोष्ट सुंदर, पवित्र व शुद्ध असते. असा निसर्गवाद्यांचा दावा आहे. माणसाच्या हाती आल्यावरच प्रत्येक बिघडते व अशुद्ध बनते असे त्यांचे मत आहे. रूसोला निसर्गवादाचा जनक मानला जातो.

**४) कार्यवाद –** कार्यवाद ही तत्त्वज्ञानाची आधुनिक शाखा आहे. अमेरिका ही कार्यवादाची जन्मभूमी मानली जाते. जॉन, ड्युई, किल, पॅट्रिक, विल्यम जेम्स हे कार्यवादी तत्त्वज्ञानाचे प्रमुख पुरस्कर्ते मानले जातात. कार्यवाद्यांच्या मते, सगळे विश्व हे परिवर्तनीय आहे. सत्याचे स्वरूप हे निश्चित व शाश्वत आहे, असे ते मानतात. शोलर म्हणतो, ''सत्यहे घडत आहे, अपूर्ण आहे. जगात सनातन असे काहीही नाही. सत्याच्या प्रयोगाबाबत मानवी व्यवहारच जबाबदार आहेत.''

**५) वास्तववाद –** भौतिक विश्वाला प्राधान्य देणारी तत्त्वज्ञानाची आधुनिक शाखा प्रत्यक्ष वास्तव स्वरूपातील अनुभव हेच खरे सत्य. ज्या जगात आपण राहतो, विविध प्रकारचे व्यवहार करतो, ज्याचा इंद्रियांनी अनुभव घेतो, ते जग सत्य आहे. माणसाला जसा अनुभव येतो तसेच या जगाचे स्वरूप आहे. हाच विचार वास्तववाद सांगतो. कोमेनियस हा वास्तववादी तत्त्वज्ञानाचा प्रमुख भाष्यकार वास्तववादी विज्ञानावर विश्वास ठेवतात.

**६) अस्तित्ववाद –** ही तत्त्वज्ञानाची आधुनिक शाखा होय. जीवन हेच केवळ जगणे नव्हे. माणसाच्या जीवनातील वैफल्य, नैराश्य, काळजी, चिंता नष्ट झाल्या पाहिजेत. त्याला जगण्यातला खरा आनंद मिळाला पाहिजे. हा विचार अस्तित्ववाद मांडतो. शेवटी माणसाच्या अस्तित्वाला जास्त महत्व आहे.

## १.२ शिक्षणाची संकल्पना :

### १.२.१ शिक्षणाचा अर्थ :

शिक्षणाचा बाळबोध अर्थ म्हणजे शाळेत जाणे. साक्षरता म्हणजे शिक्षण. अनेक परीक्षा पास करून पदव्या घेतलेली व्यक्ती म्हणजे शिकलेली व्यक्ती, असे शिक्षणाचे अनेक अर्थ व्यवहारात रूढ असले तरी शिक्षण म्हणजे ज्ञान किंवा विद्वता. गुरू, शिक्षक अथवा श्रेष्ठ अनुभवी व्यक्ती आपल्या शिष्यांवर संस्कार करून त्यांना मार्गदर्शन करतात व त्यांच्या वर्तनात सुयोग्य व अपेक्षित बदल घडवून आणतात. त्यावेळी त्या प्रक्रियेला शिक्षण म्हणतात.

कोमेनियसच्या मते शिक्षण माणसाला नवा आकार देऊ शकते. जॉन्सनच्या मते, शिक्षण माणसाला घडविते किंवा बिघडविते. शिक्षणाचा आशय, स्वरूप व पद्धती चांगल्या असतील तर विद्यार्थ्यांमध्ये अपेक्षित बदल दिसून येतो. ''सा विद्या या विमुक्तये।'' सर्व प्रकारच्या भौतिक व शारीरीक बंधनातून माणसाला मुक्त करते ती विद्या. शिक्षण आपल्या मनाला अंतिम सत्याचा शोध घेण्याची प्रेरणा देते.

### १.२.२ शिक्षणाचा व्युत्पत्यर्थ :

शिक्षण हा शब्द 'शिक्षू' या धातुपासून तयार झाला आहे. शिक्षू म्हणजे उपदेश करणे व बदल घडवून आणणे. या व्युत्पत्तीनुसार शिक्षकाने शिष्यांत, विद्यार्थ्यात संस्कार करून घडवून आणलेला बदल म्हणजे शिक्षण.


शिक्षणाला इंग्रजीमध्ये Education असा शब्द आहे. लॅटिन भाषेनुसार Educare = to nourish, to bring up.

पालपोषण करणे, वाढविणे, संवर्धन करणे आणि Educere = to lead out, to draw out. व्यक्तीच्या जन्मजात, सुप्त गुणांना जागृत करून, चालना देऊन त्यांचा आविष्कार करणे, विकास करणे.

### १.२.३ शिक्षणाच्या व्याख्या :

* **ऋग्वेद –** माणसाला जे आत्मविश्वासू व नि:स्वार्थी बनविते ते शिक्षण.
* **उपनिषदे –** सा विद्या या विमुक्तये ।
* **स्वामी विवेकानंद –** शिक्षण म्हणजे माणसातील दैवीशक्तीच्या पूर्णत्वाचा आविष्कार.
* **महात्मा गांधी –** शिक्षण म्हणजे माणसाच्या शरीर, मन व चैतन्यातील उत्कृष्टतेची अभिव्यक्ती.
* **प्लेटो –** शरीर व आत्मा यांना त्यांच्या पात्रतेनुसार पूर्णत्वाकडे नेणे म्हणजे शिक्षण.
* **ॲरिस्टॉटल –** शिक्षण म्हणजे सुदृढ शरीरात सुदृढ मन तयार करणे.
* **स्पेन्सर –** पूर्णत्वाने जगणे म्हणजे शिक्षण.

## १.३ शिक्षणप्रक्रियेची वैशिष्ट्ये :




**१) शिक्षण ही नैसर्गिक प्रक्रिया :** स्वाभाविकपणे प्रत्येक प्राणिमात्र जन्मल्यापासून काही ना काही शिकत असतो. निसर्गत:च माणूस हा जिज्ञासू प्राणी असल्याने तो स्वत: उत्स्फूर्तपणे ज्ञान, कौशल्य, अभिरूची, सवयी आत्मसात करीत असतो.

**२) शिक्षण ही जीवनभर चालणारी प्रक्रिया :** व्यक्तिच्या जन्मापासून शिकण्याची प्रक्रिया सुरू होते. दररोज येणाऱ्या अनुभवातून व्यक्तिच्या वर्तनात सतत बदल होत असतात. आयुष्याच्या अखेरपर्यंत माणूस येणाऱ्या अनुभवातून शिकत असतो.

**३) शिक्षण ही त्रिध्रुवात्मक प्रक्रिया :** आजकाल शिक्षक आणि विद्यार्थी या दोन घटकांबरोबरच पालक या घटकाचाही शिक्षणात विचार केला जाऊ लागला आहे. शिक्षणाची ध्येये, अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके या सर्वांचा विचार करताना पालकांनादेखील विश्वासात घ्यावे या नव्या विचाराने आताच्या जागरूक पालकांचाही समावेश शिक्षणप्रक्रियेत होऊ लागला आहे.

**४) शिक्षण ही सामाजिक प्रक्रिया :** व्यक्ती व समाज यांच्यात आंतरक्रिया घडत असते. समाजातील अनिष्ट रूढी, परंपरा, अंधश्रद्धा घालवायच्या असतील तर शिक्षणानेच मानवामध्ये परिवर्तन घडवायला हवे. समाजात राहूनच व्यक्ती स्वत:चा विकास घडवित असते. म्हणून शिक्षण ही सामाजिक प्रक्रिया आहे.

**५) शिक्षण ही स्वयंस्फूर्त प्रक्रिया :** शिक्षण कोणावरही लादता येत नाही. शिकण्यासाठी व्यक्ती शरीर व मनाने तयार नसेल तर शिक्षण शक्य नाही.

### १.४ मानवी जीवनात शिक्षणाचे महत्त्व :

मानव व मानवेतर प्राणी यांच्यात महत्त्वाचा फरक म्हणजे मानव हा विचार करणारा प्राणी आहे. मानवाने बुद्धिमत्तेच्या जोरावर आज अनेक क्षेत्रे पादाक्रांत केली आहेत. 'विद्येनेच मनुजा आले श्रेष्ठत्त्व या जगामाजि' हे कृष्णशास्त्री चिपळूणकरांचे उद्‌गार पूर्णपणे सार्थ ठरले आहेत. शिक्षणाच्या साहाय्याने मानवाने समाज, संस्कृती, धर्म, राज्यसंस्था यांची स्थापना केली. बुद्धिच्या जोरावर अनेक वैज्ञानिक शोध लावून मानव चंद्रावर पोहोचला आहे. आज नवनवीन शिक्षणाची दालने खुली होत आहेत. माहिती-तंत्रज्ञानाच्या या युगात ज्ञानाचा विस्कोट झाला आहे. चहूबाजूंनी आज मानवाला ज्ञानप्राप्ती होत आहे आणि त्यामुळेच आज तो यशाच्या शिखरावर पोहोचला आहे. औद्योगिक, सामाजिक, वैज्ञानिक, शैक्षणिक, राजकीय इ. क्षेत्रातील मानवाची प्रगती ही त्याच्या शिक्षणाचीच पोचपावती म्हणावी लागेल.

शिक्षणाशिवाय मानव पशुतुल्य समजला जातो. त्याने स्वत:चे आचारविचार यामध्ये शिक्षणाच्या सहाय्याने बदल घडवून आणलेला दिसून येतो. म्हणून मानवी जीवनात शिक्षणाला महत्वपूर्ण स्थान आहे.

### १.५ स्वयंअध्ययन प्रश्न :

**२) रिकाम्या जागा भरा -**

१. अध्यात्मवादी तत्त्ववेते परमेश्वराचे ------ मान्य करतात.

अ) स्थान ब) महत्व क) अस्तित्व ड) जागा

२. निसर्गनिर्मित प्रत्येक गोष्ट सुंदर, पवित्र व शुद्ध असते असा ------ दावा आहे.

अ) निसर्गवाद्यांचा ब) निसर्गाचा क) ईश्वराचा ड) शास्त्रज्ञांचा

३. अस्तित्ववादही तत्त्वज्ञानाची ------ शाखा होय.

अ) आधुनिक ब) माध्यमिक क) अत्याधुनिक ड) सुधारीत

४. पूर्णत्वाने जगणे म्हणजे शिक्षण असे ------ यांनी म्हटले.

अ) ऋग्वेद ब) प्लेटो क) ॲरिस्टॉटल ड) स्पेन्सर


५. शिक्षणाशिवाय मानव ------ समजला जातो.

अ) पशुतुल्य ब) पशु क) जनावर ड) प्राणी

### १.६ तत्वज्ञान व शिक्षण यांच्यातील संबंध :

तत्त्वज्ञान व शिक्षण यांच्यात अतूट असा संबंध आहे. सर जॉन ॲडम्स या शिक्षणतज्ञाच्या मते, ''शिक्षण व तत्त्वज्ञान या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.''

तत्त्वज्ञान ही वैज्ञानिक किंवा सैद्धांतिक बाजू तर शिक्षण ही क्रियात्मक बाजू आहे.




" Education is the dynamic side of Philosophy. It is the active aspect of philosophical belief, the Practical means of realising ideals of life. "

Sir John Adams

तत्त्वज्ञानाशिवाय शिक्षण आंधळे आहे व शिक्षणाशिवाय तत्त्वज्ञान पांगळे आहे. जीवनाची ध्येये तत्त्वज्ञान निश्चित करते व ती साध्य करण्यासाठी शिक्षण प्रयत्न करते.

फिष्टे या तत्त्वज्ञानाच्या मते, ''तत्त्वज्ञानाशिवाय शिक्षणाच्या कलेला पूर्णत्व येऊ शकत नाही. एकाशिवाय दुसरा अपूर्ण व अव्यवहारी आहे.''

या विचारांवरून तत्त्वज्ञान शिक्षण यातील घनिष्ट संबंध आपल्या लक्षात येईल. तसेच आपण पुढील घटकांच्या बाबतीतही हा संबंध अभ्यासणार आहोत.

**१) तत्त्वज्ञान आणि शिक्षणाची ध्येये :**

शिक्षणाची ध्येये शैक्षणिक तत्त्वज्ञानाच्या केंद्रस्थानी असतात. तत्त्वज्ञान जीवनाची ध्येये निश्चित करते आणि ती प्रत्यक्षपणे साध्य करण्यासाठी शिक्षण मदत करते. जीवनाची ध्येये शिक्षणाच्या माध्यमातून साध्य करता येतात असे म्हणतात की, शिक्षणाची ध्येये आणि मानवी जीवनाची ध्येये सुसंगत असतात.

(Aims of Education are co-relative to the ideals of life) जीवनध्येयांची व शिक्षणाच्या ध्येयांची फारकत झाल्यास शिक्षण अर्थहीन व निष्फळ होते. तत्त्वज्ञानाच्या विविध शाखांची ध्येये भिन्न आहेत. आदर्शवादात श्रेष्ठ जीवनमुल्यांचे संस्कार व मोक्षप्राप्ती, निसर्गवादात निसर्गानुसार व अनुभवजन्य शिक्षण हे प्रमुख ध्येय तर कार्यवादात कृतीतून शिक्षण (Learning by doing) हे शिक्षणाचे ध्येय सांगितले आहे.

### २) तत्त्वज्ञान आणि अभ्यासक्रम :

शिक्षणाची ध्येये साध्य करण्याचे अभ्यासक्रम हे प्रभावी माध्यम आहे. अभ्यासक्रमावर तत्वज्ञानचा प्रभाव असतो. आदर्शवादात जड, पदार्थनिष्ठ व वस्तुनिष्ठ जगापेक्षा अनुभवविश्व हे अधिक सत्य व म्हणून अधिक महत्त्वाचे मानले जाते. सांस्कृतिक पर्यावरणाचे घटक म्हणून मानल्या गेलेल्या तत्त्वज्ञान, धर्म, साहित्य, कला, नीतिशास्त्र इ. विषयांचा अंतर्भाव आदर्शवादी अभ्यासक्रमाला केला जातो. कार्यवादात कृतिकेंद्री व समाजकेंद्री अभ्यासक्रमाला महत्त्व देण्यात आले. वास्तववादाने विज्ञाननिष्ठ अभ्यासक्रमावर भर दिला तर अस्तित्ववादाने मानवाच्या अस्तित्वालाच महत्व दिल्याचे दिसून येते. निसर्गवादाच्या चार भिंतीच्या आत बालकांना शिकवू नये असे सांगून पुस्तकी, साचेबंद अभ्यासक्रमाला विरोध केला.

### ३) तत्त्वज्ञान आणि अध्यापनपद्धती :

अध्यापन प्रक्रिया अध्ययनाची सापेक्ष प्रक्रिया आहे. आदर्शवादात पाठांतर, विचार, तर्क, कल्पना, उपयोजना इ. पद्धतींना प्राधान्य मिळाले. निसर्गवादी पुस्तकी व ज्ञाननिष्ठ अध्यापनाला विरोध करतात. तर अनुभवातून शिकण्यावर भर देतात. कार्यवादी प्रत्यक्ष कृतीवर भर देतात.

### ४) तत्त्वज्ञान आणि शालेय शिस्त :

प्राचीन काळी जीवनात शिस्तीला अनन्यसाधारण महत्व होते. गुरूकुल शिक्षणपद्धतीत शिष्यांना आसमातील कडक शिस्तीचे पालन करावे लागत असे. आदर्शवादी शिक्षणपद्धती शिस्तीच्या पायावरच उभारली होती. निसर्गवादात 'निसर्ग परिणामातून शिक्षा' हा दृष्टिकोन मांडला. बालकाने निसर्गाच्या सानिध्यात राहूनच शिक्षण घ्यावे. तो जिथे चुकेल तिथेच त्याला मार्गदर्शन करावे. शिकवू नये. त्याच्या चुकीची शिक्षा निसर्गच त्याला निसर्गच त्याला देईल. असा अनिर्बंध स्वातंत्र्याचा पुरस्कार निसर्गवादाने केला. आजच्या आधुनिक शिक्षणपद्धतीत शारीरिक शिक्षा कायद्याने बंद केल्यामुळे विद्यार्थ्यांना ह्या शिस्तीच्या प्रकाराचे दडपण राहत नाही.

### ५) तत्त्वज्ञान आणि विद्यार्थी-शिक्षक :

शिक्षकाला तत्त्वज्ञानाची इतरांपेक्षा अधिक आवश्यकता असते. कारण तो समाजात नवीन पिढी घडविण्याचे काम करतो. स्वत:च्या उत्तम आचरणातून विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार करणे, त्यांचे व्यक्तिमत्त्व घडविणे ही त्याची जबाबदारी असते. म्हणूनच डॉ. राधाकृष्णन शिक्षकाला 'चैतन्याचा निधी' मानतात. तो खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांचा मित्र, मार्गदर्शक व तत्ववेत्ता असतो. तत्वज्ञान शिक्षकाला आपल्या जबाबदारीची. ज्ञानदानाचे अंगीभूत केलेल्या तत्त्वज्ञानाचा विद्यार्थ्याला त्याच्या जीवनात प्रेरणा देण्यासाठी उपयोग होतो. शिक्षकांच्या आदर्श तत्वज्ञानी विचाराने प्रेरित होऊन तोही आपल्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण चांगल्या प्रकारे करू शकेल.

## १.७ सारांश :

## १.८ स्वयंअध्ययन प्रश्न :

**दिर्घोत्तरी प्रश्न -**

१) तत्त्वज्ञान व शिक्षण यांच्या संकल्पना स्पष्ट करा.

२) “तत्त्वज्ञान व शिक्षण या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत” हे स्पष्ट करा.

३) तत्त्वज्ञान व शिक्षण यांच्यातील संबंध स्पष्ट करा.

*** टीपा लिहा :**

१) तत्त्वज्ञानाची संकल्पना

२) शिक्षणाची संकल्पना

३) तत्त्वज्ञानाचे विविध संप्रदाय

४) तत्त्वज्ञान व शिक्षणाचा अभ्यासक्रम

५) तत्त्वज्ञान व शिक्षणाची ध्येये

६) तत्त्वज्ञान व शिक्षक

**१.७ उत्तरे – स्वयंअध्ययन – १.१.५**

**१) रिकाम्या जागा.**

१) Philosophy

२) कलांची

३) डॉ. राधाकृष्णन

४) अंतिम

५) ध्येये

**२) रिकाम्या जागा भरा. – स्वयंअध्ययन – १.५**

१) अस्तित्व

२) निसर्गवाद्यांचा

३) अत्याधुनिक

४) स्पेन्सर

५) पशुतुल्य

*** संदर्भ ग्रंथ :**

१. कुंडले म. बा. (१९९४) शैक्षणिक तत्त्वज्ञान व समाजशास्त्र, श्री विद्या प्रकाशन पुणे.

२. धनवडे नंदकुमार आणि धनवडे सुरेखा (२०११) शिक्षणशास्त्र, फडके प्रकाशन,कोल्हापूर.

***

# घटक : २

# शिक्षणाची कार्ये

# Functions of Education

१.१ : शिक्षणाच्या कार्यांबाबत शिक्षणतज्ञ आणि अभ्यासक यांची भूमिका व मते

१.२ : व्यक्तिगत विकासाच्या अनुषंगाने शिक्षणाच्या कार्यातील 'ज्ञान' या पैलूचे महत्त्व.

१.३ : 'कौशल्य' या पैलूचे महत्त्व

१.४ : अभिरुची चे महत्त्व

१.५ : व्यक्तिविकासात गुणग्राहकत्त्वाचे आणि त्यान्वये रसग्रहणाचे महत्त्व

१.६ : उपसंहार

२) सांस्कृतिक वारशाचे जतन आणि संक्रमण

२.१ : संस्कृतीची संकल्पनात्मक रुपरेषा

२.२ : संस्कृतीचे स्वरुप

२.३ : संस्कृतीची ठळक वैशिष्ट्ये आणि व्याख्या

२.४ : संस्कृतीचे महत्त्व व संस्कृतीचे घटक

२.५ : संस्कृतीचे जतन, संस्कृती संवर्धन, संस्कृती संक्रमण आणि शिक्षण प्रणालीची यातील भूमिका

२.६ : संस्कृती ज्ञान, संस्कृती संवर्धन आणि संक्रमण यांच्या अनुषंगाने शिक्षणाची कार्ये

अ) ऐतिहासिक वारश्याबाबत जागृती

ब) सामाजिक प्रबोधन

क) सामाजिक अभिवृत्तींचे उन्नयन

ड) कौटुंबिक आणि अध्यात्मिक संस्कार

इ) सामाजिक मूल्यांचे उन्नयन

फ) शिक्षणाद्वारे सामाजीकरण

ग) परंपरा, मूल्ये आणि रुढींची डोळस चिकित्सा

य) संस्कृतीच्या जतन, संवर्धन आणि संक्रमणासाठी शैक्षणिक अभ्यासक्रमाची रचना

र) धार्मिकतेचा विकास

ल) संस्कृतीच्या संवर्धनात आणि संक्रमणात शिक्षकाचे योगदान

व) सांस्कृतिक परिवर्तन आणि शिक्षण

**२.७ : उपसंहार**

**३) मानवी मूल्यांचा विकास**

३.१ मानवी मूल्यांची संकल्पना

३.२ मानवी मूल्यांचे स्वरुप

३.३ मूल्यांची गरज आणि महत्त्व

३.४ सामाजिक मानवी मूल्ये

३.५ नैतिक मानवी मूल्ये

३.६ सौंदर्यविषयक मानवी मूल्ये

३.७ मूल्यांधिष्ठित व्यक्तिमत्त्व विकास आणि शिक्षण

३.८ मूल्य संवर्धनातील शिक्षणाची कार्ये

३.९ मूल्यांच्या रुजवणुकीसाठीचा शैक्षणिक अभ्यासक्रम

३.१० मानवी मूल्यांच्या विकासामध्ये शिक्षकांचे योगदान

३.११ उपसंहार

अ) व्यक्तिगत विकास (ज्ञान, कौशल्य, अभिरुची, गुणग्राहकता)

ब) सांस्कृतिक वारशाचे जतन आणि संक्रमण

क) मानवी मूल्यांचा विकास (सामाजिक, नैतिक आणि सौंदर्यविषयक)

**उद्दिष्टये :**

१) शिक्षण प्रणालीच्या कार्याबाबतची शिक्षणतज्ञांची आणि अभ्यासकांची मते समजावून घेण्यास विद्यार्थ्यांना मदत करणे.

२) बालकांच्या शारीरिक, भावनिक आणि मानसिक विकासाच्या अवस्थेमध्ये शिक्षणाच्या भूमिकेविषयीची माहिती विद्यार्थ्यांना अवगत करुन देणे.

३) शिक्षणाद्वारे होणाऱ्या व्यक्तिगत विकासामध्ये गरज असणाऱ्या ज्ञान, कौशल्य, अभिरुची आणि गुणग्राहकता इत्यादी पैलूंविषयीचे ज्ञान आत्मसात करण्यास विद्यार्थ्यांना सहाय्य करणे.

४) 'सांस्कृतिक वारसा जोपासणे व संक्रमित करणे' या शिक्षणाच्या कार्याविषयीचे ज्ञान संपादन करण्यास विद्यार्थ्यांना मदत करणे.

५) ज्ञान, कौशल्य, अभिरुची आणि गुणग्राहकता आणि संस्कृतीविकास आदी व्यक्तिविकासासंदर्भातील घटकांचे आणि शिक्षणाच्या कार्यांचे सहसंबंध समजावून घेण्यास व संश्लेषण करण्यास विद्यार्थ्यांना मदत करणे.

६) शिक्षणाचे व्यक्तिगत विकाससंबंधीचे, सांस्कृतिक विकासाच्या तसेच मानवी मूल्यांच्या संवर्धनाच्या अनुषंगाने जे कार्य घडते त्याचे विश्लेषण करण्याचे कौशल्य विद्यार्थ्यांमध्ये रुजविणे.

७) शिक्षणाच्या कार्यांचे दैनंदिन आणि व्यवहारी जीवनात उपयोजन करण्याबाबत विद्यार्थ्यांना मदत करणे.

८) सामाजिक, नैतिक आणि सौंदर्यविषयक मानवी जीवन मूल्ये समजावून घेण्यास विद्यार्थ्यांना मदत करणे.

९) व्यक्तिगत विकास, सांस्कृतिक विकास आणि मूल्यात्मक विकास या शिक्षणाच्या महत्त्वाच्या कार्याविषयी विद्यार्थ्यांमध्ये आवड निर्माण करणे.

१०) शिक्षणाची कार्ये या घटकासंदर्भातील प्रश्नांचे मूल्यमापन करण्याचे कौशल्य विकसित करणे.

११) शिक्षणाच्या विविधांगी कार्याचे पूर्णतः आकलन घडवून आणण्यास विद्यार्थ्यांना मदत करणे.

१२) 'शिक्षणाचे कार्ये' या प्रकरणाचे स्वयंकृतीतून स्वयंअध्ययन यशस्वीरित्या घडण्यासाठी मदत करणे.

१३) शिक्षणाच्या कार्यांचा महत्त्वाचा भाग सारांश रुपाने आत्मसात करण्यास विद्यार्थ्यांना सहाय्य करणे.

**टीप** : शिक्षणाची कार्ये या घटकाचे पूर्णतः स्वयंअध्ययन केल्यास विद्यार्थ्यांच्या अनुषंगाने उपरोक्त उद्दिष्टांची पूर्ती घडून येईल.

**प्रस्तावना :**

**१) शिक्षणाच्या कार्याची कल्पना**

जगातील निरनिराळ्या काळातील व विविध राष्ट्रांमधील शिक्षणाचा इतिहास आपण पाहिला तर असे दिसून येईल की, तत्कालीन परिस्थितीला अनुरुप असे आणि तत्कालीन अस्तित्वात असलेल्या जीवन तत्वज्ञानाला अनुसरुन शिक्षण देण्यात येई. मागील पाठामध्ये याच अनुषंगाने आपण तत्त्वज्ञान आणि शिक्षण यांच्या संकल्पना, तत्त्वज्ञानाचे व शिक्षणाचे स्वरूप, महत्त्व, शिक्षणाची ध्येये, अभ्यासक्रम, अध्यापन पद्धती, शालेय शिस्त आणि गुरु-शिष्य संबंध याबाबींच्या अनुषंगाने शिक्षण व तत्त्वज्ञानाचा सहसंबंध अभ्यासला. तत्त्वज्ञान व शिक्षण यांच्यात अतूट असा संबंध आहे. शिक्षण व तत्त्वज्ञान या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. तत्त्वज्ञान ही सैद्धांतिक बाजू किंवा वैचारिक भाग तर शिक्षण ही कृतीशील क्रियात्मक बाजू आहे. शिक्षणाच्या कार्यांच्या अभ्यासातून शिक्षणाची ही क्रियात्मक बाजू विद्यार्थ्यांना समजू शकेल.

शिक्षण ही मानवाची अपरिहार्य गरज आहे. कारण सर्वांगसुंदर आणि परिपूर्ण व्यक्तिमत्त्व विकासासाठी शिक्षणाची आवश्यकता आहे. औपचारिक, अनौपचारिक, न-औपचारिक आणि सहज शिक्षणाच्या माध्यमातून मानवी जीवनाला नेटका आकार देण्याचे महत्तम कार्य शिक्षणच करत असते. शिक्षण एक सदिश कृती आहे. मात्र ध्येयाविना केलेली कोणतीही कृती निरर्थक असते. ध्येयांचा दीपस्तंभ समोर असेल तरच जीवनरुपी भवसागर यशस्वीपणे पार करता येतो. ध्येयांविना केला गेलेला कोणताही प्रवास दिशाहीन ठरतो. शिक्षणाचे देखील असेच आहे. शिक्षणाला ध्येयांची गरज तर असतेच पण याच शैक्षणिक ध्येयांमधून निर्माण झालेली शिक्षणाची कार्ये शिक्षक-विद्यार्थी-पालक यांना अवगत असणे नितांत आवश्यक आहे. या पाठांमध्ये आपण शिक्षणाची कार्ये अभ्यासणार आहोत.

**आशय विवेचन :**

**१) शिक्षणाच्या कार्याची संकल्पना :**

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्याचे शिक्षण एक प्रभावी साधन आहे. बालकाचा शारीरिक, बौद्धिक, भावनिक, मानसिक, सामाजिक, सांस्कृतिक, नैतिक आणि अध्यात्मिक विकास करणे हेच शिक्षणाचे मूलभूत ध्येय आणि कार्य आहे. सकारात्मक अशा अपेक्षित वर्तन बदलास शिक्षण म्हणतात. देशाचे भावी नागरिक घडविण्याचे सत्कार्य शिक्षणाच्या प्रक्रियेतून साधले जाते. सामाजिक परिवर्तनाचे आणि राष्ट्रविकासाचे प्रमुख साधन म्हणजे शिक्षण होय. शिक्षणाची कार्ये विचारात घेताना आपण शिक्षण नेमकेपणाने काय करु शकते? या प्रश्नाची चर्चा करणार आहोत. जैन ड्युईच्या शब्दात, ''शिक्षणाचे कार्य, असहाय्य अशा विकसनशील तरुण प्राण्याच्या आनंदी, नीतिमान आणि कार्यक्षम अशा मानवात होणाऱ्या रुपांतराला मदत करणे असे आहे.'' म्हणजेच बालकाला स्वत्वाची जाणीव करुन देणे आणि त्यान्वये त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करणे आणि समाजविकासासाठी समर्थ बनविणे हे शिक्षणाचे

कार्य म्हणावे लागेल. म्हणूनच स्वामी विवेकानंदांच्या मते, ''शिक्षणाचे ध्येय मानव निर्माण करणे,'' हे यथार्थ वाटते.

शिक्षणाच्या ध्येयांमध्ये आणि कार्यांमध्ये फरक करणे जरा कठीण आहे. शिक्षणाची कार्ये आणि ध्येये यांच्यात फरक दर्शविणारी रेषा आखणे ही क्लिष्ट बाब आहे. शिक्षणाची कार्ये आणि ध्येये परस्परांमध्ये इतक्या निकटतेने एकत्र गुंतलेली आहेत की, एकासाठी दुसऱ्याचा वापर केला जातो. शिक्षणाचे कार्य, बालकाला स्वतःविषयी विचार करण्यास, श्रमाची प्रतिष्ठा राखण्यास, शाश्वत मूल्यांवर गाढ श्रद्धा आणि विश्वास ठेवण्यास आणि चांगला माणूस बनण्यास समर्थ बनविणे असेच आहे. सर पर्सीनन यांच्या मते, ''शिक्षण प्रणालीच्या यशाचे मूल्यमापन करताना त्या शिक्षण प्रणालीने व्यक्तीच्या उत्कृष्टतेला विकसित करण्यास किती चालना दिली याचा विचार केला जातो.''

याचाच अर्थ शिक्षणाची फलनिष्पत्ती ही विचारपूर्वक ठरवलेली शिक्षणाची ध्येये आणि त्यातून प्रत्यक्षात अवतरलेली शिक्षणाची कार्ये यावर अवलंबून आहे.

### १.१ शिक्षणाच्या कार्यांबाबत शिक्षणतज्ज्ञ आणि अभ्यासक यांची भूमिका व मते :

शिक्षणाच्या माध्यमातून मानवाने स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास घडवून आणला आहे. सुसंघटीत व्यक्तिमत्त्वे साकारण्यामध्ये शिक्षणाची भूमिका अमुलाग्र अशीच आहे. आज माहिती-तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षणाचा प्रसार झपाट्याने होत चालला आहे. शिक्षण प्रणालीच्या नानाविध दालनांमधून ज्ञान आणि माहितीचे अनेक स्त्रोत निर्माण झाले आहेत. सर्वत्र शिक्षणाचे खुले वारे वाहत आहे. या शिक्षणाच्या अवकाशामध्ये मानवांचा मुक्त संचार सुरुच आहे. रवींद्रनाथ टागोर यांच्या मते, ''खरे शिक्षण तेच की जे केवळ माहिती देत नाही तर आपल्या जीवनाचा संपूर्ण जीवनाशी संबंध प्रस्थापित करते.'' एम.एल. जॅक्स यांच्या मते, वैश्विक मानवी मूल्यांवर नितांत श्रद्धा असणारा सद्‌गुणी माणूस घडविणे हेच शिक्षणाचे कार्य आहे. डॅनिअल वेबस्टर यांच्या मते, ''अशा परिस्थितीत शिक्षणाद्वारे आपणाला भावना शिस्तबद्ध करावयाच्या आहेत, क्रोधाला आवर घालायचा आहे, खऱ्या आणि मौलिक प्रेरणांना स्फूर्ती द्यायची आहे, अंतःकरणातील खोल धार्मिक भावना हळूहळू मनात भरवावयाच्या आहेत आणि शुद्ध नैतिकता मनावर, बिंबवावयाची आहे.''

शिक्षणाद्वारे माणसाच्या सर्व शक्तींचा नैसर्गिक, सुसंगत, प्रगतशील विकास घडवून आणणे हेच शिक्षण आहे असे पेस्टॉलॉजीचे मत आहे. ॲरिस्टॉटलच्या मते, शिक्षणाने सुदृढ शरीरात सुदृढ मन तयार झाले पाहिजे. शिक्षण विशेषतः मानवी मनाची अशी शक्ती विकसित करते की तो माणूस सत्य, शिव व सौंदर्य हे सर्वोच्च विचार असणाऱ्या पूर्ण आनंदाचा अनुभव घेऊ शकतो. श्री. अरविंद घोष म्हणतात की, ''अंतर्आत्म्याचा विकास करण्यासाठी मदत करणे म्हणजे शिक्षण.'' डॉ. राधाकृष्णन शिक्षणाच्या कार्यावर प्रकाश टाकताना म्हणतात, ''शिक्षण म्हणजे केवळ बौद्धिक धडाडी नव्हे, माणसाच्या विविध प्रवृत्ती आणि भावना यांना परिस्थितीनुरूप सुसंस्कृत वळण लावणे म्हणजे शिक्षण होय.'' अशा प्रकारे

भारतातील व पाश्चिमात्य जगतातील अनेक अभ्यासकांनी तत्वचिंतकांनी आणि शिक्षणतज्ज्ञांनी शिक्षणाची संकल्पना व व्याख्या सांगताना खऱ्या अर्थाने शिक्षणाच्या कार्याविषयी भूमिका विषद केली आहे. शिक्षणाद्वारे नेमके कोणते कार्य अभिप्रेत आहे हे यातून स्पष्ट होते.

**१.२ व्यक्तिगत विकासाच्या अनुषंगाने शिक्षणाच्या कार्यातील 'ज्ञान' या पैलूचे महत्त्व :**

ज्ञानदान आणि ज्ञानार्जन या दोन्ही प्रक्रिया परस्परपूरक आहेत. दुसऱ्यास बोधामृत पाजण्यासाठी किंवा ज्ञानदान करण्यासाठी प्रथमतः आपण स्वतः ज्ञानार्जन करणे नितांत आवश्यक आहे. त्यामुळेच डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन म्हणतात की, 'ज्ञानदान करणाऱ्याने सतत ज्ञानार्जन करणे गरजेचे असते. सातत्यपूर्ण औपचारिकरित्या अथवा अनौपचारिकपणे ज्ञान ग्रहण केल्याने व्यक्तिमत्त्व परिपूर्ण होत जाते. ज्ञानार्जन ही एक आनंददायी व अविरत चालणारी अखंडित प्रक्रिया आहे. सातत्यपूर्ण सर्वंकष विकास हेच ज्ञानग्रहणाचे उद्दिष्ट आहे.' मानवाच्या ज्ञान इतिहासापासून म्हणजे आदिमानव अवस्थेपासून ज्ञानग्रहणाची विकासात्मक प्रक्रिया सुरूच आहे. आधुनिक काळात ज्ञानाच्या कक्षा अधिकाधिक रुंदावल्या असून विविध क्षेत्रांत संशोधन सुरुच आहे. त्यामुळे ज्ञानाचा प्रस्फोट घडून येत असतो. शिक्षण प्रक्रियेने आपले मूलभूत कार्य म्हणून हे नवज्ञान विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. शिक्षण हे ज्ञानाच्या सर्वकक्षांना निगडीत असले पाहिजे.

ज्ञानदान हे शिक्षणाचे प्रथम कार्य आहे. मानवी जीवनात ज्ञानाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. ज्ञानाविना मनुष्य पशुतुल्य आहे. 'न ही ज्ञानेने सदृशं पवित्रमिह विद्यते' असे संस्कृतमध्ये वचन आहे. ज्ञानासारखे पवित्र दुसरे काही नाही. ज्ञानाने मनुष्य विचारवंत बनतो. व्यक्तिगत विकासासाठी ज्ञानाची आवश्यकता आहे. ज्ञानाची क्षितिजे निरंतर विस्तारत आहेत. रोज नित्य नव्या ज्ञानाची प्राप्ती करून व्यक्तीचे जीवन ज्ञानसमृद्ध करणे हे शिक्षणाचे महत्तम कार्य आहे. केवळ माहितीच्या रुपाने सैद्धान्तिक ज्ञान विद्यार्थ्यांना देणे एवढेच शिक्षणाचे कार्य नसून ज्ञानाच्या संक्रमणाबरोबर उपयोजनाचे कौशल्य विद्यार्थ्यांच्या अंगी रुजविणे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. व्यक्तिमत्त्व विकासात अनुभवजन्य ज्ञानाला फार महत्त्व आहे. असे अनुभवजन्य ज्ञान की जे व्यक्तीला कृतीशील, कार्यक्षम आणि अनुभवसमृद्ध बनविते, ते देणे हे व्यक्तिगत विकासातील शिक्षणाचे कार्य आहे. व्यक्तीच्या जीवनातील अज्ञानरुपी अंधकार नष्ट करुन ज्ञानरुपी प्रकाशाने व्यक्तीचे जीवन उजळून निघाले पाहिजे. व्यक्तीने संपादन केलेल्या ज्ञानाचा सकारात्मक, विधायक आणि रचनात्मक उपयोग करणेसुद्धा नितांत गरजेचे असते. आपल्या ज्ञानाचा विधायक कार्यासाठी, समाज आणि राष्ट्र यांच्या भल्यासाठी उपयोग करण्यातच त्या व्यक्तीचे आणि ज्ञानाचे मोठेपण आहे. (Knowledge is a Virtue) असे सॉक्रेटिस म्हणतो, तर (Knowledge is a Power) असे बेकन म्हणतो.

२१ व्या शतकात विज्ञानयुगात तर ज्ञानाच्या या विस्फोटातून असंख्य ज्ञानमोती बाहेर पडत आहेत. ''देता किती घेशील दो कराने'' या अवस्थेतून आता ''घेता घेता एक दिवस देणाऱ्याचे हात घ्यावे'' अशी मानवाची अवस्था झाली आहे. माहिती तंत्रज्ञान, दळणवळण, संप्रेषण, अंतराळ संशोधन या क्षेत्रांतील

क्रांतीमुळे संगणक शिक्षण हे अत्यावश्यक ठरत आहे. म्हणूनच सर्वांगीण ज्ञानाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे.

### १.३ 'कौशल्य' या पैलूचे महत्त्व :

'कौशल्याधिष्ठित' व्यक्तिगत विकास साधणे हे शिक्षणाच्या माध्यमातून अपेक्षित आहे. सुखी आणि यशस्वी जीवनासाठी व्यक्तीला कौशल्यांची गरज आहे. 'कार्यवाद' या तत्त्वज्ञानाच्या संप्रदायानुसार शिक्षण कृतीला जन्म देतेच असे नाही. मात्र कृती केल्याने जो अनुभव व्यक्तीला प्राप्त होतो त्यातूनच खऱ्या अर्थाने शिक्षण जन्म घेते. प्रतिकूल अशा परिस्थितीशी संघर्ष करुन आपली प्रगती करुन घेण्यामध्ये मानवी समुदायाला नेहमीच नानाविध कौशल्यांची गरज भासली आहे. म्हणूनच शिक्षणाने विद्यार्थ्यांना 'कौशल्ये' प्राप्त करण्यास सक्षम बनविले पाहिजे. केवळ पुस्तकी व शब्दनिष्ठ ज्ञान व्यक्तिगत विकासासाठी पुरेसे नसते, तर ज्ञानाचे प्रत्यक्षपणे उपयोजन करण्याचे कौशल्य ज्ञानप्राप्ती इतकेच महत्त्वाचे आहे. उदाहरणार्थ : पाककलेचे किंवा स्वयंपाकाचे नुसते ज्ञान असून चालत नाही तर स्वयंपाक रुचकर करण्याचे कौशल्य आत्मसात करणे महत्त्वाचे आहे. पोहण्याच्या कलेचे नुसते सैद्धान्तिक व पुस्तकी ज्ञान असून भागत नाही तर प्रत्यक्ष पाण्यात उतरून हाता-पायांची योग्यपणे हालचाल करण्याचे, पाण्यात तरंगत राहण्याचे व श्वास रोखण्याचे अथवा गरजेनुसार श्वास सोडण्याचे, नाकातोंडात पाणी जाऊ न देण्याचे कौशल्य आत्मसात करावे लागते तरच व्यक्तीला पोहता येते.

व्यक्तिगत विकासासाठी माणसाने विविध कौशल्ये प्राप्त करण्याचा सातत्यपूर्ण प्रयास केला पाहिजे आणि शिक्षणाने कौशल्यप्राप्तीसाठी ज्ञान, प्रयोगशीलता, प्रशिक्षण, आवश्यक सुविधा आणि आर्थिक तरतूद यांची गरज असते. वक्तृत्व, संभाषण, वैचारिक लेखन, आकडेमोड, हिशोब, संगणकाचे संचलन, उपकरणांची दुरुस्ती अशा प्रकारची कौशल्ये विद्यार्थ्यांना स्वावलंब व आत्मनिर्भर बनवितात. नक्षीकाम, शिल्पकला, चित्रकला, रांगोळी, मेहंदी, फोटोग्राफी यांसारखे कलात्मक आणि व्यावसायानुरुप अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना अर्थार्जन करण्यास सहाय्यभूत ठरतात.

### १.४ व्यक्तिगत विकासामध्ये अभिरुचीचे महत्त्व :

शिक्षणाच्या माध्यमातून अभिरुची संपन्न अशी व्यक्तिमत्त्वे साकारणे हे देखील शिक्षणाचे महत्त्वाचे कार्य आहे. उच्च दर्जाच्या अभिरुची माणसाला सुसंस्कृत व गुणवान बनवितात. याउलट हीन प्रकारच्या आवडी माणसांतला पशू जागा करतात. व्यक्तीच्या अभिरुची त्या व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व विकसित करण्यास कारणीभूत ठरतात. साहित्य, संगीत, कला आणि क्रीडा क्षेत्रात अभिरुची असलेली व्यक्तिमत्त्वे समाज जीवनास उपकारक असतात. म्हणून शालेय जीवनात चांगल्या अभिरुचींची रुजवणूक होणे गरजेचे असते. आहार-विहार, कार्यक्षेत्र, छंद व फुरसदीच्या वेळेचा अभिरुची संपन्न सदुपयोग याबाबतीत व्यक्तीने जागरुक व निवडक असले पाहिजे. रिकामा वेळ कारणीभूत लावण्याची पद्धती या संदर्भातील व्यक्तीच्या अभिरुची व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व विकसित करण्यास मदत करतात. ''तुमच्या देशातील तरुणांच्या ओठावरची गाणी सांगा मी तुम्हाला तुमच्या देशाचे भवितव्य सांगतो.'' असे एक विचारवंत तरुणांच्या आवडीनिवडी

विषयी टिपण्णी करताना बोलतात. आपल्या अभिरुची आपल्या व्यक्तिमत्त्वाचा आरसा असतात.

अभिरुची म्हणजेच आवड. आपल्याला ज्या गोष्टी आनंदाने कराव्याशा वाटतात, आवडीने जोपासाव्या वाटतात, त्यांनाच अभिरुची म्हणतात. व्यक्ती, वस्तू व घटना यांकडे पाहण्याचा कल किंवा दृष्टीकोन म्हणजेच अभिरुची होय. वाचन, लेखन, निरीक्षण, पर्यटन, संकलन यातून विद्यार्थ्यांमध्ये कलाभिरुची, सौंदर्यदृष्टी आणि रसिकता यांचा विकास करण्यासाठी साहित्य, ललितकला, हस्तकला, अभिनय, साहसी खेळ आणि निसर्गभेटी अशा स्वरूपात चांगल्या अभिरुचींची रुजवणूक करणे, त्या वृद्धींगत करणे आणि संवर्धन करणे हेच शिक्षणाचे अभिरुची संदर्भातील कार्य आहे.

## १.५ व्यक्तिगत विकासात गुणग्राहकत्त्वाचे आणि त्यान्वये रसग्रहणाचे महत्त्व :

गुणग्राहकत्व हा सद्‌गुण चांगल्या व सुसंघटीत व्यक्तिमत्त्वाचा भाग आहे. सुशिक्षित आणि सुसंस्कृत तथा अभिरुचीसंपन्न माणसाचे एक ठळक लक्षण म्हणजे गुणग्राहकता. गुणग्राहकतेचा उल्लेख रसग्रहण असाही करता येतो. कारण एखाद्या गोष्टींमधील गुण ओळखून ते ग्रहण करुन त्याचा गुणगौरव करावयाचा झाल्यास 'रस', 'सौंदर्य' आणि 'शाश्वत मूल्य' टिपावयाचे कौशल्य व्यक्तीजवळ असणे आवश्यक आहे. सौंदर्यप्रेमी व स्वच्छ माणसाचे ते वैशिष्ट्य आहे. साहित्य, संगीत, कला, क्रीडा, नृत्य, शिल्प, अभिनय, साहसी कृती, स्वयंपाक अशा वैविध्यपूर्ण क्षेत्रांत आवड घेऊन त्यातून आपल्या आवडीचे क्षेत्र निवडून त्यामधील 'कला-कौशल्य' आत्मसात करणे ज्याला जमेल त्या व्यक्तीकडे रसग्रहण म्हणजेच गुणग्राहकत्व हा गुण आहे असे आपणास म्हणता येईल.

विद्यार्थ्यांची गुणग्राहकता वाढविणे हे शिक्षणाचे कार्य आहे. यासाठी शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठे यातून विविध वाङमय-साहित्य मंडळे, वाचक मंडळे, गणित-विज्ञान मंडळे, ललितकला मंच, वक्तृत्व विकास मंच, पर्यटन व भूगोल मंच यांची स्थापना होणे व ती कार्यान्वित करणे गरजेचे आहे. वादविवाद मंडळ आणि नाट्य मंडळ यांच्यातून भावी अभिनेते व नेते घडू शकतात. वृत्तीची निखळता, निरागसपणा, मनाचा मोकळेपणा, समीक्षक वृत्ती आणि सखोल अभ्यास हे कोणत्याही क्षेत्रातील रसग्रहणासाठी आवश्यक आहे. पोटार्थी, द्रव्यलोभी, स्वार्थी, संकल्पित विचारांची माणसे कोणत्याच गोष्टीचे यथार्थ रसग्रहण करु शकत नाहीत. शिक्षणाने विद्यार्थ्यांची निकोप रसग्रहण क्षमता विकसित केली पाहिजे.

## १.६ उपसंहार :

मानवाच्या कृतीला अथवा वर्तनास प्रेरणा देणारे अथवा दिशा दर्शविणारे पूर्वनियोजित केलेले अंतिम लक्ष म्हणजे ध्येय होय. सुनिश्चित ध्येयांमधूनच यशस्वी कार्य निर्माण होत असते. शिक्षणप्रणालीद्वारे सुस्पष्ट ध्येयांच्या माध्यमातून वैशिष्ट्यपूर्ण आणि नियोजनबद्ध कार्य घडणे अपेक्षित आहे. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास करताना ज्ञान, कौशल्य, गुणग्रहण, अभिरुची आदी पैलूंवर अधिकाधिक भर दिला गेला पाहिजे. चारित्र्य संवर्धन, नैतिक उन्नती, शरीर संपदा, सामाजिकरण, उत्पादनक्षमता, स्वावलंबन, मानसिक व वैचारिक विकास, सौंदर्याविष्कार व कलात्मकता, मूल्यांधिष्ठीत तत्वप्रणाली, नागरिकत्वाची

जाणीव आणि नेतृत्वक्षमता या पैलूंचा क्रमबद्ध, सूत्रबद्ध आणि नियोजनपूर्वक विकास करणे हे शिक्षणाचे कार्य आहे.

शिक्षण ही बालकाच्या जन्मापासून तर मरेपर्यंत चालणारी अखंड प्रक्रिया असते. ती केवळ शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठे यांपर्यंतच मर्यादित किंवा विशिष्ट स्थितीपर्यंत सीमित नसते. शाळेप्रमाणेच माणूस घरीदारी, समाजात, जीवनात सातत्यपूर्ण आणि आणि सर्वत्र शिकतच असतो. विद्यार्थी मित्रहो! यावरून असे म्हणता येईल की, शिक्षण ही केवळ ज्ञानात्मक पातळीवर चालणारी क्रिया मुळीच नसते. शारीरिक आणि भावनिक पातळीवर व्यक्तीचा जो काही विकास होत असतो, त्याचाही समावेश शिक्षणातच होत असतो. औपचारिक, अनौपचारिक आणि सहज शिक्षणावरच्या माध्यमातून व्यक्तिगत विकास करण्याचे कार्य शिक्षण करत असते.

जीवन जगत असताना व्यक्तीला अनेकविध अनुभव येत असतात. याचाच अर्थ असा की, शाळेव्यतिरिक्त घर, शेजारपाजार, समाजातील लोक आणि सामाजिक संस्था या मधूनही शिक्षणाचे व्यक्तिगत विकासाचे कार्य अव्याहतपणे सुरुच असते. व्यक्तिभिन्नतेला वाव देऊन व्यक्तिमत्वाचा आणि व्यक्तिमत्वाचा शिक्षण प्रक्रियेचे महत्तम असे कार्य आहे.

**घटक – २ शिक्षणाची कार्ये :**

उपघटक – १) व्यक्तिगत विकास (ज्ञान, कौशल्य अभिरुची, गुणग्राहकत्व)

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न :**

१) शिक्षणाच्या विविध कार्यांबाबतची शिक्षण तज्ज्ञांची मते सांगा.

२) व्यक्तिगत विकासात 'ज्ञान' या पैलूचे महत्त्व सांगा.

३) व्यक्तिगत विकासात कौशल्यांना काय महत्त्व आहे?

४) रसग्रहणाचे महत्त्व अधोरेखित करा.

५) अभिरुचीचे महत्त्व सांगून अभिरुचीचे स्वरुप स्पष्ट करा.

**दृढीकरणासाठी कृती :**

शिक्षणाच्या कार्याविषयीची पार्सीनन, जॉन ड्युई आणि डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची मते सांगा.

**महत्त्वाचा भाग :**

शिक्षणाच्या कार्याविषयी एम.एल.जैक्स, डॅनिअल वेबस्टर, जॉन ड्युई, रुसो, पार्सिनन यांची मते, व्यक्तिगत विकासात ज्ञान, कौशल्य, अभिरुची व गुणग्राहकत्व यांचे महत्त्व.

## २) सांस्कृतिक वारशाचे जतन आणि संक्रमण :

**प्रस्तावना :**

सामाजिक सभ्यता आणि संस्कृतीचे संवर्धन घडवून आणणे हे शिक्षणाचे कार्य आहे. मानवी मनावर स्थळ, काळ आणि प्रसंगानुरुप प्रभाव पडून मूल्यात्मक जडण-घडणीमध्ये बदल घडणे हाच संस्कृतीचा विकास समजला जातो. शिक्षणातून सद्‌गुणांची रुजवणूक झाली पाहिजे; पण त्याच बरोबर समृद्ध जीवनाचा विकासही झाला पाहिजे. या जीवन समृद्धीसाठी सांस्कृतिक जडण-घडण मूल्यांशी आणि व्यवहारातील प्रतिमानांशी तरुण व क्रियाशील सदस्यांना अवगत करणे हे शिक्षणाचे कार्य आहे. जुन्या रुढी, चालीरिती, परंपरा यामध्ये कालसंगत सुधारणा करणे आणि नवीन विचारांना उजाळा देऊन त्यांचे सर्वधन करणे आवश्यक असते.

व्यक्ती समाजात राहत असल्याने त्यांचा समुदाय तयार होतो. त्या समुदायाची एक वेगळी संस्कृती तयार होते. अशा समाजाच्या संस्कृतीमध्ये काही परंपरा, आदर्श, मूल्ये, नीतितत्त्वे सामाजिक आचरणाचे नियम भाषिक व्यवहार इत्यादी पैलू समाविष्ट असतात. या सर्वांचे ज्ञान शाळेमधून समाजाला मिळत असते. शालेय, सहशालेय व शाळाबाह्य उपक्रमांमधून तसेच विद्यार्थ्यांच्या सक्रिय सहभागाने संस्कृतीचे जतन, संक्रमण व संवर्धन होण्यास मदत होत असते. शाळा ही एका अर्थाने समाजाच्या संस्कृतीचे रक्षण करीत असते.

### २.१ संस्कृतीची संकल्पनात्मक रुपरेषा :

मानवी समुदाय आणि त्याची वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती हे माणसाचे व्यवच्छेदक लक्षण आहे. मानवाशिवाय इतर प्राणीमात्रांना संस्कृती नाही. संस्कृती ही अशी एक व्यापक संपूर्णता आहे की ज्यामध्ये मानवी समाजाचा एक घटक म्हणून माणसाने आत्मसात केलेल्या आदर्शांचा, मूल्यांचा, रुढी व परंपरांचा, राहणीमानाचा, जीवन व्यवहारांचा व धार्मिक अध्यात्मिक निष्ठांचा तसेच वांशिक-ऐतिहासिक पैलूंचा समावेश होतो. प्राचीन काळापासून म्हणजेच माणसाच्या ज्ञात इतिहासापासूनचे 'सांस्कृतिक संचित' हा आखिल मानवजातीचा महान ठेवा आहे. संस्कृतीचे जतन, संवर्धन आणि संक्रमण हे शिक्षणाचे महत्त्वाचे कार्य आहे.

प्रत्येक राष्ट्राला स्वतःची एकमेव आणि अद्वितीय अशी संस्कृती असते. जगभरात प्रत्येक राष्ट्र-समुहाची, धर्माची आणि भौगोलिक परिस्थितीला साजेशी अशी वैशिष्ट्यपूर्ण सांस्कृतिक रचना अस्तित्वात असल्याचे आढळून येते. आपल्या देशाची संस्कृती 'विविधतेत एकता' हा ठळक गुण दर्शविते. भारतीय संस्कृती जगातील महान संस्कृतीपैकी एक मानली जाते. भारतीय संस्कृती ही सर्वसमावेशक, सहिष्णू आणि उदारमतवादी आहे. दया, क्षमा, शांती व त्याग यावरच भारतीय समाजाची संस्कृती आधारीत आहे. 'भोगापेक्षा' त्यागावर प्रेम करणारी आपली संस्कृती आहे. भारतीय समाज हा सेवाभावी, धार्मिक आणि सर्वांना आपलेसे करणारा आहे. याउलट जगातील काही राष्ट्रांमधील समाज आणि संस्कृती आक्रमक वांशिक भेदावर आधारलेली, असहिष्णू आणि निर्दयी असल्याचे दिसून येते. पाश्चिमात्य संस्कृती आणि भारतीय संस्कृती यांच्यामध्ये

काही बाबतीत भेद आढळून येतो. पाश्चिमात्य संस्कृतीमधील आदर्श, मुल्ये, रुढी व परंपरा तसेच नैतिकता यांच्यात वेगळेपण जाणवते. वर्तनातील अवाजवी 'खुलेपणा' पाश्चिमात्य संस्कृतीत दिसतो.

समाज आणि संस्कृती यांच्या प्रभावातूनच व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व साकार होते. व्यक्तिगत विकासावर समाज आणि संस्कृतीचा प्रभाव पडतो. नैसर्गिक भौगोलिक, आर्थिक आणि राजकीय घटक संस्कृतीची वैशिष्ट्यपूर्ण बांधणी करतात. भारताला सुद्धा अतिप्राचीन काळापासूनची सांस्कृतिक परंपरा आहे. या परंपरेतील काही गोष्टी आजही आपणास आदर्श आणि उपयुक्त आहेत. 'प्रज्ञा, शील, करुणा' आणि 'सत्यं, शिवं व सुंदरम्' अशी भारतीय संस्कृतीची ओळख जगभरात आहे. हा सामायिक वारसा सांस्कृतीक ठेवा जपणे हे मूलभूत कर्तव्य आहे.

## २.२ संस्कृतीचे स्वरूप :

मानवाच्या अनमोल अशा अनुभवातूनच मानवी विचारांचा आणि वर्तनाचा दर्जा उंचावत गेला. मानवी मनाला संस्कारांची देण याच सकारात्मक अनुभवांतून मिळाली. मानवी सौंदर्य आणि भावना यांच्या एकात्म बांधणीमधून संस्कृती साकार झाली. संस्कृतीची व्याप्ती अगाध व फार मोठी आहे. प्राचीन काळाच्या प्रदीर्घ व परिपक्व अनुभवातून संस्कृती विकसित होत गेली. संस्कृती म्हणजे मानवाने आपल्या उत्पत्तीपासून आजपर्यंत केलेली सर्व प्रकारची भौतिक, अभौतिक, नैतिक, मूल्यात्मक, मूर्त आणि अमूर्त अशी परंपरा व परिस्थिती होय. म्हणूनच विश्वातील प्रत्येक मानवी समाजाला संस्कृती ही असतेच. याच संस्कृतीचे निमित्त आणि संचित असणाऱ्या सांस्कृतिक मूल्यांची जोपासना करणारा, कला, साहित्य, संगीत, शिल्प, नाट्य, क्रीडा यामध्ये अभिरुची दाखविणारा सहिष्णू व विनयशील माणूस म्हणजे सुसंस्कृत माणूस. अशा सुसंस्कृत माणसाला एक जीवनदृष्टी लाभलेली असते. याच सुसंस्कृतपणाचा विकास करणे हे सुद्धा शिक्षणाचे कार्य आहे. जगभरातील अनेक शिक्षणतज्ज्ञ व विचारवंत शिक्षणातून निर्माण होणाऱ्या अक्षर साक्षरतेपेक्षा सुसंस्कृतपणाच्या विकासाला अधिक महत्त्व देतात. सुसंस्कृत माणसाच्या वाणीतून, परस्परांच्या वर्तनातून आणि अतिथीच्या स्वागतातून तसेच मूल्यांच्या जोपासनेतून तो ज्या समाजाचा घटक आहे, त्या समाजाची संस्कृती दिसून येते.

आपला भारत देश विविधतेने नटलेला आहे. भारतातली ही विविधता भौगोलिक, सांस्कृतिक, सामाजिक, व्यावसायिक, धार्मिक-अध्यात्मिक, तात्त्विक इत्यादी बाबींमध्ये आढळते. भारतातील पर्वतराजी, नद्या, निसर्गसौंदर्य, कलाकुसर तसेच मानवनिर्मित इतर ऐतिहासिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाची ठिकाणे, तेथील वैशिष्ट्यपूर्ण कलाकृती भारताच्या वैभवशाली संस्कृतीची साक्ष देतात. जगभरात देखील अनेक राष्ट्रांच्या अनेक वैशिष्ट्यपूर्ण 'संस्कृती' आहेत. यातूनच जगभरातील मानवी समाजाची वैविध्यपूर्ण मात्र व्यापक संस्कृती निर्माण झाली आहे.

## २.३ संस्कृतीची ठळक वैशिष्ट्ये आणि व्याख्या :

**१) केवळ मानवालाच संस्कृती असते** : माणूस इतर सर्व प्राणीमात्रांच्या तुलनेत बुद्धीने श्रेष्ठ

आहे. मानवाने आपल्या अंगीभूत बुद्धिसामर्थ्याच्या जोरावर आणि वैचारिक कौशल्याच्या सहाय्याने स्वतःची संस्कृती निर्माण केली. मानवतेवर प्राण्यांचे बौद्धिक आणि भावनिक, तसेच सृजनशील आणि चिकित्सक विचारांचे सामर्थ्य कमी असल्याने त्यांना 'संस्कृती' नाही. मानवाने मात्र धर्म, नीती, कायदा, रुढी, परंपरा, मनोरंजन, कला आणि क्रीडा यांचा समावेश असलेली संस्कृती निर्माण केली व करत राहील.

**२) संस्कृतीचे संपादन करावे लागते** : मागील अनेक युगांपासून पिढ्यान्‌पिढ्या माणूस संस्कृती जपत आला आहे. उत्क्रांतीच्या प्रत्येक अवस्थेत अतिप्राचीन-आदीमानव कालखंडापासून ते आजच्या तंत्रज्ञानाच्या अत्युच्च शिखरावर असलेल्या विकसित मानवापर्यंत संस्कृती वृद्धिंगत होत गेली आहे. संस्कृती मानवनिर्मित असून, प्रत्येक मानवी समुदायाची वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती असते. मानव ज्या समाजात जन्माला आला त्या समाजातील मागील पिढ्यांनी जी सांस्कृतिक ठेव निर्मित केली आणि जपली ती संस्कृती पुढील पिढीमधील मानव परिश्रमपूर्वक आत्मसात करतो. संस्कृती, जन्म, जात लागत नसते. तिचे कष्टाने व परिश्रमाने संपादन करावे लागते. माणूस आपल्या जिज्ञासेतून, प्रयत्नातून आणि सहसंबंधातून सांस्कृतिक मूल्यांचा व आदर्शांचा अंगिकार करतो. मानवी जीवन व्यवहार पुढील पिढ्यांना प्रदान केले जातात.

**३) संस्कृतीचा संचय होत राहतो** : संस्कृतीच्या अनुषंगाने वैविध्यपूर्ण सांस्कृतिक पैलूंची निर्मिती प्रक्रिया अविरतपणे, निरंतररित्या आणि सातत्याने सुरुच असते. सध्या अस्तित्वात असलेल्या संस्कृतीत नव-नव्या गोष्टींची भर पडतच असते. त्यामुळेच संस्कृती अधिक समृद्ध आणि वैविध्यपूर्ण होत जाते.

एकदा निर्माण झालेल्या सांस्कृतिक बाबी बऱ्याच काळ टिकून असतात. मानव सामाजिक परंपरांचे आणि आपल्या समुदायाच्या सांस्कृतिक बाबींचे सर्वोतपरी जतन करतो. सहजासहजी सांस्कृतिक परिवर्तन घडून येत नाही. आपल्या संस्कृतीच्या घटकांना सहजपणे नष्ट होऊ दिले जात नाही. उलटपक्षी अनेक प्रकारे यात भरच पडत असते अथवा नव्याने जाणीवपूर्वक घातली जाते. त्यामुळे संस्कृतीचे स्वरुप हे संचयात्मक असते.

चांगल्या रुढी, परंपरा नीतिमूल्ये यांचे मानव जतन करतो व तो पुढील पिढीला प्रदान करतो. एकमेकांना मिळालेल्या या संस्कृतीची तो साठवणूक करत असतो.

**४) संस्कृतीचे स्वरुप सामाजिक असते** : सामाजिक आंतरक्रिया आणि संस्कृतीचे उन्नयन यांमध्ये सहसंबंध असतो. कोणतीही संस्कृती त्या-त्या समाजातील अनेक समाज घटकांमध्ये होणाऱ्या सामाजिक आंतरक्रियांची निष्पत्ती व परिपाक असतो. कोणतीही संस्कृती ही त्या समाजाचा वारसा असतो. मानव हा समाजशील प्राणी आहे. तसेच संस्कृती ही देखील वैयक्तिक स्वरुपाची नसल्याने संस्कृतीचे वैशिष्ट्यपूर्ण पिढीकडे हा सांस्कृतिक ठेवा येत असतो. संस्कृतीचे स्वरूप व्यक्तिगत असू शकत नाही.

**५) सांस्कृतिक परिवर्तनाची प्रक्रिया अनिवार्य असते** : संस्कृतीमध्ये परिवर्तन होते. संस्कृतीमध्ये सूक्ष्म, धिम्या गतीने मात्र निरंतर बदल होत असतात. संस्कृतीचा स्थळ, काळानुरुप आणि मानवाच्या वैचारिक जडण-घडणीतील बदलांनुसार विकास होत असतो. संस्कृतीचे संक्रमण होत असतानासुद्धा हे बदल होत असतात. संस्कृतीचे आदान-प्रदान होत असताना चांगल्या रुढी-परंपरा की ज्या समाजाला

पर्यायाने मानवाला पोषक आहेत, त्यांचेच बहुतांशी संक्रमण होते. ज्याचा मानवाला उपकारक, हीतावह व सुखद अनुभव येतो, अशा परंपरा, आदर्श, मूल्ये नव्या पिढीकडून स्वीकारली जातात. काही अनिष्ट रुढी, परंपरा ज्या समाजाला घातक आहेत त्या काळाच्या ओघात आपसूकच लोप पावतात. उदाहरणार्थ सती प्रथा, बाल विवाह, विधवांचे केशवपन, देवदासी, जटा वाढविणे, ज्ञान पंचायत इत्यादी. या प्रथा बदलून विधवा पुनःर्विवाह, स्त्री-स्वातंत्र्य, देवदासी-जटानिर्मूलन या संकल्पना थोर समाजसुधारकांच्या आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या अथक आणि धाडसी प्रयत्नांतून सुरु झाल्या. या क्रांतिकारक सामाजिक बदलांना सांस्कृतिक परिवर्तन असे म्हणतात.

**६) संस्कृतीचे संक्रमण होत जाते** : मानवाच्या उत्पत्तीपासून मानवी उत्क्रांतीच्या अनेक टप्प्यांवर संस्कृतीचे संक्रमण होत आलेले आहे. आदीमानव काळापासून मानवाच्या एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे सांस्कृतिक पैलू संक्रमित केले जातात. मागील पिढ्या पुढील पिढ्यांना संस्कृतीचा हा वारसा प्रदान करत असतात. संस्कृती संक्रमणात औपचारिक, अनौपचारिक आणि न-औपचारिक शिक्षणाचा मोठा वाटा आहे. शिक्षणाद्वारे संस्कृती प्रवाहित होते.

**७) संस्कृतीत आदान-प्रदानाची क्रिया चालते** : राष्ट्रांराष्ट्रांमध्ये एकाच देशातील राज्यांमध्ये, राज्यातील विविध भौगोलिक क्षेत्रांमध्ये संस्कृतीच्या अनुषंगाने विविधता आढळते. विविध समाजा-समाजात संस्कृतीच्या आदान-प्रदानाची क्रिया चालू असते. भिन्न मानवी समुदाय जेव्हा एकमेकांच्या सान्निध्यात येतात तेव्हा सांस्कृतिक देवाण-घेवाणीचे कार्य होते. मध्य-पूर्वेतील इस्लामी राज्यकर्त्यांचे वास्तव्य, ब्रिटिशांचे वास्तव्य, पोर्तुगीजांचे वास्तव्य यामुळे प्राचीन आणि मध्ययुगीन भारतीय संस्कृतीमध्ये अनेक परंपरा नव्याने समाविष्ट झाल्या. याचा प्रभाव वास्तुकला, शिल्पकला, संगीत, खान-पानाच्या पद्धती, भाषा, पेहराव-पोषाख, दागदागीने यामध्ये विशेषत्वाने जाणवतो. साहित्य-वाङ्मय यांमध्येही देवाण-घेवाण झालेली दिसून येते.

उदाहरणार्थ : ब्रिटिशांनी भारतावर सुमारे दीडशे वर्षे राज्य केले. त्यामुळे ब्रिटिश समाज व भारतीय समाज हे परस्परांच्या संपर्कात आले. त्यामुळे ब्रिटिशांच्या चालीरिती, राहणीमान, सण भारतीय समाजाने स्वीकारले व त्यातून नव्या सांस्कृतिक जडण-घडणीची प्रक्रिया कार्यान्वित झाली. पाश्चिमात्य संस्कृतीमधील बराच भाग भारतीय समाजाने स्वीकारला. उदाहरणार्थ : नाताळ, गुडफ्रायडे, ३१ डिसेंबर, व्हॅलेंटाईन डे हे साजरे करणे तसेच सुटबूट, फ्रॉक, टी-शर्ट, जीन्स हे वेशभूषेचे प्रकार इत्यादी. संस्कृतीचे संक्रमण होत असताना कुटुंबात सुद्धा आदान-प्रदानाची क्रिया प्रत्यक्षात पार पाडताना दिसून येते. आजी-आजोबांकडून मुले अनेक गोष्टी शिकतात. आपल्या घराण्याच्या परंपरा सासू आपल्या सूनेला शिकविते. विद्यार्थी आपल्या शिक्षकांचे, गुरुंचे वर्तन आदर्श मानून त्याचे अनुकरण करतो. एका समाजाकडून दुसरा समाज घटक त्यांची लोकसंस्कृती शिकतो.

**२.३.१ : संस्कृतीच्या व्याख्या :**

मानवी समाजाबद्दलच्या ज्ञानाची पद्धतशीरपणे मांडणी करणारे शास्त्र म्हणजे समाजशास्त्र. संस्कृतीचा संबंध हा मानवी समाजाशी असल्याने, समाजशास्त्र संस्कृतीचासुद्धा शास्त्रशुद्धरित्या आणि वैज्ञानिक-संशोधन

पद्धतीने अभ्यास करते. समाजशास्त्रज्ञांनी आणि अभ्यासकांनी केलेल्या संस्कृतीच्या व्याख्या खालीलप्रमाणे :

**१) डॉ. इरावती कर्वे** : ''मानवी समाजाची डोळ्यांना दिसणारी भौतिक वस्तूरुप निर्मिती आणि डोळ्यांना न दिसणारी पण विचारांना आकलन होणारी मनोमय सृष्टी म्हणजे संस्कृती होय.''

**२) एडवर्ड टायलर** : संस्कृती म्हणजे अशी व्यापक, संकीर्ण समाजव्यवस्था की ज्यात मनुष्याने एक समाजघटक म्हणून आत्मज्ञान केलेले ज्ञान, श्रद्धा, कला, नीती, कायदा, रुढी, चालीरीती व अशा इतर कोणत्याही क्षमतांचा अंतर्भाव होतो.

(" Culture is that complex whole which includes knowledge, belief, arts, morals, law, custom and any other capabilities organised by man as a member of society"- E.B.Taylor )

**२.४ संस्कृतीचे महत्त्व : सांस्कृतिक वारशाचे महत्त्व खालीलप्रमाणे आहे :**

**१) संस्कृती भाषेची निर्मिती करते** : मानवी संस्कृतीमधून भाषेचा उगम व विकास होतो. आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी मानवाने अवयवांच्या मदतीने शब्दोच्चारांचा उपयोग करुन घेतला आणि त्यातूनच भाषेची निर्मिती आणि विकास झाला. भाषेच्या माध्यमातून विचारांचे आदान-प्रदान होत असते. मानवी संस्कृती च्या प्रगतीबरोबरच लिपींचा शोध लागला. जगातील अनेक भाषा समृद्ध झाल्या. भाव-भावना, इच्छा-आकांक्षा, विचार भाषेच्या सहाय्याने व्यक्त होऊ लागल्याने मनुष्यप्राणी सुखी झाला.

**२) संस्कृती वर्तनाचे दर्शन देते** : संस्कृती वर्तनाचे संकेत ठरविते. माणसाचे स्थळ-काळानुरूप कसे वर्तन करावे याचे मार्गदर्शन संस्कृती करते. संस्कृती मानवी वर्तनाचे निकष ठरविते. अनेक संकीर्ण व गुंतागुंतीच्या प्रसंगी माणसाचा वर्तनात्मक प्रतिसाद काय असावा? ह्याचे शिक्षण संस्कृती देते.

**३) भौतिक पर्यावरणाशी समायोजन साधण्यास संस्कृती माणसाला मदत करते** : निसर्गाशी जुळवून घेण्याचे आणि नैसर्गिक भौतिक पर्यावरणाशी समर्पक सुसंगती साधण्याचे मार्गदर्शन संस्कृती करते. आपल्या घरांची रचना आपण राहतो त्या भौगोलिक परिस्थितीला साजेशी आणि सुरक्षित ठरेल अशीच आपण करतो. सभोवतालच्या वातावरणानुसार आणि आपल्या मागील पिढ्यांच्या सांस्कृतिक अनुभवांनुसारच आपण निर्णय घेत असतो. उदाहरणार्थ - कोकणात जास्त पाऊस म्हणून घरे उतरत्या छपरांची. देशावर-घाट-पठरांवर उष्णता जास्त म्हणून घरे धाब्याची. नैसर्गिक-भौगोलिक पर्यावरणातून आपण आपला आहार, कपडे, जीवनपद्धती स्वीकारली. ही सुसंघटीत समायोजनाची पद्धत आपणास संस्कृतीच शिकविते.

**४) सामाजिक सुव्यवस्था निर्माण करणे आणि तिचे रक्षण करणे** : संस्कृती समाजात सुव्यवस्था निर्माण करते. समाजात कुटुंब व्यवस्थेची निर्मिती, कामवासना आणि प्रजननाच्या पूर्तीसाठी समाजमान्य मार्गाने नियंत्रित व्यवस्था म्हणजेच विवाह संस्था, सामाजिक नियंत्रणासाठी शासनव्यवस्था किंवा राज्यसंस्था अशी सूत्रबद्ध आणि सुव्यवस्थित रचना करण्यात संस्कृतीचा वाटा मोठा आहे. मानवाचे बहुतांशी जीवन

व्यवहार समाजमान्य रीतीने पूर्णत्वास नेण्यामध्ये संस्कृती मूलभूत अशी भूमिका बजावत असते. लैंगिक गरज व प्रजनन यासाठी विवाह, बालसंगोपन आणि निवारा यासाठी कुटुंब, ज्ञान व कौशल्य आत्मसात होण्यासाठी शिक्षणसंस्था याद्वारे समाज व्यवहार पार पाडण्याचे कार्य संस्कृतीद्वारे केले जाते.

**५) संस्कृती व्यक्ती वर्तनाची प्रमाणके निर्धारित करते (Behavioural standards for Individuals) ...**

समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या वर्तनाला समाजमान्य, समाजोपयोगी व सकारात्मक दिशा देण्यासाठी संस्कृती व्यक्ती वर्तनाची प्रमाणके ठरवत असते. मानवी वर्तनातील चांगुलपणा, वाईटपणा, विकृती, नैतिकता, अनैतिकता, इष्ट-अनिष्टता या बाबतीमध्ये अलिखित नियम आणि प्रमाण निश्चित करण्याचे कार्य संस्कृती करते. संस्कृतीमुळेच मूल्ये, अभिरुची, प्रवृत्ती, जीवनध्येये ही वर्तनाची प्रमाणके निर्धारित केली जातात.

**६) संस्कृती राष्ट्र बांधणीचे कार्य करते : (Man Making and Nation Building) :**

हे कोणत्याही राष्ट्राच्या संस्कृतीचे आणि राष्ट्राने स्वीकारलेल्या शिक्षण प्रणालीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आणि कार्य आहे. माणूस घडविणे आणि त्यातून सुसंस्कृत व सामर्थ्यशाली 'राष्ट्र' निर्माण करणे हे संस्कृतीचे व्यवच्छेदक वैशिष्ट्य आहे. लोकांच्यामध्ये दृढ एकात्मतेची भावना विकसित करुन राष्ट्रीय अस्मिता आणि राष्ट्राभिमान जागृत केला जातो व राष्ट्रबांधणी होते. समान सांस्कृतिक-सामाजिक वैशिष्ट्ये समूह भावनेचा विकास करतात. समान सांस्कृतिक जडण-घडण असलेले समाज-समूह एकत्र येतात. कारण त्यांचे राहणीमान, आहार, विवाह, वेशभूषा, चालीरीरी, लोकरुढी, मूल्ये, जीवनप्रणाली, वाङ्मय या बाबी समान असतात. त्यातूनच सामाजिक एकीकरणाची मानसिकता दृढ होत जाते आणि राष्ट्रभावनेची निर्मिती होते.

## २.४.१ संस्कृतीचे घटक :

संस्कृती ही संकीर्ण स्वरुपाची व्यवस्था असते आणि तिच्यात हळूहळू, सातत्याने आणि निरंतर बदल होत असतो. संस्कृतीची व्यापकता मोठी असल्याने तिच्यामध्ये मूर्त-अमूर्त, भौतिक-अभौतिक, नैतिक-मूल्यात्मक असे अनेक घटक समाविष्ट असतात. उदाहरणार्थ - १) ज्ञान, २) श्रद्धा ३) मूल्ये आणि प्रमाणके ४) प्रतिके आणि संकेत.

**१) ज्ञान (Knowledge) :** मनुष्याने आपल्या अवती-भोवती असलेल्या नैसर्गिक, प्राकृतिक, सामाजिक, आर्थिक व धार्मिक-अध्यात्मिक परिस्थितीचे निरीक्षण करुन व अनुभव घेऊन प्रयत्नपूर्वक ज्ञान प्राप्त केलेले आहे. त्या ज्ञानाचे संक्रमण पुढच्या पिढ्यांना झाले आहे. अन्न, वस्त्र, निवारा, व्यवसाय, शत्रूपासून संरक्षण अशा सर्व बाबींचे ज्ञान मानवाने प्राप्त केले. मानवी हक्कांचे ज्ञान मिळविले. संस्कृतीचा डोलारा हा ज्ञानावरच उभा आहे.

**२) श्रद्धा (Belief) :** श्रद्धा असल्याखेरीज ज्ञानप्राप्ती होत नाही. संस्कृती केवळ ज्ञानावर आधारलेली नसून ती श्रद्धेवर सुद्धा उभी असते. व्यक्ती आणि समाज जीवनात श्रद्धेला फार महत्त्व आहे.

अनुभवजन्य कसोटी आणि बुद्धिप्रामाण्यवादाचे निकष श्रद्धेला लावले की श्रद्धा टिकेलच असे नाही. मात्र प्रत्येक संस्कृतीमध्ये 'श्रद्धा ह्या असतातच.' धार्मिक-आध्यात्मिक-सामाजिक-नैतिक अशा स्वरुपाच्या श्रद्धांचा जगभरातील मानवी जीवनावर आजही फार पगडा आहे. हजारो वर्षापासून युगायुगांनी रुढ झालेल्या या श्रद्धांचे पालन आजचा आधुनिक मानवसुद्धा करत आहे.

**३) मूल्ये आणि प्रमाणके (Values and Standards) :** मानवाचे जीवन मूल्याधिष्ठित असणे नितांत गरजेचे आहे. जीवनाची नैतिकदृष्ट्या सकारात्मक आणि विधायक दृष्टी व विचारप्रणाली म्हणजेच मूल्ये होय. प्रत्येक संस्कृतीत स्वतःची अशी वैशिष्ट्यपूर्ण मूल्ये आणि प्रमाणके असतातच. ज्यासाठी आपण जीवन जगतो त्याला मूल्य म्हणतात. मूल्यांच्या अधिष्ठानावरच वर्तनाची प्रमाणके उभी राहतात. ही प्रमाणके किंवा समाज नियमने मानवी वर्तनपद्धत निश्चित करतात. प्रत्येक संस्कृतीनुसार मूल्ये आणि प्रमाणके भिन्न असू शकतात. मूल्यांना धर्माचासुद्धा आधार असतो.

मूल्य याचा दुसरा अर्थ असा की, जास्तीत जास्त लोकांनी योग्य म्हणून स्वीकारलेला वर्तनामागचा एक विचार होय. प्रत्येक मानवी समाजाची व समुदायाची भिन्न-भिन्न मूल्ये आणि प्रमाणके आहेत. पण त्यामुळे संस्कृतीवर चांगलाच परिणाम दिसून येतो. विविध समुदायांच्या मूल्यात्मक रचनेमध्ये परस्पर संबंध दिसून येतो. समानता, आंतरराष्ट्रीय सामंजस्य, राष्ट्रीय एकात्मता, लोकशाही, सर्वधर्मसमभाव, एकता, न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता, विश्वकल्याण, आस्था ही मानवी मूल्ये जगभरात शांतता नांदण्यासाठी आवश्यक आहेत. जागतिक संस्कृतीने या शाश्वत मूल्यांचे उन्नयन करणे अपेक्षित आहे.

**४) संकेत किंवा प्रतिक (Symbols) :** मानवी वर्तन आणि विचारप्रणाली ही गुंतागुंतीची बाब आहे. मात्र समाजव्यवस्था टिकून राहायची असेल तर माणसाच्या वर्तनावर आणि विचारांवर नैतिकतेच्या अनुषंगाने नियंत्रण असणे आवश्यक आहे. संस्कृती आपल्या विशिष्ठ संकेताद्वारे असे नियंत्रण राखत असते. प्रत्येक संस्कृतीमध्ये वर्तनाशी संबंधित संकेत असतात. तसेच वस्तूरुप प्रातिनिधिक आणि चित्ररुपांत प्रतीके असतात. भारतीय समाजात पूर्वी विधवा स्त्रिया शुभ्र वस्त्र परिधान करत असत. त्याचा संकेत साधी राहणी व त्यागी वृत्ती असा आहे. असे संकेत, प्रतीके, सांस्कृतिक मूल्ये, आदर्श आणि प्रमाणके यांचे जतन आणि वहन म्हणजेच संस्कृती संवर्धन व संस्कृतीचे संक्रमण होय.

### २.५ संस्कृतीचे जतन, संस्कृती संवर्धन, संस्कृतीचे संक्रमण आणि शिक्षण प्रणालीची भूमिका :

माणसाच्या वर्तनात अपेक्षित दिशेने बदल घडवून आणणे म्हणजे शिक्षण होय. डॉ. राधाकृष्णन यांच्या मते, ''शिक्षण म्हणजे केवळ बौद्धिक धडाडी नव्हे, माणसाच्या विविध प्रवृत्ती आणि भावना यांना परिस्थितीनुरूप सुसंस्कृत वळण लावणे म्हणजे शिक्षण होय.'' म्हणूनच शिक्षणाला समाज नियंत्रणाचे व परिवर्तनाचे प्रभावी साधन मानले जाते. समाज नियंत्रणाच्या प्रक्रियेतून समाजात विधायक अशा बाबी घडवून आणता येतात. सामाजिक नीतिमूल्ये रुजविता येतात. अनैतिकतेवर बंधने घालून नियंत्रण ठेवता येते. स्वैराचारी अनिर्बंध व भ्रष्ट वर्तनाला आळा घातला जातो. संस्कृती संक्रमणाचे व संवर्धनाचे कार्य सामाजिक नियंत्रणाच्या कार्यासारखेच आहे. संस्कृती संवर्धन व संस्कृती संक्रमण यांचा संबंध औपचारिक व अनौपचारिक शिक्षणाशी आहे.

तसाच तो संबंध समाज नियंत्रण प्रक्रियेशी आहे. समाजशास्त्रज्ञ, समाज नियंत्रण प्रक्रियेची व्याख्या करताना म्हणतात, ''भौतिक बल अथवा प्रतिकात्मक साधनांच्याद्वारे समाज घटकांकडून समाजाला अपेक्षित असे वर्तन घडवून आणणे म्हणजे समाज नियंत्रण. समाजातील कायदा, सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी त्या समाजातील स्वार्थी आणि बेबंद, भ्रष्टाचारी, संकुचित व्यक्तींच्या समाजविरोधी वर्तनावर नियंत्रण आणणे गरजेचे असते. कायदा आणि शासनसंस्था हे नियंत्रण करते. मात्र सर्वच बाबी कायद्याने साध्य होत नाहीत. त्यासाठी शिक्षणाची भूमिका मोलाची आहे.''

## २.६ संस्कृती जतन, संस्कृती संवर्धन आणि संस्कृती संक्रमण यांच्या अनुषंगाने शिक्षणाची कार्ये :

**संस्कृतीचे जतन व संक्रमण यामध्ये शिक्षणाचा सहभाग पुढील प्रमाणे होतेः**

**अ) ऐतिहासिक वारश्याबाबत जागृती** : इतिहासाच्या अभ्यासातून भारतीय समाजाचा उज्ज्वल व संघर्षपूर्ण भूतकाळ विद्यार्थ्यांना माहित करुन देणे हे शिक्षणाचे कार्य आहे. भारताच्या प्राचीन इतिहासापासूनची सांस्कृतिक परंपरा शिक्षणाच्या माध्यमातून अवगत करुन देणे गरजेचे आहे. मागील पिढ्यांच्या वैचारिक, धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय आणि नागरी संरचनेची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाली पाहिजे. परकीय सत्तांशी भूमीपुत्रांनी केलेला संघर्ष व मिळविलेला विजय प्रेरणादायी आहे. स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासातून एकात्मतेची जाणीव, धर्मनिरपेक्षता, स्वातंत्र्य न्याय, समता व बंधुभाव रुजविणे शक्य आहे. राष्ट्रप्रेमाची भावना वृद्धिंगत होत जाते. म्हणून शिक्षकाने भारताचा सामायिक ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा नवीन पिढीला ज्ञात करुन देणे गरजेचे आहे. देशातील थोर पुरुषांचा व त्यांच्या व्यक्तिमत्त्वांचा विद्यार्थ्यांवर विधायक प्रभाव पडतो. म्हणून अशा थोर व्यक्तींची जीवनचरित्रे अभ्यासक्रमात आणणे गरजेचे असते.

**ब) सामाजिक प्रबोधन** : समाजप्रबोधन हे शिक्षणाचे महत्त्वाचे कार्य आहे. समाजाच्या गरजेतूनच शाळेची निर्मिती झाली. यास्तव शाळेचा पर्यायाने शिक्षणाचा वापर समाजासाठीच होणे अपेक्षित आहे. शिक्षणाद्वारे समाजातील लोकांचे प्रबोधन करुन, उपदेश करुन आणि जाणीव-जागृती निर्माण करुन विधायक स्वरुपाचे मनपरिवर्तन केले जाते. औपचारिक व अनौपचारिक अशा दोन्ही मार्गांनी शिक्षण समाज प्रबोधन करत असते. वर्गाच्या चार भिंतींच्या आतील शिक्षणाबरोबरच प्रवचन, भजन, कीर्तन अशा अनेक मार्गांनी समाजामध्ये चांगली मूल्ये, चांगले आदर्श यांचे महत्त्व पटवून दिले जाते. अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्यक्रम, प्रदर्शने, व्याख्यानमाला इत्यादी प्रकारे अनौपचारिकरित्या समाजप्रबोधन घडत असते. वर्तमानपत्रे, दूरदर्शन आदी समूह संपर्क माध्यमातून उपदेशपर कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. समाजात स्नेह, प्रेम, जिव्हाळा आणि आपुलकी निर्माण होण्याच्या दृष्टीने अनेक शालेय, सहशालेय, शाळाबाह्य उपक्रम राबविले जातात. विविध अशासकीय संस्था व संघटना सामाजिक आरोग्य व स्वास्थ्य टिकविण्यासाठी प्रयत्नशील असतात.

**क) सामाजिक अभिवृत्तींचे उन्नयन** : आपल्या मनाचा कल म्हणजेच आपली 'अभिवृत्ती' होय. अभिवृत्ती म्हणजे विशिष्ठ, दृष्टीकोन. अभिवृत्ती ही एक स्थिर प्रवृत्ती असते. वरिष्ठांविषयीचा आदर, देशाप्रती निष्ठा, मानवतावाद, माणुसकीचा दृष्टीकोन, दीन-दलितांविषयी सहानुभूती, नागरिकत्वाची सकारात्मक

व उत्कट भावना, सामाजिक अन्याय व अत्याचारांविषयीचा तिरस्कार, सामाजिक ऐक्य व सामाजिक समता, न्याय, विवेक, स्वातंत्र्य, बंधुता या गुणांविषयीचा आदर ही सामाजिक अभिवृत्तींची उदाहरणे आहेत. संस्कृती संक्रमणाच्या दृष्टीकोनातून व्यक्तींच्या समाजिकरणासाठी वरील सामाजिक अभिवृत्तींचा विकास आवश्यक मानला जातो. विद्यार्थ्यांमध्ये अशा सामाजिक अभिवृत्तींचा विकास करण्यासाठी शाळेत मराठी राजभाषा दिन, हिंदी दिवस, अस्पृश्यता निर्मूलन सप्ताह, अंधश्रद्धा निर्मूलन कार्यक्रम, विवेक वाहिनी, ऐतिहासिक प्रसंगांचे नाट्यीकरण, वाङ्मयाचे अध्यापन अशा प्रकारच्या अनेक उपक्रमांमचे आयोजन केले पाहिजे. अनेक अशासकीय समाज मंडळे असे विधायक उपक्रम राबवत असतात. त्यातूनच नागरिकांच्या सामाजिक अभिवृत्तींचे उन्नयन होत असते.

**ड) कौटुंबिक आणि आध्यात्मिक संस्कार** : प्रत्येक कुटुंबाची आपली एक जीवनप्रणाली असते. धार्मिक, सामाजिक आणि आर्थिक पार्श्वभूमीनुसार ही जीवनप्रणाली व कौटुंबिक संस्कृती ठरत जाते. याचप्रमाणे प्रत्येक धर्मानुसार अनुयायी आचरण करत असतात. विविध कुटुंबात आप-आपल्या धार्मिक प्रथेनुसार सणवार साजरे केले जातात. प्रत्येक कुटुंबाची एक आध्यात्मिक बैठक व विचारसरणी ठरलेली असते. मागील पिढ्यांच्या मार्गानेच नवीन पिढी कुटुंबातील धार्मिक व आध्यात्मिक संस्कार सुरु ठेवते व पुढच्या भावी पिढीला एक आदर्श व चाकोरीबद्ध पायंडा घालून देते. प्राचीन काळापासून संस्कृती संवर्धनाचे आणि संस्कृती संक्रमणाचे कार्य कौटुंबिक व धार्मिक संस्कारातून होत आलेले आहे. घरात जे सण, उत्सव व व्रत-वैकल्ये साजरी केली जातात. त्यातूनच सांस्कृतिक मूल्ये जोपासली जातात. म्हणूनच कुटुंब ही अनौपचारिक शिक्षणाची एक संस्था मानली जाते. कुटुंबातील कुलाचार, परंपरा, कुलदैवताची पूजा-अर्चा आणि वारसा हक्काने चालत आलेल धार्मिक कार्यक्रम अखंडपणे पार पाडणे ही नवीन पिढीमधील सदस्य नैतिक कर्तव्य मानतात. संस्कृतीत दैनंदिन रीतिरिवाज, रुढी, नैतिक कल्पना, आचरण नियम, शिस्त, आध्यात्मिक श्रद्धा, मूल्ये कलात्मक अभिरुची, तात्विक व सैद्धान्तिक अधिष्ठान या सर्व गोष्टी येतात. बालकाला विकासाच्या प्रक्रियेत या सर्वांचा प्राथमिक परिचय कुटुंबातच होतो. यालाच अनौपचारिक सहज शिक्षण म्हणतात.

**इ) सामाजिक मूल्यांचे उन्नयन** : हेन्री ज्यूल्स यांच्या मते, ''मूल्य म्हणजे ज्याला आपण चांगले समजतो असे काही तरी, उदाहरणार्थ - प्रेम, दयाळूपणा, समाधान, गंमत, प्रामाणिकपणा, सभ्यता, आराम व साधेपणा होय.'' मूल्य संवर्धन हे शिक्षणाचे महत्त्वाचे कार्य आहे. कोट यांनी सामाजिक मूल्यांची व्याख्या करताना म्हटले आहे की, ''मूल्य म्हणजे आदर्श किंवा आदर्श रुढी की, ज्या समाजाने अथवा समाजातील बहुसंख्येने मान्य केलेल्या असतात.'' ज्या आपण जगतो त्यालासुद्धा मूल्य म्हणतात. समाजाच्या भल्यासाठी समाजाने काही आदर्श आणि वर्तनासंबंधीचे मापदंड तयार केलेले असतात. त्यांनाच सामाजिक मूल्ये असे म्हणतात. सामाजिक मूल्यांचे व्यक्तीकडून आपोआप पालन होते. सार्वजनिक स्वच्छता, सौंदर्य, बंधुभाव, पातिव्रत्य, चारित्र्य, नीतिमत्ता ही सामाजिक मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये रुजविणे आवश्यक आहे. सामाजिक मूल्यांचा विकास होत असतानाच संस्कृतीचे जतन, संवर्धन आणि संक्रमण होते.

**फ) शिक्षणाद्वारे समाजीकरण** : शिक्षणाने बालकाचा सामाजिकदृष्ट्या विकास करणे 'समाजीकरण' या संकल्पनेस अभिप्रेत आहे. व्यक्तीला त्याच्या समाजाप्रती असलेल्या बांधिलकीची जाणीव करुन देणे हे शिक्षण प्रक्रियेचे योगदान असते. समाजात वास्तव्य करीत असताना त्याची समाजाप्रती असलेली कर्तव्ये आणि वर्तणुकीचे, कायदा पालनाचे नीतिनियम यांची सांगोपांग माहिती शिक्षणातून दिली गेली पाहिजे. म्हणून विद्यार्थ्यांना सामाजिक मूल्यांची जाण करुन देणे गरजेचे असते. शिक्षणाने व्यक्तीच्या स्वार्थी, स्वकेंद्री, मतलबी व अनिर्बंध विचारांना व वर्तनाला आळा घालण्याचे काम केले पाहिजे. समाजहिताच्या आणि समाजविधायक कृतींना चालना दिली पाहिजे. स्वहितापेक्षा समाजहिताला प्राधान्य देण्याची मनो-भूमिका विकसित करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना 'समाजशील' बनविणे गरजेचे असते. तरच समाजासाठी मूलभूत योगदान देणारे नागरिक तयार होतील. समाजीकरणातून सामाजिक जबाबदारीची जाणीव वाढीस लागते. त्यातूनही संस्कृतीचे जतन आणि संवर्धन साधले जाते.

**ग) परंपरा, मूल्ये आणि रुढींची डोळस चिकित्सा** : संस्कृतीत समाविष्ट असणाऱ्या परंपरा, मूल्ये आणि अभिवृत्ती यांचा स्वीकार करताना त्यांची डोळसपणे व चिकित्सक वृत्तीने रुजवणूक झाली पाहिजे. संस्कृतीमधील कालबाह्य झालेले घटक त्याज्य मानले गेले पाहिजेत. समाज विघातक परंपरा व रुढी संपुष्टात आणल्या पाहिजेत. आजच्या काळाशी सुसंगत नसणाऱ्या आणि अशोभनीय वाटणाऱ्या बाबी संस्कृती संक्रमणाच्या प्रक्रियेतून वगळल्या गेल्या पाहिजेत. त्यासाठी शिक्षण प्रक्रियेमधून साधक बाधक विचार घडून आला पाहिजे.

**य) संस्कृतीच्या जतन, संवर्धन आणि संक्रमणासाठी शैक्षणिक अभ्यासक्रमाची रचना** :

शैक्षणिक अभ्यासक्रमातून व पाठ्यक्रमातून निर्धारित अशी शिक्षणाची ध्येये आणि उद्दिष्ट्ये साध्य करण्याचा प्रयत्न केला जातो. शैक्षणिक ध्येये साध्य करण्याचे अभ्यासक्रम हे एक साधन आहे. अभ्यासक्रमाची मांडणी आणि रचना करताना संस्कृतीचे जतन, संवर्धन आणि संक्रमण यांच्या दृष्टीकोनातून विषय घटक निवडले गेले पाहिजेत. आपल्या देशाची संस्कृती, धर्म, तत्त्वज्ञान, वाङ्मय, कला, इतिहास इत्यादी महत्त्वाच्या सांस्कृतिक बाबींचा समावेश असला पाहिजे तरच विहीत अभ्यासक्रम परिपूर्ण ठरेल. सामाजिक अभिरुची विकसित करणारा अभ्यासक्रम तयार केला पाहिजे. यातूनच विद्यार्थ्यांच्या मनावर चांगले संस्कार होतील.

**र) धार्मिकतेचा विकास** : आध्यात्मिक प्रवृत्तींच्या विकासाने व्यक्तिमत्त्व समायोजित आणि परिपूर्ण होण्यास सहाय्य मिळते. प्राचीन भारतीय आध्यात्माने एके काळी जगाला मार्गदर्शन केले आहे. भारतीय धार्मिक तत्त्वज्ञान हे जगामध्ये आदर्श तत्त्वज्ञान मानले जाते. त्याच्या अभ्यासातून आध्यात्मिक प्रवृत्तींचा विकास साधला जातो. आध्यात्मिक व धार्मिक मूल्यांच्या विकसनातून संस्कृती संक्रमित करणे आणि तिचे संवर्धन करणे हे शिक्षणाचे कार्य आहे.

**ल) संस्कृतीच्या संक्रमणात आणि संवर्धनात शिक्षकाचे योगदान** : संस्कृतीचे जतन, संवर्धन आणि संक्रमण या तिन्ही प्रक्रियांमध्ये शिक्षकाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. आपल्या कृतीतून अध्यापनातून आणि व्यक्तिमत्त्वाच्या जडण-घडणीतून शिक्षणक विद्यार्थ्यांमध्ये समाज मूल्यांचे प्रवर्तन आदर्शांचे

प्रवर्तन करु शकतो. म्हणूनच शिक्षकाला सामाजिक अभियंता असे म्हटले जाते. सामाजिक मूल्यांची रुजवणूक करणे, विद्यार्थ्यांचे समाजीकरण करण्यासाठी त्यांच्या वर्तन प्रवृत्तींना आणि विचारांना चांगले वळण लावणे, चांगल्या अभिवृत्ती जोपासण्यासाठी चांगले शैक्षणिक संस्कार करणे हे उदात्त कार्य शिक्षक करत असतात. एका अर्थाने शिक्षकाची भूमिका विधायक समाजकार्याची आणि संस्कृती रक्षकाची आहे.

**व) सांस्कृतिक परिवर्तन आणि शिक्षण** : शिक्षणातून उचित असे सामाजिक आणि सांस्कृतिक परिवर्तन होणे अपेक्षित आहे. परंपरा आणि रुढींबरोबरच समाजात विज्ञाननिष्ठा जोपासली गेली पाहिजे, अंधश्रद्धांचे निर्मूलन करुन नवा पुरोगामी विचारांचा समाज घडविणे हे शिक्षणाचे कार्य आहे. समाजात चांगला उपयुक्त बदल घडवून आणण्यात शिक्षण प्रक्रियेची भूमिका महत्त्वाची आहे. लोकभ्रम, लोकरुढी आणि अनिष्ठ चालीरिती सांस्कृतिक वारशामधून हद्दपार झाल्या पाहिजेत.

**उपघटक – २) शिक्षणाचे एक कार्य – सांस्कृतिक वारशाचे जतन व संक्रमण**

**स्वयंमूल्यमापनासाठी प्रश्न**

१) संस्कृती म्हणजे काय?

२) संस्कृतीची वैशिष्ट्ये कोणती?

३) सांस्कृतिक वारसा म्हणजे काय ते सांगून सांस्कृतिक वारशाचे महत्त्व अधोरेखित करा.

४) समाज प्रबोधन म्हणजे काय? सामाजिक अभिरुची कोणत्या?

५) संस्कृती संवर्धनात व संक्रमणात शिक्षकाचे योगदान कोणते?

**❊ दृढीकरणासाठी कृती :**

आपल्या कुटुंबातील परंपरागत चालीरिती आणि धार्मिक संस्कार कोणते याचे वर्णन करा. त्यांची यादी करुन प्रत्येकाचे महत्त्व सविस्तर सांगा.

**❊ महत्त्वाचा भाग :**

संस्कृतीची संकल्पना, संस्कृतीच्या व्याख्या आणि वैशिष्ट्ये, सांस्कृतिक वारशाचे महत्त्व, संस्कृतीचे जतन, संवर्धन आणि संक्रमण यामध्ये शिक्षणाची भूमिका, संस्कृतीचे विविध घटक आणि पैलू, संस्कृतीची डोळस चिकित्सा – शिक्षकांचे योगदान.

**२.५ उपसंहार :**

भारत देश विविधतेने नटलेला आहे. आपल्या देशातील ही विविधता भौगोलिक, सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक अशा महत्त्वपूर्ण बाबींमध्ये आढळते. जगातील सुंदर असा ताजमहाल, अजिंठा वेरुळची लेणी, काश्मिरचे सृष्टीसौंदर्य, हिमालयाची उत्तुंग हिमशिखरे, गंगा नदीचा विस्तीर्ण आणि पवित्र जलौघ ही सर्व वैशिष्ट्ये जगाचे लक्ष वेधून घेणारी आहेत. त्यांचा परिचय विद्यार्थ्यांना करुन देणे हे शिक्षणाचे कार्य

आहे. आपल्या देशाला थोर सांस्कृतिक परंपरा आहे. भारताचा आध्यात्मिक क्षेत्रातील वारसा जगाने मान्य केला आहे. प्राचीन भारतीय थोर विचार, परंपरा आणि कर्तृत्व साऱ्या विश्वाने वाखाणलेले आहे. म्हणूनच प्राथमिक, माध्यमिक, उच्चमाध्यमिक, महाविद्यालयीन, विद्यापीठीय आणि व्यावसायिक प्रशिक्षण देणाऱ्या शिक्षण संकुलातून बाहेर पडणाऱ्या सुशिक्षित युवक-युवतींना या सांस्कृतिक वारश्याची जोपासना करुन त्याचे संक्रमण करण्यात आपले योगदान दिले पाहिजे. तसेच महान भारतीय संस्कृती, विश्वबंधुत्वाची परंपरा आणि जगाला सकारात्मक दिशा देणारी विचारधारा टिकून राहील आणि जगात तिचा प्रसार व प्रचार होईल.

## ३) मानवी मूल्यांचा विकास :

**प्रस्तावना :**

मूल्य म्हणजे काय? ऑटॉवे यांनी मूल्यांची व्याख्या करताना म्हटले आहे, ''ज्यासाठी आपण जगतो कल्पना (आदर्श) म्हणजे मूल्ये.'' समाजाच्या प्रगतीसाठी व समाजाच्या कल्याणासाठी समाजाने काही आदर्श, मानवी वर्तनासंबंधीचे काही मानदंड तयार केलेले असतात. तसेच प्रत्येक व्यक्तीने जगण्याची स्वतःची सकारात्मक आणि विधायक अशी अलिखित नियमावली डोळ्यांसमोर ठेवून जगणे अपेक्षित असते. त्यालाच 'मानवी मूल्ये' म्हणतात.

मूल्ये माणसाला पशुतूल्य जीवन जगण्यापासून परावृत्त करतात आणि विवेकबुद्धीने वागण्यास भाग पाडतात. म्हणूनच मूल्यांधिष्ठित व्यक्तिमत्त्वे घडविणे हे शिक्षणाचे कार्य आहे. यास्तव शालेय संकुलांमधून आणि शाळाबाह्य सामाजिक कृती-कार्यक्रमातून मानवी मूल्यांचे विकसन होणे गरजेचे आहे.

### ३.१ मानवी मूल्यांची संकल्पना :

आर.के. मुखर्जी यांच्या मते, ''अभिसंधान, अध्ययन आणि समाजीकरणामुळे आत्मसात झालेल्या व शैक्षणिक पसंती, दर्जा व अपेक्षा प्राप्त झालेल्या समाजमान्य इच्छा व ध्येये म्हणजे मूल्य होत.'' अशा मानवी मूल्यांचे नागरिकांकडून आपोआप पालन होणे अपेक्षित आहे. सार्वजनिक स्वच्छता, सौंदर्य, चारित्र्य, नीतिमत्ता, मानवता, आस्था, दयाभाव, सत्यनिष्ठता, अहिंसा, समता, बंधुता ही मानवी मूल्यांचीच ठळक उदाहरणे आहेत. अशा मानवी मूल्यांमुळे मानवी समुदाय टिकून राहतो. मानवी मूल्यांचा ऱ्हास झाल्यास नैतिक, सामाजिक, आध्यात्मिक आणि सांस्कृतिक अधःपतन होते. मानवाने त्याला नैसर्गिकरित्या मिळालेल्या व इतर प्राणीमात्रांकडे ज्याचा अभाव दिसून येतो अशा वैचारिक आणि बौद्धिक क्षमतांच्या सहाय्याने आणि मानवी भाव-भावनांची सांगड घालून 'मानवी मूल्य प्रणाली' विकसित केली आहे.

### ३.२ मानवी मूल्यांचे स्वरुप :

प्रत्येक मानवी समुदायाची भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक स्थिती वेगळी असते. यास्तव प्रत्येक मानवी समुदायाची मूल्य संरचना भिन्न-भिन्न असते. तरीसुद्धा काही वैश्विक आणि शाश्वत

अशी मानवी मूल्ये जगभरातील मानवी समाजात समान आणि एकात्म असल्याचे आढळून येते. हेन्री ज्यूल्स यांच्या मते ज्याला आपण चांगले समजतो असे काहीतरी म्हणजे मूल्ये होय. उदाहरणार्थ – प्रेम, दयाळूपणा, प्रामाणिकपणा, सभ्यता व साधेपणा होय. ही मानवी मूल्ये जगभरात सारखीच आहेत. मात्र त्यांचे पालन हे समाज सापेक्ष असते.

सामाजिक मूल्ये

नागरिकत्वविषयक मूल्ये      विविध मूल्ये      सांस्कृतिक मूल्ये

मूल्य आध्यात्मिक मूल्ये      सौंदर्यविषयक मूल्ये

नैतिक मूल्ये

विद्यार्थ्यांमध्ये वरील मूल्यांची रुजवणूक करणे हा शिक्षकाच्या व्यावसायिक जबाबदारीचा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. शिक्षणातून आदर्श नागरिक घडवायचे असतील तर कोणतीही 'विद्याशाखा' असू दे, मूल्यशिक्षण अनिवार्य आहे.

### ३.३ मूल्यांची गरज आणि महत्त्व :

मानवी मूल्यांची जोपासना होणे काळाची गरज आहे. ज्याप्रमाणे एखादी भिंत बांधताना दोन विटांमध्ये सिमेंटचा वापर केला जातो, लोखंडाला लोखंड जोडण्यासाठी रासायनिक द्रव्याचा किंवा चिकट धातूचा वापर केला जातो, त्याचप्रमाणे मनुष्याला मनुष्य भावनिकरित्या जोडण्यासाठी दया, शांती, सहयोग, सन्मान, सहनशीलता, आस्था, सरलता, संतोष आणि सेवाभाव इत्यादी मानवी मूल्यांची आवश्यकता भासते. मूल्यांचा ऱ्हास झाला, तर माणूस दुःखी, अस्वस्थ व अशांत होईल. त्याला तणावग्रस्त जीवन जगणे भाग पडेल. सध्याच्या आधुनिकीकरणाच्या व जागतिकीकरणाच्या काळात भौतिक प्रगतीबरोबर मानसिक अशांती असा विरोधाभास आपणास जाणवत आहे. त्यासाठी शाळा-महाविद्यालयातून मूल्य शिक्षणास प्राधान्य देणे क्रमप्राप्त आहे. बौद्धिक क्षमतेबरोबर आत्मिक व मानसिक क्षमतांचा विकास साधताना मूल्य शिक्षणाचे महत्त्व जाणवते. म्हणून मानवी मूल्यांचा समग्र विकास हे शिक्षणाचे कार्य आहे.

### ३.४ सामाजिक मानवी मूल्ये :

सार्वजनिक स्वच्छता, बंधुभाव, सामाजिक एकात्मता, जबाबदारीची जाणीव, सुजाण नागरिकत्व, समानता, सर्वधर्मसमभाव, सामाजिक न्याय, लोकशाही विचारधारा, देशप्रेम ही सामाजिक मूल्ये विद्यार्थ्यांच्या अंगी रुजविण्यासाठी शिक्षणाने कार्यरत असले पाहिजे.

### ३.५ नैतिक मानवी मूल्ये :

प्रज्ञा, शील, करुणा, दया, क्षमा, शांती, सहविचार, सहकार्य, मानवता, सत्यता, न्यायप्रियता, भूतदया, चारित्र्यसंपन्नता, सेवाभाव, त्याग, औदार्य आणि पवित्रता या नैतिक मूल्यांची जोपासणा होणे

हे प्रत्येक राष्ट्राच्या दृष्टीने, प्रत्येक मानवी समूहाच्या दृष्टीने अनिवार्य आहे. नैतिक मूल्यांचे मानवी जीवनात फार महत्त्व आहे. मानवी जीवनात दिव्यता आणि परिपूर्णता आणणे हा शिक्षणाचा खरा उद्देश आहे.

### ३.६ सौंदर्यविषयक मानवी मूल्ये :

मानवी जीवनात आनंददायी व्हावयाचे असेल तर माणसाने निखळ आणि सात्विक अशा सौंदर्यविषयक मूल्यांची जोपासना करणे अत्यावश्यक आहे. सुसंस्कृत आणि अभिरुची संपन्न-स्वच्छ मनाच्या माणसाचे ते व्यवच्छेदक लक्षण आहे. सौंदर्यविषयक मूल्ये आत्मसात करण्यासाठी रसिकता, रसग्रहण क्षमता व गुणग्राहकत्व आवश्यक आहे. साहित्य, संगीत, अभिनय, ललितकला, शिल्पकला, चित्रकला, स्थापत्यशास्त्र, निसर्गप्रेम यातून आनंद मिळविण्यासाठी त्यांतील सौंदर्य पैलू टिपणे गरजेचे असते. एखाद्या मूर्त-अमूर्त गोष्टीमध्ये दडलेले सौंदर्य दिव्यता, भव्यता आत्मसात करण्यासाठी अभिरुची, अभिवृत्ती आणि कौशल्यपूर्ण निपुणता अत्यावश्यक ठरते. निसर्गाची विलोभनीयता, नद्या, पर्वत, शिखरे, धबधबे, गाणे, नृत्य, नाट्य या सर्वांमध्ये सुखद अनुभूती असते.

### ३.७ मूल्यांधिष्ठित व्यक्तिमत्त्व विकास आणि शिक्षण :

व्यक्तिमत्त्वाच्या जडण-घडणीत भौगोलिक, सामाजिक, अनुवंशिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय व शैक्षणिक घटक महत्त्वाची भूमिका बजावतात. व्यक्तीची स्वतःची मूल्य प्रणाली आणि तिचा विकास वरील सर्व घटकांवर अवलंबून असतो माणूस हा समाजशील, विचारी आणि संस्कारक्षम प्राणी आहे. इतर प्राण्यांपेक्षा माणसाला बुद्धीची देणगी अधिक प्रमाणात लाभलेली आहे. याच जोरावर माणसाने संस्कृती, आदर्श, परंपरा आणि मूल्यांची निर्मिती केली. या सर्वांचे विकसन करण्याची जबाबदारी शिक्षणप्रक्रियेची आहे. एखाद्या व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व तिच्या वर्तनातून, हालचालीतून, कृतीतून, विचारातून आणि त्या व्यक्तीने समोर आलेल्या परिस्थितीला दिलेल्या प्रतिसादातून व्यक्त होते. हाच प्रतिसाद व्यक्तीच्या मूल्यांत्मक अशा जडण-घडणीवर अवलंबून असतो. शिक्षणामुळे विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व सदाचारी, प्रेमळ, समाजशील, चारित्र्यसंपन्न, आज्ञाधारक, विनम्र, विनयशील, त्यागी, क्षमाशील, वात्सल्यपूर्ण, मानवतावादी, विवेकशील बनते. हीच शिक्षण प्रक्रियेची सकारात्मक भूमिका मानवी जीवनात आहे.

### ३.८ मूल्यसंवर्धनातील शिक्षणाची कार्ये :

मानवी मूल्यांचे जतन, संवर्धन आणि संक्रमण करण्यात शिक्षण मोलाची भूमिका बजावत असते. मूल्य संवर्धनाच्या अनुषंगाने शिक्षणाची कार्ये खालीलप्रमाणे :

अ) अभ्यासक्रमाचे विषयनिहाय स्वरुप ठरविताना मानवी मूल्यांच्या रुजवणुकीला वाव देणे.

ब) मूल्यांधिष्ठित अध्ययन अनुभूती विद्यार्थ्यांना मिळतील अशी योजना आखणे.

क) मूल्यांच्या विकासात योगदान देणे.

ड) भारतीय संविधानात्मक मूल्यांच्याबाबतीत जाणीव-जागृती विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे.

इ) प्रत्यक्ष अध्यापनादरम्यान विषय-घटकांतून विद्यार्थ्यांमध्ये मूल्यांची रुजवणूक करणे.

फ) अभ्यासक्रमाबरोबरच मूल्यांधारित अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रमांचे नियोजन व आयोजन करणे.

य) शालेय वातावरणात जात, धर्म, पंथ, लिंग याबाबतीत कोणताही भेदभाव निर्माण होणार नाही याची दक्षता घेणे.

र) नैतिक शिक्षणास प्राधान्य देणे.

ल) आंतरविद्याशाखीय दृष्टीकोनातून मूल्यशिक्षणाचा प्रत्येक विद्याशाखेच्या अभ्यासक्रमा मध्ये अंतर्भाव करणे.

व) विद्यार्थ्यांना सामाजिक, नैतिक आणि सौंदर्यविषयक मूल्यांची कृतीप्रवण ओळख करुन देणे.

**३.९ मूल्यांच्या रुजवणुकीसाठीचा शैक्षणिक अभ्यासक्रम :**

शिक्षण ही गतिशील प्रक्रिया आहे. यामुळेच शिक्षणात दिवसेंदिवस होणारा बदल हा मानवी कल्याणासाठीच होत असतो. यास्तव शैक्षणिक क्रांती घडून येणे गरजेचे असते. चारित्र्यवान नागरिक निर्माण करण्याचे कार्य मूल्य शिक्षणाद्वारे होत असल्याने अभ्यासक्रमामध्ये जाणीवपूर्वक मूल्यांचा समावेश झाला पाहिजे. वैविध्यपूर्ण अध्ययन अनुभवांद्वारे प्रेम, सहानुभूती, सहकार्य आणि समतेच्या मूल्यांची पेरणी शिक्षणाद्वारे होणे अपेक्षित आहे. अभ्यासक्रमांची रचना करताना या बाबी लक्षात घेणे जरुरीचे ठरते. मूल्य शिक्षणाच्या अनुषंगाने अभ्यासक्रम हा विद्यार्थी केंद्रित, सृजनात्मक, समाजकेंद्रित, मानवी मूल्यांची जोपासना करणारा, संस्कृती संक्रमणास उपयोगी, जीवनाभिमुख आणि राष्ट्र बांधणीसाठी आणि माणूस घडविण्यासाठी उपयुक्त असावा.

**३.१० मानवी मूल्यांच्या विकसनामध्ये शिक्षकाचे योगदान :**

शिक्षक हा शिक्षण प्रक्रियेचा कणा आहे. शिक्षक विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाची इमारत आणि परिपूर्णता उभारत असतो. म्हणून शिक्षकाने सृजनशीलतेचे प्रबलीकरण करावे. भ्रामक अंधश्रद्धांना मुठमाती देऊन विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन जागृत करावा. 'समाजसेवा' कार्यक्रमास दैनंदिन शालेय नियोजनाला समाविष्ट करावे. सर्वधर्मसमभाव, धर्मनिरपेक्षता आणि देशप्रेमाबरोबरच आंतरराष्ट्रीय सदभावना वाढीस लावण्याचा प्रयत्न करावा. स्वातंत्र्य, समानता, बंधुत्व, न्याय, सहिष्णुता, परस्पर मदत या मूल्यांना दृष्टीक्षेपात ठेवून अध्यापन करावे.

**३.११ उपसंहार :**

शिक्षण म्हणजे विद्यार्थ्यांमध्ये अपेक्षित दिशेने वर्तनबद्दल करणे. उपदेशाने परिवर्तन घडवून आणणे. गुरु-शिष्यांवर संस्कार करुन त्यांच्या विचार आणि वर्तनात सकारात्मक बदल घडवून आणतो. शिक्षण म्हणजे अज्ञानरुपी अंधकारातून ज्ञानरुपी प्रकाशाकडे मार्गक्रमण सर्व दोषांपासून जी मुक्त करते ती विद्या. काम, क्रोध, मोह, माया व मत्सर या षडरिपू-शत्रूंपासून मानवाला मुक्त करते ते शिक्षण. व्यक्तिगत विकासासाठी, संस्कृतीच्या जतन, संवर्धन आणि संक्रमणासाठी व मानवी मूल्यांच्या रुजवणुकीसाठी अशा

प्रेरणादायी शिक्षण प्रणालीची नितांत गरज असते. शिक्षण प्रक्रियेचा हाच 'गाभा' आहे.

**उपघटक : ३ मानवी मूल्यांचा विकास**

**(सामाजिक, नैतिक व सौंदर्यविषयक मूल्ये)**

**स्वयंमूल्यमापनासाठी प्रश्न :**

१) मानवी मूल्यांचे स्वरुप स्पष्ट करा.

२) मानवी मूल्यांची संकल्पना स्पष्ट करुन, मानवी मूल्यांच्या व्याख्या सांगा.

३) सामाजिक मूल्यांचे महत्त्व स्पष्ट करा.

४) नैतिक मूल्यांचे महत्त्व स्पष्ट करा.

५) सौंदर्यविषयक मूल्यांचे महत्त्व स्पष्ट करा.

**दृढीकरणाची कृती :**

आपल्या सभोवताली ज्या मूल्यांची जोपासना होतेय असे तुम्हाला वाटते त्यांची यादी करुन मूल्यांच्या विविध प्रकारात त्यांचे वर्गिकरण करा.

**महत्त्वाचे मुद्दे :**

मूल्यांचे मानवी जीवनातील महत्त्व, जीवन शिक्षण, नैतिक शिक्षण, जबाबदार नागरिकत्वासाठी मूल्य शिक्षण सामाजिक, नैतिक आणि सौंदर्यविषयक मूल्ये, मूल्यसंवर्धनात शिक्षकाची भूमिका.

* **संदर्भ ग्रंथ :**

१. कुंडले म. बा. (१९९४) शैक्षणिक तत्त्वज्ञान व समाजशास्त्र, श्री विद्या प्रकाशन पुणे.

२. धनवडे नंदकुमार आणि धनवडे सुरेखा (२०११) शिक्षणशास्त्र, फडके प्रकाशन,कोल्हापूर.

***

# घटक - ३

## शिस्त आणि स्वातंत्र्य

## शिक्षणाचे तत्त्वज्ञानात्मक अधिष्ठान

## Philosophical Foundation of Education

अनुक्रमणिका


३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

  ३.२.१ शिस्त व स्वातंत्र्याची संकल्पना

  ३.२.२ शिस्तीचा अर्थ

  ३.२.३ शिस्तविषयक पारंपारिक व आधुनिक संकल्पना

  ३.२.४ शिस्तीचे प्रकार

  स्वयंअध्ययनासाठी प्रश्न - १

  ३.२.४ सामाजिक जीवनात शिस्तीचे महत्त्व

  ३.२.५ शाळा महाविद्यालयीन स्तरावरील बेशिस्तीची कारणे

    ३.२.५.१ 'कुटुंब' या घटकाशी संबंधित बेशिस्तीची कारणे

    ३.२.५.२ 'शाळा' या घटकाशी संबंधित बेशिस्तीची कारणे

    ३.२.५.३ 'समाज' या घटकाशी संबंधित बेशिस्तीची कारणे

  स्वयंअध्ययनासाठी प्रश्न - २

  ३.२.६ शिस्त राखणेसाठी उपाययोजना

    ३.२.६.१ शालेय स्तरावरील उपाययोजना

    ३.२.६.२ महाविद्यालयीन स्तरावरील उपाययोजना

स्वयंअध्ययानासाठी प्रश्न -३

३.३ सारांश

३.४ स्मरणात ठेवण्याच्या संकल्पना

३.५ स्वयंअध्ययनासाठीच्या प्रश्नाची उत्तरे

३.६ स्वाध्याय

३.७ पुढील अध्ययनासाठी संदर्भ / साहित्य

## ३.० उद्दिष्ट्ये :

या पाठातून आपल्याला पुढील घटक अभ्यासायचे आहेत.

* शिस्त व स्वातंत्र्य या संकल्पना समजण्यास मदत करणे.
* शिस्तीचा अर्थ माहित होण्यास मदत करणे.
* शिस्त व स्वातंत्र्य यातील समन्वयाचा अर्थ समजण्यास मदत करणे.
* शिस्तीचे प्रकार समजण्यास मदत करणे.
* शिस्तीचे सामाजिक जीवनातील महत्त्व समजण्यास मदत करणे.
* विद्यार्थ्यांच्या बेशिस्तीची कारणे समजण्यास मदत करणे.
* शिस्तीसाठी उपाययोजना माहित होण्यास मदत करणे.

## ३.१ प्रास्ताविक :

पाठीमागच्या पाठामध्ये आपण शिक्षणाची वैयक्तिक व समाजनिष्ठ ध्येये अभ्यासली. ज्ञान, कौशल्य, अभिरुची आणि गुणग्राहकत्व या घटकांमुळे व्यक्तिविकास होतो. हे अभ्यासले. तसेच मानवी मूल्यांचा विकास, शिक्षणाची कार्ये या मुद्यांचा अभ्यास केला.

विद्यार्थी मित्रहो, शालेय जीवनामध्ये शिस्तीला फार मोठे स्थान आहे. विद्यार्थ्यांच्या शिस्तबद्ध वर्तनासाठी शिस्त आवश्यक आहे. पण केवळ शिस्तीचा वापर करुन विद्यार्थी विकास साधता येणार नाही. तर विद्यार्थ्यांना योग्य तिथं स्वातंत्र्य मिळणं ही तितकंच क्रमप्राप्त आहे. शिस्त व स्वातंत्र्य या दोन्ही बाबी विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी आवश्यक आहेत. म्हणून, या पाठामध्ये आपण शिस्त व स्वातंत्र्य यांच्या संकल्पना शिस्तीचे प्रकार, गरज, तसेच शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या बेशिस्तीची कारणे व उपाय या बाबींचा आपण अभ्यास करणार आहोत.

## ह्व३.२ विषय विवेचन :

### ३.२.१ शिस्त व स्वातंत्र्याची संकल्पना :

शिस्त व स्वातंत्र्य या दोन्ही बाबी विद्यार्थी जीवनाशी निगडीत आहेत. खरं तर मानवी जीवनाची स्थिरता आणि समृद्धी शिस्तीवरच अवलंबून आहेत. शिस्तीमुळे माणसाच्या आयुष्याला नेटके वळण लागते. मानवी जीवनात शिस्तबद्ध वर्तनासाठी शिस्त आवश्यक आहे. निसर्गसुद्धा शिस्तीचे, नियमाचे पालन करतो.

**दिसामागुनी येते रजनी, अंधारूनी जाते अवनी।**

**दिनकर येता पुन्हा उठूनी लाल कडा ती उषा लेवूनी।।**

दिवसानंतर रात्र येते, उन्हाळ्यानंतर पावसाळा हे ऋतुचक्र, भरती-ओहोटी हे परिणाम सुद्धा शिस्तबद्ध असतात. व्यक्तीला केवळ शिस्तीत बांधून ठेवणे योग्य नाही. शिस्तीबरोबर त्याला स्वातंत्र्यही मिळाले पाहिजे. भारताच्या लोकशाही शासनप्रणालीत मत, भाषण, विचार, व्यवसाय, शिक्षण स्वातंत्र्य हे नागरिकांचे हक्क आहेत. अशा स्वातंत्र्याशिवाय जगणे म्हणजे प्रत्यक्ष मरणच होय. शिस्त आणि स्वातंत्र्य या दोन्ही बाबी शालेय जीवनात तसेच सामाजिक जीवनातही महत्त्वाच्या आहेत.

प्राचीन कुटुंबाचे उदाहरण घेतले तर शिस्त संकल्पना आपल्या लक्षात येईल. प्रत्येक कुटुंबात वडील माणसाचा अधिकार सर्व कुटुंबियांवर चालत असे. त्याच्या आज्ञेचे पालन नीटपणे करावे लागे. त्याच्या विरुद्ध 'ब्र' काढण्याची हिंमत नव्हती. त्याच्या मनाविरुद्ध वागण्याचे स्वातंत्र्य कोणालाही नसे. कुटुंब प्रमुखाविषयी विलक्षण दरारा आणि भीती प्रत्येकाच्या मनात असे. त्यामुळे एकत्र चर्चा करणे, मनमोकळे बोलणे आपली मते मांडणे हा प्रकार भीतीमुळे होत नव्हता. समाजातही तीच स्थिती होती. राजकीय सत्ताधाऱ्यांच्या कायद्याचे पालन, धर्माचे पालन प्रत्येक नागरिकाला करावे लागे. आता तशी परिस्थिती राहिली नाही. स्त्री-पुरुष समानता, स्त्री-हक्काचा बोलबाला यामुळे कुटुंबप्रमुखाप्रमाणे कुटुंबातील आजी, आई, पत्नी यांनाही एखाद्या निर्णयामध्ये सहभागी करता येऊ लागले. स्त्रियासुद्धा पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून घराबाहेर पडू लागल्या. त्यामुळे स्त्रियांना स्वातंत्र्य मिळाले. त्या शिकल्या, स्वावलंबी बनल्या त्यामुळे स्वातंत्र्याबरोबरच त्यांना काही अधिकार प्राप्त झाले.

मानवी जीवन सुखी, समृद्ध व यशदायी करण्यासाठी शिस्त व स्वातंत्र्य यांच्यात नेहमी समन्वय साधता आला पाहिजे. शाळा महाविद्यालयामध्ये सुद्धा शिस्त व स्वातंत्र्य यांचा समन्वय राखून आपण विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास करु शकतो. शिस्तीचा अतिरेक करुन चालणार नाही व स्वातंत्र्य देऊनही चालणार नाही. म्हणून दोन्हीमध्ये समन्वय साधणे गरजेचे आहे.

### ३.२.२ शिस्तीचा अर्थ (Meaning of Discipline) :

शिस्त हा शब्द 'शास' या संस्कृत धातूपासून तयार झाला आहे. शास या धातूचा अर्थ नियम करणे किंवा शासन करणे. शिस्त हा शब्द पारसी भाषेतून आलेला आहे. कर वसूलीसाठी तयार केलेली

यादी किंवा नियमावली असा त्याचा अर्थ आहे.

इंग्रजीतील Discipline म्हणजे शिस्त. Discipulus या लॅटिन शब्दापासून तो तयार झाला आहे. याचा अर्थ 'शिकणे' मूळ शब्द Disciple म्हणजे शिष्य. शिष्याचे वर्तन शिस्तबद्ध पाहिजे म्हणून Discipline म्हणजे शिस्त असे म्हणतात.

पुढील व्याख्यांवरून कोणत्या शिस्तीचा अर्थ स्पष्ट होण्यास मदत होईल.

१) शिस्त म्हणजे मनाला लावलेले एक प्रकारचे वळण होय.

२) गुरुंच्या मार्गदर्शनाखाली केलेले नियंत्रित वर्तन म्हणजे शिस्त होय.

३) शिस्त म्हणजे परंपरागत नीतिनियमांचे, आचार, विचारांचे, आदर्शांचे प्रामाणिक पालन करणे, कोणत्याही परिस्थितीत पारंपारिक संकेतांचे, नियमांचे उल्लंघन न करणे.

४) सर पर्सीतन यांच्या मते, ''शिस्त म्हणजे सुव्यवस्था कायदे, नियम इत्यादींसारख्या बाह्यात्कारी गोष्टी नव्हेत. उलट शिस्त ही प्रत्यक्ष माणसाच्या वर्तनातील बाबींना प्रेरणा देणाऱ्या अंतर्मनाला जाऊन स्पर्श करते.''

५) माध्यमिक शिक्षण आयोगाच्या मते, ''स्वेच्छेने हाती घेतलेल्या आणि कार्यक्षमतेने पूर्णत्वास नेण्याच्या सहकारी कार्याचे शिस्त हे फलित व किमती जोड उत्पादन आहे.''

### ३.२.३ : शिस्तविषयक पारंपारिक व आधुनिक संकल्पना :

#### १) शिस्तविषयक पारंपारिक संकल्पना :

यामध्ये परंपरागत नीतिनियमांचे, आचारविचारांचे, आदर्शांचे प्रामाणिकपणे पालन करणे, दिलेले काम निमूटपणे करणे या गोष्टी अपेक्षित आहेत. पारंपारिक शिस्तीच्या संकल्पनेत भीती, धाक, दरारा निर्माण करण्यावर भर असतो. विद्यार्थ्यांवर नियंत्रण प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला जातो. केवळ शिक्षकांच्या भीतीने शिस्त पाळली जाते. या शिस्तीचे स्वरूप नकारात्मक, मर्यादित व विघातक असते. विद्यार्थ्यांच्या स्वाभाविक विकासाला व सहजप्रवृत्तीला ही शिस्त मारक असते.

#### २) शिस्तविषयक आधुनिक संकल्पना :

यामध्ये शिस्तीचा मानसशास्त्रानुसार विचार केला जातो. नव्या संकल्पनेनुसार शिस्त ही अंतःस्फूर्त अविष्कार समजली गेली. शिस्तीच्या आधुनिक संकल्पनेनुसार धाकाने, दडपशाहीने, शिक्षेने, भीतीने जी शिस्त निर्माण होते ती खरी शिस्त नव्हे तर शिस्त ही आत्मनियंत्रणातून निर्माण व्हावी. अंतःप्रेरणेतून निर्माण होते. ही शिस्त कृतीला प्रोत्साहन देते. ही स्वयंशिस्त आहे. लोकशाही जीवन पद्धतीत सुजाण नागरीक तयार होण्यासाठी आवश्यक अशी ही शिस्त आहे.

### ३.२.४ शिस्तीचे प्रकार :

शाळा-महाविद्यालयात शिस्त हा आवश्यक घटक आहे. अध्ययन-अध्यापन प्रक्रिया, शैक्षणिक

नियोजन, शैक्षणिक प्रशासन या सर्वच बाबींमध्ये शिस्तीशिवाय पर्याय नाही. विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास साधायचा असेल तर औपचारिक शिक्षणात शिस्त राखण्याच्या पद्धतींना महत्त्व आहे.

शिस्त राखण्याचे एकूण तीन प्रकार आहेत.

१) दडपशाहीची शिस्त

२) व्यक्तीप्रभावाची शिस्त

३) बंधनमुक्त किंवा स्वयंशिस्त

**१) दडपशाहीची शिस्त : (Discipline by Repression)**

शिस्तीचा हा प्रकार सर्वात जुना व पारंपरिक आहे. शिक्षकांना घाबरून, शिक्षेमुळे दडपणाखाली येऊन राखलेली शिस्त म्हणजे दडपशाहीची शिस्त होय. शिक्षकांच्या कडक व रागीट स्वभावामुळे ते वर्गात आल्यावर विद्यार्थी शांत बसतात. त्याच शिक्षकांच्या विषयाचा अभ्यास पूर्ण करतात. उदा. गणित विषयाचे सर खूप कडक आहेत. जर गृहपाठ (Homework) पूर्ण नसेल तर मार बसेल म्हणून गणित विषयाचा अभ्यास वेळेवर करतात. मराठी विषयाच्या मॅडम काही विचारत नाहीत त्यांच्या विषयाचा अभ्यास नाही केला तरी चालेल किंवा वेळेतच झाला पाहिजे असे नाही. अशी विद्यार्थ्यांची मानसिकता बनते. एखाद्या कार्यक्रमासाठी विद्‌यार्थी एकत्र बसवले असतील तर शिक्षकांच्या खुर्च्या मध्ये-मध्ये ठेवाव्या लागतात. हे दडपशाहीचे उदाहरण आहे. कारण शिक्षकांच्या भीतीपोटी विद्यार्थी सभेच्या ठिकाणी, क्रीडांगणावर शांत बसतात. हे वर्तन दडपशाहीमुळे दिसून येते. पण ते टिकाऊ स्वरुपाचे नसते. शिक्षक वर्गाबाहेर पडले किंवा जरा बाजूला गेले की विद्यार्थी दंगा करायला सुरुवात करतात.

**२) व्यक्तिप्रभावाची शिस्त : (Discipline by Impression)**

शिस्तीच्या या प्रकारात शिक्षक आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या प्रभावाची छाप विद्यार्थ्यांवर पाडतात. अध्यापन कौशल्ये, विषयज्ञान, व्यासंग, भाषा शैली, भाषा प्रभुत्व या बाबींचा प्रभाव विद्यार्थ्यांवर पडतो. शिक्षकांकडे असलेल्या या गुणवैशिष्ट्यामुळे विद्यार्थी त्या शिक्षकाप्रती आदर बाळगतो. त्यांना आदर्श मानतो त्यांच्या आदर्शांचे अनुकरण करतो. केवळ त्या शिक्षकांच्या आदरापोटी शिस्त बाळगतो. गुणी व चारित्र्यसंपन्न विद्यार्थी घडविण्यासाठी या शिस्तीचा उपयोग होतो. काही वेळा अंधानुकरण होण्याची शक्यता असते. विशिष्ट मर्यादेपर्यंत ही शिस्त उपयुक्त आहे. मुले व्यक्तिपूजक बनतात अशा वेळी शिक्षक त्या पात्रतेचे नसतील तर विद्यार्थ्यांच्या विश्वासाला तडा जाण्याची शक्यता असते.

**३) बंधनमुक्त किंवा स्वयंशिस्त : (Discipline by Emancipation)**

स्वयंशिस्त हीच खरी शिस्त होय. शिस्तीच्या या प्रकारात संपूर्ण स्वातंत्र्य अभिप्रेत आहे. कोणाच्याही दडपणाखाली येऊन किंवा कोणाच्याही प्रभावाने शिस्त न राखता विद्यार्थी जेव्हा मनापासून शिस्त राखतो तेव्हा त्या शिस्तीच्या प्रकारास बंधनमुक्त / स्वयंशिस्त असे म्हणतात. विद्यार्थ्याला जेव्हा स्वतःच्या

आतून वाटेल की मी बेशिस्तीचे वर्तन करता कामा नये. मी नियमित शाळेला गेले पाहिजे, नियमित अभ्यास केला पाहिजे, शाळेची शिस्त राखली पाहिजे, शिक्षकांची आज्ञा पाळली पाहिजे हे विद्यार्थ्याला आतून कळले पाहिजे. जीवनात आदर्श, मूल्ये कशी आचरणात आणली पाहिजे हे कळले पाहिजे. प्रामाणिकपणा, नीतिमत्ता, विवेकबुद्धी, विनम्रता हे गुण आपल्यासाठी आवश्यक आहेत. हे विद्यार्थ्याला स्वतःला पटले पाहिजे. शिस्त स्वयंप्रेरित व मनापासून पाळली गेली पाहिजे.

स्वयंशिस्त ही शिस्त बंधनमुक्त शिस्त म्हणूनही ओळखली जाते. मुलांना संपूर्ण स्वातंत्र्य या शिस्त प्रकारात दिले जाते. विद्यार्थ्यांच्या स्वाभाविक गुणांचा विकास होतो. परंतु संपूर्ण स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे. शिक्षकांनी हुकूमशाहीचा वापर न करता विद्यार्थी मताचा विचार करुन शिस्त राखण्याचा प्रयत्न केल्यास स्वयंशिस्त राखली जाते.

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न – १**

**रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

१) ..................मुळे माणसाचा परमोच्च विकास होतो.

२) शिस्त हा शब्द ...............भाषेतून आला आहे.

३) शिस्त हा शब्द............धातूपासून तयार झाला आहे.

४) ............. हा शिस्तीचा सर्वात जुना व पारंपारिक प्रकार आहे.

५) शिस्तीचा..............हा प्रकार म्हणजे खरी शिस्त होय.

**३.२.४ सामाजिक जीवनात शिस्तीचे महत्त्व :**

केवळ शालेय जीवनातच शिस्त आवश्यक आहे असे नाही. तर सामाजिक जीवनातही व्यक्तीला आपला विकास करुन घ्यायचा असेल किंवा चांगल्या सवयी लावून जीवन अधिक सुखी, समृद्ध करायचे असेल तर शिस्त आवश्यक आहे. उदा. परीक्षेत यश किंवा पहिला क्रमांक मिळवायचा असेल तर अभ्यास करणे भाग आहे. शिस्तीकडे दुर्लक्ष झाल्यामुळे आज विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, धैर्य, निश्चयशक्ती यांचा अभाव आढळतो. तो केवळ शिस्तीकडे दुर्लक्ष झाल्यामुळेच. मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून मुलाला शारीरिक सवयीतून मानसिक वृत्तींचा विकास होतो. उदा. राष्ट्रगीत किंवा प्रार्थना म्हणणे या गोष्टी केल्याच पाहिजेत का? त्याने काय होणार आहे? असा अनेक लोकांचा आक्षेप असतो. त्यांच्या मते या वरपांगी, यांत्रिक वृत्तींना महत्त्व नाही परंतु वारंवार शारीरिक कृती करुनच मनाला वळण लागू शकते. मनोवृत्ती निर्माण होऊ शकतात.

माणूस हा समाजप्रिय प्राणी आहे. त्याला सामाजिक जीवनात समाजधारणेसाठी नीतिनियमांची चौकट गरज असते. माणूस समाजात राहतो त्याप्रमाणे इतर प्राणी कळपात राहतात. परंतु मानवालाच संस्कृती असते. माणूस हा नियम करणारा प्राणी आहे. त्याने समाजातील रुढी, परंपरा, रीतीभाती, कायदा

इ. सामायिक संकेतांची, नियमांची चौकट विवेकाच्या आधारे केली आहे.

सामाजिक जीवनात शिस्त अतिशय महत्त्वाची आहे. कारण प्रत्येक मुलाला एखाद्या रोपट्याप्रमाणे रुजविण्यासाठी नीतिनियमांचे कोंदण पाहिजे. त्याचप्रमाणे स्वातंत्र्याची सुद्धा गरज आहे. कारण स्वातंत्र्य या संकल्पनेत शिस्त किंवा सुनियमितता अभिप्रेत आहे. शिस्त व स्वातंत्र्य या वेगळ्या संकल्पना नसून त्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.

नन् यांच्या मते शिस्त ही थेट माणसाच्या अंतर्मनाला प्रेरणा देणाऱ्या अंतर्मनालाच जाऊन स्पर्श करते. मनःशक्तींना नियंत्रित करते, सुयोग्य वळण लावते. म्हणून केवळ शालेय जीवनातच शिस्त आवश्यक आहे असे नाही तर समाज-जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर शिस्तीचा पाठपुरावा करणे तितकेच गरजेचे आहे.

**३.२.५ शाळा महाविद्यालयीन स्तरावरील बेशिस्तीची कारणे :**

'नोकरीसाठी पदवी आणि पदवीसाठी शिक्षण' असे काहीसे समीकरण शिक्षणाच्या बाबतीत आज समाजात पहावयास मिळत आहे. शिक्षणाकडे पाहण्याचा लोकांचा कल उपयुक्ततावादी झाला आहे. पदवी आणि नोकरीचे अतूट असे नाते जोडले जाते आणि दुर्दैव असे की प्रचलित शिक्षणातून सर्वांनाच नोकरी मिळेल असे नाही. लोकसंख्यावाढीमुळे बेकारी वाढत चालली आहे. अशा शिक्षणावर विद्यार्थ्यांचा विश्वास बसत नाही. त्यामुळेच शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची बेशिस्त ही एक गंभीर समस्या बनत चालली आहे.

विद्यार्थ्यांच्या बेशिस्तीचे परिणाम शाळा महाविद्यालयावर झालेले दिसून येत आहेत. बेशिस्त वर्तनामुळे रोजच्या वर्तमानपत्रात उपोषणे, मोर्चे, संप, दगडफेक, मारामारीच्या बातम्या छापून येतात. देशाचे भवितव्य घडविणारी पिढीच देशाचे नुकसान करताना दिसत आहे. अशा बेशिस्त मुलांच्या बेशिस्तीची कारणे जाणून घेणे आपल्यासाठी खुप गरजेचे आहे.

बेशिस्तीच्या कारणांमध्ये पुढील तीन घटक महत्त्वाचे वाटतात.

१) कुटुंब २) शाळा ३) समाज

**३.२.५ शाळा महाविद्यालयीन स्तरावरील बेशिस्तीची कारणे :**

**१) कुटुंबात लोकशाहीचा अभाव :**

कुटुंबातील ज्येष्ठ व्यक्ती मुलांवर आपली मते लादतात. 'हम करे सो कायदा' या नात्याने त्यांच्याशी वागतात. घरातील कोणत्याही निर्णयात त्यांना बोलण्याचे स्वातंत्र्य नसते. हुकुमशाही वृत्तीने वागले जाते. त्यामुळे मुलांच्या इच्छा, आकांक्षा, मते, विचार, भावना आतल्या आत दडपल्या जातात. अशा दडपलेल्या भावना विचार दुसऱ्या ठिकाणी उफाळून येतात आणि मग त्यांच्याकडून बेशिस्तीचे वर्तन घडते.

**२) पालकांचा मुलांबाबत उदासीन दृष्टिकोन :**

काही व्यावसायिक कुटुंबातील पालक आपल्या पाल्याला आपल्या कामात, व्यवसायात मदत करायला सांगतात. शिक्षणाकडे जाऊ नये, शिकून तरी काय करणार आहेस? त्यापेक्षा मला मदत कर, आपला व्यवसाय सांभाळ अशीच अपेक्षा पालक व्यक्त करतात. उदा. सुतारकाम, चांभारकाम, शेती इ.

**३) विद्यार्थ्यांच्या गरजांची पूर्तता न होणे :**

मुलांच्या प्राथमिक गरजा घरातूनच पूर्ण होणे आवश्यक आहे. त्यांना हवे असणारे साहित्य, वह्या, पुस्तके, गणवेश, शाळेची फी इ. बाबींची पूर्तता कुटुंबातून होणे गरजेचे आहे. पालकांनी अशा गरजा वेळेवर पूर्ण केल्या नाहीत तर विद्यार्थी बेशिस्तीने वागतात.

**४) कुटुंबातील व्यसनाधिनता :**

कुटुंबातील सदस्य व्यसनाधीन असतील तर ते बेशिस्तीवर परिणाम करणारे एक महत्त्वाचे कारण आहे. कारण आज समाजात व्यसनाधीनतेचे प्रमाण खूपच वाढले आहे. मुले मोठ्यांचे अनुकरण करतात. लहान मुलांसमोर पालक तंबाखू खाणे, गुटखा खाणे, दारू पिणे अशा प्रकारचे व्यसन करत असतील तर मुलेही व्यसनाकडे वळतात. त्यामुळे कुटुंबात होणारी भांडणे, हेवेदावे, मारामाऱ्या इ. चा नकळत परिणाम विद्यार्थ्यांच्या मानसिकतेवर होतो. सुशिक्षित लोकही आधुनिकतेच्या नावाखाली पार्ट्यांमध्ये व्यसने करताना दिसतात. त्याचाही परिणाम विद्यार्थ्यांच्या मानसिकतेवर होतो. त्यामुळे तरुण मुलेही व्यसनाधीनतेकडे वळताना दिड्सठतघाठत.

**५) कौटुंबिक संस्कारांचा अभाव :**

समाजात आज विभक्त कुटुंब पद्धतीमुळे अनेक त्रिकोणी, चौकोनी कुटुंबे अस्तित्वात आली आहेत. एकत्र कुटुंबातील आजी, आजोबा, काका, काकू, या नात्यातील ओलावा त्यांना मिळत नाही. परिणामी देवपूजा, भजन, कीर्तन, गप्पा गोष्टी, खेळ अशा गोष्टींना फाटा मिळत चालला आहे.

रोजगार करणारे पालक आपल्या पाल्याला पुरेसा वेळ देऊ शकत नाहीत. अशा पालकांनी आपल्या पाल्यांवर संस्कार कधी करावेत हा मोठा प्रश्नच आहे. परिणामी अशी संस्कारहीन मुले बेशिस्तीने वागताना दिसतात.

**६) कुटुंबातील मानसिक अस्वास्थ्य :**

सध्याचे युग हे ताण-तणावाचे युग मानले जाते. कुटुंबातील संघर्ष, मानसिक ताण-तणाव, हेवे-दावे, नैराश्य, अपयश, दीर्घकालीन आजार, द्वेष, मत्सर यामुळे कुटुंबात वातावरण मोकळे राहत नाही. परस्परांवर प्रेम, जिव्हाळा अशा गोष्टी ढासळले तर मुले गैरवर्तन करतात.

**७) कुमारावस्थेचा कालावधी :**

शालेय वय हे कुमारावस्थेचे वय असते. १३ ते १९ वर्षे असा या अवस्थेचा कालावधी असतो. या वयात मुलांची ना थोर ना पोर अशी अवस्था असते. 'एवढा घोड्यासारखा वाढला तरी अक्कल नाही.' असे उद्‌गार एकीकडे व 'तू गप्प बैस तुला अजून काही कळत नाही.' असे उद्‌गार दुसरीकडे. त्यामुळे आपण नक्की लहान आहोत की मोठे आहोत असा भावनिक संघर्ष वाढतो. अशा वयोगटातील मुलांना पालकांनी विश्वासात घेतले पाहिजे. त्यांना आवश्यक तिथे स्वातंत्र्य दिले पाहिजे असे झाले नाही तर ती आक्रमक बनतात.

**३.२.५.२ शाळा या घटकाशी संबंधित कारणे :**

**१) अध्यापनकुशल शिक्षकांचा अभाव :**

सध्या सगळीकडे शिक्षणाच्या बाजारीकरणाच्या विषयावर चर्चा चालू असते. शिक्षणसम्राट सत्तेच्या व अधिकाराच्या जोरावर शिक्षणसंस्था काढतात. त्यामध्ये त्यांचे नातेवाईक, शिक्षणसेवक, तासिका तत्त्वावर नेमलेले शिक्षक यांचा समावेश असतो. ते अध्यापन कुशल न झाल्याने त्याचा विद्यार्थ्यांवर परिणाम होतो. व विद्यार्थी बेशिस्तीचे वर्तन करताना दिसतात. जे शिक्षक विद्यार्थ्यांचे बौद्धिक समाधान करु शकत नाहीत. त्यांचे तास विद्यार्थी चुकवितात, दंगा करतात. संप, घेराव, मोर्चे काढले जातात. अशा प्रकारचे बेशिस्तीचे वर्तन विद्यार्थ्यांकडून होते.

**२) शिक्षकांचे हुकुमशाही धोरण :**

'मी म्हणेन तेच खरे', 'तुम्हाला काही कळत नाही' 'मी सांगतो तेच करायचे' अशा प्रकारचे शिक्षकांचे हुकुमशाही धोरण असेल तर विद्यार्थ्यांचे विचार, कल्पना दडपल्या जातात. रागीट व कडक शिक्षकांमुळे विद्यार्थी कोडगे बनतात. परिणामी बेशिस्तीने वागण्याकडे त्यांचा कल असतो.

**३) शिक्षकांचा पक्षपातीपणा :**

शिक्षकांचे पक्षपाती धोरण हे बेशिस्तीला कारणीभूत ठरते. हा माझ्या जवळचा, हा माझ्या नात्यातला, जातीचा अशी भावना ठेवून विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करणे, परीक्षेत त्याला मार्क्स वाढवून देणे असे पक्षपाती धोरण जर वर्गात अवलंबले तर इतर विद्यार्थ्यांच्या मनावर त्याचा वाईट परिणाम होतो. त्यामुळे विद्यर्थी बेशिस्तीने वागतात.

**४) विद्यार्थी - शिक्षक संबंध :**

अध्ययन - अध्यापन प्रक्रिया यशस्वी होण्यासाठी विद्यार्थी-शिक्षक संबंध प्रेमाचे, जिव्हाळ्याचे आपुलकीचे असणे गरजेचे आहे. (Teacher is a friend, philosopher and guide of student) असे म्हटले जाते. तसा तो बनू शकला नाही तर विद्यार्थ्यांनाही शिक्षकाविषयी प्रेम, आदर, जिव्हाळा

वाटत नाही. त्यामुळे विद्यार्थी - शिक्षक यांच्यात दुरावा निर्माण होऊन मुले बेशिस्तीने वागतात.

**५) सदोष वर्गरचना :**

वर्गरचना सदोष असेल, पुरेसा प्रकाश, वायुजीवन, फळ्याची वर्गातील जागा, नीट न दिसणे अशा गोष्टींमुळे वर्गातील वातावरण अध्ययनासाठी पूरक नसेल तर विद्यार्थी बेशिस्तीने वागतात.

**६) सदोष शिक्षणपद्धती :**

'ज्याचे जास्त डोनेशन त्याचे शिक्षण' अशी म्हण आता शिक्षणक्षेत्रात यायला लागली आहे. शिशुवर्गापासूनच हल्ली 'डोनेशन' देऊन प्रवेश घेतले जातात. 'जागरूक' पालक डोनेशन द्यायला अगदी रात्रंदिवस रांगेत उभे असतात. होतकरू, हुशार विद्यार्थ्यांना डावलून मुलाखती आणि प्रवेश परिक्षेच्या गोंडस नावाखाली श्रीमंत पालकांच्या मुलांना प्रवेश दिले जातात.

**७) शैक्षणिक सुविधांची कमतरता :**

शाळेमध्ये विद्यार्थ्यांना पुरविल्या जाणाऱ्या सोईसुविधा जर नीट नसतील, उदा. ग्रंथालयात पुस्तकांची कमी संख्या, शिक्षकांची कमी संख्या, क्रीडांगण नसणे, खेळाचे साहित्य नसणे, सुसज्ज प्रयोगशळा नसणे, वर्ग, वर्गातील बाकांची संख्या इ. बाबी व्यवस्थित नसतील तर विद्यार्थी बेशिस्तीचे वर्तन करताना दिसतात.

**८) कौटुंबिक संस्कारांचा अभाव :**

पूर्वी एखाद्या गावातील शिक्षकाला शाळेत येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याची कौटुंबिक पार्श्वभूमी, आर्थिक परिस्थिती, कुटुंबातील लोकांचा परिचय या सर्व बाबींचा अंदाज असे त्यामुळे एखादा विद्यार्थी कोणत्या कौटुंबिक संस्काराखाली वाढतोय हे त्या शिक्षकाला माहित असे. त्यामुळे संस्कार करण्याची जबाबदारी तो शिक्षक घेत असे. आता शहरीकरणामुळे शिक्षक खेड्यात रहायला तयार होत नाही. जवळच्या शहरात राहून तो शाळेच्या वेळात जा-ये करतो त्यामुळे विद्यार्थ्यांविषयी फारशी माहिती त्याला नसते. त्यामुळे तोंडदेखलेपणामुळे विद्यार्थी बेशिस्तीने वागताना दिसते.

### ३.२.५.३ 'समाज' या घटकाशी संबंधित बेशिस्तीची कारणे :

**१) समाजातील भ्रष्टाचार :**

राजकारण, समाजकारण, शिक्षण अशा सर्वच क्षेत्रात आता भ्रष्टाचार दिसून येत आहे. उच्च पदस्थ अधिकारी असोत, शासकीय कर्मचारी असोत, राजकारणी असोत आज भ्रष्टाचारापासून कोणी वेगळा नाही. काहीतरी टेबलाखालून दिल्याशिवाय सरकारी काम होत नाही. या सर्वांचे रोजच दर्शन विद्यार्थ्यांना घडते. काही महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी याचा अनुभवसुद्धा घेतलेला असतो. त्यामुळे असे विद्यार्थी बेशिस्तीने वागतात.

**२) बेरोजगारीचे वाढते प्रमाण :**

बेरोजगारीची समस्या संपूर्ण देशाला ग्रासत आहे. आज देशातील तरुणांची संख्या जास्त आहे. सर्वांनीच नोकरीची अपेक्षा करुन चालणार नाही. परंतु मुले पदवी आणि नोकरी यांचा संबंध जोडतात. शिक्षण पूर्ण केल्यानंतर नोकरी करणे हे एकच ध्येय बाळगतात. व्यावसायिक शिक्षणाचा अभाव असल्याने विद्यार्थ्यांना पदवी घेऊनही नोकरी मिळत नाही. व्यवसाय करता येत नाही. त्यामुळे बेरोजगारीचे प्रमाण वाढलेले दिसते. याचा परिणाम महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या शिस्तीवर होतो.

**३) सामाजिक अन्याय :**

समाजातील अन्यायकारी घटनांमुळे समाजात अराजकता माजली आहे. जातीय दंगली, नक्षलवाद्यांचे हल्ले, खंडणी, अपहरण, अतिरेक्यांच्या समस्या, बाँबस्फोट, भ्रष्टाचार यामुळे जनजीवन विस्कळीत होते. अनिष्ठ रुढी, परंपरा, हुंडापद्धती, लग्नसमारंभातील डामडौल, पैशाची उधळपट्टी यामुळे गरीबांचे हाल होत चालले आहेत. अशा सामाजिक अन्यायाचे पडसाद शाळा-महाविद्यालयात उमटतात आणि विद्यार्थी वर्तनावर त्याचा अनिष्ट परिणाम होतो.

**४) आदर्शांचा अभाव :**

आजच्या विद्यार्थ्यांपुढे प्रभावशाली आदर्शांचा अभाव आहे. तरुण पिढी बिघडली आहे. असा आरोप तरुणाईवर केला जातो. मोबाईलचा अतिरेकी वापर, मिडियाचा परिणाम, भ्रष्टाचार, गुन्हेगारी, अत्याचार यांनी सर्व क्षेत्रे व्यापली असताना विद्यार्थ्यांनी आदर्श म्हणून कोणाकडे पहावे. समाजहित व राष्ट्रहित या फक्त बोलायच्या गोष्टी राहिल्या आहेत. स्वार्थी राजकारण सत्तेसाठी हपालेले असतात. अशा समाजात वावरताना विद्यार्थी आपोआपच बेशिस्तीकडे वळतो.

**५) दिशाहीन राजकारण :**

सरस्वतीच्या मंदिरात ज्ञानाचा गजर झाला पाहिजे असे आपण म्हणतो. परंतु शिक्षणात सुद्धा आता राजकारणाने प्रवेश केला आहे. विद्यापीठ निवडणुका, गावपातळीवरील निवडणुका, विधानसभा, लोकसभा इ. निवडणुकीतून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा सर्रास वापर करुन घेतात. नोकरी देतो असे सांगून कित्येकांची फसवणूक केली जाते. प्रचारांसाठी तरुणांचा वापर करुन घेतला जातो. यामध्ये कित्येक तरुण व्यसनांच्या आहारी जातात. भांडणे, खून, मारामाऱ्या यामध्ये अडकतात. अशा विकृत राजकारणाचा परिणाम विद्यार्थी वर्तनावर होऊन ते बेशिस्तीने वागताना दिसतात.

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न २ :**

प्रश्न १ : 'शाळा' या घटकाशी संबंधित बेशिस्तीची कारणे स्पष्ट करा.

प्रश्न २ : 'समाज' या घटकाशी संबंधित बेशिस्तीची कारणे स्पष्ट करा.

**३.२.६ शिस्त राखणेसाठीच्या उपाययोजना :**

**२.२.६.१ शालेय सरावावरील उपाययोजना :**

**१) शिक्षकांचे दर्जेदार अध्यापन :**

'शिक्षक हा आजन्म विद्यार्थी असतो' या न्यायाने प्रत्येक शिक्षकाने आपले ज्ञान अद्ययावत ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. स्वतःचे विषयज्ञान वाढवून विद्यार्थ्यांचे बौद्धिक समाधान करता आले पाहिजे. अध्यापन सचेतन व परिणामकारक केले पाहिजे तरच विद्यार्थ्यांचे अवधान केंद्रीकरण होण्यास मदत होईल. परिणामी विद्यार्थी वर्तन सुधारेल.

**२) प्रभावी अध्यापन पद्धती :**

विद्यार्थ्यांच्या वयोगटाचा विचार करुन पाठ्यवस्तूस योग्य अशा अध्यापन पद्धतीची निवड करावी. दिग्दर्शन पद्धती, प्रात्यक्षिक पद्धती, कथाकथन पद्धती अशा अध्यापन पद्धतींचा वापर करावा जेणेकरुन विद्यार्थी अवधान टिकून राहील. शैक्षणिक साधनांचा वापर केल्यामुळे विद्यार्थी अध्ययन अध्यापन प्रक्रियेत सक्रीय सहभागी होईल.

**३) शिक्षक – पालक संघ :**

शाळेत शिक्षक – पालक संघाची स्थापना करावी, पालक प्रतिनिधी नेमावेत. सध्याची शिक्षण प्रक्रिया ही विद्यार्थी – शिक्षक यांच्यापुरती मर्यादित न राहता 'पालक' या घटकाचाही समावेश झाला आहे. त्यामुळे शिक्षण प्रक्रियेत पालकांच्या मतांचाही विचार केला जावा. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या योग्य अयोग्य वर्तनावर चर्चा होऊ शकेल. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेतला जाईल. पालक सभेमध्ये या विषयी चर्चा झाल्याने पाल्याच्या शैक्षणिक प्रगतीचा अंदाज पालकांना येईल.

**४) दत्तक – पालक योजना :**

प्रत्येक शिक्षकाकडे ५ ते १० विद्यार्थ्यांचा एक गट स्वतःकडे दत्तक घ्यावा. त्या विद्यार्थ्यांची दैनंदिनी तपासावी. दररोज विद्यार्थी काय करतो, कोणते खेळ खेळतो, कोणते मित्र आहेत, काय वाचतो यासंबंधी शिक्षकाला माहिती मिळू शकेल. त्याच्या आवडी निवडी काय आहेत हे जाणून घेऊन त्याच्या कुवतीप्रमाणे त्याला मार्गदर्शन करता येईल.

**५) अभ्यासपूर्वक कार्यक्रम :**

शाळेमध्ये स्काऊट गाईड, सहली, व्याख्यानमाला, मुलाखती असे उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना त्यात सहभागी करुन घ्यावे. त्यामुळे जबाबदारीची जाणीव, विनम्रता, सहकार्यवृत्ती सदाचरण इ. गुणांचा विकास होईल.

**६) मनोविकृत मुलांच्या समस्या :**

शाळेत काही मनोविकृत मुले असतील तर त्यांच्या वर्तनवैशिष्ट्यांचा अभ्यास करण्यासाठी पालकांच्या

सहकार्याने मनोवैज्ञानिकांचा सल्ला घ्यावा. मानसोपचार केंद्राची स्थापना शाळेत करावी. १० वी नंतर विद्यार्थ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण खूपच वाढले आहे. त्यामुळे समुपदेशन व मार्गदर्शन याचा लाभ विद्यार्थ्यांना होऊ शकेल.

**३.२.६.२ महाविद्यालयीन स्तरावरील उपाययोजना :**

वरील शालेय स्तरावरील काही उपाययोजनेबरोबरच पुढील उपाययोजना महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरतील.

**१) प्रभावी अध्यापन पद्धती :**

महाविद्यालयीन स्तरावर ‘व्याख्यान’ पद्धतीचा अवलंब केला जातो. परंतु अध्यापनातील तोच-तोचपणा टाळण्यासाठी विविध अध्यापन पद्धतींचा वापर आवश्यक आहे. (L.C.D., O.H.P. Slides, Charts, Models, Tree charts) इ. शैक्षणिक साधनांचा वापर करावा.

**२) अभ्यासपूर्वक कार्यक्रमात सहभाग :**

शिक्षणाचे उद्दीष्टच मुळी विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास करणे हे असल्यामुळे राष्ट्रीय सेवा योजना (NCC) राष्ट्रीय छात्रसेना (NSS), सहली, नामांकित व्यक्तींच्या मुलाखती, व्याख्यानमाला, अशा अनेक उपक्रमांचे आयोजन महाविद्यालयात करावे. विद्यार्थी सहभाग घ्यावा त्यामुळे विद्यार्थ्यांच्या नेतृत्व गुणांचा विकास होईल. जबाबदारीचे वर्तन त्यांच्याकडून घडेल.

**३) कायद्याचे ज्ञान देणारे कार्यक्रम :**

आज समाजात माजलेली अराजकता पाहता विद्यार्थ्यांना कायदेविषयक माहिती आणणे आवश्यक आहे. प्रत्येक महाविद्यालयात लैंगिक छळ प्रतिबंधक समिती, रॅगींग समितीची स्थापना करावी. विद्यार्थ्यांना कायद्याची ओळख होण्यासाठी कायद्याचे ज्ञान देणारे कार्यक्रम आयोजित करावेत. यासाठी स्थानिक शहरातील न्यायालयाचे न्यायाधीश, वकील, प्रतिष्ठित व्यक्ती यांना पाचारण करावे. त्यामुळे विद्यार्थ्यांना कायद्याची माहिती होईल.

**४) व्यवसाय मार्गदर्शन :**

महाविद्यालयात व्यवसाय मार्गदर्शन केंद्र असावे. पदवीधारक विद्यार्थ्यांना भविष्यात याचा लाभ होऊ शकेल. तज्ज्ञ व्यक्तींची व्याख्याने, उद्योजकांची भाषणे, बँक अधिकारी इ. ची भाषणे आयोजित करावीत. त्यामुळे व्यवसायाबद्दलची माहिती मिळेल. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातूनही समाजातील विविध उच्चपदस्थ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनपर व्याख्यानांचे आयोजन करावे. त्याचाही विद्यार्थ्यांना भविष्यात लाभ होईल.

**दर्जेदार अध्यापन :**

महाविद्यालयीन विद्यार्थी लेक्चर बंक करण्यात धन्यता मानतात. वर्गात बसण्यापेक्षा त्यांना कॉलेजकट्टे प्रिय असतात. अशावेळी शिक्षकांचे प्रभावी अध्यापन त्यांना वर्गाकडे खेचून आणू शकते. दर्जेदार अध्यापन, शिक्षकांचे प्रभावी व्यक्तिमत्त्व विद्यार्थ्यांना बेशिस्त करण्यापासून रोखू शकते.

अशाप्रकारे शाळा - महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या जटिल समस्या सोडवण्यासाठी समाज, शाळा, कुटुंब या घटकातील सर्व सदस्यांनी सतर्क आणि प्रयत्नशील राहिले पाहिजे. वरील उपाययोजनांची पूर्तता करावी.

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न :**

प्रश्न १ : शालेय विद्यार्थ्यांच्या बेशिस्तीसाठी कोणतेय उपाय योजावेत?

प्रश्न २ : महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या शिस्तीसाठी कोणते उपाय योजाल?

**३.३ सारांश :**

विद्यार्थी मित्रहो, आपण या पाठात शिस्त व स्वातंत्र्याची संकल्पना समजून घेतली. शालेय आणि सामाजिक जीवनात शिस्तीचे महत्त्व आपण जाणले, शिस्त व स्वातंत्र्य या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. शिस्त व स्वातंत्र्य यात समन्वय असला पाहिजे.

दडपशाहीची, व्यक्तिप्रभावाची आणि बंधनुक्त किंवा स्वयंशिस्त असे शिस्तीचे तीन प्रकार आपण पाहिले. यामधील स्वयंशिस्त हाच शिस्तीचा खरा प्रकार आहे. कारण मनाला लावलेले वळण म्हणजे शिस्त. विद्यार्थ्यांनी बेशिस्तीचे वर्तन न करता स्वतः स्वजाणीवेने स्वयंशिस्त राखली पाहिजे तरच उद्याच्या भारताचे भवितव्य सुकर बनेल.

विद्यार्थ्यांच्या बेशिस्तीची कारणे आपण अभ्यासली. कुटुंब, शाळा, समाज या तीन घटकांशी संबंधित विद्यार्थ्यांच्या बेशिस्तीची कारणे अभ्यासताना आपल्या लक्षात आले असेल की केवळ विद्यार्थ्यांना दोष देऊन उपयोग नाही. तर समाजातील, कुटुंबातील, शाळेतील अनेक घटक यासाठी कारणीभूत आहेत.

शिस्त राखणेसाठीच्या उपाययोजना जर अंमलात आणल्या तर विद्यार्थ्यांचे वर्तन निश्चितपणे सुधरण्यास मदत होईल.

**३.४ स्मरणात ठेवण्याच्या संकल्पना :**

१) शिस्त : शिस्त म्हणजे परंपरागत नीतीनियमांचे, आचार विचारांचे, आदर्शांचे प्रामाणिक पालन

करणे, कोणत्याही परिस्थितीत पारंपरिक संकेताचे, नियमांचे उल्लंघन न करणे.

२) शिस्तीचे प्रकार : १) दडपशाहीची शिस्त, २) व्यक्तिप्रभावाची शिस्त, ३) बंधनमुक्त / स्वयंशिस्त.

३) शिस्त व स्वातंत्र्य एकाच नाण्याच्या दोन बाजू.

४) विद्यार्थ्यांच्या बेशिस्तीची कारणे व उपाययोजना.

**३.५ स्वयंअध्ययनासाठीच्या प्रश्नांची उत्तरे :**

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न - १**

१) व्यक्तिस्वातंत्र्या, २) पारशी, ३) शास, ४) दडपशाहीची शिस्त, ५) स्वयंशिस्त

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न - २**

१) 'शाळा' या घटकाशी संबंधित कारणे : १) अध्यापन कुशल शिक्षकांचा अभाव

२) शिक्षकांचे हुकूमशाही धोरण, ३) शिक्षकांचा पक्षपातीपणा, ४) विद्यार्थी- शिक्षक संबंध, ५) सदोष वर्गरचना, ६) सदोष शिक्षणपद्धती, ७) शैक्षणिक सुविधांची कमतरता, ८) कौटुंबिक संस्कारांचा अभाव.

२) 'समाज' घटकाशी संबंधित कारणे : १) समाजातील भ्रष्टाचार, २) बेरोजगारीचे वाढते प्रमाण, ३) सामाजिक अन्याय, ४) आदर्शाचा अभाव, ५) दिशाहीन राजकारण

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न - ३**

१) शालेय विद्यार्थी बेशिस्त उपाययोजना :

१) शिक्षकांचे दर्जेदार अध्यापन, २) प्रभावी अध्यापन पद्धती, ३) शिक्षक-पालक संघ, ४) दत्तक - पालक योजना, ५) अभ्यासपूर्वक उपक्रम, ६) मनोविकृत मुलांच्या समस्या.

२) महाविद्यालयीन स्तरावरील उपाययोजना :

१) प्रभावी अध्यापन पद्धती, २) अभ्यासपूर्वक कार्यक्रमात सहभाग, ३) कायद्याचे ज्ञान देणारे कार्यक्रम, ४) व्यवसाय मार्गदर्शन, ५) दर्जेदार अध्यापन

**३.६ स्वाध्याय :**

प्रश्न : १) शिस्तीचा अर्थ स्पष्ट करा.

प्रश्न : २) शिस्त राखणेचे प्रकार कोणते?

प्रश्न : ३) सामाजिक जीवनातील शिस्तीचे महत्त्व स्पष्ट करा.

**३.७ : पुढील अध्यायनासाठी संदर्भ साहित्य :**


* कुंडले म. बा. (१९९४) शैक्षणिक तत्त्वज्ञान व समाजशास्त्र, श्री विद्या प्रकाशन पुणे.
* पारसनीस न. रा. (१९८७) शिक्षणाची तात्त्विक व समाजशास्त्रीय भूमिका, नूतन प्रकाशन पुणे.
* धनवडे नंदकुमार आणि धनवडे सुरेखा (२०११) शिक्षणशास्त्र, फडके प्रकाशन,कोल्हापूर.
* शिक्षणाचे तत्त्वज्ञानात्मक व समाजशास्त्रीय अधिष्ठान (२०१४) बी.ए. भाग-१ शिक्षणशास्त्र (पेपर १), दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर प्रकाशन.


***

# घटक – ४

# शिक्षणतज्ज्ञ व त्यांचे शैक्षणिक योगदान

४.० उद्दिष्टे :

४.१ विषय विवेचन :

**कर्मवीर भाऊराव पाटील**

४.१.१ प्रस्तावना

४.१.२ जीवन चरित्र

४.१.३ रयत शिक्षण संस्थेची स्थापना

४.१.४ कर्मवीरांचे शैक्षणिक कार्य

४.१.५ बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी आचरणात आणले तत्त्व

४.१.६ शैक्षणिक योगदान

४.१.७ कर्मवीरांविषयी गौरवोद्गार

४.१.८ रयत शिक्षण संस्थेचा कार्यविस्तार

४.१.९ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

**४.२ महात्मा जोतीराव फुले**

४.२.१ प्रास्ताविक

४.२.२ जीवनचरित्र

४.२.३ म. फुले यांचे सामाजिक कार्य

४.२.४ सत्यशोधक समाजाची स्थापना

४.२.५ म. फुले यांची ग्रंथसंपदा

४.२.६ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

४.३ अधिक वाचनासाठी पुस्तके

**उद्दिष्टे :**

भारतामध्ये अनेक विचारवंतांनी आपल्या तत्त्वज्ञानाला अनुसरून शैक्षणिक कार्य केलेले आहे. स्वत:ची विचारसरणी मांडून समाजाला अज्ञानातून बाहेर काढण्याचे अविरत प्रयत्न केले. सामाजिक विरोधाला न जुमानता प्रतिकूल परिस्थितीत समाजसेवेचे व शिक्षणप्रसाराचे कार्य हाती घेतले होते. याची माहिती कर्मवीर भाऊराव पाटील व महात्मा जोतिराव फुले या घटकांचा अभ्यास केल्यावर माहिती होईल.

१) तत्त्वचिंतकांनी केलेले कार्य माहिती होईल.

२) कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक प्रयोग समजतील.

३) म. फुले यांचे स्त्रियांबाबतचे केलेले सामाजिक व शैक्षणिक कार्य समजेल.

४) विविध तत्त्ववेत्यांचे शैक्षणिक कार्य सांगता येईल.

**४.१.१ प्रास्ताविक :**

बहुजन समाजाविषयी असणाऱ्या चळवळीला अपार कष्ट आणि असीम त्यागाची जोड देऊन महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात ज्यांना शिक्षण म्हणजे काय, हे देखील माहित नाही, त्या वंचित जनतेच्या दारापर्यंत शिक्षणाची गंगा नेऊन पोहचविण्याचे कार्य कर्मवीर भाऊराव पाटील यांनी केले. खेड्यापाड्यात ज्ञानाची गंगा पोहचली पाहिजे, ही दूरदृष्टी व शिक्षणाविषयी नितांत प्रेम यामुळे कर्मवीरांचे कार्य उल्लेखनीय ठरते. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे कार्य हजारो-लाखो विद्यार्थ्यांच्या माध्यमातून व त्यांनी केलेल्या प्रगतीच्या माध्यमातून आज उभा महाराष्ट्र अनुभवत आहे. यामुळे पश्चिम महाराष्ट्र शैक्षणिक दृष्ट्या ५० वर्षे पुढे गेला! प्रगत झाला! छत्रपती शाहू महाराजांच्या कार्याचा आदर्श आपल्यासमोर ठेवून कर्मवीर अण्णांनी शिक्षण प्रसाराचे कार्य आयुष्यभर केले.

**४.१.२ जीवन चरित्र :**

**जन्म व शिक्षण** : कर्मवीर भाऊराव पाटील यांचा जन्म २२ सप्टेंबर १८८७ रोजी कुंभोज ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथे झाला. कर्मवीर अण्णांचं मूळ घराणं मुडबिद्रीचं, मुडबिद्री हे कर्नाटकातल्या मंगलोर तालुक्यातले छोटंसं गाव, पूर्वज देसाई त्या ठिकाणी छोटे शेतकरी म्हणून राबत होते. इ.स. १०४५ च्या सुमारास दुष्काळामुळे मुडबिद्री हे खेडे सोडावे लागले. स्थलांतर करीत, अनेक ठिकाणी मुक्काम करीत महाराष्ट्राच्या दिशेने तासगाव तालुक्यात, येलवी खेड्यात स्थायिक झाले. अतिशय कष्ट केले. व तेथे पाटील झाले. भाऊराव यांचे मूळ गाव ऐतवडे बुद्रुक. हे गाव सांगली जिल्ह्यातील वाळवे तालुक्यातील आहे. भाऊरावांचे आजोबा, देवगोंडा ज्योतीगोंडा पाटील हे 'नांदणी जैन मठ' कोल्हापूर /यांचे कारभारी होते.

भाऊरावांचे वडील पायगोंडा पाटील हे शेतीवाडी असलेले, शिकलेले आणि महसूल खात्यात नोकरीस होते. भाऊरावांना पुरोगामित्वाचा वारसा आपल्या वडिलांकडूनच मिळाला होता. ते जातीभेद मानणारे नव्हते. भाऊराव हे पायगोंडा व गंगाबाई यांचे अपत्य होते.

भाऊराव लहानपणापासून हरहुन्नरी स्वभावाचे होते. दिवसभर खेळणे, नदीवर पोहायला जाणे व खोड्या करणे हा त्यांचा उद्योग असायचा. भाऊरावांवर लहानपणापासून सत्याप्पासारख्या स्वाभिमानी व्यक्तीचा प्रभाव होता. अन्यायाविरुद्ध दंड थोपटून उभे राहायचे व गरीबांवर जुलूम करणारांशी मुकाबला करायचे बाळकडू भाऊरावांनी सत्याप्पाकडून घेतले.

भाऊराव आपल्या सर्व जातीधर्मातील मित्रांना समान वागणूक देत असत. एकदा लहानपणी त्यांच्या आजोबांनी घेतलेला नवा कोट आपल्या दलित मित्रांला दिला होता. यातून त्यांची माणूसकीची तळमळ दिसून येते. भाऊरावांचे प्राथमिक शिक्षण त्यांच्या आजोळीच झाले. त्यानंतर पुढे कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजमध्ये त्यांनी प्रवेश घेतला. तेथे भाऊराव जैन बोर्डींगमध्ये राहात. लहानपणापासून सत्याची कास धरलेली असल्यामुळे त्यांनी कधीही इतरांच्या असत्य, नियमबाह्य व अन्यायकारक गोष्टी व वर्तन खपवून घेतले नाही. सर्व जातीधर्माच्या मुलांना समान वागणूक द्यायला हवी असे भाऊरावांचे म्हणणे होते.

**नोकरी व व्यवसाय** : भाऊरावांची अभ्यासात समाधानकारक प्रगती नसली तरी कुस्ती, मल्लखांब, क्रीडा याबाबतीत भाऊराव आघाडीवर असत. त्यावेळी कोल्हापूरमध्ये सत्यशोधक चळवळीचे वारे वाहत होते. शाहू महाराज हे त्यांचे प्रमुख होते. भाऊरावदेखील या चळवळीकडे आकर्षित झाले. त्यामुळे शिक्षणावरचे त्यांचे लक्ष पूर्णपणे उडाले. त्यानंतर त्यांनी सातारा येथे इंग्रजी व संस्कृतच्या शिकवण्या घेतल्या. यानंतर घडलेल्या डांबर प्रकरणामुळे त्यांच्या जीवनाला वेगळेच वळण मिळाले. त्यांना चार महिने तुरुंगवास सोसावा लागला. काही दिवसांनी भाऊरावांची निर्दोष सुटका करण्यात आली. पण या प्रकरणामुळे ते शरीर व मनाने सुद्धा खचले होते.

डांबर प्रकरणातून सुटल्यावर भाऊराव किर्लोस्करांच्या 'किर्लोस्कर' नांगराचे विक्रेते म्हणून काम करु लागले होते. त्यावेळी त्यांनी भारतीय समाज जवळून पाहिला. त्यांना सामान्य जनतेची, शेतकरी-कष्टकरी वर्गाची आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक स्थिती जवळून पाहता आली. या सर्वांचे मूळ अज्ञान आहे हे भाऊरावांनी ओळखले होते. म्हणून ज्ञानप्रसार करण्याचे त्यांनी ठरविले होते. रयतेच्या शिक्षणासाठी वाहून घेण्याची व रयतेची मुले व मुली शिकवून शहाणी करण्याची शपथ घेतली. इथेच रयत शिक्षण संस्थेच्या उभारणीचे बीज रोवले गेले.

महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराजांच्या विचारांचा वारसा त्यांनी आपल्या कृतीतून पुढे चालवला. आपल्या शैक्षणिक कार्याची सुरुवातच त्यांनी एका दलित मुलाला घेऊन त्याच्यासाठी सातारा येथे छत्रपती शाहू बोर्डींग सुरु करुन केली. या बोर्डिंगचे नामकरण महात्मा गांधीजींच्या हस्ते झाले. त्यावेळी भाऊरावांनी गांधीजींना सांगितले की, पैशाच्या स्वरूपातील देणगी पेक्षा छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या कार्याचा वारसा मला दिला आहे. हीच माझ्यासाठी मोठी देणगी, मोठे पाठबळ आहे.

४.१.३ **रयत शक्षण संस्थेची स्थापना** : कर्मवीरांनी सर्व जाती-जमातींसाठी एकच बोर्डिंग सुरु करुन सामाजिक विषमतेला छेद देण्याचे पहिले पाऊल टाकले. बहुजन समाजातील सर्वांनी एकत्र येऊन एक

शैक्षणिक संस्था सुरु करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत या ठरावाला चांगला प्रतिसाद मिळाला. त्यानुसार कराडजवळील काले या गावी ४ ऑक्टोबर १९१९ साली विजयादशमीच्या मुहूर्तावर रयत शिक्षण संस्थेची स्थापना करण्यात आली.

**मुष्टीफंड योजना** : सुरुवातीला या संस्थेअंतर्गत दुधगाव, कार्ले, नेर्ले येथे मोफत वसतीगृह सुरु करण्यात आले होते. पण त्याचा खर्च भागविणे दिवसेंदिवस अवघड जात होते. भाऊरावांनी वसतीगृहाचा खर्च भागविण्यासाठी एक अभिनव योजना सुरु केली. ती म्हणजे गावातील प्रत्येकाने दररोज मुठभर धान्य वसतीगृहातील मुलांसाठी बाजूला काढून ठेवायचे. हीच ती मुष्टीफंड योजना होय. भाऊरावांनी नोकरी सोडून शिक्षण कार्यात वाहून घेण्याचे ठरविले. साधी राहणी, उच्च विचार हे अण्णांच्या जीवनाचे तत्त्वज्ञान होते. खादीचे कपडे, पायात वहाण नाही, भाकरी, ठेचा, ताक असा साधा आहार होता.

**४.१.४ कर्मवीरांचे शैक्षणिक कार्य** : शिक्षणाच्या विविध पैलूंवर त्यांनी आपले मतही मांडले. भाऊरावांचे वसतिगृह म्हणजे स्वावलंबी शिक्षण घेण्याचे एक कृतीशील प्रयोगकेंद्रच होते. भाऊरावांनी विद्यार्थ्यांना 'कमवा आणि शिका', 'श्रम करा आणि शिका' हा मंत्र दिला. 'वस्ती तेथे शाळा' हे ध्येय ठेवून भाऊरावांनी व्हॉलंटरी शाळा सुरु केल्या. याकरिता ३ ऑक्टोबर १९३८ रोजी प्राथमिक शिक्षण समिती स्थापन केली. या समितीमार्फत सातारा जिल्ह्यातील यवतेश्वर येथे पहिली व्हॉलंटरी शाळा सुरु केली. रयत शिक्षण संस्थेचे पहिले माध्यमिक विद्यालय २० जून १९४० रोजी सुरु केले. महाराजा सयाजीराव गायकवाड फ्री अँड रेसेडेन्शिअल हायस्कूल असे विद्यालयाला नाव दिले. सर्व विद्यार्थी वसतिगृहात राहत. त्यांना भांडी घासणे, स्वयंपाक करणे, शेतीकाम करणे, शेतात पिकवलेले भाजीपाला विकणे अशी सर्व कामे करावी लागत.

स्वावलंबन, स्वाध्याय, स्वाभिमान, व स्वातंत्र्य हे त्यांच्या शैक्षणिक तत्त्वज्ञानाचे चार पैलू होते. स्वतःच्या कष्टातून मिळवलेले शिक्षण हेच खरे शिक्षण कारण त्याला अनुभवाची जोड असते. असा त्यांचा विचार होता. श्रमप्रतिष्ठेचे महत्त्व कर्मवीरांनी पूर्वीच ओळखले होते. शिक्षण आणि जीवन यांची सांगड त्यांनी घालून दाखविली. स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद. श्रम हीच पूजा व श्रमाच्या मोबदल्यात मोफत शिक्षण. या शब्दांमध्ये भाऊरावांचे शैक्षणिक तत्त्वज्ञान सामावलेले आहे. १९४७ साली साताऱ्यात छत्रपती शिवाजी कॉलेज सुरु झाले आणि कराडमध्ये १७ जुलै १९५४ रोजी सद्‌गुरु गाडगे महाराज कॉलेज भाऊरावांनी सुरु केले. १६ जुलै १९३५ रोजी सिल्व्हर ज्युबिली रुरल ट्रेनिंग कॉलेज हे पहिले ट्रेनिंग कॉलेज होते. याच कॉलेजला महात्मा जोतिबा फुले यांचे नाव देण्यात आले. १९४२ मध्ये मुलींच्या प्रशिक्षणासाठी 'जिजामाता अध्यापिका विद्यालय' या स्वतंत्र प्राथमिक शिक्षिका प्रशिक्षण केंद्राची स्थापना केली. १९५५ साली शिक्षक प्रशिक्षणासाठी (पदवीधर) आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशनची स्थापना सातारा येथे केली.

### ४.१.५ बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी कर्मवीरांनी आचरणात आणलेली तत्त्वे :

**१) स्वावलंबन** : कर्मवीरांच्या शैक्षणिक तत्त्वज्ञानाचे पहिले वैशिष्ट्य म्हणजे स्वावलंबन होय. विद्यार्थ्यांनी स्वतः कष्ट करुन श्रमाच्या बळावर स्वावलंबनाचे शिक्षण घ्यावे. कोणापुढे हात पसरू नयेत. काम करा, घाम गाळा व त्या मोबदल्यात शिक्षण घ्या.

**२) स्वाभिमान** : हा स्वभावगुण होता. मोडेन पण वाकणार नाही. हा कर्मवीरांचा बाणा होता.

**३) स्वातंत्र्य** : स्वावलंबी व स्वाभिमानी माणसे स्वातंत्र्यप्रेमी असतात. स्वतंत्र विचारसरणी हे कर्मवीरांच्या शैक्षणिक तत्त्वज्ञानाचे वैशिष्ट्य होते.

**४) समता** : रयत शिक्षण संस्थेच्या शाहू बोर्डिंगमध्ये अठरापगड जाती-धर्माचे विद्यार्थी एकत्र राहत. कर्मवीर सत्यशोधक समाजाचे निष्ठावान कार्यकर्ते होते. बहुजन समाजातील मुलांच्या शिक्षणाची सोय करताना कोणत्याही प्रकारचा भेदभाव न मानता त्यांनी समतेचे तत्त्व अंगिकारले.

**५) श्रमप्रतिष्ठा** : श्रमाची, कष्टाची लाज बाळगू नये. पोशाखीपणा सोडून विद्यार्थ्यांनी पडेल ते काम करण्याची तयारी दाखवावी. श्रमप्रतिष्ठा जोपासावी.

**६) सत्यनिष्ठा** : कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांनी सत्यापासून ढळू नये.

**७) अन्यायाची चीड** : अन्याय सोसणे हे गुलामगिरीचे लक्षण आहे. सामाजिक अन्यायाला ठेचणारा विद्यार्थी घडविणे हे माझे कार्य आहे असे ते म्हणत.

**८) वसतिगृहयुक्त शिक्षण** : ग्रामीण भागातील सर्व जाती-धर्माचे विद्यार्थी वसतिगृहात एकत्र राहत. सर्वधर्मसमभाव यातून जोपासला जात होता.

**९) कमवा व शिका** : श्रमाच्या मोबदल्यात विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याची सोय केली. स्वतः कमवून स्वतः शिकले पाहिजे. संपूर्ण जगाचे लक्ष या एक तत्त्वामुळे शिक्षणाकडे वळले होते.

### ४.१.५ शैक्षणिक कार्य :

१९१० - दूधगाव शैक्षणिक सह. संस्था स्थापन्यामध्ये सक्रीय सहभाग.

१९१९ - ४ ऑक्टोबरला कराड जवळील काले या गावी रयत शिक्षण संस्थेची स्थापना.

१९२४ - सातारा येथे फ्री बोर्डिंग हाऊस सुरु.

१९२७ - म. गांधींच्या हस्ते श्री छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊसचे उद्‌घाटन.

१९३२ - पुणे येथे युनियन बोर्डिंग हाऊसची उच्च शिक्षण घेणाऱ्यांसाठी स्थापना.

१९३५ - रयत शिक्षण संस्थेचे रजिस्ट्रेशन करुन प्राथमिक शिक्षकांसाठी ट्रेनिंग कॉलेज सुरु.

१९३६ - रा.ब.रा.रा. काळे यांच्या नावाने सातारा येथे पहिली मराठी शाळा सुरु.

१९३८ - यवतेश्वर या खेड्यात पहिली व्हॉलंटरी प्राथमिक शाळा सुरु.

१९४० - महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या नावाने मोफत वसतीगृह माध्यमिक शाळा सुरु.

१९४२ - प्राथमिक शिक्षकांसाठी जिजामाता अध्यापिका विद्यालय या नावाचे ट्रेनिंग कॉलेज व वसतीगृह सुरु.

१९४७ - छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा - स्थापना.

१९५४ - संत गाडगे महाराजांच्या नावाने कराड येथे दुसरे महाविद्यालय सुरु.

१९५५ - मौलाना आझाद यांच्या स्मरणार्थ सेकंडरी टीचर्सना प्रशिक्षण देण्यासाठी बी.एड. कॉलेज सुरु केले.

- शिक्षणामध्ये स्वावलंबन, स्वाध्याय स्वातंत्र्य, स्वाभिमान यावर भर स्वावलंबी शिक्षणासाठी कमवा व शिका ही योजना सुरु केली.

- 'स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद' या रयत शिक्षण संस्थेच्या बोधवाक्याला समाजातील तळागाळातून मान्यता.

- महाराष्ट्राचे 'बुकर टी वॉशिंग्टन' म्हणून ओळख.

### ४.१.७ कर्मवीरांविषयी गौरवोद्‌गार :

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी ९ जानेवारी १९४८ रोजी, विद्यार्थ्यांनी जमविलेला एक लाख रुपये निधी कर्मवीरांना अर्पण करण्याच्या सोहळ्यास पाठविलेला संदेश -

''श्री भाऊराव पाटील की सेवाही उनका कीर्तिस्तंभ है। फिर भी छात्रोंने जो प्रवृत्ति की है वह उनके लिए स्तुत्य है। श्री भाऊराव पाटील दीर्घकाल तक सेवा करते रहे।''

* महाराजा सयाजीराव गायकवाड - ''अशी संस्था भारतात सापडणार नाही. राजे महाराजांनाही पैसा खर्च करुन अशी संस्था चालविणे शक्य होणार नाही. भाऊरावांची कितीही प्रशंसा केली तरी त्यात अतिशयोक्ती होणार नाही.''

* कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे - ''स्वावलंबनाचा प्रयोग या वसतिगृहात होत असलेल्या पहिल्यापासून मी पाहत आहे. या देशातील माझ्या पाहण्यातील हे पहिलेच वसतीगृह आहे.''

* सद्‌गुरु गाडगे महाराज - ''कर्मवीर भाऊराव यांनी सर्व हयातभर गोरगरीब जनतेची जीवापाड सेवा केली. माझ्या अंगावरील कातडी काढून त्याचे जोडे करुन जरी कर्मवीर अण्णांच्या पायात घातले तरी त्यांच्या थोर उपकारांचे आपण उतराई होणार नाही. कर्मवीर खरे कर्मवीर आहेत.''

प्रा. कोप – (We academicians must sit at Karmveer's feet and re-learn our theories of education)

**धर्मपत्नीची कार्यात मदत** :

भाऊरावांच्या धर्मपत्नी सौ. लक्ष्मीबाई यांनी भाऊरावांना या कार्यात मोलाची मदत केली. सर्वस्व अर्पण केले. पाडव्याच्या सणादिवशी वसतिगृहातील मुलांना गोडधोड जेवण करण्यासाठी आपले सौभाग्याचा अलंकार असलेले मंगळसूत्रही विकले.

**मान सन्मान** : भाऊरावांच्या या भगीरथ कार्याचा भारत सरकारने १९५९ साली 'पद्मभूषण' हा किताब देऊन गौरव केला. तर पुणे विद्यापीठाने 'डी.लिट' ही पदवी देऊन गौरव केला. शिक्षण प्रसारासाठी आपले संपूर्ण जीवन समर्पित करणाऱ्या आण्णांना जनतेने 'कर्मवीर' ही पदवी बहाल केली. महाराष्ट्राचे बुकर टी वॉशिंग्टन म्हणून त्यांची ओळख आहे. वसतिगृहाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या मनावर मानवतावादाचे संस्कार करणारा आधुनिक भगीरथ म्हणून त्यांची ख्याती सर्वत्र पसरली.

**मृत्यू** : ज्ञानगंगा झोपडीपर्यंत पोहोचवणारा असा हा भारतमातेचा सुपुत्र ९ मे १९५९ रोजी पंचतत्त्वात विलीन झाला. पण त्यांनी दिलेला स्वावलंबी शिक्षणाचा कानमंत्र मात्र रयत शिक्षण संस्थेच्या उच्चविद्याविभूषित विद्यार्थ्यांच्या रूपाने आजही जीवित आहे.

### ४.१.८ रयत शिक्षण संस्थेच्या कार्याचा विस्तार :

आशिया खंडातील सर्वात मोठी शैक्षणिक संस्था असा उल्लेख केला जातो.

रयत शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यालय, सातारा येथे असून पाच विभागात संस्थेचा विस्तार झालेला आहे.

विभाग जिल्हा शाखा संस्था

१) मध्य विभाग – सातारा जिल्हा, सोलापूर – २४०

२) दक्षिण विभाग – सांगली, कोल्हापूर – १३३

३) उत्तर विभाग – रत्नागिरी, सिंधुदुर्ग, बेळगाव, अ. नगर, नाशिक, बीड, नंदुरबार – १९३

४) पश्चिम विभाग – पुणे – १०९

५) रायगड विभाग – रायगड, ठाणे, पालघर, बृहन्मुंबई – ६२

एकूण शाखा – ७३७

या रयत शिक्षण संस्थेचे बोधचिन्ह 'वटवृक्ष' आहे. तर ध्येयवाक्य 'स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद' आहे.

२) माध्यमिक विद्यालये – MCVC-53 १९९ मध्ये Junior College चे वर्ग –४३८

३) अध्यापक विद्यालये (पैकी महिलांसाठी १) - ०७

४) प्राथमिक शाळा (पैकी इंग्रजी माध्यम २४) - ५१

५) पूर्वप्राथमिक शाळा (पैकी इंग्रजी माध्यम २४) - ३३

६) वसतिगृहे (पैकी मुलींची ३५) - ९१

७) प्रशासन कार्यालये - ०७

८) आश्रमशाळा - ०८

९) औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI) - ०२

१०) रयत इन्स्टिट्युट ऑफ रिसर्च अँड डेव्हलपमेंट - ०१

**रयत शिक्षण संस्थेचे वैविध्यपूर्ण उपक्रम :**

- कर्मवीर विद्याप्रबोधिनी
- टिश्यू कल्चर लॅब्स्
- कृषी मार्गदर्शन केंद्र
- स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र
- माती, पाणी परीक्षण प्रयोगशाळा
- रयत प्लेसमेंट सेल
- सेंटर ऑफ एक्सलन्स
- रयत आविष्कार संशोधन प्रकल्प
- रयत इन्स्पायर संशोधन प्रकल्प
- रयत आयडिया बँक
- सेंटर फॉर अन्व्हेन्शन, इनोव्हेशन अँड इन्क्युबेशन
- उद्योजकता विकास व प्रकल्प अहवाल मार्गदर्शक
- यू.जी.सी. एन.एस. क्यू. एक स्कीम - बी. व्होक.
- कर्मवीर क्रीडा प्रबोधिनी - दहिवडी, विटा, मंचर, श्रीरामपूर, कामोठे.
- कौशल्य विकास - विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासासाठी अनेक कंपन्यांशी सामंजस्य करार व

विविध कौशल्याधारित कोर्सेस

✻ रयत प्रज्ञाशोध परीक्षा (RTS)

✻ अनिवासी गुरुकूल प्रकल्प

(Trajectory - Research Journal)

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न :**

**कर्मवीर भाऊराव पाटील**

१) कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक तत्त्वज्ञान स्पष्ट करा.

२) कर्मवीर भाऊराव पाटील व महात्मा फुले यांच्या शैक्षणिक विचारांचे आधुनिक काळातील महत्त्व लिहा.

३) कर्मवीर भाऊराव पाटील यांची शैक्षणिक तत्त्वे त्यांच्या शैक्षणिक प्रयोगाच्या आधारे स्पष्ट करा.

४) कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या बहुजन समाजाच्या शिक्षणाबाबतचे दृष्टीकोन स्पष्ट करा.

**टीपा लिहा :**

१) कर्मवीरांचे शैक्षणिक प्रयोग

२) रयत शिक्षण संस्थेचे शैक्षणिक कार्य.

३) कमवा व शिका योजना

**संदर्भ ग्रंथ :**


१) भिडे, पाटील, थोरात (२००५) : महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

२) के. सागर - महाराष्ट्रातील 'समाजसुधारक व थोर विचारवंत' के-सागर पब्लिकेशन्स, पुणे.

३) कुंडले म.बा. - (१९८६) शैक्षणिक तत्त्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र - श्री विद्या प्रकाशन, पुणे.

४) तांबोळी शमुद्दिन (२०११) प्रभावशाली शिक्षणतत्त्व, डायमंड प्रकाशन पुणे.

५) (K.Sagar : Social Performers in Maharashtra : K. Sagar Publication 2006.)

६) धर्माधिकारी अविनाश - (२०११) महाराष्ट्रातील समाजसुधारक, चाणक्य मंडल परिवार प्रकाशन, पुणे.

७) धनवडे नंदकुमार, धनवडे सुरेखा (२०११) शिक्षणशास्त्र - फडके प्रकाशन, कोल्हापूर.

८) रयत शिक्षण पत्रिका

९) विविध लेख संग्रह

***

# ४.२ महात्मा फुले

## ४.२.१ प्रास्ताविक :

भारतामध्ये १९ व्या शतकाच्या प्रारंभी धर्मसुधारणेच्या चळवळीची सुरुवात झाली. सामाजिक, धार्मिक सुधारणेच्या चळवळी मोठ्या प्रमाणात सुरु झाल्या. अनेक सुधारक विचारवंतांच्या कार्यामुळे सामाजिक, धार्मिक क्षेत्रात सुधारणा सुरु झाल्या. वर्ण व जातीव्यवस्थेचा समाजमनावर पगडा होता. स्त्रियांना कसल्याही प्रकारचे स्वातंत्र्य नव्हते. धर्म व संस्कृतीच्या नावावर अनेक बंधने लादली होती. बालविवाहाची पद्धती रुढ होती. विधवांची स्थिती अत्यंत वाईट होती. सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यांना बंदी होती. शेतकरी, कामगार, स्त्रिया, अस्पृश्य यांचे सामाजिक, धार्मिक शोषण सुरु होते.

भारतातील परंपरागत समाजव्यवस्थेविरुद्ध व परंपरांविरुद्ध विद्रोह करुन उठणारे पहिले व्यक्तिमत्त्व म्हणून महात्मा फुले यांचा उल्लेख होतो. महात्मा फुले हे आधुनिक महाराष्ट्रातील मूलगामी समाजपरिवर्तनाच्या चळवळीचे आद्यप्रवर्तक होते. सर्व समाज परंपरा व रुढींच्या जोखडाखाली वावरत असताना शिक्षणाचा विचार करुन त्यातून समाजक्रांती घडवण्याचा दृष्टीकोन बाळगणारे महात्मा फुले हे शिक्षण क्षेत्रासाठी आदर्शच आहेत. बहुजन समाजाला जागृत करुन त्यास आपल्या न्याय्य हक्कांसाठी संघर्ष करण्याची शिकवण महात्मा फुले यांनी दिली. म्हणूनच त्यांना महाराष्ट्रातील बहुजन समाजाचा आणि पददलित जनतेचा उद्धारकर्ता म्हणून जोतीरावांचा उल्लेख केला जातो.

## ४.२.२ जन्म व बालपण :

महात्मा फुले यांचा जन्म १८२७ साली झाला. त्यांच्या पूर्वजांचे मूळ गाव सातारा जिल्ह्यातील कटगुण हे होते. फुले यांचे आजोबा त्या गावचे चौगुले होते व ते जातीने क्षत्रिय-माळी होते. पण काही कारणांमुळे त्यांना आपले गाव सोडावे लागले आणि ते पुणे जिल्ह्याच्या पुरंदर तालुक्यातील खानवडी येथे स्थायिक झाले. त्यांच्या मुलाचे नाव शेटिबा होते. राणोजी, कृष्णा, गोविंद ही शेटीबांची मुले होती. त्यांनी फुलांचा व्यवसाय सुरु केला. तेव्हापासून त्यांनी आपले नाव 'गोऱ्हे' ह्या आडनावाऐवजी 'फुले' हे आडनाव धारण केले.

त्यांच्या तीन मुलांपैकी गोविंद यांचे लग्न चिमणाबाई हिच्याशी झाले. याच दांपत्याच्या पोटी जोतीबांचा जन्म झाला.

**शिक्षण :**

जोतीबा एक वर्षाचे असतानाच त्यांच्या आईचे निधन झाले. जोतीबा लहानपणापासून बंडखोर वृत्तीचे होते. गोविंदरावांनी जोतिबांना एका स्कॉटिश मिशनच्या इंग्रजी शाळेत घातले होते. विद्यार्थीदशेत असताना त्यांच्या मनात आपल्या देशातील परकीय इंग्रजी सत्ता उलथून टाकण्याचे विचार घोळू लागले

होते. लहुजी वस्ताद साळवे यांच्याकडून नेमबाजी, दांडपट्टा यांचे शिक्षण घेतले. दरम्यानच्या काळात त्यांचा सावित्रीबाई यांच्याशी विवाह झाला. येथील स्त्रियां वाईट परिस्थिती, हिंदू धर्मातील अनिष्ट रुढी, चालीरिती, स्त्रीशिक्षण, बालविवाह, विधवा पुनर्विवाह, जरठविवाह, केशवपन या सर्व गोष्टींचा ते अंतर्मुख होऊन विचार करु लागले. महात्मा फुले कृतीशील विचारवंत होते. आपल्या शिक्षण कार्यात पत्नीची साथ मिळाल्यास स्त्रिया व मुलींच्या शिक्षणासाठी चालवलेल्या चळवळीसाठी उपयुक्त ठरेल या दूरदृष्टीने त्यांनी पत्नी सावित्रीबाईंचेही शिक्षण सुरु केले.

ऑगस्ट १८४८ मध्ये जोतीरावांनी पुण्याच्या बुधवार पेठेतील भिड्यांच्या वाड्यामध्ये मुलींची पहिली शाळा सुरु केली. तेव्हा जोतिबांनी आपली अशिक्षित पत्नी सावित्रीबाई यांना प्रथम घरीच लिहिण्या-वाचण्यास शिकवले आणि त्यांची शिक्षिका म्हणून नेमणूक केली. जोतीरावांनी 'पहिली भारतीय शिक्षिका' सावित्रीबाईंच्या माध्यमातून घडविली. सावित्रीबाईंच्या अंगावर शेणचिखल फेकण्यापर्यंत काही नराधमांनी मजल मारली. पण त्यांनी स्वतःचे कार्य निष्ठेने चालू ठेवले. अशारितीने जोतिबांनी स्त्री शिक्षणाचा पाया घातला.

३ जुलै १८५१ ला जोतिबांनी पुण्यातच चिपळूणकर वाड्यात मुलींची दुसरी शाळा सुरु केली. १८५२ साली पुण्यातील रास्तापेठेत मुलींची तिसरी शाळा काढली व अस्पृश्यांसाठी वेताळपेठेत चौथी शाळा सुरु केली.

समाजाचा प्रचंड प्रक्षोभ महात्मा फुले यांना सहन करावा लागला. सनातनी कर्मठांनी या शाळांना आणि स्त्री शिक्षणाला संस्कृतीच्या नावाखाली कडवा निरोध केला.

लॉर्ड बेटिंगच्या काळात भारतातील शिक्षणाबद्दल सुधारणा सुचविण्यासाठी लॉर्ड मेकॅलोच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त केली होती. १८३५ मध्ये मेकॅलोने पाश्चात्य ज्ञान इंग्रजी भाषेतून भारतीयांना शिकवण्याचा 'झिरपता सिद्धांत' मांडला. याला महात्मा फुले यांनी विरोध केला. १८८२ साली शिक्षण प्रसारासाठी स्थापन झालेल्या हंटर आयोगासमोर त्यांनी साक्ष दिली. यामध्ये भारतीय लोकांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत मिळावे असा आग्रह धरणारे ते पहिले भारतीय होते.

जोतिबांचे हे शैक्षणिक कार्य पाहून सरकाने त्यांचा १६ नोव्हेंबर १८५२ रोजी विश्रामबाग वाड्यात सत्कार केला.

### ४.२.३ म. फुले यांचे सामाजिक कार्य :

**✻ विधवा पुनर्विवाह :**

म. फुले यांनी आपले संपूर्ण आयुष्य विषम समाजव्यवस्थेविरुद्ध न्याय, समता, शिक्षणाचा प्रसार, मानवतावाद निर्माण करण्यासाठी खर्ची केले.

१९ व्या शतकात सुरुवातीच्या काळामध्ये बालविवाह, जरठविवाह यामुळे बालविधवांचे प्रमाण मोठे होते. ही सामाजिक समस्या सोडविण्यासाठी त्यांनी विधवा पुनर्विवाहाचे समर्थन केले. सनातन्यांना न जुमानता १८६४ मध्ये त्यांनी गोखल्यांच्या बागेत एक पुनर्विवाह घडवून आणला. ही त्या काळातील सामाजिक क्रांतीच होती.

**बालहत्या प्रतिबंधक गृह :**

बिकट अवस्थेतील विधवांची सुटका व्हावी व अनैतिक संततीची हत्या टाळण्यासाठी जोतिबांनी १८६३ मध्ये आपल्या घरी बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली. बालहत्याप्रतिबंधगृहातील एका विधवा ब्राह्मण महिलेच्या मुलास त्यांनी दत्तक घेतले. त्याला उच्चविद्याविभूषित डॉक्टर केले. त्याचे नाव डॉ. यशवंत होय.

**अस्पृश्यताउद्धार विषयक काम :**

वर्णभेदाविरुद्ध जोतिबांनी आवाज उठवून अस्पृश्यांचे अज्ञान दूर करण्यासाठी गुलामगिरीतून मुक्तता करण्यासाठी १८५१ साली नानापेठेत अस्पृश्य मुलांसाठी एक शाळा सुरु केली. १८५८ पर्यंत तीन शाळा पुण्यात सुरु करण्यात आल्या. मुलांच्या जेवणानंतर पाणी समस्या सोडविण्याकरिता जोतिबांनी स्वत/ :च्या घरचा पाण्याचा हौद खुला केला. याशिवाय जोतिबांनी 'गुलामगिरी' हा ग्रंथ लिहिला. यामधून समाजाला जागृत करण्याचे प्रयत्न केले.

**शेतकऱ्यांचे कैवारी** : भारत हा कृषीप्रधान देश आहे. शेतकऱ्याला सक्षम बनविले हे त्यांनी ओळखले होते. दारिद्र्य, कर्जबाजारीपणा यासाठी सर्वप्रथम शेतकऱ्यांना शिक्षण दिले पाहिजे. असे त्यांना वाटे. त्यामुळे त्यांनी विहिरी, कालवे खोदणे, बंधारे बांधणे याचे महत्त्व सरकारला पटवून दिले. शेतकऱ्यांची होणारी पुरोहितांकडील फसवणूक व लूट त्यांनी 'शेतकऱ्यांचे आसूड' या ग्रंथाद्वारे केली. म. फुले शेतकऱ्यांचे कैवारी होते. त्यांनी ड्युक ऑफ कॅनॉट समोर शेतकऱ्यांचा वेष धारण करुन महत्त्वपूर्ण भाषण केले व त्यातून शिक्षणाचे महत्त्व विशद केले होते. शेतकऱ्यांचे दुःख व दारिद्र्याचे मूळ त्यांच्या अज्ञानात आहे हे स्पष्ट करताना ते म्हणतात -

**विद्येविना मती गेली। मतिविना नीति गेली।**
**नीतिविना गती गेली। गतिविना वित्त गेले।**
**वित्ताविना शूद्र खचले। इतके अनर्थ एका अविद्येने केले।।**

४.२.४ **सत्यशोधक समाजाची स्थापना :**

सामाजिक विषमता, अन्याय व शोषण यावर आधारलेल्या प्रचलित समाजव्यवस्थेवर बदल घडवून आणावयाचा असेल तर या ठिकाणच्या कनिष्ठ वर्गाला संघटित करुन संघर्ष केला पाहिजे असे महात्मा फुल्यांना वाटत होते.

ही गरज ओळखून २४ सप्टेंबर, १८७३ रोजी पुण्यात सत्यशोधक समाजाची स्थापना त्यांनी केली.

ते या संघटनेचे पहिले अध्यक्ष व कोषाध्यक्ष होते. ईश्वर एकच असून तो निर्गुण-निराकार आहे. सर्व मानव एकाच परमेश्वराची लेकरे आहेत. ही त्यांची प्रमुख तत्त्वे होती.

११ मे १८८८ रोजी मुंबईतील कोळीवाडा येथील समारंभात जोतीरावांना 'महात्मा' ही पदवी अपर्ण करण्यात आली. ते महाराष्ट्राचे मार्टिन ल्यूथर किंग या नावाने ओळखले जातात. त्यांच्यावर थॉमस पेन यांच्या दि राईटस् ऑफ मॅन या ग्रंथाचा, विचारांचा प्रभाव होता. जोतीरावांनी स्त्रियांसाठी केलेल्या ग्रंथाचा, विचारांचा प्रभाव होता. जोतीरावांनी स्त्रियांसाठी केलेल्या शिक्षणाच्या कार्यामागे मिस फॅरार या बाईंची प्रेरणा होती.

**४.२.५ ग्रंथसंपदा :**

१) नाटक : तृतीय रत्न

२) पोवाडा : छत्रपती शिवाजीराजे भोसले यांच्यावर आधारित शिवाजी महाराजांना 'कुळवाडीभूषण' संबोधले

३) ब्राह्मणांचे कसब

४) शेतकऱ्यांचा आसूड

५) गुलामगिरी

६) संसार

७) इशारा

८) सार्वजनिक सत्यधर्म : मृत्यूनंतर प्रकाशित

९) अखंडादी काव्यरचना

१०) दीनबंधू - वर्तमानपत्र

**मृत्यू :**

महात्मा जोतिबा फुल्यांनी बहुजन समाजाच्या उद्धारासाठी आपले संपूर्ण आयुष्य घालविले. शिक्षणाच्या माध्यमातून समाजात बदल घडवून आणले. म्हणूनच त्यांना समाजसुधारणेचे अग्रदूत म्हटले जाते. म. गांधींनी जोतिबांना 'जोतिबा हे खरेखुरे महात्मा होत' असे म्हटले आहे. या थोर महात्म्याचा मृत्यू २८ नोव्हेंबर १८९० रोजी झाला.

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न :**

**महात्मा फुले**

१) महात्मा फुले यांचे शिक्षणविषयक विचार स्पष्ट करा.

२) महात्मा फुले यांचा स्त्री शिक्षणाबाबतचा दृष्टीकोन स्पष्ट करा.

**टीपा लिहा :**

१) म. फुले यांचे सामाजिक योगदान २) म. फुले यांची ग्रंथसंपदा

३) म. फुले यांचे शैक्षणिक कार्य ४) सत्यशोधक समाज

**४.२.५ ग्रंथसंपदा :**


१) भिडे, पाटील, थोरात (२००५) : महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

२) के. सागर, महाराष्ट्रातील समाजसुधारक व थोर विचारवंत, कि सागर पब्लिकेशन, पुणे.

३) धर्माधिकारी अविनाश (२०११) : महाराष्ट्रातील समाजसुधारक, चाणक्य मंडल परिवार प्रकाशन, पुणे.

४) धनवडे नंदकुमार, धनवडे सुरेखा (२०११) : शिक्षणशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

५) देशमुख एल. जी. (२००३) : शिक्षणाचे तत्त्वज्ञानात्मक व समाजशास्त्रीय अधिष्ठान, फडके प्रकाशन, कोल्हापूर.


***

# घटक – १

# समाजशास्त्र व शिक्षण

# SOCIOLOGY AND EDUCATION

A) Meaning, Nature and Scope of Education Sociology

**(शैक्षणिक समाजशास्त्र, अर्थ, स्वरूप व व्याप्ती)**

B) Need for Sociological Approach in Education

**(शिक्षणात समाजशास्त्रीय दृष्टीकोनाची गरज)**

**उद्‌दिष्टये (Objectives)**

१. शैक्षणिक समाजशास्त्र म्हणजे काय हे समजावून घेता येईल.

२. शैक्षणिक समाजशास्त्राची अर्थ, स्वरूप व व्याप्ती याचे आकलन होईल.

३. शिक्षणात समाजशास्त्रीय दृष्टीकोनाची गरज स्पष्ट होईल.

मनुष्य हा समाजप्रिय प्राणी आहे असे मानले नाते. परंतू मनुष्य हा काही जन्मतः वा उपजतच समाजप्रिय प्राणी नसतो. अगदी जन्मानंतर आई, त्यानंतर कुटुंब व हळूहळू समाज यांच्याशी त्याचा संपर्क येतो. या संपर्कामुळेच विविध अनुभवाद्वारे वेगवेगळे संस्कार त्याच्यावर होतात. यातूनच परस्परावलंबित्वाची जाणीव होते. हीच प्रवृत्ती उत्तरोत्तर वाढत जाऊन त्यातून व्यापक बनते यातूनच समाजाचे शास्त्र निर्माण होते ते म्हणजेच समाजशास्त्र होय.

समाजशास्त्राची ओळख होण्यापूर्वी समाज म्हणजे काय ही संकल्पना थोडक्यात पुढील व्याख्याद्वारे समजावून घेत येईल.

**समाज : व्याख्या** (Society definitions)

१) ''सामाजिक संबंधाचे जाळे म्हणजेच समाज होय.'' मॅसीव्हर आणि पेज

1 "Society is a web of social relationship -Maciver & Page

२) समान सामाजिक आणि सांस्कृतिक आशय असणाऱ्या तसेच समान सवयी, कल्पना व अभिवृत्ती असणाऱ्या एकाच भुभागावर राहणाऱ्या विशाल जनसमुदायास समाज म्हणतात जो इतर समाजापासून अभिवृत्ती,भिन्न कृतीद्वारे वेगळेपण दर्शवतो.'' किबॉल यंग.

" A Society refers to the broadest grouping of people who have a certain common set up of habits,ideas and attitudes, that is a social & cultural content, living in a definate

territory and aften set off form other societies by attitude and actons of difference and antagonism" - Kimball young समाजशास्त्राच्या मते,'' समाज म्हणजे लोकांचा असा समूह जो समान संस्कृती भूभागावर वास करतो, समान आंतरक्रिया व समान संस्कृती जोपासतो व दोन वा अधिक व्यक्तीच्या परस्पर क्रियाद्वारे ओळखला जाऊ शकतो.''

समाजाची वैशिष्ट्ये आपण पुढीलप्रमाणे सांगू शकतो.

१) समाज हा व्यक्तीसमूह असतो.

२) समान अभिरूची व अभिवृत्ती असणारा समूह असतो.

३) समान सवयींचा समूह असतो.

४) समान जीवनपद्धतीचा अंगीकार केलेला असतो.

५) प्रतिके, कल्पना, समान असतात.

६) एकजिनसीपणा असतो.

७) परस्पर संबंधाचे जाळ असते.

समाजात प्रामुख्याने व्यक्ती -व्यक्ती व्यक्ती-समूह व समूह- समूह अशा आंतरक्रिया घडत असतात त्यातुनच समाजाचा विकास होत असतो. समाजाच्या विकासासाठी शिक्षण महत्त्वाची भूमिका बजावत असते. समाज व शिक्षण एकमेकावर प्रभाव टाकत असताना दिसतात. या दोन्हीच्या आंतरक्रियेतून समाज विकास पावताना दिसतो. यासाठी समाजशास्त्र व शिक्षण यांच्या संकल्पना थोडक्यात समजावून घेऊया.

**समाज शास्त्र :-** आतापर्यंत आपण समाज म्हणजे काय हे पाहिले आता समाज शास्त्राच्या काही व्याख्या पाहू व व्युत्पूती अर्थ समाजवून घेऊ.

**अर्थ :**

मानवाच्या सामाजिक संबंधाचा अभ्यास करणारे, शास्त्र म्हणजे समाजशास्त्र होय. हा शब्द इंग्रजीत " sociology" असा आहे त्याचा उगम मूळ लॅटीन शब्द socies आणि logos' या दोन शब्दांत आहे.

socies = सोबती सहचर logos पद्धतशीर अभ्यास वा शास्त्र

म्हणजेच मनुष्याच्या सहजीवनाचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजेच समाजशास्त्र होय असे म्हणता येईल.

**स्वरूप :**

ऑगस्ट कॉम्त (Auguste Comte) (1798 ते 1857) ह्याला समाजशास्त्राचा जनक मानले जाते. ''समाजशास्त्र'' ही संज्ञा प्रथम त्यानेच वापरात आणली. समाजशास्त्रात व्यक्ती व्यक्ती मधील परस्परसंबंध, विविध प्रकारची नाती, व्यक्तीचे समाजातील वर्तन, त्याची कारणमीमांसा व्यक्तीच्या परस्परसंबंधातील वर्तनामुळे निर्मित समस्या व परिणाम यांचा अभ्यास केला जातो. समाजशास्त्रात सामाजिक व सांस्कृतिक संबंधाचा अभ्यास केला जातो. या बरोबर अनेक सामाजिक प्रक्रियांचा अभ्यास केला जातो.

**व्याप्ती :**

समाजाची निर्मिती मनुष्याच्या सहजीवनातुन होत असते. समाजात अनेक संज्ञाचा अंतर्भाव समाजात होत असते. उदा. धर्मसंस्था, शासनसंस्था इ. याबरोबर समाजात जीवनमुल्ये, रूढी, परंपरा, रितीरीवाज यांचाही समावेश होत असतो. या सर्वांमध्ये वेगवेगळ्या कारणामुळे बदल होत असतात. त्यांची दखल व्यक्ती व सामाजिक संबंध, व्यक्ती व समाज आंतरक्रिया समाज परीवर्तन, सामाजिक विकास या सर्वाद्वारे घेतली जाते. सद्य परिस्थितीत इतिहास भुगोल, अर्थशास्त्र, मानसशास्त्र, गणित, विज्ञान ह्या विषयांचा अभ्यास समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून केला जातो.

**समाजशास्त्र : व्याख्या (Sociology : Definition)**

''सामाजिक जीवनाचा शास्त्रीय पद्धतीने केली अभ्यास म्हणजे समाजशास्त्र-ऑर्गून व निमकॉफ

1. "Sociology is the scientific study of social life" - Orgurn & Nimkoff

२) ''मानवाचा इतर मानवाशी असणाऱ्या संबधाचा अभ्यास म्हणजे समाजशास्त्र होय'' मार्शल जॉन्स

3 "Sociology is the study of man-in -relationship to other" Marshall Jones

३) ''मानवी संबंधाचे विज्ञान म्हणजे समाजशास्त्र होय.'' मेरील व एल्ड्रीज

Sociology is the science of human relationship" Merrill & Eldredge

४) समाजशास्त्र म्हणजे समाजात राहणाऱ्या मानवाचा पद्धतशीर व व्यवस्थित अभ्यास होय म्हणजेच मानवाच्या सामुहिक जीवनाचा व त्याच्याशी सामुहीकरीत्या संलग्न असणाऱ्या रूढी,परंपरा संस्था आणि आचार- विचाराच्या पद्धतीचा अभ्यास होय.'' किबाल यंग

Sociology is a systematic and orderly study of man in society, that is of group life and of custorms traditions, institutions and ways of thinking & living which are linked to group life" - Kimball Young

५) ''समाजशास्त्र म्हणजे व्यक्ती व्यक्तीमधील आंतरक्रिया परस्परसंबंधाचा ते नियंत्रित करणाऱ्या परिस्थितीचा व त्याच्या परिणामांचा अभ्यास मानवा मानवातील परस्परासंबंधातून घडणाऱ्या सर्वाचा अभ्यास होय'' जिन्सबर्ग

5. " Sociology is the study of human interactions, interrelations, their conditions and consequences -- It is concerned with all that happens to the human beings in virtue of their relationships with each other" - Ginesberg.

'' समाजशास्त्र म्हणजे मानव आणि मानवी पर्यावरण यांच्या परस्पर संबंधाचा अभ्यास होय. हेन्री फेअरचाईल्ड

" Sociology is the study of man and human environment in their relations to each other, Henry Fairchild

वरील व्याख्यांच्या संदर्भानुसार थोडक्यात आपणास समाजशास्त्रात व्यक्ती व इतर व्यक्तीनी निर्माण केलेले विविध गट, समुह, समाज तसेच औपचारीक, अनौपचारीक संस्था यांचे संबंध दुसऱ्या व्यक्तीशी गटाशी, समुहाशी

अथवा निरनिराळ्या संघटनाशी येतात त्याच्यात परस्परक्रिया होता. या क्रियांचा परिणाम व विकासाशी संदर्भ यांचा मनुष्यजातीच्या संदर्भात केलेला विचार आढळतो समाजशास्त्र प्रामुख्याने सामाजिक तत्वांचे शास्त्रीय अध्ययन करते. सामाजिक प्रक्रियांचा अभ्यास करून त्यांचे परस्परासंबधातील विवेचन करत असते. त्यातुन निर्माण होणाऱ्या समस्यांचा अभ्यासाबरोबर मनुष्यजीवनावर प्रभाव टाकणाऱ्या तत्वांचे अध्ययन करते. सामाजिक परीवर्तनासाठी प्राप्त परिस्थिती त्याबरोबर समाज प्रबोधनाच्या घटकांचे परीक्षण करणे संस्कृती,रीतीरिवाज जीवनशैली व मुल्ये यांचा अभ्यास करून सामाजिक विकासासाठी प्रयत्नशील असणारे शास्त्र आहे.

**समाजशास्त्राची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.**

१) समाज जीवनाची तयारी करणे.

२) सामाजिक गुणांचा विकास करणे.

३) व्यक्तीचे समाजोपयोगी कार्यात योगदान

४) जीवनातील आव्हानांना सामोरे जाणेची क्षमता विकसित करणे.

५) वैज्ञानिक प्रवृत्तीचा विकास करणे

६) व्यक्तीपेक्षा समाजहिताला महत्व देण्याच्या विचारांना चालना.

या सर्वांतून आपल्याला समाजशास्त्राचा शिक्षणाचा परस्परसंबंध पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

**समाजशास्त्र व शिक्षण यांचा परस्परसंबंध**

समाजशास्त्राचा अनेक शास्त्रावर प्रभाव दिसतो. समाजशास्त्रमध्ये विविध मानवी समूह,व्यक्ती यांच्या विकासासाठी अनेक संस्थाचा अभ्यास केला जातो. विविध शास्त्राचा एकमेकांवर पडणारा प्रभाव त्यांचा विकास घडवण्यास मदत करतो समाज हा व्यक्तीने बनतो तर व्यक्तीच्या जीवनावर शिक्षणाचा प्रभाव पडत असते. शिक्षणाचा प्रभाव समाज निर्मितीवर पडतो तर समाजाला आवश्यक असणाऱ्या व्यक्तीची वा नागरीकाच्या निर्मितीसाठी शिक्षणावर समाजाचा मोठा प्रभाव पडत असतो.

शिक्षणाचे सामाजिकीकरण हे उद्दिष्ट आहेच. शिक्षणामध्ये आवश्यक बदल वेगवेगळ्या क्रांती परीवर्तने यातून होत असते. वेगवेगळ्या मुल्यानुसार, विचार सरणीनुसार शिक्षणात बदल घडत असतात. सामाजिक समस्या उदा. पर्यावरण तंत्रज्ञान लोकशाही मुल्ये यांचा परिणाम होत असतो. समाजातील परस्पर संबंध वाढणारा युद्धाचा (संघर्षाचा) धोका लक्षात घेऊन शांततेसाठी शिक्षण यासारखे प्रवाह शिक्षण क्षेत्रात आढळतात. तंत्रज्ञानामुळे वाढणारा माहितीचा साठा व त्यासाठी आवश्यक बदलणारी कौशल्य यांचा प्रभाव शिक्षण पद्धतीवर होत असतो. त्याप्रमाणे शिक्षणातुन मिळणारी मुल्ये, विचारसरणी, कौशल्ये ज्ञान, तंत्रज्ञान यामुळे बदलता समाज आपणास पाहावयास मिळतो. समाजातील समस्या आव्हाने यांचा परिणाम शिक्षणावर तर शिक्षणाच्या पद्धती,आशय, अभ्यासक्रम यांचा परिणाम बदलत्या समाजजीवनांवर होत असतो. समाजशास्त्राला अपेक्षित व्यक्ती शिक्षण घडवण्याचे कार्य करते तर शिक्षणातून नवा समाज बनवण्याचे आव्हान शिक्षण पूर्ण करताना आढळते. यातूनच शिक्षणाच्या समाजशास्त्रीय अधिष्ठानाचा विकास वेगवेगळ्या दृष्टीकोनातून पुढीलप्रमाणे दिसून येतो.

**१) शिक्षणाचे समाजशास्त्र – (Sociology of Education)**

या शाखेत समाजशास्त्रीय तत्वांचा शिक्षणशास्त्रात उपयोग केला जातो.

**२) शैक्षणिक समाजशास्त्र – (Education Sociology)** शिक्षणसंस्थेमधील समाजशास्त्रीय प्रक्रीयांचे विश्लेषण या शाखेमध्ये करण्यात येते.

**३) शिक्षणाचे समाजशास्त्रीय अधिष्टान –** समाजाचे अर्थशास्त्र धर्मशास्त्र नितीशास्त्र धर्मशास्त्र, राजनितीशस्त्र या क्षेत्रांचा अभ्यास शिक्षणशास्त्राच्या संदर्भात करण्यात येतो.

हे तिन्ही स्त्रोत एकमेकांशी संबंधित आहेत.

समाजशास्त्राचा शिक्षणाशी संबंध ऐतिहासिक काळापासून विचार करावा लागेल. शिक्षण ही उद्याच्या समाजधारणा व समाजविकासाचे साधन म्हणून शिक्षणाचा विचार केलेला आढळतो.

१) प्राचीन रोम व ग्रीसमध्ये शैक्षणिक ध्येय हे समाजधारणा होते तर भारतात शिक्षणात समाजऋणाचा उल्लेख आढळतो. व देशाला व्यक्तीहितापेक्षा प्राधान्य आढळते.

२) समाज हेतूच्या पुर्ततेसाठी व्यक्तीचा विकास करणेसाठी शिक्षण एक साधन म्हणून वापरले जाऊ शकते.

३) व्यक्ती-व्यक्तीत व्यक्ती- समुहात समुहात संघर्ष निर्माण होऊ शकतो. सर्व समाज आनंदाने राहावेत यासाठी निष्ठा, परंपरा, रूढी, रीतीरिवाज निर्माण होतात. त्याचे पालन करणे, जोपासना करणे व त्यात भर टाकणे हे कार्य शिक्षण करते. त्यामुळे समाजात संघटीतपणा राहतो व समाजविकास घडून येतो.

४) समाजशास्त्राकडून संस्कृतीचा ठेवा शिक्षणाला प्राप्त होतो. त्यामुळे साहचर्यामधून शिक्षणासाठी मदत होत असते व व्यक्तीविकासाला चालना मिळते.

५) सर्वांगीण विकास हे शिक्षणाचे ध्येय मानले जाते त्यातून शारीरिक भावनिक बौद्धीक दृष्टया सक्षम व्यक्ती समाजाला मिळतात ज्यामुळे समाजात सकारात्मक बदलासाठी अनुकूलन निर्माण होतो.

६) समाजामध्ये व्यक्तीच्या उत्पादनक्षमतेवर अमेरिकेसारख्या देशांनी भर दिलेला आढळतो. दरडोई, उत्पन्नामुळे आर्थिक विकासदरामध्ये फरक आढळतो. देशाचा विकास साधला जातो. समाजसेवेसाठी सुद्धा प्रगत देशामध्ये प्रवृत्ती निर्माण केली जाते. याचा देश विकासात फायदा होतो. तसे पाहता समाजाशिवाय व्यक्तीला व तिच्या जीवनाला काही अर्थ राहत नाही. त्यामुळे सहकार्य वृत्ती व नेतृत्व या समाजाच्या प्रमुख गरजा भागवण्याचे कार्य शिक्षण करते. तर उत्तम समाज हा गुणवत्तापूर्ण शिक्षणाची गरज पूर्ण करताना दिसतो.

वरील विवेचनावरून समाजशास्त्र व शिक्षण याचा संबंध लक्षात येतो. समाजामुळेच शिक्षण सुलभ व सफल होते तर शिक्षणाने समाजोन्नती होते तसे शिक्षण व समाज यांचे केंद्रस्थान व्यक्तीच आहे. व्यक्तीला व्यक्तीमत्व शिक्षण व समाज प्राप्त करून देतात. सामाजिक उद्दिष्टनुरूप शिक्षण आकार घेते तर शिक्षणातून नविन समाज घडत असताना दिसतो. म्हणजेच समाजशास्त्र व शिक्षण हे एकमेकास पूरक विषय आहेत असेच म्हणता येईल. या परस्पर संबंधातून समाजशास्त्रा अंतर्गत एक नविन शास्त्र उदयास आले ते शास्त्र म्हणजेच शैक्षणिक समाजशास्त्र होय.

**शैक्षणिक समाजशास्त्र –**

शैक्षणिक समाजशास्त्राचा प्रमुख प्रवर्तक म्हणून जॉर्ज पेन (George payne) यांना ओळखले जाते. " Principles of Educational Sociology" हा ग्रंथ लिहून त्यांनी शैक्षणिक समाजशास्त्राची स्वतंत्र ओळख निर्माण केली. त्याचबरोबर शैक्षणिक समाजशास्त्रात जॉन ड्युई यांचेही योगदान महत्त्वाचे मानले जाते. शिक्षणामध्ये समाजशास्त्राची भूमिका त्यांचा परस्परावरील प्रभाव याचा उटापोह यापूर्वीच केलेला आहे. काही व्याख्यांच्या साहाय्याने

**शैक्षणिक समाजशास्त्रावर चर्चा करू.**

**व्याख्या :** १) ''ज्याद्वारे व्यक्ती अनुभव संपन्न होऊन तिचे अनुभव सुसंघटीत करते त्या सामाजिक संबंधाचे व सामाजिक संबंधाचे व सामाजिक संबंध घडवून आणणाऱ्या संस्था, समाज समुह व सामाजिक प्रक्रियांचे वर्णन व स्पष्टीकरण करणारे शास्त्र म्हणजे समाजशास्त्र होय.'' जॉर्ज पेन.

1) " by educational sociology we mean the science which describes and explains the institutions social groups and social process that is the social relationships in which or, through which the individual gains and organises his experience" E. George Payne,

२) व्यक्ती व अन्य व्यक्ती सामाजिक समूह व वर्तन वैशिष्ट्यांनी युक्त सांस्कृतिक वातावरण यांच्यामध्ये होणाऱ्या आंतरक्रियांचे अध्ययन म्हणजे शैक्षणिक समाजशास्त्र होय. ब्राउन

2. " educational sociology is the study of the interactions of the individual and his cutural environment which includes other individuals, social groups and patterns of behaviour." -Brown

३) ''शिक्षण ही अशी कृती आहे जी समाजात सुरूच असते जिचे शिक्षणाचे स्वरूप समाज निर्धारण करत (ठरवत) असतो ह्या गृहीतकानुसार शैक्षणिक समाजशास्त्र कार्य करते'' – ओटावे.

3) " Educational sociology starts with the assumption that education is an activity which goes on in the society and the society in turn determines the nature of education - Ottaway

४)'' ज्या सामाजिक ज्ञानाचा आणि ते वाढवण्याच्या व वापरण्याच्या तंत्राचा,समग्र शैक्षणिक प्रक्रियेमध्ये उपयोग करता येतो असे सामाजिक ज्ञान व त्यासंबंधीची निर्दिष्टित तंत्रे यांचा समावेश असणारे शास्त्र म्हणजे शैक्षणिक समाज शास्त्र होय''–किनर मन

4 " the educational sociology is that body of social knowledge together with the technique for enlarging and applying that knowledge, which can be used to advantage in the educative process" - Kinnerman

५) ''लोक समाजात कसे राहतात,विशेषतः समाजसमुहात राहून प्राप्त केलेले शिक्षण आणि समाजसमुहात उत्तमरीत्या जगण्यासाठी आवश्यक शिक्षण यांचा शास्त्रशुद्ध अभ्यास म्हणजे शैक्षणिक समाजशास्त्र होय.''– गुड

6. Educational sociology is the scientific study of - people live in social groups

especially including the study of education that is obtained by living in the social group and education that is needed by the members to live efficiently in social groups" - Good

६ ‘‘ शैक्षणिक समाजशास्त्र म्हणजे शैक्षणिक प्रक्रियेतील मानवी गुणधर्माचा अभ्यास होय, ज्याचे उद्दिष्ट शैक्षणिक प्रक्रियामधील अध्ययन अध्यापन प्रक्रिया गुणवत्तापूर्ण बनवणे हे आहे.’’ कुक व कुक

" Educational sociology is the study of human factors in the educative process with the aim to improve teaching and learning in all types of educational systems " - cook and cook

वरील व्याख्यावरून शैक्षणिक समाजशास्त्र संकल्पना स्पष्ट होण्यास मदत होते. साधारणपणे व्यक्ती-व्यक्ती, व्यक्ती-समूह या पद्धतीने आंतरक्रिया होऊन अनुभव संपन्न बनते. त्यासाठी व्यक्तीला समाजामध्ये समायोजन साधावे लागते त्यातूनच त्याचे औपचारीक वा अनौपचारीक शिक्षण होत असते. समाजसमुहसुद्धा एकमेकावर परीणाम करीत असतात त्या प्रक्रियांचा अभ्याससुद्धा शैक्षणिक समाजशास्त्र करत असते, एवढेच नव्हे तर अध्ययन-अध्यापन प्रक्रियांचा अभ्यास शैक्षणिक समाजशास्त्रात केलेला आहे कारण जिथे औपचारीक शिक्षण आहे ती शाळा कॉलेज ही सुद्धा समाजाची प्रतिकृतीच असते. ज्यामुळे व्यक्ती समाजात उत्तमरित्या जगण्याची तयारी करताना दिसते. शैक्षणिक समाजशास्त्राच्या माध्यमातून शाश्वत स्थिर व पुरोणामी समाज निर्मिती ही अपेक्षा आहे सामाजिक दोष कमी करणे व उपयुक्त संस्थाची रचना निर्मिती व वृद्धी करणे याबरोबर सामाजिक चालीरितीच्या व संस्थाच्या पावित्र्याचा समावेश होतो. गतीमान असणारा, एकत्र गुण्यागोविंदाने राहणारा व अपेक्षित असा परीवर्तनाकुल समाज निर्माण झाला पाहिजे.

**शैक्षणिक समाजशास्त्राची ध्येये :-**

जॉर्ज हेरिंग्टन (George Herrington) याने शैक्षणिक समाजशास्त्राची ध्येये पुढीलप्रमाणे दिली आहेत.

१) शिक्षकाची समाजातील भूमिका व शाळा हे समाज विकासाचे साधन आहे त्याचे ज्ञान करून घेणे, त्याप्रमाणे शिक्षणावर इतर प्रभाव टाकणाऱ्या घटकांचे ज्ञान करून घेणे.

२) लोकशाही तत्वज्ञान संस्कृती आर्थिक व सामाजिक प्रवाह यांचे परस्पर संबंध लक्षात घेणे.

३) औपचारीक व अनौपचारीक शिक्षणसंस्थांच्या कार्याचा परस्परसंबंध अभ्यासणे.

४) सामाजिक शक्तीचा व्यक्तीच्या विकासावरील परिणाम समजून घेणे.

५) अभ्यासक्रमाचे समाजीकरण करणे

६) वरील उद्दिष्ट्ये साध्यतेसाठी संशोधनपद्धती व चिकित्सात्मक विचार पद्धतीचा वापर करणे.

**शैक्षणिक समाजशास्त्राची उद्दिष्टे**

१) सामाजिक सुव्यवस्थापन साधणे.

२) व्यक्ती व्यक्तीमधील व्यवहार सुरळीत चालण्याच्या दृष्टीने व संघटनेचे इच्छित ध्येय साध्य करण्यासाठी पूर्वनियोजित व अनियोजित अशी सामाजिक नियंत्रणची प्रक्रिया राबवण्याचा प्रयत्न करणे.

३)  सामाजिक परीवर्तनासाठी परीवर्तनाचे माध्यम असणाऱ्या शिक्षकाच्या वृत्तीत व वर्तनात परीवर्तनाचा आग्रह धरणे.

४)  व्यक्तीला तिच्या क्षमतेनुसार व व्यक्तीमत्वाच्या विकासानुसार स्वतंत्र दर्जा देणे व भूमिका प्रदान करणे.

५)  समाजातील कुटुंब शाळा, विविध समुह ,संस्था प्रसारमाध्यमे इ. सामाजिक अभिसरणाची माध्यमे असतात त्याच्यात  सुसंवादीत्व निर्माण करणे

६)  शाळा एक आदर्श समाजाची प्रतिकृती कशी आहे याचे विवेचन करणे.

७)  शाळेतील  निरनिराळ्या आंतरक्रियाद्वारे व्यक्तीत्वाचा विकास  साधणे.

८)  शाळा व समाज यामध्ये सुसंवाद प्रस्थापित करणे

९)  विश्व सामजंस्यला हवा असणारा मानवाचा दृष्टीकोन बनविण्याचा प्रयत्न करणे.

१०) राष्ट्रीय एकात्मतेची संकल्पना रूजविणे.

**शैक्षणिक समाजशास्त्राची व्याप्ती.**

**१)  शैक्षणिक उद्दिष्टे –** शैक्षणिक समाजाशास्त्राने सामाजिक परिवर्तन व सामाजिक नियंत्रण साध्य करावे तर काहीच्या मते समाजातील वर्ग,स्पष्टीकरण,जाती व्यवस्था यासारखे कृत्रिम भेद नष्ट करून एकसंघ समाज निर्मिती करावी. उद्दिष्टांचे वर्णन यापूर्वीच आपण पाहिले आहे.

**२)  अभ्यासक्रम** – अभ्यासक्रमासंबधात ब्राउन यांचे काही तत्वे मांडण्यात आली आहेत.

१)  समाज परीवर्तनावर  लक्ष केंद्रीत झालेला असावा.

२)  उत्तम नागरीकत्वासाठी व्यक्तीला उपयुक्त करणारा असावा.

३)  गतिमान, लवचिक व परीवर्तनशील असावा.

४)  समाजाने निश्चित केलेल्या उद्दिष्टाप्रत नेणारा असावा

५)  संस्कृतीसक्रम करणारा व हळूहळू बदल करणारा असावा

६)  बालकाच्या अवस्थाशी जुळणारा असावा बालक व प्रोढांच्या गरजावर आधारित कार्यात्मक असावा

७)  विद्यार्थ्यांना सामाजिक गरजा व समस्या सोडवण्याची पात्रता निर्माण करणारा असावा

८)  जागतिक समूहाचा मी एक घटक आहे अशी भूमिका निर्माण करनार असावा

९)  तज्ज्ञ ,विद्यार्थी शिक्षक पालक व प्रशासक अशा सर्व घटकांच्या सहकार्याने ठरवलेला असावा.

**३)  अध्यापन पद्धती :**

१)  अध्यापन पद्धती व्यक्तीविकासानुरोधाने आधारलेल्या नसाव्यात तर आंतरक्रियात्मक असाव्यात

२)  विविध सामाजिक परिस्थितीत योग्य समायोजन साधण्यासाठी उपयुक्त अध्यायन पद्धती असाव्यात.

३) भावनीकदृष्ट्या स्थिर व सामाजिकदृष्ट्या स्विकारणीय अशा व्यक्तिमत्व विकासास पोषक असाव्यात.

४) कथन, सुचन, प्रश्नोत्तरे, चर्चा, नाट्यीकरण, क्रिडा व स्पर्धा यांना स्वाध्याय पर्यवेक्षित अभ्यास, डाल्टन प्लॅन, प्रकल्प पद्धती, संशोधन व क्रमान्वित अध्यापन यापेक्षा अधिक प्राधान्य दिलेले असावे.

५) वर्गप्रतिनिधीच्या मध्ये जोपासल्या जाणाऱ्या गुणामुळे नेतृत्व निर्माण होते. एकत्वाची भावना (संघभावना) निर्माण करणारी असावी.

६) शाळा - वरील उद्दिष्टये, अभ्यासक्रम व पद्धती यांचे संयोजन व अवलंबन करणेसाठी शाळा ही सामाजिक संस्था आवश्यक आहे. शाळेसंबंधी पुढील प्रकरणात आधिक माहीती मिळेलच.

७) शिक्षण हा समाजशास्त्राचा अभ्यासक समाजभिमुख, समाजनिष्ठ असावा. शाळेवर प्रभाव पाडणाऱ्या सामाजिक घटकाचा ज्ञाता असावा. विद्यार्थी व्यक्तीमत्वविकास आंतरक्रिया, शाळेच्या सामाजिक प्रक्रियांचा अभ्यासक तसेच शाळेच्या सामाजिक प्रक्रियांचा अभ्यासक तसेच अध्यापन पद्धती,उद्दिष्टे साध्य करणारा असावा.

या बरोबरच शैक्षणिक समाजशास्त्राची व्याप्ती क्षेत्रे थोडक्यात पुढीलप्रमाणे.

८) मूल्यमापन

९) विद्यार्थी वृत्ती सुप्तशक्ती व अभिव्यक्ती

१०) व्यक्तीविकास

११) राष्ट्रीय एकता

१२) आंतरराष्ट्रीय सामजंस्य

१३) व्यक्ती समूह आंतरक्रिया,माध्यमे

१४) समाजनियंत्रण

१५) समाज सुव्यवस्थापन

१६) शाळा समूह संबंध

१७) दर्जा, भूमिका स्तरीकरण इ.

## B) (शिक्षणात समाजशास्त्रीय दृष्टीकोनाची गरज / निकड)

## B) Need for Sociological Approach in Education

समाजशास्त्र शिक्षणाला सामाजिक प्रक्रिया मानते. समाजशास्त्राच्या मतानुसार शिक्षण म्हणजे समाजीकरणाची प्रक्रिया होय.

**ड्रीव्हरच्या मते** ''ज्या प्रक्रियेच्याद्वारे व्यक्ती सामाजिक वातावरणांशी जुळवून घेते व समाजात एक सामान्य सहकार्यशील व कार्यक्षम व्यक्ती म्हणून जीवन सहकार्यशील व कार्यक्षम व्यक्ती म्हणून जीवन जगू लागते, त्या प्रक्रियेला समाजीकरण म्हणतात''

**ओटोवे म्हणतो,**

‘‘ शिक्षण ही अशी प्रक्रिया आहे की जी समाजात चालते, जिची ध्येय पद्धती ही, ती ज्या समाजात चालते, तिच्या स्वरूपावर अवलंबून असतात.

जॉन ड्युई म्हणतो’’ ‘‘ व्यक्तीच्या सहभागातून समाज-- शिक्षणप्रक्रियेचा आरंभ व्हायला हवा.’’

खऱ्या अर्थाने बालक ज्या समाजाचा घटक होणार आहे त्याच्या अभिरूप वातावरणातून गरजेनुरूप शिक्षण घडायला हवे. तर बुब्रेकरच्या मते शिक्षण ही सामाजिक प्रक्रियाच आहे त्याचा अभ्यास शैक्षणिक समाजशास्त्राबरोबर शैक्षणिक तत्वज्ञानातही व्हायला हवा.

म्हणजेच ज्याप्रमाणे शैक्षणिक मानसशास्त्र व्यक्तीगत विकासप्रक्रियेंवर विचार करते शैक्षणिक तत्वज्ञान मुल्ये व आदर्श संक्रमणाचा प्रयत्न करते त्याचप्रमाणे शैक्षणिक समाजशास्त्र विविध प्रकारच्या सामाजिक आंतरक्रियावर भाष्य करते व सामाजिकरणावर म्हणजेच शिक्षणावर भर देते. शिक्षणाची समाजशास्त्रानुसार कार्य अभ्यासणे या संदर्भात गरजेचे ठरते.

जॉर्ज पेनच्या मते शिक्षणाची तीन प्रमुख कार्य शैक्षणिक समाजशास्त्राला अपेक्षित आहेत.

**१) परंपरांचा स्विकार :- (Assimilation of traditions)**

व्यक्ती ही समाजापासून अलिप्त राहू शकत नाही. परस्पर आंतरक्रियासाठी त्याला /तिला विविध मुल्ये,नियमने, कौशल्याची गरज पडते. सांस्कृतिक वारसा हा महत्वाचा असतो. समाज एकसंघ राहण्यासाठी ती कळत,नकळत कधी कधी प्रयत्न पूर्वक संस्करीत होत असते व समाजाचा हिस्सा बनत असते. त्याचबरोबर सद्याच्या काळात परस्पर संबंधामुळे संस्कृतीसंकर होत आहेच यातूनच ती विविध परंपरा रूढी, मुल्ये, आदर्श याचे सांस्कृतिक वहन करत असते. हा वारसा पुढे नेण्यासाठी शिक्षण कार्य करीत असते. यासाठी व्यक्तीमध्ये उदारमतवादी दृष्टीकोन निर्माण शिक्षणाने होत असतो.

**२. नवसामाजिक पद्धतीचा विकास (Development of new social patterns)**

जीवनातील सातत्यपूर्ण व गतिमान बदलाशी समायोजन साधणे व्यक्तीसाठी गरजेचे बनले आहे. यातून परस्पर आंतरक्रियेदरम्यान संघर्ष कमी होऊ शकतो. भूमिका दर्जा स्तरीकरणासाठी पात्रतेनुसार विचार करण्यासाठी कृत्रिम अशा रूढी परंपरा यांचा त्याग करणे, विज्ञानवादी दृष्टीकोन जोपासणे, स्वातंत्र, समता, बंधूता अशा नवीन मुल्यांचा स्विकार करणे व नविन समाजरचनेनुसार अनुकूल सवयी, अभिवृत्ती वा संस्कार -- गरजेचे आहे. यातूनच नविन वर्तन बदल व वर्तन प्रक्रियांचे साचे नवीन युगासाठी तयार होतील व विध्व बंधुत्वाची भावना निर्माण होणेस मदत होईल.

**३. सर्जनशील व विधायक भूमिका (Creative & Constructive Role)**

नवी ध्येये नवी मूल्ये, नवी नियामके यांच्या निर्मितीची गरज सद्या वेगाने गरजेचे बनलेली आहेत. समाजरचना वेगाने बदलत आहे. परस्पर संबंधाचे नवे नियम निर्माण होत आहेत. कुटुंब समाज आपल्या रचना गरजेनुसार बदलताना दिसतो आहे. त्यानुसार सर्जनशील विचारांचे नेतृत्व विचारवंत, व्यावसायिक, अधिकारी,

कर्मचारी इ. निर्माण होणे गरजेचे आहेत. परीवर्तनामुळे संघर्ष कमी करणे, संक्रमण कालावधी कमीत कमी करणेसाठी विधायक भूमिका शिक्षणातून निर्माण करावी लागते. वेळोवेळी गरजेनुरूप मुल्ये, आदर्श, पद्धती इ. मध्ये बदल करणे भर टाकणे, दोष कमी करणे गरजेचे बनले आहे. त्यानुसार कार्य करणे गरजेचे ठरत आहे.

**४) समाज नियंत्रण व समाज परीवर्तन –**

समाज स्वास्थासाठी समाज नियंत्रण हे अत्यंत गरजेचे असते. सामाजिक नियंत्रण म्हणजे कोणताही समूह आपल्या घटकाकडून आपल्या अपेक्षा व गरजा यानुरूप वर्तन घडवून आणणेसाठी प्रयत्नशील असतो त्या प्रकाराला 'समाज नियंत्रण' म्हणतात.

**सामाजिक नियंत्रणासाठी व्यक्ती व समाज**

कुटुंब, धर्म, लोक रूढी, लोकनीती, कायदा इ. माध्यमे वापरताना दिसतो. परंतु शिक्षण इतर संस्थापेक्षा निरोगी, विधायक व प्रभावी रीतीने अंमलबजावणीसाठी पोषक ठरताना दिसते.

समाजाच्या प्रत्येक भागातील त्यातील व्यक्तीच्या दृष्टीने व समाजाच्या दृष्टीने काही कार्य असतात. व्यक्ती समुह, मंडळ, संघ, संस्था यासारख्या समाजाच्या प्रत्येक भागाला समाजात विशिष्ट भूमिका वठवायची असते'' समाजाच्या सामाजिक कार्यात बदल म्हणजे या सामाजिक रचनेतील बदल म्हणजे सामाजिक परीवर्तन होय.''सामाजिक परीवर्तन मॅक आयव्हर  या समाजशास्त्राच्या मते चार प्रकारचे आहे.

**१) भौतिक    २) यांत्रिक    ३) जीवनात्मक    ४) सांस्कृतिक**

या पद्धतीने समाजपरीवर्तन होत असते. शिक्षणाने समाजशास्त्रीय दृष्ट्या सकारात्मक, विधायक व रचनात्मक पद्धतीने परीवर्तन होण्यास हातभार लागत असतो. त्यामुळे शिक्षणाचे हे महत्वाचे कार्य मानले आहे.

शिक्षणाचे कार्य पाहता शिक्षणात समाज शास्त्रीय दृष्टीकोनाची गरज आपल्या सहज लक्षात येते. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून शिक्षण समाजातील भविष्यकालीन  जीवनासाठी तयारी करून घेते. भूतकाळापासून समाजनिर्मितीतील रूढी, परंपरा, नियमके इ. बरोबर सांस्कृतिक वारसा पुढे नेण्यास मदत करते. जीवनशैली सुधारणे, संस्कृती सकारात्मक बदल निर्माण करून विचारास चालना देते. शिक्षणाची ध्येये व समाजशास्त्राची ध्येये एकदरीत व्यक्ती व समाज शांततेने समृद्धपणे जीवन जगतील यासाठी प्रयत्नशील असले हीच असतात.समाज सुरळीत चालणेसाठी विशिष्ट नियम, कायदे असतात ज्याद्वारे नियंत्रणाचे कार्य होते. समाज परीवर्तनासाठी शिक्षणाची भूमिका आजपर्यंतच्या इतिहासात वेळोवेळी स्पष्ट दिसते. शिक्षणात समाजशास्त्रीय तत्वे नियम यांची व्यक्तीनिष्ठ, समाजनिष्ठ व आंतरक्रियात्मक दृष्टीकोन यांची गरज आहे व्यक्तीच्या शारीरीक, मानसिक व सामाजिक जीवनाच्या निरोगी असण्यामध्ये समाजशास्त्रीय तत्वे मदत करत असतात कारण मानव हा स्वतंत्रपणे जगू शकत नाही. व्यक्ती इतर व्यक्तीशी आंतरक्रिया करताना संघर्ष निर्मिती होऊ नये यासाठी समाजशास्त्र कार्य करते. भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशात सतत संघर्षाचे प्रकार होत असतात व लोकशाही तत्वांच्या रूजवणूकीसाठी व संवर्धनासाठी शिक्षण व समाजशास्त्र यांची जोड गरजेची ठरते. याबरोबर विश्वभावनेची जपणूक करणे, सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव निर्मिती, व्यावसायिकतेचा प्रामुख्याने विचार, सामाजिक कौशल्याची प्राप्ती करणे व समाजरूपी यंत्रात आपली भूमिका चोखपणे निभावण्यासाठी शिक्षणाला समाजशास्त्राची गरज अधोरेखित होत असते.

**संदर्भ ग्रंथ :**


१) करंदीकर सुरेश, मंगरूळकर मीना (२००२) : 'उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण.' कोल्हापूर : फडके प्रकाशन.

२) कुंडले म. बा. (१९९८) : 'शैक्षणिक तत्वज्ञान व समाजशास्त्र.' श्री विद्या प्रकाशन, पुणे.

३) कोंडेकर ए. वाय. : 'भारतीय समाजाचा परीचय.' फडके प्रकाशन, कोल्हापूर.

४) साळुंखे सर्जेराव (१९९८) : 'समाजशास्त्रातील मुलभूत संकल्पना.' नरेंद्र प्रकाशन, पुणे.

५) सांगोलकर अरूण (२०११) : 'नविन जागतिक समाजातील शिक्षणाचे विचारप्रवाह.' इनसाईट पब्लिकेशन, नाशिक.

६) डॉ. सौ. पेंडके प्रतिभा सुधिर (२००९) : 'शिक्षणाची तात्विक व समाजशास्त्रीय भूमिका.' विद्या प्रकाशन, नागपूर.


***

# घटक २ : शिक्षणशास्त्र

# शिक्षण व सामाजिक परिवर्तन

# EDUCATION AND SOCIAL CHANGE

A) Education as an instrument of Social Change

**शिक्षण : सामाजिक परिवर्तनाचे साधन**

B) Education as reflection of Social Change

**शिक्षण : सामाजिक परिवर्तनाचे प्रतिबिंब**

C) Agencies of Social Change : School & Mass Media (Newspaper, T.V.)

**सामाजिक परिवर्तनाच्या संस्था : शाळा, समुहसंपर्क माध्यम (वृत्तपत्रे, दुरदर्शन)**

**उद्दिष्टये (Objectives)**

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणांस ..

१. शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन कसे आहे हे लक्षात येईल.

२. शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे प्रतिबिंब आहे व अनिवार्य घटक आहे हे समजेल.

३. सामाजिक परिवर्तनासाठी उपयुक्त असणाऱ्या संस्था उदा. शाळा व समुहसंपर्क माध्यमे यांची भुमिका, बलस्थाने व उणिवांचे ज्ञान मिळेल.

**शिक्षण व सामाजिक परिवर्तन : Education and Social Change :**

परिवर्तन हा मानवी जीवनाचाच नव्हे तर सर्व विश्वाचा शाश्वत नियम आहे. परिवर्तन किंवा बदल हे जीवनाचे वैशिष्ट्य आहे. समाजात सतत बदल घडत असतात. अगदी अश्मयुगापासून ते आजपर्यंत अनेक बदल वा स्थित्यंतरे झालेली आपणांस दिसून येतात, मानवाच्या आचार-विचार, रिती-रिवाज, जीवन पध्दती, संघटना, संस्था, जाती, धर्म, संस्कृती, भाषा इ. अनेक बाबतीत सतत बदल दिसून येतात. या बदलांच्या गती कधी सुक्ष्मतर कधी मंद अशा दिसतात. परंतु कधीही स्थिरता व निरंतरता समाजामध्ये आढळत नाही. मानवी जीवनाच्या ह्या परिवर्तनाचा अभ्यास करणे समाजशास्त्रात महत्त्वाचे मानले जाते. यासाठी सामाजिक परिवर्तनाच्या काही व्याख्याद्वारे सामाजिक परिवर्तनाची संकल्पना समजून घेऊ.

१) 'सामाजिक परिवर्तन म्हणजे समाज रचनेतील बदल होय.' - डॉ. हॅरी जॉन्सन

"Social Change means change in social structure."

२) ‘समाजाची रचना व कार्य यात घडून येणाऱ्या बदलाला सामाजिक परिवर्तन म्हणता येईल.’–कींग्जले डेव्हीस

"By social change it means only such alternatives as occur in social organisation that is the structure & function of society - Kingslay Davis.

३) ‘सामाजिक प्रक्रिया, सामाजिक रचना, सामाजिक आंतरक्रिया अथवा सामाजिक संघटना यांच्यातील एखाद्या पैलूमध्ये होणारे बदल.’ – जोन्स.

"Social change is a term used to describe variations or modifications of any aspect of social process, social patterns, social intractions or social organisation. -Jones

४) ‘सामाजिक उत्थान म्हणजे सामाजिक परिवर्तन’– स्पेन्सर.

"Social change is social evaluation."

५) ‘समाजमान्य पध्दतीतील बदल, जरी तो भौगोलिक परिस्थिती, सांस्कृतिक साधने यामुळे झाला असेल तरी त्याला सामाजिक परिवर्तन म्हणतात.’– गिलिन आणि गिलिन

"Social change is variation from accepted mode of life whether due to alternations in geographic conditions, in cultural equipment, composition of the population or ideologies and whether brought about by diffusion or invention within the group." - Gillin and Gillin.

६) ‘सांस्कृतिक परिवर्तन म्हणजेच सामाजिक परिवर्तन आहे कारण सर्व संस्कृती, उत्पत्ती, अर्थ व व्यवहार हा मुलत: सामाजिक असतो.’– डॉसन आणि गेटीस

"Cultural change is social change since all culture in is social in its origin, meaning and usage." - Dawson & Gettys.

वरील व्याख्या पाहता सामाजिक परिवर्तन हे समाजरचना व त्यातील आंतरक्रियेवर आधारीत असून आंतरक्रियेतील बदलामुळे सांस्कृतिक बदल व समाजातील घटकांच्या होणारे बदल, त्यांची कार्य करण्याची पध्दतीत परिवर्तन यामुळे घडून येत असते. यासंबंधी अधिक विश्लेषण हॅरी जॉन्सन (Harry Johnson) यांनी पुढीलप्रमाणे केले आहे.

**सामाजिक परिवर्तन :**

१) सामाजिक मुल्यामधील परिवर्तन – (Change in Social Values)

२) संस्थागत परिवर्तन – (Institutional Change)

३) संपत्ती अथवा पुरस्कार प्रणालीतील परिवर्तन – (Change in distribution of possession and rewards)

४) व्यक्तीगत / वैयक्तिक परिवर्तन – (Changes in personal)

५) व्यक्तीगत / वैयक्तिक योग्यता आणि अभिवृत्तीतील परिवर्तन – (Changes in abilities or attitudes in personal)

याबरोबरच तज्ज्ञांनी परिवर्तन प्रक्रिया पुढीलप्रमाणे मांडली आहे.

१. व्यक्तीच्या अनुभवामध्ये बदल

२. व्यक्तीच्या अभिवृत्तीत बदल

३. व्यक्तीच्या वैचारिक प्रारूपामध्ये बदल

४. सामाजिक आंतरक्रियामध्ये बदल

५. सामाजिक संबंधामध्ये बदल

६. सामाजिक संरचनेमध्ये बदल

यामुळे सामाजिक बदल होतो ज्याला सामाजिक परिवर्तन म्हणता येईल. त्याचे प्रकार पुढीलप्रमाणे :

१) भौतिक २) जीवनात्मक ३) यांत्रिक ४) सांस्कृतिक

वरील प्रकार मॅक आयव्हर ह्या समाजशास्त्रज्ञाने मांडलेले आहेत.

**सामाजिक परिवर्तनाचे स्वरुप : (Nature of Social Change)**

- समाजरचनेत बदल
- समाज रचना, आंतरक्रिया यासारख्या पैलूत बदल
- कार्यपध्दतीत बदल
- परिवर्तनाची अनिवार्यता
- सांस्कृतिक बदलाशी संबंध

**सामाजिक परिवर्तनाचे सिद्धांत : (Principles of Social Change)**

सामाजिक परिवर्तनाचे सिद्धांत पुढीलप्रमाणे मांडले जातात.

१) परंपरागत अथवा धार्मिक सिद्धांत असे मांडते की व्यक्ती अथवा वस्तु तिच्या पुर्वसंचितानुसार वाढते वा नाश पावत असते. अनित्यता / क्षणभंगुरता हा विश्वाचा नियम आहे.

२) परिवर्तन हा विश्वाचा नियम आहे. (Change is the soul of life)

३) ऐतिहासिक सिद्धांत असे सांगतो की युद्धे, क्रांत्या, आर्थिक व राजकीय घटना व शोध यामुळे समाजात परिवर्तन होत असते.

४) मार्क्सवादाचा सिद्धांत हा वर्गसिद्धांतामुळे परिवर्तन सांगतो. 'आहे रे' व 'नाही रे' अथवा हुजुर-मजुर संघर्षामुळे परिवर्तन अटळ आहे असे तो मानतो.

**सामाजिक परिवर्तनाची वैशिष्ट्ये :**

सामाजिक परिवर्तन ही एक वैशिष्ट्यपूर्ण प्रक्रिया आहे. या प्रक्रियेचे प्रमुख वैशिष्टये पुढे दिली आहेत.

१) **वैश्विक स्वरूप :** सामाजिक परिवर्तन ही वैश्विक (Universal) स्वरूपाची घटना आहे. समाजात सर्वत्र प्रवाहीपणा आढळतो. समाजात विचारांची एक लाट येते व समाज प्रवाहीत होत असतो. नव्या तत्त्वाचा स्विकार करण्याची त्याची गती कमी अधिक असू शकते.

२. **सामाजिक स्वरूप :** समाजामध्ये व्यक्तिगत परिवर्तनाला महत्त्व नसुन व्यापक प्रमाणात समाजात झालेले परिवर्तन महत्त्वाचे मानले जाते. या अर्थाने परिवर्तनाचे स्वरुप व्यक्तिगत नसून सामाजिक असते.

३. **काळाशी संबंधितता :** सामाजिक परिवर्तन हे काळाशी संबंधित असते. काळानुरुप त्याची गती कमी-जास्त असते.

४. **अनिवार्यता / अपरिहार्य प्रक्रिया :** सामाजिक परिवर्तन ही टाळता न येणारी व अपरिहार्य प्रक्रिया आहे कारण बदल हा सृष्टीचा नियम आहे.

५. **स्वाभाविक प्रक्रिया :** काळ वा परिस्थितीनुसार समाजाच्या गरजा बदलत असतात त्यानुसार परिवर्तन होणे हे स्वाभाविक असते. त्यामुळे ही प्रक्रिया स्वाभाविक मानली जाते.

६. **अनिश्चित प्रक्रिया :** सामाजिक परिवर्तनाला कोणतेही निश्चित नियम नसल्याने ती गरजेनुरुप होत असते. त्यामुळे त्याविषयी कोणतेही भाकित करता येत नाही.

७. **गतिभिन्नता :** सामाजिक परिवर्तन ही प्रक्रिया सार्वत्रिक असली तरी तिचा वेग सर्वत्र सारखा नसतो. काही ठिकाणी गतिमान तर काही ठिकाणी तिचा वेग कमी आढळतो. उदा. काही बाबतीत ग्रामीण भागापेक्षा शहरी भागात तिचा वेग जास्त असतो.

**सामाजिक परिवर्तनाची कारणे किंवा घटक :**

सामाजिक परिवर्तनास जे घटक कारणीभूत आहेत त्याविषयी सविस्तर तपशील पुढे दिला आहे.

१) **नैसर्गिक घटक / भौगोलिक घटक / भौतिक घटक :**

भौगोलिक घटकामुळे पूर्वापार परिवर्तन होत आले आहे, परंतु मानवाने देखील ज्ञान विज्ञानाच्या सहाय्याने या सर्वांवर मात करत विविध नैसर्गिक आपत्तीचा सामना केला आहे. नविन वातावरणाशी जुळवून घेऊन त्यांनी अस्तित्व टिकवलेले दिसते.

२) **सांस्कृतिक घटक :**

समाजामध्ये ज्या पध्दतीने स्थैर्य अथवा अस्थैर्य असते त्याप्रमाणे संस्कृती बनत असते. याचा परिणाम संस्कृतीवर निश्चित घडत असतो. त्यामुळे संस्कृतीत बदल होत असतो. पर्यायाने सामाजिक बदल घडतात. उदा. शांतता व समृध्दी असेल तर तिथे उत्साहाचे, आनंदाचे सण, उत्सवांचे नृत्य, साहित्य, संगीत व कलांचे प्राबल्य दिसते. तर याउलट अस्थिर ठिकाणी सांस्कृतिक घटक कमकुवत असतात.

### ३) तांत्रिक घटक :

आज समाजाच्या प्रत्येक ठिकाणी तंत्रज्ञान दिसते. तंत्रज्ञानाचा फार मोठा प्रभाव सामाजिक परिवर्तनावर दिसून येतो. तंत्रज्ञानाने व्यवसाय, उद्योग, शिक्षण, विपणन, राजकारण, अर्थकारण व सर्वांवर प्रभाव टाकला आहे. हे घटक नेहमीच सामाजिक परिवर्तन घडून येण्यास मदत करत असतात.

### ४) लोकसंख्यात्मक घटक :

लोकशाहीच्या घनता, जन्मदर-मृत्यूदर, पुरुष-स्त्री प्रमाण, गुन्हेगारी, बेरोजगारी, व्यसनाधिनता, भ्रष्टाचार, नैसर्गिक साधनसंपत्तीचे वितरण यावर सामाजिक परिवर्तन अवलंबून असते. जीवनाची गुणवत्ताच लोकसंख्यात्मक घटकावर ठरते. त्यामुळे या घटकांचा सामाजिक परिवर्तनात महत्त्वाचा वाटा ठरतो. उदा. यात वाढ झाली तर आर्थिक, राजकीय, सामाजिक स्वरुपाच्या समस्या निर्माण होवून त्या जीवनावर विपरीत परिणाम करताना दिसतात.

### ५) राजकीय घटक :

राज्ये, राष्ट्रे व वैश्विक राजकीय धोरणांचा प्रभाव समाजमनावर होत असतो. आजपर्यंतच्या राजकीय क्रांतीनी मानवी जीवन बदलले आहे. त्यामुळे फार मोठे सामाजिक परिवर्तन झाले आहे. रशियन क्रांतीने वर्गसंघर्ष संपवण्याचा प्रयत्न केला तर अमेरिकेने व्यक्तीस्वातंत्र्य व फ्रान्सने समता, स्वातंत्र्य बंधूता दिली. हिटलर, मुसोलीनीने महायुद्धाची ठिणगी टाकली. यावरुन राजकीय घटकसुद्धा सामाजिक परिवर्तनाचा मोठा हिस्सा असल्याचे दिसते.

### ५) आर्थिक घटक :

रशियामधील कार्ल मार्क्स धोरणामुळे झालेले परिवर्तन हे आर्थिक घटकाचे उदाहरण आहे. सर्व जगात भांडवलशाहीला व सरंजामशाहीला बसलेले हादरे आपण पाहिले आहेत. आजसुध्दा जगभर वाढती बेकारी, दारिद्र्य यांच्यामुळे सामाजिक परिवर्तन होताना दिसते आहे.

### पर्यावरणीय घटक :

पर्यावरणाचा व्यक्तीवर व समाजावर अनुकूल व प्रतिकूल परिणाम घडताना दिसतो. पर्यावरणानुसार आजपर्यंत मानवाने सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक बदल करुन घेतले आहेत. भौगोलिक स्थितंतरे घडतील तसे त्याचे राहणे, खाणे-पिणे इ. अनेकांत बदल होतात. नैसर्गिक आपत्ती आल्या तर त्याचे प्रतिकूल व नैसर्गिक अनुकूलन असते तर अनुकूल परिणाम दिसतात.

आजच्या युगात मात्र पर्यावरणाचे प्रचंड असंतुलन झाल्यामुळे प्रतिकूल असा परिणाम मानवी जीवनावर दिसून येत आहे. अर्थात याचे कारण मानवाने निसर्गाच्या संपत्तीची नुसती लूट चालवली आहे हेच आहे. चिरंजीवी विकासाच्या संकल्पनेचा उपयोग करुन तो प्रदूषण रोखण्याचा प्रयत्न करत आहे. आवश्यक ते सामाजिक परिवर्तन करण्याचा प्रयत्न दिसत आहे. औद्योगिक विकास संयमाने व पर्यावरणपूरक करण्याचा प्रयत्न दिसत आहे. सामाजिक परिवर्तनासाठी शासन स्तरावर जगभर, कायदे कानून, मदत पुरविली जात आहे.

सामाजिक परिवर्तनासाठी एकंदरीत पर्यावरणीय घटक महत्त्वाची भुमिका बजावताना दिसत आहेत.

**सामाजिक परिवर्तनात बाधा आणणारे घटक : Obstacles in Social Change**

समाजात बदल होणे अटळ असते, अथवा प्रत्येक समाज परिवर्तनशील असतो. परंतु समाज परिवर्तनास काही घटक अडथळे निर्माण करताना दिसतात. त्यांची चर्चा पुढीलप्रमाणे :

**१) नाविन्याची भिती :**

समाजातील व्यक्तीला नेहमी नाविन्याची भिती वाटत असते. नविन विचार, नविन आचार गरजेनुरुप असतात. परंतु बऱ्याचवेळा अशा प्रकारे रुढी सोडून जाणे व नविन परंपरा / विचार स्विकारणे अडचणीचे वाटते. त्यामुळे सामाजिक परिवर्तनाची गती मंद होताना दिसते. परंतु ही संक्रमण अवस्था संपत जाते व सामाजिक परिवर्तनाला चालना मिळते.

**२) सांस्कृतिक दृढता :**

परंपरागत रूजलेल्या रूढी व परंपरा सोडण्याची भिती वाटते तसे त्या परंपरा अंगवळणी पडल्यामुळे समाजाची मानसिकता परिवर्तनास प्रतिकूल असते. सवयी, रूढीप्रियता, विषयाची भिती, स्वार्थी मनोवृत्ती यामुळे रुढीला चिकटून राहण्याची प्रवृत्ती वाढते. त्यामुळे परिवर्तनाला नेहमी सांस्कृतिक दृढतेमुळे विलंब होताना आढळतो.

**३) नविन शोधांना विरोध :**

समाजात सतत नविन शोध लागत असतात. त्यामुळे समाज विकसित होत असतो. उदा. लसीकरणांचा शोध, जेम्स वॅटचा बाष्पशक्तीचा शोध यांना सुरुवातीला विरोध झाला. अज्ञानामुळे विविध शोधांचे भय समाजघटकांना वाटते. त्यामुळे धर्माच्या वा इतर बाबींचे भय दाखवून विरोध केला जातो.

**४) स्वार्थ जपण्याची वृत्ती :**

समाजातील विशिष्ठ वर्ग आपला स्वार्थ जपण्यासाठी समाजाला नव्या विचारांचा संपर्क येऊ देत नाहीत. स्वत:च्या स्वार्थासाठी प्रगतीला हितकारक विचारापासून दूर ठेवण्याची प्रवृत्ती सामाजिक परिवर्तनात एक अडथळा ठरते.

**५) आत्मविश्वासाचा अभाव :**

एखादा नविन विचार स्विकारणे तो अंमलात आणणे सोपे नाही त्यासाठी स्विकाराचे मोठे धाडस समाजमनाकडे असावे लागते. समाजात आत्मविश्वास निर्मितीचे धाडस नेतृत्त्वाकडे लागते. जर आत्मविश्वासाचा अभाव असेल तर समाजपरिवर्तनाची गती मंद होत जाते.

**६) वेगळेपणाची भावना :**

स्वत:च्या अस्तित्वासाठी स्वत:चे वेगळेपण टिकवणारा समाजात एक वर्ग असतो. विशिष्ठ भाषा, पोषाख, जीवनशैली ह्यामधून तो स्वत:चे वेगळेपण जपत असतो. समाजातील स्वतंत्र संस्कृती जपत नविन प्रवाहापासून अलिप्त धोरण तो वर्ग स्विकारत असल्यामुळे सामाजिक परिवर्तनास दिरंगाई किंवा अडथळा निर्माण होतो.

### ७) अकार्यक्षम प्रशासन :

कोणत्याही समाजाची राज्यसंस्था ही शक्तीशाली असते. स्वत:चा स्वार्थ साधून सत्तेवर राहणेसाठी बऱ्याच वेळा नवविचारांना विरोध करुन एकप्रकारे ती समाजाचे अकल्याण करत असते. अशा प्रशासनास अकार्यक्षम प्रशासन म्हणतात. योग्य दिशेने समाजाला प्रगतीपथावर नेणे, त्यासाठी योग्य तो आत्मविश्वास देणे हे नेतृत्त्वाचे काम असते. प्रशासन अकार्यक्षम असेल तर सामाजिक परिवर्तनात एक मोठा अडथळा निर्माण होतो.

### ८) आर्थिक विषमता :

आर्थिक दौबल्र्यामुळे नविन शोध, शिक्षण, तंत्रज्ञान याचा वापर दुर्बल घटक करु शकत नाहीत. या विषमतेमुळे नविन विचारापासून ते दूर राहतात. खालावलेला आर्थिक स्तर, व्यसनाधिनता, दारिद्र्य या सर्वांमुळे समाजातील हा घटक शोषणास बळी पडतो. त्यामुळे हा वर्ग सामाजिक परिवर्तनातील एक मोठा अडथळा ठरतो.

वरील घटकाव्यतिरिक्त काही घटक सामाजिक परिवर्तनात अडथळा ठरत असतात. त्यामुळे सामाजिक परिवर्तनाची दिशा ही अधोगामी होत असते. त्यामुळे परिवर्तनास दिरंगाई होत असते.

### ब) शिक्षण : एक सामाजिक परिवर्तनाचे साधन :

**Education as an Instrument of Social Change** :

शिक्षण हे सामाजिक परिवर्तनासाठी आवश्यक व प्रभावी साधन मानले जाते. शिक्षण ही एक सहयोगी शक्ती आहे जी सामाजिक परिवर्तनासाठी समाजाची मानसिक व वैचारिक पार्श्वभूमी तयार करते. शासन व इतर संस्थांनी निर्मित कायदे, परंपरा जतन करणे व पुढे संक्रमित करणे या कामी शिक्षण महत्त्वाची भूमिका बजावते. अनेक सुधारकांनी याचा उपयोग करुन शिक्षणाच्या माध्यमातून अनिष्ठ रूढी व परंपरा यांचे उच्चाटन केले आहे. सती, बालविवाह, बहुपत्नीत्व, जातीभेद अशा प्रथांचे निर्मुलन करणेकामी शिक्षणच उपयोगात आले आहे. राष्ट्रासाठी विविध मुल्ये रुजविणे उदा. उत्तम नागरिक, राष्ट्रभक्त युवक, स्त्री-पुरुष समानता, लोकशाही मुल्यसंवर्धन, पर्यावरण रक्षण व चिरंजीवी विकास इ. अशी अनेक कामे शिक्षण करीत असलेले दिसते. त्यामुळेच तर शिक्षण आयोगात याचे संदर्भ सापडतात.

भारतीय शिक्षण आयोगाने १९६४ मध्ये आपल्या अहवालात नमूद केले आहे की,

''सामाजिक परिवर्तनाचे शिक्षण हे एक साधन आहे. सर्व नागरिकाची मुल्ये, अभिरुची, कौशल्ये, ज्ञान यांच्यातील परिवर्तनांचा समावेश राष्ट्राच्या इच्छा आकांक्षाची जाणीव करुन देतात. अशा मुलभूत मुल्यांची प्रत्येक सामाजिक व आर्थिक कार्यक्रमासाठी भारताला गरज आहे. हे सामाजिक परिवर्तन हिंसक क्रांतीविना, व्यापक स्वरुपात घडवायचे असेल तर शिक्षण हेच एकमेव साधन आहे. हे खात्रीशीर व वापरुन उपयुक्त सिध्द झालेले साधन आहे.'' - भारतीय शिक्षण आयोग १९६४-६६

शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे साधन आहे हे वरील संदर्भावरुन आपल्या लक्षात येते. समाजशास्त्राला अभिप्रेत शिक्षणावर प्रकाश टाकल्यावर शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे एक साधन आहे हे लक्षात येईल.

समाजशास्त्राच्या मते शिक्षण म्हणजे व्यक्तीच्या समाजीकरणाची प्रक्रिया होय.

''समाजीकरण अशी प्रक्रिया आहे. ज्याद्वारे व्यक्ती सामाजिक वातावरणाशी जुळवून घेते व समाजात एक सन्मान्य, सहकार्यशील व कार्यक्षम व्यक्ती म्हणून जीवन जगते.''- ड्रीव्हर

''शिक्षण ही समाजात चालणारी प्रक्रिया आहे आणि तिची ध्येये, अध्यापन पध्दती ती ज्या समाजात चालते त्या समाजाच्या स्वरुपावर अवलंबून असतात.'' - ऑटोवे

तर ब्राऊनच्या मतानुसार समाजाच्या परिस्थितीशी जुळवून घेणे एवढेच शिक्षणाचे मुलभूत उद्दिष्ट नसून समाजपरिवर्तन हेही शिक्षणाचे प्रमुख कार्य आहे.

जॉर्ज पेनच्या मते (समाजशास्त्राचा जनक) शिक्षणाने

१) परंपराचा स्विकार

२) नवसामाजिक पध्दतीचा विकास

३) सर्जनशील व विधायक कार्ये

ही प्रमुख कार्य केली पाहिजेत.

यासाठी आधुनिक समाजशास्त्र शिक्षणाकडून अपेक्षित ध्येय, अभ्यासक्रम, अध्यापन पध्दती व शाळा याबाबत पुढील अपेक्षा करते.

**शिक्षणाची ध्येये :**

* जबाबदार घटक असल्याची भावना निर्मिती.
* समाजहिताची कळकळ, सहकार्य भावना, बंधुता, परमसहिष्णुता, समतायुक्त नागरिक बनवणे
* सामाजिक समस्याचे निराकरणाची क्षमता, उदा. बेकारी, दहशतवाद, जातीद्वेष इ.
* सामाजिक गरजांची पूर्तता करणे, उदा. औद्योगिक विकास, राष्ट्रीय ऐक्य, वैज्ञानिक विकास इ.

वरील ध्येये पूर्ण करण्यासाठी योग्य अभ्यासक्रम निर्मिती.

**अभ्यासक्रम**

समाजशास्त्राधारीत शिक्षणाच्या ध्येयांची पूर्तता करणारा अभ्यासक्रमासाठी पुढील मार्गदर्शक तत्त्व सुचविले आहेत.

* पाठ्यपुस्तकाव्यतिरिक्त विद्यार्थी वर्तनाबदलासाठी जाणीवपूर्वक निवडलेली व संयोजित केलेली कृती.
* समाजमुल्यांचे अधिष्ठान व समाज परिवर्तनावर आधारित
* गतिमान, परिवर्तनशील व लवचिक
* पालक, विद्यार्थी, शिक्षक, प्रशासकांचा विचार करुन निर्मित.
* संस्कृती संक्रमणाचे ध्येय असणारा.
* सामाजिक गरजा, समस्या यानुसार

* भविष्यातील आव्हाने पेलण्यास सक्षम.

वरील अभ्यासक्रमानुसार अध्यापन पध्दती समाजशास्त्र पुढीलप्रमाणे सुचविते.

**अध्यापन पध्दती :**

* वर्गात प्राप्त ज्ञानाचे प्रत्यक्ष व्यवहारात उपयोजन होईल अशी अध्यापन पध्दती.
* वर्गबाह्य सामाजिक वर्तनाचा विचार करुन अध्यापन पध्दती.
* जीवनात प्रचलित असणाऱ्या समाजशक्तीचा समायोजनक्षमता वाढीसाठी उपयोग करणारी अध्यापनपध्दती

उदाहरणार्थ = अ) प्रोजेक्ट पध्दती

ब) गटचर्चा पध्दती

क) चर्चासत्रे

ड) सामुहिक पध्दती

**शाळा :**

शाळा ही सामाजिक संस्था असून त्यामध्ये सामाजिक प्रक्रिया व कार्यक्रमांना महत्त्वाचे स्थान असावे. त्यामुळे वर्ग ही समाजाची छोटी प्रतिकृती असावी.

या सर्वांबरोबर शिक्षकाची भुमिका शिक्षण प्रक्रियेत महत्त्वाची ठरते.

**सामाजिक परिवर्तनात शिक्षकाची भूमिका :**

प्रा. कबीर यांच्या मते चांगल्या शिक्षकविना उत्कृष्ट शिक्षण पध्दती देखील अपयशी ठरते तर चांगल्या शिक्षकामुळे शिक्षण पध्दतीतील दोषही दूर करता येतात.

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन म्हणतात,''शिक्षकाचे समाजातील स्थान अत्यंत महत्त्वाचे असते. तो एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे बौध्दीक व तांत्रिक कौशल्याचे संक्रमण करतो व संस्कृतीचा दिप सदैव तेवत ठेवण्याचे कार्य करतो.''

वरील तज्ज्ञांच्या मतावरुन शिक्षकाचे कार्य सामाजिक परिवर्तनात महत्त्वाचे आहे हे लक्षात येते.

शिक्षकाची भुमिका :

१) शिक्षकाला सामाजिक परिवर्तनाच्या प्रकारांचे ज्ञान हवे. (१. समतल २. असमतल)

२) समतेचा अंगीकार

३) नविन घडामोडीनुसार सामाजिक व नैतिक मुल्य विकसन.

४) लोकशाहीयुक्त वर्गनिर्मिती

५) विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेचा विकास

६) विद्यार्थ्यांच्या शास्त्रीय दृष्टीकोनाचा विकास

७) विद्यार्थ्यांच्या आर्थिक विकासास मदत

८) विद्यार्थ्यांच्या नविन कौशल्यांचा विकास

९) सामाजिक मुल्यांवर भर

१०) वर्गात शैक्षणिक साधनांचा वापर

११) स्वत: शिस्तपालन

१२) अभ्यासपूरक व अभ्यासेत्तर कार्यक्रमांचे नियोजन

१३) विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्त्व गुणांचा विकास

वरील प्रकारचे कार्य शिक्षकात करणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे सामाजिक परिवर्तनात त्याला महत्त्वाची भुमिका बजावता येईल. या सर्वांबरोबर शिक्षणाची सामाजिक परिवर्तनांची कार्य समजावून घेणे आवश्यक आहे.

**शिक्षणाची सामाजिक परिवर्तनामधील कार्य :**

सामाजिक परिवर्तनासंबंधी शिक्षण हे विविध स्वरूपाचे कार्य करते. त्यातील काही कार्याचा तपशील येथे दिला आहे.

१) समाजामध्ये योग्य मुल्यांची स्थापना व जोपासना

२) सामाजिक परिवर्तनासाठी पोषक वातावरणाची निर्मिती

३) सामाजिक परिवर्तनाचे योग्य समिक्षण

४) नविन विचारांचा स्विकार

५) सामाजिक परिवर्तनाचे ज्ञान

६) ज्ञान विज्ञान क्षेत्रात संशोधनास उत्तेजन

७) मानवी आंतरक्रियेतील संबंधांचे दृढीकरण

८) संस्कृती संक्रमण किंवा सांस्कृतिक वारसा प्रदान करणे

९) सामाजिक परिवर्तनातील अडथळे कमी करणे

१०) सामाजिक प्रक्रियामध्ये सहजता व स्वाभाविकता आणणे

११) सर्जनशील व विधायक कार्यास प्रोत्साहन

१२) नवी मुल्ये व निष्ठा रूजविणे

१३) समाजबांधणीचे कार्य

१४) राष्ट्रीय ऐक्य जोपासणे

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न :**

**रिकाम्या जागा भरा.**

१) सामाजिक परिवर्तल हिंसक क्रांतीविना व्यापक स्वरूपात घडवायचे असेल तर ............ हेच एकमेव साधन आहे.

२) .................... या समाजशास्त्रज्ञाने सामाजिक परिवर्तनाचे भौतिक, यांत्रिक, जीवनात्मक व सांस्कृतिक हे चार प्रकार मांडले आहेत.

३) समाजाच्या परिस्थितीशी जुळवून घेणे एवढेच शिक्षणाचे मुलभूत उद्दिष्ट नसून समाजपरिवर्तन हेही शिक्षणाचे प्रमुख कार्य आहे असे ................. म्हणतो.

४) ...................... ही समाजाची छोटी प्रतिकृती मानली जाते.

५) शिक्षक एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे बौध्दिक व तांत्रिक कौशल्याचे संक्रमण करतो व संस्कृतीचा दिप सदैव तेवत ठेवतो असे .................... शिक्षणतज्ज्ञांचे मत आहे.

## (ब) शिक्षण : एक सामाजिक परिवर्तनाचे प्रतिबिंब :

## b) Education as Reflection of Social Change :

समाज व शिक्षण हे दोन्ही परस्परांवर परिणाम करणारे घटक आहेत. समाजामध्ये विविध प्रकारे परिवर्तन होत असते, त्यानुसार शिक्षणावर त्याचा प्रभाव पडत असतो. मागील घटकात आपण शिक्षणाची ध्येये, अभ्यासक्रम, अध्यापनपध्दती, शिक्षकांची भूमिका यांचा विचार केला. शिक्षण एक समाजपरिवर्तनाचे साधन म्हणून कसे उपयुक्त आहे ते पाहील, या घटकामध्ये शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे प्रतिबिंब कसे आहे ते पाहू.

सामाजिक परिवर्तनासाठी शिक्षणाचे ध्येये कोठारी आयोगाने सांगितल्याप्रमाणे पुढील आहेत.

१) उत्पादनक्षमता व स्वयंपूर्णता

२) सामाजिक व राष्ट्रीय एकात्मता

३) लोकशाही मुल्यांचा विकास

४) आधुनिकीकरण

५) नैतिक व आध्यात्मिक मुल्यांची जोपासना

वरील ध्येये साध्य करण्याकरिता शिक्षणाची पुर्नरचना व्हावी अशी शिफारस करण्यात आली. व्यवसायभिमुख शिक्षण देण्यात आले. आज एकविसाव्या शतकात भारत एक महासत्ता बनण्यासाठी तरुण उत्पादक मनुष्यबळ तयार होण्यासाठी कौशल्याधारित शिक्षणावर सरकार भर देत आहे. याचाच अर्थ सामाजिक परिवर्तनाचे प्रतिबिंब शिक्षणात दिसते. समाजाच्या परिवर्तनासाठीच्या भविष्याभिमुख गरजा ओळखून शिक्षणाचे धोरण ठरवले जाते. याबाबत २०१९ चा अहवाल ''राष्ट्रीय शिक्षण धोरण २०१९ मसुदा'' सुरुवातीलाच उल्लेख करतो.

कल्पना करते जी सर्वांना उच्च दर्जाचे शिक्षण प्रदान करुन आपल्या राष्ट्राला सातत्याने न्याय व चैतन्यमय ज्ञानी समाजामध्ये परिवर्तित करण्यात थेट योगदान देते.''

**अभ्यासक्रशम व अध्यापनशास्त्र :**

राष्ट्रीय शिक्षण धोरणाचा २०१९ चा अहवाल व्यावसायिक शिक्षणाबाबत पुढील बाबी नमुद करतो.

**व्यावसायिक शिक्षण :**

व्यावसायिक शिक्षण सर्व प्रकारच्या शिक्षणाचा अविभाज्य घटक असेल. सन २०२५ पर्यंत सर्व शिकाऊ विद्यार्थ्यांपैकी किमान ५०% विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणाचा लाभ मिळावा, हे या धोरणाचे उद्दिष्ट आहे.

याबरोबर शिक्षणामध्ये तंत्रज्ञानाचा वापर, प्रौढ शिक्षण १००%, शिक्षणासाठी वित्तपुरवठा याबरोबर सर्व स्तरावरील शिक्षणामध्ये सर्वांना वैश्विक प्रवेश व त्यांना शिक्षणप्रवाहात टिकवून ठेवणे हे उद्दिष्ट आहे.

या धोरणानुसार अभिनव अभ्यासक्रम व अध्यापनशास्त्र रचना मांडली गेली आहे. घोंकपट्टीद्वारे करण्यात येणारे अध्ययन कमी करुन त्याऐवजी सर्वांगीण विकास आणि शोधक विचारक्षमता, सर्जनशीलता, शास्त्रीय मनन, सुसंवाद, परस्परसहकार्य, बहुभाषिकता, समस्या निवारण, नितीतत्त्वे, सामाजिक बांधिलकी व अंकीय साक्षरता अशा २१व्या शतकातील अभिनव कौशल्यावर आधारीत अध्ययनाला चालना देण्यासाठी सन २०२२ पर्यंत अभ्यासक्रम व अध्यापनशास्त्र यामध्ये आमुलाग्र बदल करणे.

अभ्यासक्रम लवचिक असेल. विद्यार्थ्यांमध्ये असामान्य प्राविण्य व स्वारस्य शोधण्यात येईल व त्यांचे विकसन करण्यात येईल. याबरोबर खुले व दुरस्थ शिक्षणाच्या कक्षा रुंदावण्यात येतील. याप्रकारे सामाजिक परिवर्तनाचे प्रतिबिंब अभ्यासक्रम व अध्यापनशास्त्रात दिसते.

**शिक्षक :**

शिक्षक या घटकावर सामाजिक परिवर्तनाचे परिणाम दिसतात. पूर्वीचा शिक्षक हा ज्ञानी व विशिष्ट अध्यापन पध्दतीचा हवा तर आज तंत्रज्ञान व नव्या जगाच्या मुल्याबरोबर परिवर्तनाचा पाईक असणारा शिक्षक गरजेचा आहे. त्यानुसार शिक्षकाचे गुण प्रतिबिंबित झाले आहेत.

१) उत्साही, सहभागी होणारे सक्षम शिक्षक

२) उच्च सक्षमता, दृढ बांधिलकी असलेले शिक्षक

३) अध्यापन व संशोधनात उत्कृष्टता प्राप्त करण्यासाठी उत्साही असलेले सबल शिक्षक वर्ग.

४) शैक्षणिक नैपुण्य, अध्यापनाच्या क्षमता व सार्वजनिक क्षेत्रामध्ये समाजसेवेसाठी असलेला त्यांचा कल याच्यावर आधारीत शिक्षक

५) निरंतर व्यावसायिक विकास आराखडा असणारे शिक्षक

वरील शिक्षकाच्या अपेक्षा ह्या सद्य जीवनामधील आवश्यक असणाऱ्या सामाजिक परिवर्तनाचा घटक होणाऱ्या भविष्यातील नागरिकांकडून केल्या गेल्या आहेत. त्याचे प्रतिबिंब शिक्षणात उमटलेले दिसून येत आहे.

एकंदरीत वरील सर्व घटकांचा विचार करता शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे कारण असणारे एक महत्त्वपूर्ण अंग आहे. त्याबरोबर ते सामाजिक परिवर्तनाचे प्रतिबिंब आहे असे दिसते.

**स्वयंअध्ययन प्रश्न .२ :**

**एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) कोठारी आयोगाने शिक्षणाची सामाजिक परिवर्तनासाठी कोणती पाच ध्येये सांगितली आहेत?

२) राष्ट्रीय शिक्षण आयोगानुसार (२०१९) किमान किती टक्के विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणाचा लाभ मिळणे हे उद्दिष्ट आहे?

३) विद्यार्थ्यांचे असामान्य प्राविण्य व स्वारस्य शोधण्यासाठी अभ्यासक्रम कसा असणे आवश्यक आहे?.

४) अध्यापन व संशोधन क्षेत्रात उत्कृष्टता प्राप्त करणेसाठी शिक्षक कसा असावा?

५) शिक्षकाचा कल सार्वजनिक क्षेत्रामध्ये समाजसेवेकडे असणे का आवश्यक आहे?

## क) सामाजिक परिवर्तनाच्या संस्था : शाळा व समुह संपर्क साधने :

## C) Agencies of Social Change : School and Mass Media :

संस्था ही समुहापेक्षा अधिक विकसीत व संघटीत असते. समाजात व्यवस्था राहावी व समाजाचा विकास व्हावा, व्यक्तीला योग्य वळण लागावे व समाज आणि व्यक्तीचे कल्याण व्हावे यासाठी संस्था निर्मित होत असतात. संस्थेला विशिष्ठ उद्दिष्ट, निश्चित कार्यप्रणाली, योग्य यंत्रणा, संस्थेचे भौतिक सामुग्री, रूढी व परंपरा याबरोबरच एकात्मतेची भावना असते.

सामाजिक परिवर्तनात पुढील प्रकारच्या संस्था कार्य करतात.

**सामाजिक परिवर्तनासाठी शिक्षणसंस्था**

''राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०१९ भारताला केंद्रस्थानी मानून अशा शिक्षण प्रणालीची

- अनौपचारिक
  - कुटुंब
  - समाज
    - सामा. संस्था
      - जाती, धर्म, भाषा, अर्थव्यवस्था, राजकारण इ.
  - राज्यसंस्था
  - समुहसंपर्क साधन
    - साहित्य, वृत्तपत्रे, आकाशवाणी, चित्रवाणी, बोलपट, मोबाईल वरील व्हॉटस ॲप, फेसबुक ट्विटर इ.
- औपचारिक
  - शाळा
  - महाविद्यालय

यामधील आपणांस औपचारिक व अनौपचारिक अशा काही संस्थांचा विचार येथे केला आहे.

**औपचारिक संस्था : शाळा**

शाळा व महाविद्यालयामधील शिक्षण हे नियोजनपूर्वक, हेतूबध्द व योग्य यंत्रणेमार्फत दिले जाते. अशा ठिकाणी उद्दिष्टनुरुप व ध्येयाप्रमाणे अभ्यासक्रम, पाठ्यक्रमाची आखणी करुन शिक्षण दिले जाते. योग्य अध्यापन पध्दतीचा वापर करुन शिक्षकांकडून वर्गवातावरण निर्मिती केली जाते. या औपचारिक पध्दतीत मूल्यमापन, प्रत्याभरण याद्वारे विद्यार्थ्यांमध्ये ईष्ट मार्गाने वर्तन बदल घडवून आणले जातात. योग्य त्या अभिवृत्ती, अभिरूचीचा विकास केला जातो. विविध आंतरक्रियाद्वारे त्यांच्यामध्ये योग्य दृष्टीकोन, क्षमता विकसन, कौशल्यांचे विकसन केले जाते. राष्ट्रप्रेम, जबाबदार नागरिक भविष्यातील समाजनिर्मितीसाठी सुयोग्य व्यक्ती म्हणून त्याचा बौध्दिक, भावनिक व शारीरिक विकास करण्याचा प्रयत्न केला जातो. राष्ट्राला हवा असणारा नागरिक निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. या सर्वांमध्ये सामाजिक परिवर्तनाचा सक्षम व क्रीयाशील व्यक्ती निर्मिती करण्याचा प्रयत्न केला जातो. शिक्षणाच्या माध्यमातून नवा वारसा, नवी मुल्ये निर्माण करणे, ती रुजविणे, सर्जनशील व विधायक कार्यासाठी विचारप्रक्रिया विकसन सामाजिक व राष्ट्रीय ऐक्य जोपासणे अशी अनेक कार्य शाळेमार्फत केली जातात. त्यामुळे शाळा हे सामाजिक परिवर्तनाचे महत्त्वाची संस्था मानली आहे. अनौपचारिक संस्थामध्ये समुह संपर्क किंवा जनसंपर्क माध्यमे महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यातील महत्त्वाची माध्यमे पुढीलप्रमाणे :

**(अ) साहित्य :**

साहित्याची निर्मिती प्राचीन काळापासून होत आहे. हे मौखिक व लिखित स्वरुपात आहे. बालपणापासून वृध्दापर्यंत याचा प्रभाव दिसून येतो. याचा उपयोग पुढीलप्रमाणे :

१) मुलांच्या ज्ञानात भर पडते.

२) विचारशक्तीचा, बुध्दीचा व कल्पकतेचा विकास

३) चारित्र्यसंपन्नतेसाठी पोषक

४) राष्ट्रीय एकात्मता

५) सद्प्रवृत्तीचे विकसन

६) समस्यावर उपाय मिळणे.

समुह संपर्क माध्यमे महत्त्वाची भूमिका बजावतात. यासाठी ग्रंथालये योग्य पध्दतीची असणे गरजेच आहेत. पालक, शिक्षक, विद्यार्थी यांनी साहित्यापासून प्रेरणा घेतली पाहिजे. आजकाल साहित्य वाचन कमी होत चालले आहे. ही समाजाची खंत आहे.

**आ) वृत्तपत्रे :**

जे नियमित छापले जाते. उदा. लोकसत्ता, सकाळ, लोकमत, पुढारी इ. वृत्तपत्राची भूमिका थोडक्यात पुढीलप्रमाणे :

१) सामाजिक समस्यावर प्रकाश टाकणे.

२) जागतिक पातळीवरील घडामोडी, राष्ट्रीय व स्थानिक बातम्या पुरविणे.

३) सामाजिक अन्यायाला वाचा फोडणे

४) जनमत तयार करणे

५) मनोरंजन, करमणूक करणे.

६) समाजप्रबोधन व लोकशिक्षण करणे.

७) शैक्षणिक कार्य करणे.

८) फुरसदीच्या वेळेचा सदुपयोग करण्यास मदत

आजच्या वर्तमानपत्राच्या सामर्थ्याबरोबर त्याच्या उणिवा पुढीलप्रमाणे :

१) भडकपणा

२) पक्षपातीपणा

३) जाहिरातीचा मारा

४) जनतेला भडकावणे

५) पेड न्यूज (पैसे घेऊन बातम्या छापणे)

वरील सामर्थ्य व उणिवा आपल्याला वृत्तपत्राच्या दिसतात. परंतु वर्तमानपत्रामुळे मोठी मोठी सामाजिक परिवर्तने घडल्याचे इतिहास सांगतो. त्यामुळे लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून याचा गौरव केला आहे.

**दुरदर्शन (Television)**

दुरदर्शन हे दृकश्राव्य माध्यम आहे. याचा परिणाम फार मोठ्या प्रमाणावर सद्याच्या समाजावर झालेला दिसून येतो आहे. याचे सामर्थ्य व कार्य पुढीलप्रमाणे :

**कार्य :**

१) बातम्या देणे.

२) मनोरंजक कार्यक्रम सादरीकरण

३) माहिती पुरवणे

४) मुलाखती

५) क्रीडाविषयक कार्यक्रम

६) सामान्यज्ञान

७) संगीत कलेला उत्तेजन

८) शासकीय धोरणांचा प्रसार

९) समाजप्रबोधन व लोकशिक्षण

**उणिवा :**

१) केवळ मनोरंजनावर भर

२) अश्लिलता असणारे कार्यक्रम

३) जाहिरातीचा भडीमार

४) निष्क्रियता वाढण्यास मदत

५) विघातक कृत्याकडे कल

६) कल्पना विलास

७) मुल्यांची घसरण

दूरदर्शनाच्या वैविध्यपूर्ण कार्यामुळे दुरदर्शन हे सामाजिक परिवर्तनातील एक महत्त्वाची संस्था आहे हे लक्षात येते.

**आकाशवाणी :**

आकाशवाणीच्या माध्यमातून लोकशिक्षण, सरकारी धोरणांचा पुरस्कार, कला, संगीत, धोरणांचा प्रचार व प्रसार, सामान्यज्ञान समाजप्रबोधन होत असते. परंतु याच्याही उणिवा आजकाल दिसत आहेत. केवळ मनोरंजन, संगीताकडे कल, विचित्र कार्यक्रम शुभेच्छा, जाहिराती, विशिष्ठ पध्दतीच्या कार्यक्रमामुळे तरुणाई चंगळवादाकडे झुकण्यास मदतच होत आहे.

**मोबाईल – व्हाटसअॅप, फेसबुक, ट्विटर इ.**

मोबाईलशिवाय माणूस दिसणे आजकाल मुश्किल झाले आहे. हे २१व्या शतकातील सर्वात प्रभावी माध्यम मानले जाते. त्याचे सामर्थ्य पुढीलप्रमाणे :

१) प्रभावी संपर्क माध्यमे : जगाशी इंटरनेटच्या माध्यमातून संपर्क.

२) बातम्या, खेळ, कला, संगीत, शिल्प इ. माहिती व सहभाग शक्य.

३) शासकीय धोरणांचा संपर्क, प्रचार व प्रसार. उदा. डिजीटल लॉकर, व्होटर हेल्पलाईन इ.

४) विविध अॅपद्वारे शिक्षण, मनोरंजन, ज्ञान यात वृध्दी

५) विविध अॅपद्वारे सामाजिक संघटना शासकीय योजना, जीवनावश्यक गरजा भागवण्यासाठी उपयुक्त

६) महिलांसाठी 'प्रतिसाद' सारखे अॅप त्यामुळे सुरक्षितता.

७) बँकींग, बिले भरणे, सेवा घेणे, खरेदी, विमा हप्ते भरणे सारखे हजारो फायदे घरबसल्या मिळतात.

८) विविध योजनांची माहिती, अर्ज करणे, सहभागी होणे शक्य.

९) व्यावसायिकांना घरबसल्या विक्रीसाठी उपयुक्त.

१०) आरोग्यासाठी अनेक उपयुक्त ॲप्लीकेशन.

११) मित्र व परिवाराशी संपर्क

अशा अनेक गोष्टींसाठी रोजच्या रोज मोबाईल उपयुक्त ठरत आहे.

परंतु प्रत्येक नाण्याला दोन बाजू असतात त्याप्रमाणे मोबाईलच्या काही उणिवा आहेत.

**उणिवा :**

१) सतत मनोरंजनामुळे वेळेचा अपव्यय

२) मुलांमध्ये मोबाईलची व्यसनाधिनता

३) अश्लिलता व हिंसक दृश्ये पाहिल्यामुळे गुन्हेगारील प्रोत्साहन

४) खरेदीचा अतिरेक

५) जाहिरातीमुळे ग्राहकांची गरज नसताना खरेदी

६) शारीरिक आरोग्य धोक्यात कारण मुले निष्क्रिय बनत चालली, त्यामुळे ओबसिटी (लठ्ठता), डोळ्यावर चष्मा इ.

७) विविध मनोरुग्णतेत वाढ उदा. नैराश्य, चिडचिड इ.

८) मोबाईलमुळे वेळेचा, पैशाचा अपव्यय व नितीमुल्यांची घसरण.

अशा अनेक सामर्थ्य व उणीवांनी हे समुह संपर्क माध्यम विविध आंतरक्रियांनी परिपूर्ण आहे. त्याला शाप मानावा की वरदान यावर रोज चर्चा घडत असतात.

याबरोबर अनेक समुह संपर्क माध्यमे कार्यरत असतात, जी सामाजिक परिवर्तनात महत्त्वाची भूमिका बजावताना आढळतात. या समुह संपर्क साधनात कमतरता असल्या तरी त्या कमी करण्याचा प्रयत्न केला गेला पाहिजे व त्यांचे सामर्थ्य वाढवणेसाठी प्रयत्न गरजेचे आहे. विज्ञानामुळे संपर्क सुलभ व जलद झाला. संपर्क माध्यमे अतिशय वेगाने काम करु लागली. त्यांचेवर नियंत्रण ठेवून त्याच्या तंत्रज्ञानामध्ये आवश्यक बदल करुन आपण त्यांचा वापर सामाजिक परिवर्तनासाठी करुन घेतला पाहिजे. माध्यमांनी राष्ट्रीय हित लक्षात ठेवून त्यांच्या भूमिकेत बदल करुन सतत अधिकाधिक सकारात्मकतेने भविष्यातील उदयोन्मुख समाजनिर्मितीची भूमिका घेणे गरजेचे आहे. राष्ट्रीय एकात्मता, देशप्रेम, राष्ट्रनिष्ठा, त्याग व चारित्र्याचे आदर्श निर्माण करणे महत्त्वाचे आहे.

**स्वयंअध्ययन प्रश्न ३ :**

एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) सामाजिक परिवर्तनासाठी शिक्षणसंस्थांचे कोणते दोन प्रमुख प्रकार पडतात ?

२) स्थानिक बातम्या ते राष्ट्रीय बातम्या देणे व समस्येवर प्रकाश टाकणे हे कार्य कोणत्या समुह संपर्क माध्यमांद्वारे होते ?

३) केवळ मनोरंजनावर भर देणेही कोणत्या समूहसंपर्क माध्यमाची उणीव आहे?

४) मनोरूग्णता, नैराश्य याचे प्रमुख कारण कोणते संपर्क माध्यम आहे?

५) बिल भरणे, खरेदी विक्री, सेवा, बँकींगसाठी प्रामुख्याने कोणते माध्यम वापरले जाते?

सारांश :

सामाजिक परिवर्तन म्हणजे समाजाचे उत्थानच असते. यामुळे व्यक्तीच्या अनुभवात, अभिवृत्तीत, वैचारिक प्रारूपात, आंतरक्रियेत, संबंधात व सामाजिक संरचनेबद्दल घडत असतात. यावरुन सामाजिक परिवर्तन हे समाजाची रचना व त्यातील भिन्न आंतरक्रिया यावर आधारित असलेले आपल्याला दिसते. ही प्रक्रिया काळाशी संबंधित असते. जरी ही प्रक्रिया स्वाभाविक असली तरी अनिश्चित स्वरूपाची व भिन्न भिन्न गतीची असते. याची कारणे भौतिक, आर्थिक, पर्यावरणीय, तांत्रिक, सांस्कृतिक, लोकसंख्यात्मक, राजकीय इ. असतात. सामाजिक परिवर्तद्यनात बाधा आणणारे घटक व्यक्तीची वा समाजाची रूढीप्रियता, नवीन मुल्यांची भिती, स्वार्थीपणा इ. असतात.

शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे साधन मानलेले इतिहासात दिसते. विविध शिक्षणतज्ज्ञ, आयोग हे त्यानुसार अभ्यासक्रशम, अध्यापनपध्दती, शिक्षक यांच्या कार्यात बदल करताना आढळतात. सामाजिक परिवर्तनासाठी शिक्षण हे प्रभावी साधन आहे असे मानले जाते. शिक्षणात सामाजिक परिवर्तनाचे प्रतिबिंलब दिसत असते. जसे सामाजिक परिवर्तन घडत जाते त्याप्रमाणे शिक्षणाचा अभ्यासक्रम, ध्येये, अध्यापनपध्दती, शिक्षक यांच्या भूमिकेत बदल होताना दिसत असतो. उदा. तंत्रज्ञान हा परवलीचा शब्द बनलेल्या समाजात शिक्षणात त्यांचा वापर अध्यापनपध्दती दिसून येतो. सामाजिक परिवर्तनावर संस्था व समुह संपर्क माध्यमांचा वापर महत्त्वाचा मानला जातो. वृत्तपत्र, दुरदर्शन, मोबाईल इ. औपचारिक व अनौपचारिक माध्यमे सामाजिक परिवर्तन गतिमान करताना दिसतात. समुह संपर्क माध्यमे, शाळा महत्त्वाची भूमिका बजावत असतात.

**पारिभाषिक संज्ञा :**

**१) सामाजिक परिवर्तन :** काळाच्या ओघामध्ये समाजाची संस्कृती, आंतरक्रिया पध्दती, वर्तनप्रणाली आणि मूल्यव्यवस्था यामध्ये घडणारा बदल म्हणजे सामाजिक परिवर्तन होय.

**२) अभ्यासक्रम :** अभ्यासक्रम म्हणजे वर्गातील अध्ययन अध्यापनाशिवाय शाळेत मिळणाऱ्या इतर सर्व अपेक्षित अनुभवांचा आराखडा तयार करण्यासाठी आखलेला कृतिकार्यक्रम.

**३) मूल्यमापन :** कोणत्याही निर्णयाप्रत येण्यासाठी माहितीचे संकलन व विश्लेषण करण्यासाठी केलेली सुव्यवस्थित प्रक्रिया म्हणजे मूल्यमापन होय.

**४) अध्यापन पध्दती :** विविध विषयांचे अध्यापन करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या, विषयानुरुप विविध पध्दती होय.

५) जनसंपर्क माध्यमे : जनसमुदायाशी विशिष्ट उद्देशाने संप्रेषण साधण्यासाठी असणारी माध्यमे म्हणजे जनसंपर्क माध्यमे होय.

**स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे :**

**स्वयंअध्ययन प्रश्न १ : उत्तरे**

१) शिक्षण २) मॅक आयव्हर ३) ब्राउन ४) वर्ग ५) डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन

**स्वयंअध्ययन प्रश्न २ : उत्तरे**

१) कोठारी आयोगाने सामाजिक परिवर्तनासाठी १) उत्पादनक्षमता व स्वयंपूर्णता २) सामाजिक व राष्ट्रीय एकात्मता ३) लोकशाही मुल्यांचा विकास ४) आधुनिकीकरण ५) नैतिक व आध्यात्मिक मुल्यांची जोपासना ही ध्येये सांगितली आहेत.

२) राष्ट्रीय शिक्षण आयोग (२०१९) नुसार किमान ५०% विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षण मिळणे हे उद्दिष्ट आहे.

३) अभ्यासक्रम लवचिक असणे विद्यार्थ्यांना असामान्य प्राविण्य व स्वारस्य शोधणेसाठी आवश्यक आहे.

४) अध्यापन व संशोधन क्षेत्रात उत्कृष्टता प्राप्त करणेसाठी शिक्षक सक्षम व उत्साही असावा.

५) शिक्षकाचा कल सामाजिक परिवर्तन वेगाने घडवून आणणेसाठी सार्वजनिक क्षेत्रामध्ये समाजसेवेकडे असावा.

**स्वयंअध्ययन प्रश्न ३ : उत्तरे**

१) औपचारिक व अनौपचारिक हे दोन प्रमुख शिक्षण संस्थांचे प्रकार आहेत.

२) स्थानिक बातम्या हे राष्ट्रीय बातम्या देणे व समस्येवर प्रकाश टाकणे हे कार्य वृत्तपत्रांद्वारे होते.

३) दुरदर्शन या माध्यमाची केवळ मनोरंजनावर भर देणे ही उणीव आहे.

४) मनोरुग्णता, नैराश्य याचे प्रमुख कारण मोबाईल आहे.

५) बिल भरणे, खरेदी-विक्री सेवा, बँकींग साठी मोबाईल हे माध्यम वापरले जाते.

**सरावासाठी प्रश्न :**

१) सामाजिक परिवर्तन म्हणजे काय? सामाजिक परिवर्तन स्वरूप व कारणे व वैशिष्ट्ये नमुद करा.

२) सामाजिक परिवर्तनातील अडथळे किंवा बाधा आणणारे घटक स्पष्ट करा.

३) 'शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे साधन आहे' या विधानावर सविस्तर चर्चा करा.

४) समुह संपर्क माध्यमांचे कार्य व उणिवा स्पष्ट करा.

५) 'शाळा ही समाजपरिवर्तनात महत्त्वाची भुमिका बजावते' ह्या विधानाचे स्पष्टीकरण करा.

**टिपा लिहा :**

१) शाळा २) दुरदर्शन

३) आकाशवाणी ४) सामाजिक परिवर्तनातील शिक्षक

**संदर्भ ग्रंथ :**


* करंदीकर, सुरेश मंगरूळकर मीना (२००२) : 'उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण' कोल्हापूर, फडके प्रकाशन
* कुंडले म. बा. (१९९८) 'शैक्षणिक तत्त्वज्ञान व समाजशास्त्र' पुणे श्री विद्या प्रकाशन, पुणे.
* कोंडेकर ए. वाय. (१९९८) : 'भारतीय समाजाचा परिचय' कोल्हापूर, फडके प्रकाशन.
* साळुंखे सर्जेराव (१९९८) 'समाजशास्त्रातील मुलभूत संकल्पना', पुणे नरेंद्र प्रकाशन
* डॉ. सौ. पेंडके, प्रतिभा सुधिर (२००५) 'शिक्षणाची तात्विक व समाजशास्त्रीय भूमिका' नागपूर श्री विद्या प्रकाशन.


***

# घटक – ३
# शिक्षणाचे समाजशास्त्रीय अधिष्ठान सामाजिक समुह व संस्कृती

**अ) सामाजिक समूह अर्थ आणि वैशिष्टये**

**ब) सामाजिक समुहाचे प्राथमिक आणि दुय्यम वर्गीकरण**

**क) सामाजिक आंतरक्रिया – अर्थ, स्वरूप, महत्व, प्रकार**

**ड) शिक्षण आणि संस्कृती –अर्थ, वैशिष्टये आणि संस्कृतीसाठी शिक्षण**

**सामाजिक समूह आणि संस्कृती**

**प्रकरणाची प्रस्तावना**

समाजशास्त्रात समूह ही महत्वाची संकल्पना आहे. प्रत्येक व्यक्ती समुहात जन्म घेते. समुहात व्यक्तीच्या गरजांची पूर्तता होते. स्वत:चा विकास करण्याची संधी व्यक्तीला समुहात मिळते. व्यक्तीचा मानसिक, भावनिक, बौद्धिक, सामाजिक विकास खऱ्या अर्थाने समाजातून होत असतो. अनेक व्यक्तींचा, गटाचा, समुहाचा, व्यक्तीचा संबंध येत असल्याने त्यांच्यामध्ये वैचारिक, भावनिक देवाणघेवाण होते. यातून सामाजिक आंतरक्रिया घडून येते.

हे प्रकरण एकूण चार घटकामध्ये विभागले आहे. पहिल्या प्रकरणातून सामाजिक समुहाचा अर्थ, व्याख्या तसेच वैशिष्ट्य समजण्यास मदत होते. प्रकरणाच्या दुसऱ्या घटकात सामाजिक समुहाचे प्राथमिक समुह व दुय्यम समुह या दोन प्रकारात केलेले वर्गीकरण, त्याचे वैशिष्ट्ये व प्राथमिक व दुय्यम समुहात असलेला फरक याची माहिती मिळते. तिसऱ्या घटकातून सामाजिक आंतरक्रियेचा अर्थ, त्याचे स्वरूप, महत्व आणि प्रकार समजण्यास मदत होते. आणि चौथ्या घटकात शिक्षण व संस्कृती यांत संस्कृतीचा अर्थ वैशिष्ट्ये आणि संस्कृतीसाठी शिक्षण कसे महत्वाचे आहे हे समजते.

**घटक – १**

**सामाजिक समुह अर्थ आणि वैशिष्ट्ये**

**घटक – सरंचना**

१.१ प्रस्तावना

१.२ उद्दिष्टे

१.३ अभ्यासविषयाची मांडणी

१.३.१ सामाजिक समुहाचा अर्थ-व्याख्या

१.३.२ सामाजिक समुहाची वैशिष्ट्ये

१.४ सारांश

१.५ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

१.५.१ स्वयंअध्ययन प्रश्न उत्तरे

१.६ सरावासाठी प्रश्न

१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## १.१ प्रस्तावना :

' A Man is a Social animal '

मानव हा समाजशील प्राणी आहे असे म्हटले जाते. मानव स्वत: एकटा राहण्यापेक्षा गटागटाने किंवा समुहात इतर व्यक्ती सोबत एकत्र रहाणे अधिक पसंत करतो. समाजात व्यक्तीच्या गरजा पूर्ण होतात. तसेच त्याला स्वत:चा विकास करण्याच्या अनेक संधी प्राप्त होतात. त्यातूनच त्याचा सर्वांगाने सामाजिक, मानसिक, बौद्धिक, भावनिक विकास होत असतो.

मानवी समाजात कुटूंब, वंश, वर्ग, संघटना इ. सामाजिक समुह असू शकतात. एकापेक्षा अधिक व्यक्ती जेव्हा एकत्र येतात तेव्हा त्यांच्यात आंतरक्रिया घडतात याचा परिणाम व्यक्तीच्या वर्तनावर होतो. व्यक्तीचे विचार भावना कृती इ.चा परिणाम एकमेकांवर होतो. समुहातील सदस्यांचे उद्दिष्ट समान असते. समुहामध्ये व्यक्ती- व्यक्ती, व्यक्ती- समूह आणि समूह-समूह अशा आंतरक्रिया घडतात व यातून सामाजिक चालीरीती आदर्श व मूल्य निर्माण होतात म्हणून समाजशास्त्रात समूहाच्या अभ्यासाला अधिक महत्व आहे.

## १.२ उद्दिष्टे -

या घटकाच्या अभ्यासाअंती आपल्याला -

१) सामाजिक समुहाची व्याख्या अवगत होईल.

२) सामाजिक समुहाचा अर्थ विशद करता येईल.

३) सामाजिक समुहाची वैशिष्ट्ये सांगता येतील.

## १.३

या घटकाची विभागणी दोन विभागात केली आहे.पहिल्या विभागात आपण सामाजिक समूह म्हणजे काय याचा अर्थ समजावून घेणार आहोत. तर दुसऱ्या विभागात सामाजिक समुहाच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास करणार आहोत.

१.३.१

समाजशास्त्रात समूह ही संकल्पना अतिशय महत्त्वाची आहे. एका व्यक्तीचा एका वेळेस अनेक सामाजिक समूहांशी संबंध येत असतो. यावरून मानवी समाजाचा किंवा व्यक्तीचा परस्पर संबंधाचा अभ्यास करताना सामाजिक समूहाचा अभ्यास करणे आवश्यक आहे. दोन व्यक्ती जेव्हा एकत्र येतात तेव्हा त्यांच्या परस्परसंबंध निर्माण होतात त्यातून त्यांच्यात सामाजिक संबंध निर्माण होतात. एकमेकांमध्ये आचार- विचारांची देवाण- घेवाण होऊन त्यांच्यात आंतरक्रिया होतात म्हणजेच सामाजिक समाजशास्त्र त्यांच्या एकत्र आलेल्या व्यक्तींचा समूह होण्यासाठी त्यांच्यामध्ये आंतरक्रिया होणे महत्त्वाचे आहे.

**१) ऑगबर्न व निमकॉफ:** ''जेव्हा दोन किंवा अधिक व्यक्ती एकत्र येतात आणि एकमेकांवर प्रभाव पाडतात तेव्हा त्या व्यक्तीमधून सामाजिक समूह उदयास येतो''

whenever two or more individuals come together and influence one another they may be said to constitute a social group - burn and limkoff.

**२) किंम्बल यंग :** दोन किंवा दोनापेक्षा जास्त व्यक्तीमध्ये घडणाऱ्या आंतरक्रियेने सामाजिक समूह तयार होतात.

Two or more persons in interaction constitute the group - Kimball young

**३) हॅरी जॉन्सन :** ''सामाजिक आंतरक्रियेची व्यवस्था म्हणजे सामाजिक समुह होय.''

A social group is a system of social interaction - Harry Johnson

**४) मॅक आयव्हर व पेज :-** 'समूह म्हणजे एकमेकांशी सामाजिक संबंधात एकत्रित आणलेल्या मानवाचे एकत्रीकरण

by the group we mean any collection of human being who are brought into social relationship with one another - Maciver & Page

**५) हॉर्टन व हंट -** ''समूह म्हणजे अशा लोकांचे एकत्रीकरण किंवा वर्ग की ज्यामध्ये आपले सभासदत्व आणि आंतरक्रिया यांची जाणीव असते

Groups are aggregate or categories of people who have a consciousness of membership and of interaction - Horton & Hunt

**६) मार्शल जेम्स -** '' दोन किंवा त्यापेक्षा अधिक अशा व्यक्तींच्या मध्ये स्थापित झालेल्या आंतरक्रियेची व्यवस्था म्हणजे सामाजिक समूह होय.''

A social group is two or more persons between whom there is an established pattern of interaction - Marshall Jemes

वरील व्याख्यावरून सामाजिक समूहाचा अर्थ अधिक स्पष्ट होईल

१) सामाजिक समूह निर्माण होण्यासाठी कमीत कमी दोन व्यक्तीची आवश्यकता असते म्हणजेच एका पेक्षा जास्त व्यक्ती सामाजिक समुहात एकत्र येतात.

२) व्यक्ती व्यक्तीमध्ये परस्पर संबंध असतात त्यामुळे त्या एकमेकांकडे प्रभावित होतात.

३) समूहामध्ये परस्पर आंतरक्रिया घडून येणे आणि व्यक्तीला त्याची जाणीव असणे महत्वाचे आहे.

४) समुहाची तसेच समुहातील सदस्यांची काही उद्दिष्टे- हेतू असतात ते एकमेकांच्या सहकार्याने पार पडतात

५) समुहातील व्यक्तींना आंतरक्रियेची जाणीव असावी लागते.

६) एखाद्या विशिष्ट समुहामध्ये कितीही व्यक्ती असू शकतात.

७) समुहातील व्यक्तीचे वर्तन समुहातील असलेले पद, स्थान यांना अनुसरून होत असते.

८) समुहातील व्यक्तींची पदे परस्पर संबंधित असतात त्यामुळे समुहाची एक विशिष्ट रचना तयार होते.

## ३.२ सामाजिक समूहाची वैशिष्ट्ये : Characteristics of Social Group

**१) दोन किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीचा समावेश –** समूह अस्तित्वात येण्यासाठी एकापेक्षा अधिक व्यक्ती एकत्र येणे आवश्यक आहे त्याशिवाय सामाजिक समूह आस्तित्वात येत नाही समुहामध्ये किती सदस्य संख्या असावी याला मर्यादा नसते. समुहामध्ये सदस्यांची संख्या कितीही असू शकते

**२) आपलेपणाची भावना –** आपण एका विशिष्ट समुहाचे सदस्य आहोत ही आपलेपणाची भावना सदस्यांमध्ये असते. समुहातील सदस्य एकमेकांना सहकार्य करतात व सामुहिक हिताचे एकत्रितरित्या रक्षण करतात. यामधून समुहातील ऐक्य भावना वाढीस लागते व समुहाविषयी जिव्हाळा निर्माण होतो.

**३) व्यक्तीहितापेक्षा समुहहित श्रेष्ठ –** समुहातील व्यक्ती समुहाशी एकरूप झाल्याने समुहातील प्रत्येक घटकांना परस्पराबद्दल आपुलकी वाटते. तसेच त्यांच्यामध्ये सहकार्यची भावना निर्माण होते. व्यक्तिहितापेक्षा समुहहित श्रेष्ठ ही भावना निर्माण होते. स्वत:चा स्वार्थ बाजूला ठेवला जातो.

**४) समुहाचे नियंत्रण –** व्यक्तीपेक्षा समुहहित श्रेष्ठ आहे. या भावनेतून व्यक्ती समुहाचे नियंत्रण स्वत:हून स्विकारते. समुहाचे नियम अलिखित असतात. पण त्यांचे काटेकोर पालन केले जाते. एकंदरीत व्यक्ती स्वत:च्या हिताचा त्याग करून समुहाच्या हिताचा विचार करतात. त्यामुळे समुह नियंत्रणाचे फायदे समुहाप्रमाणे व्यक्तीलाही मिळतात.

**५) सहकार्याला अधिक महत्व –** समान उद्देशाने, हेतूने समुहातील सदस्य एकत्र येतात. त्यांच्यात आंतरक्रिया घडून येते आणि सहकार्याची भावना अधिकाधिक दृढ होते. समुहातील सदस्यामध्ये सहकार्य किंवा सहयोग असल्याशिवाय समुहाचा समान हेतू साध्य होणार नाही. समुहात सहकार्य हे असावेच लागते. सहयोग असावाच लागतो. असे हॅरी जॉन्सन म्हणतात. उदा- कुटूंब, संस्था, संघटना यातील परस्पर सहकार्य.

## १.४ सारांश :

व्यक्ती ही समाजाचा एक महत्वाचा घटक असते. व्यक्तीला आपल्या गरजांची पूर्तता करण्यासाठी

इतरांवर अवलंबून रहावे लागते. त्यातून व्यक्तीचा इतर व्यक्तीशी संबंध येतो. त्याच्यामध्ये आचार-विचारांची देवाण-घेवाण होते. म्हणजेच त्यांच्यात आंतरक्रिया घडून येत असते. यातूनच समुहाची निर्मिती होण्यास मदत होत असते.

ज्याप्रमाणे समुह व्यक्तीच्या जीवनात सामाजिक-मानसिक गरजांची पूर्तता करतो तसेच व्यक्तीच्या व्यक्तीमत्व विकासाला देखील मदत करत असतो.

या घटकामध्ये आपण सामाजिक समूह म्हणजे काय, सामाजिक समुहाच्या व्याख्या त्याचा अर्थ तसेच सामाजिक समुहाच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास केला.

**१.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :**

१) सामाजिक समूह म्हणजे काय ?

२) सामाजिक समुहाची कोणतीही दोन वैशिष्ट्ये सांगा.

३) सामाजिक समुहाचे महत्त्व सांगा.

**१.५.१ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :**

१) समूह म्हणजे अशा लोकांचे एकत्रिकरण किंवा वर्ग की ज्यामध्ये आपले सभासदत्व आणि आंतरक्रिया यांची जाणीव असते.

२) सामाजिक समुहाची दोन वैशिष्ट्ये.

i) दोन किंवा अधिक व्यक्तींचा समावेश.

ii) आपलेपणाची भावना

३) व्यक्तीच्या गरजांची पूर्तता होते. व्यक्तीमत्व विकास होण्यास मदत होते.

**१.६ सरावासाठी प्रश्न :**

१) सामाजिक समुहाची वैशिष्ट्ये थोडक्यात स्पष्ट करा.

२) सामाजिक समुहाची व्याख्या सांगून अर्थ स्पष्ट करा.

**१.७ अधिक वाचनासाठी संदर्भ :**

१) देशमुख एल. जी. २००७ : शिक्षणाचे तत्वज्ञानात्मक व समाजशास्त्रीय अधिष्ठान, फडके प्रकाशन, कोल्हापूर

२) नंदपुरे ईश्वर, वानखेडे अचल २०१० : प्रगत शैक्षणिक समाजशास्त्र, नागपूर, श्री अक्षरवेध.

३) राजपूत एन. आर. २००२ : समाजशास्त्र मुलभूत संकल्पना व सिद्धांत, नागपूर, अंशुल प्रकाशन

**घटक – २**

## सामाजिक समुहाचे प्राथमिक आणि दुय्यम वर्गीकरण

**घटक संरचना**

१.१ प्रस्तावना

१.२ उद्दिष्ट्ये

१.३ अभ्यास विषयाची मांडणी

  १.३.१ सामाजिक समुहाचे वर्गीकरण

  १.३.२ प्राथमिक-दुय्यम समूह वैशिष्ट्ये

  १.३.३ प्राथमिक-दुय्यम समूह फरक

१.४ सारांश

१.५ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न उत्तरे

१.६ सरावासाठी प्रश्न

१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

**१.१ प्रस्तावना :** यापूर्वीच्या घटकात आपण सामाजिक समुहाचा अभ्यास केला. यांत सामाजिक समुहाचा अर्थ, व्याख्या, त्याचे महत्व आणि वैशिष्ट्ये याचा आढावा घेतला. समाज हाच एक व्यक्ती जीवनात मोठा समूह असतो. यामध्ये काही लहान समूह असतात. तर काही समूह सदस्य संस्था, आकार यादृष्टीने मोठे असतात. अशा समुहाला प्राथमिक व दुय्यम गट म्हणून ओळखले जाते. या गटांचे वर्गीकरण, त्याचे वैशिष्ट्ये त्यातील फरक यांचा अभ्यास या घटकात करणार आहोत.

**१.२ उद्दिष्ट्ये :**

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला

i) सामाजिक समुहाचे वर्गीकरण अवगत होईल.

ii) प्राथमिक व दुय्यम गटातील फरक विशद करता येईल.

iii) प्राथमिक व दुय्यम गटाची वैशिष्ट्ये सांगता येतील.

**१.३ अभ्यास विषयाची मांडणी :**

या घटकाची विभागणी तीन विभागात केली आहे. पहिल्या विभागात आपण प्राथमिक व दुय्यम समुहाचा अर्थ समजून घेणार आहोत. दुसऱ्या भागात प्राथमिक व दुय्यम समुहाची वैशिष्ट्ये याचा अभ्यास करणार आहोत. तर तिसऱ्या भागात प्राथमिक व दुय्यम समुहातील फरक अभ्यासणार आहोत.

## १.३.१ सामाजिक समुहाचे वर्गीकरण : प्राथमिक व दुय्यम समुह :

**अर्थ व व्याख्या :**

सामाजिक शास्त्रात वर्गीकरणाला फार महत्त्व आहे. मानवी समाज हा विविध प्रकारच्या समूहांनी व सामाजिक संस्थांनी तयार झालेला आहे. मानवी समाजात कुटूंब, मित्र परिवार, कामगार संघटना, शेजारी असे विविध समूह दिसून येतात. समुहाचा सखोल अभ्यास करण्यासाठी त्यांचे गट पाडणे आवश्यक आहे. समाजशास्त्रज्ञांनी समुहांची वर्गवारी करताना वेगवेगळे दृष्टीकोन समोर ठेऊन वर्गवारी केल्याचे दिसते. समुहाचे वर्गीकरण करण्यात प्रामुख्याने चार्लस् कुले, गिलिन आणि गिलिन, जॉर्ज हॅसेल, जॉर्ज सिमेल यांचा समावेश होतो. वर्गीकरणासाठी त्यांनी समुहाचा आकार, कालावधी, सभासदांचे सान्नि‌ध्य, सामाजिक नियंत्रण, हितसंबंध इ. गोष्टींचा विचार केला आहे.

जॉर्ज सिमेल यांनी समुहाचा आकार विचारात घेऊन लहान आणि मोठा समूह असे वर्गीकरण केले आहे. लहान समुहात कुटूंब, मित्र, परिवार, शेजारी यांचा समावेश तर मोठ्या समुहात राष्ट्र, व्यापारी संघटना यांचा समावेश होतो.

अमेरिकन समाजशास्त्रज्ञ लेस्टर वार्ड आणि गिडींग्ज यांनी सभासदाची इच्छा विचारात घेऊन ऐच्छिक समूह आणि सक्तीचे समूह असे वर्गीकरण केले आहे. कुटूंब, वंश, धर्म या समुहात सभासदांच्या इच्छेला महत्व नसते. त्यामुळे त्या समुहांना सक्तीचे समूह म्हणतात. याउलट नाट्यमंडळ, साहित्यपरिषद, नृत्य अकादमी या ठिकाणी सभासदांच्या इच्छेला महत्व आहे म्हणून ते ऐच्छिक समूह मानले जातात.

मॅक आयव्हर आणि पेज यांनी समुहाचा कालावधी विचारात घेऊन स्थिर आणि अस्थिर समूह असे वर्गीकरण केले आहे. उदा- जमाव, गर्दी हे अस्थिर समूह तर संघटना, कुटूंब हे स्थिर समूह.

डेव्हिड ड्रेसलर यांनी सभासदांचा परस्पर संपर्क आणि जवळीक यांच्या आधारे प्राथमिक (Primary) दुय्यम (Secondary) असे समुहाचे वर्गीकरण केले आहे. ज्या समुहांमध्ये आपुलकी, जवळीकता जास्त असते त्यांना प्राथमिक समूह म्हणतात. उदा- कुटूंब, मित्र-मैत्रिणींचा समूह तर दुय्यम समुहात सभासदामध्ये प्रत्यक्ष समोरासमोर निकटचे संबंध नसतात. उदा- राजकीय पक्ष, कामगार संघटना.

### ३.२ प्राथमिक समूह : (Primary Groups)

कुले (Cooley) - ज्या समुहामध्ये घनिष्ठ असा समोरासमोरचा संपर्क व सहयोग ही वैशिष्ट्ये आहेत ते समूह प्राथमिक समूह होत.

प्राथमिक समुहाची संकल्पना स्पष्ट करताना कुले यांनी 'घनिष्ठता' निकटता आणि समोरासमोरचे संबंध यांना महत्व दिले आहे. मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून याला अधिक महत्व आहे यातून समुहात आपलेपणाची भावना विकसित होते. समुहात व्यक्ती एकरूप होते.

प्राथमिक समुह आकाराने लहान असून त्यातील सभासदाचे संबंध स्थिर, घनिष्ठ स्वरूपाचे असल्यामुळे ते संबंध सतत टिकविण्याचा प्रयत्न असतो. कुंटूब हा महत्त्वाचा प्राथमिक समूह

**प्राथमिक समुहाची वैशिष्टये**

**१) समुहाचा लहान आकार –** प्राथमिक समुहाचा आकार लहान हे एक महत्त्वाचे वैशिष्ट्ये आहे त्यामुळे त्यांच्यात जवळीकता प्रेम, सहानुभूती व सहकार्य या भावना निर्माण होतात. नातेसंबंध दृढ होतात. समूह एकजिनसी बनण्यास मदत होते त्यामुळे ऐक्य भावना वाढीस लागते.

**२) सभासदामधील भौतिक सानिध्य–** प्राथमिक समूह निर्माण होण्यासाठी सभासदांमध्ये जवळीकता, निकटता निर्माण होणे गरजेचे असते. ही जवळीक निर्माण होण्यासाठी सभासदांमध्ये शारिरिक दृष्ट्या परस्परांच्या सानिध्यात येणे गरजेचे असते यालाच भौतिक सानिध्य म्हणतात. भौतिक सान्निध्यात एकत्र जेवणे, भेटी-गाठी, एकत्र प्रवास, एकत्र खेळणे, एकत्र गप्पागोष्टी करणे या क्रियांचा समावेश होतो. भौतिक सानिध्यामुळे परस्परांचा सहवास वाढतो त्यातून सहकार्य, करुणा, प्रेम, आपुलकी, जिव्हाळा निर्माण होतो.

**३) सभासद संबंधाचे सातत्य–** सभासदांमधील समोरासमोरील संबंधात जर सातत्य असेल तरच निकटता निर्माण होते. सभासदांमधील सातत्य हे सतत होणाऱ्या भेटी, एकत्रित वास्तव्य प्रवास यातून टिकून राहतात.यामुळे संबंधातील वारंवारिता व तीव्रता वाढते कुटुंबात व्यक्ती जन्मापासून मृत्यूपर्यंत एकत्र एकमेकांच्या सानिध्यात राहत असतात. त्यामुळे त्यांच्यात सातत्याचे संबंध दिसून येतात.

**४) प्राथमिक समुहात व्यक्तीला प्राधान्य–** प्राथमिक समुहातील व्यक्तीचे विचार, भावना कल्पना, हेतू या परस्परांशी एकरुप झालेल्या असतात. या ठिकाणी एका व्यक्तीची जागा दुसरी व्यक्ती घेऊ शकत नाही. कुटुंबातील कर्त्या व्यक्तीची जागा दुसरी व्यक्ती घेऊ शकत नाही

**५) अनौपचारिक सामाजिक नियंत्रण–** प्राथमिक समुहातील सर्व सभासदांच्या हिताची काळजी घेतली जाते प्रत्येक सभासदाच्या मनात इतर सभासदाविषयी प्रेम आपुलकी, निष्ठा असते. परस्परांच्या हिताची काळजी घेतली जाते. इतराबद्दल आदर बाळगला जातो. आपल्या हातून जर गैरवर्तन झाले तर इतर सदस्यांना आवडणार नाही अशी आदरयुक्त भीती असते त्यामुळे रिती,रिवाज परंपरा मुल्य याचे पालन केले जाते यालच अनौपचारिक सामाजिक नियंत्रण म्हणातात.

**६) स्वयंस्फूर्त / उत्स्फूर्त संबंध –** प्राथमिक समुहातील सदस्या मध्ये जे संबंध निर्माण झालेले असतात ते बळजबरीने व अनैच्छिक स्वरूपाचे नसतात तर ते पूर्णपणे ऐच्छिक व स्वयंस्फूर्त असतात सभासदावर कोणतीही सक्ती केली जात नाही भाऊ-बहिण, आई -वडील मित्र -मित्र यांच्यातील संबंध आपोआप निर्माण होतात.

## दुय्यम समूह Secondary Group

किंग्जले डेव्हिस यांच्या मते प्राथमिक समुहाच्या नेमका उलटा समुह म्हणजे दुय्यम समुह होय. आधुनिक काळात दुय्यम समुहास महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. दुय्यम समूह आकाराने मोठे असतात त्यातील घटकांचे परस्पर संबंध अस्थिर अप्रत्यक्ष तात्कालिक व अनौपचारिक असतात समुहातील सदस्याचे संबंध दिर्घकाळ टिकून राहत असले तरी त्यामध्ये जवळीकता घनिष्ठता निर्माण होत नाही. या समुहातील सदस्यत्व ऐच्छिक असते. सदस्यातील संबध अल्पकाळ असतो. ज्या समुहाचा आकार मोठा असतो समुहातील घटकाचे संबंध अस्थिर अप्रत्यक्ष व औपचारिक असतात अशा समुहाला दुय्यम समुह असे म्हणतात.

**ऑगबर्न –** '' ज्या समुहामध्ये निकटतेचा अभाव असतो त्यांना दुय्यम समुह म्हणतात''

(The Group which provide experience lacking in intimacy are called secondary group - Ogburn)

**हॉर्टन आणि हंट –**'' ज्या समुहातील संबंध हे व्यक्ति निरपेक्ष आणि उपयुक्ततावादी असुन ते प्राथमिक समुहापेक्षा वेगळे असतात त्यांना दुय्यम समुह म्हणतात.''

(Secondary group is a group in which contacts are impersonel segmental and utilisation as distinct from primary group - Horton & Hunt)

**दुय्यम समुहाची वैशिष्ट्ये –**

**१) मोठा आकार –** दुय्यम समुहाचा आकार खूप मोठा असतो सदस्यांची संख्या भरपूर असते सदस्य भौतिक व मानसिक दृष्ट्या एकमेकांपासून दूर असतात. बहुतांश सदस्यांना समुहाच्या कार्यात रूची असतेच असे नाही. उदा. मोठे उद्योगधंदे, मजूर संघ, सामाजिक व राजकीय संघटना रोटरी क्लब इ.

**२) भौतिक सानिध्याचा अभाव –** दुय्यम समुहामध्ये सभासदांमध्ये भौतिक सान्निध्याचा अभाव असतो कारण समुहाचा आकार मोठा असतो. सभासद संख्या अधिक असते, एकमेकांमध्ये जवळीकता निकटता नसते. त्यामुळे त्यांना भौतिक सानिध्याची गरज वाटत नाही.

**३) ऐच्छिक सभासदत्व –** दुय्यम समुहातील सभासदत्व इच्छेनुसार म्हणजे ऐच्छिक स्वरूपाचे असते ते सक्तीचे अनिवार्य स्वरूपाचे नसते एखाद्या संस्थेचे किंवा संघटनेचे सभासदत्व स्विकारणे सभासदाच्या इच्छेवर अवलंबून असते.

**४) अप्रत्यक्ष व व्यक्तीनिरपेक्ष संबंध –** दुय्यम समुहामध्ये सभासदांमध्ये निकटचे संबंध नसतात. प्रत्यक्ष व व्यक्ती सापेक्ष संबंध नसल्यामुळे एका ऐवजी दुसरा सभासद चालू शकतो. सदस्याचा संबंध सतत व टिकावू स्वरूपाचा नसतो. काही कारणपुरताच आलेला असतो. गरज संपली की आपले सभासदत्व रद्द करू शकतात त्यामुळे त्यांचे संबंध अप्रत्यक्ष व व्यक्तीनिरक्षेप स्वरूपाचे असतात.

**५) सदस्यामधील संबंध करारात्मक स्वरूपाचे –** दुय्यम समुहात व्यक्ती एका विशिष्ट हितसंबंधाने एकत्र आलेले असतात. त्यांचे हक्क व कर्तव्य याबाबत करार केलेले असतात. समुहाचे सभासद होताना अर्ज भरून घ्यावा लागतो. त्याच्या नोंदी ठेवल्या जातात. संघटना व सभासद यांच्यातील संबंध कसे राहतील यासंबंधी करार होतो.

**६) संपर्क साधण्यासाठी साधनांचा वापर –** सभासदांशी संपर्क साधण्यासाठी दूरध्वनी वृत्तपत्र, पत्रव्यवहार, आकाशवाणी– दूरदर्शन इ. मेल या प्रसार माध्यमाद्वारे संपर्क साधला जातो.

**३.३ प्राथमिक व दुय्यम समूह यांच्यातील फरक**

**प्राथमिक समुह– Primary Group**

१) ज्या समुहातील सभासदांमध्ये प्रत्यक्ष व समोरासमोरचे, आपलेपणाचे व सहकार्याचे संबंध असतात त्या समूहाला प्राथमिक समूह म्हणतात.

२) आकाराने लहान सभासद संख्या कमी

३) भौतिक सान्निध्यामुळे जवळीकता, सहकार्य, निकटता असते.

४) समुहात सभासदत्व अनिवार्य व सक्तीचे असते.

५) समोरासमोरील संबंध असल्याने सभासदांशी संपर्क साधण्यासाठी व्यवहार साधनांचा वापर करावा लागत नाही.

६) सभासदांचे हित साधण्याचा प्रयत्न असतो त्यामुळे आपलेपणाची भावना असते.

**दुय्यम समुह – Secondary group**

१) जेव्हा सभासदामध्ये समोरासमोरचे संबंध नसतात तेव्हा त्याला दुय्यम समुह असे म्हणतात.

२) आकाराने मोठा सभासद संख्या भरपूर

३) भौतिक सानिध्याचा अभाव असल्याने जवळीकता एकोपा निकटता नसते.

४) सभासदत्व ऐच्छिक असते सक्ती नसते.

५) अप्रत्यक्ष संबंध असल्याने संपर्क साधण्यासाठी व्यवहार साधनांचा वापर करावा लागतो

उदा. पत्रव्यवहार, दूरध्वनी, वृत्तपत्र इ.

६) सभासदांचे विशिष्ट हित साधण्याचा प्रयत्न असतो. आपलेपणाच्या भावनेचा अभाव असतो. उदा. वेतन, सुट्ट्या इ.

**१.४ सारांश :**

या घटकात आपण प्राथमिक दुय्यम समुहाचा अर्थ, त्याची व्याख्या तसेच वैशिष्ट्यांचा अभ्यास केला आणि प्राथमिक व दुय्यम समुहातील फरक समजावून घेतला. सामाजिक शास्त्रात वर्गीकरणाला महत्व आहे समाजात आपल्यास विविध समुह दिसून येतात. या समुहाचा अभ्यास करण्यासाठी गट पाडले जातात. वर्गीकरणासाठी समाजशास्त्रज्ञांनी त्यांनी समुहाचा आकार, कालवधी सभासदांचे सानिध्य,सामाजिक नियंत्रण हितसंबंध इ. गोष्टींचा विचार केला आहे.

**१.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न– उत्तरे**

१) दुय्यम समुह म्हणजे काय?

२) प्राथमिक समुहाची कोणतीही दोन वैशिष्ट्ये सांगा.

३) समुहाचे प्राथमिक व दुय्यम समूह असे वर्गीकरण कोणी केले

४) मानवी समाजात कोणते विविध समुह दिसून येतात?

५) अस्थिर समुहाचे दोन उदारहणे द्या.

**१.५.१ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे**

१) ज्या समूहामध्ये निकटतेचा अभाव असतो त्यांना दुय्यम समुह असे म्हणतात - ऑगबर्न

२) प्राथमिक समूहाची वैशिष्टये -समुहाचा आकार लहान सभासदामधील भौतिक सानिध्य

३) समुहाचे प्राथमिक व दुय्यम असे वर्गीकरण डेव्हिड ड्रेसलर यांनी केले.

४) मानवी समाजात कुटुंब मित्रपरिवार कामगार संघटना शेजारी,औद्योगिक संस्था असे विविध समूह दिसून येतात.

५) जमाव, गर्दी अस्थिर समाजाची उदाहरणे

**१.६ सरावासाठी प्रश्न**

१) प्राथमिक समुह व दुय्यम समूह फरक स्पष्ट करा.

२) दुय्यम समुहाची पाच वैशिष्टये लिहा.

३) प्राथमिक समुहाची संकल्पना स्पष्ट करा.

**१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके**


१) देशमुख एल्.जी.२००७ : शिक्षणाचे तत्त्वज्ञानात्मक व समाजशास्त्रीय अधिष्ठान, कोल्हापूर, फडके प्रकाशन

२) नंदपूरे ईश्वर, वानखेडे अचल २०१० : प्रगत शैक्षणिक समाजशास्त्र श्री अक्षरवेध ,नागपूर

३) राजपूत एम्. आर. २००२ : समाजशास्त्र मूलभूत संकल्पना व सिद्धांत अंशुल प्रकाशन,नागपूर


**घटक - ३**

**सामाजिक आंतरक्रिया - अर्थ, स्वरूप, महत्त्व, प्रकार**

**घटक संरचना**


१.१ प्रस्तावना

१.२ उद्दिष्टये

१.३ अभ्यासविषयाची मांडणी

१.३.१ सामाजिक आंतरक्रिया अर्थ व स्वरूप

१.३.२ सामाजिक आंतरक्रिया महत्त्व

१.३.३ सामाजिक आंतरक्रिया प्रकार

१.४ सारांश

१.५ स्वयंअध्ययनसाठी प्रश्न

१.५.१ स्वयं अध्ययन प्रश्नाची उत्तरे

१.६ सरावासाठी प्रश्न

१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

**१.१ प्रस्तावना –** मानव हा समाजप्रिय प्राणी आहे. मानवाच्या जडणघडणीत समाजाचा फार मोठा वाटा आहे. सामाजिक परिसराशिवाय व्यक्तीच्या व्यक्तीत्वाला महत्त्व नाही. मानव समाजात रहातो, तेथे त्याचा विकास होतो. कुटुंब, मित्र, शेजार, आजूबाजूचा परिसर यांच्या सहवासात तो मोठा होतो. यातूनच त्याचा सामाजिक, मानसिक बौद्धिक, भावनिक विकास होत असतो. समाजातील विविध घटकांशी त्याचा संबंध येत असतो. त्याच्यात वैचारिक भावनिक विचारांची देवाणघेवाण होत असते म्हणजेच या ठिकाणी त्याचा समाजातील इतर घटकांशी सामाजिक आंतरक्रिया होत असते व व्यक्तीच्या विकासाला समाजाच्या अस्तित्वामुळे एक पोषक वातावरण निर्माण होते.

शाळा ही समाजाची एक छोटी प्रतिकृती आहे शाळेत वेगवेगळ्या जाती, धर्माची मुले एकत्र येत असतात समाजातील विविध स्तरामधून ही मुले एकत्र येत असतात. त्यांच्यात प्रेम, जिव्हाळा, आपुलकी, सहकार्य निर्माण होते व आंतरक्रिया घडून येण्यास मदत होते.

The school is a closed system of social interaction - Williard Waller

**१.२ उद्दिष्ट्य –** या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला

- सामाजिक आंतरक्रियेचा अर्थ अवगत होईल.
- सामाजिक आंतरक्रियेचे महत्व विशद करता येईल.
- सामाजिक आंतरक्रियेची ठळक वैशिष्टये सांगता येतील.

**१.३ अभ्यास विषयाची मांडणी –**

या घटकाची विभागणी तीन विभागात केली आहे पहिल्या विभागात सामाजिक आंतरक्रियेची व्याख्या, अर्थ व स्वरूप समजावून घेणार आहोत दुसऱ्या विभागात सामाजिक आंतरक्रियेचे महत्व तर तीसऱ्या विभागात सामाजिक आंतरक्रियेच्या वैशिष्टयांचा अभ्यास करणार आहोत.

**१.३.१ सामाजिक आंतरक्रिया अर्थ व स्वरूप –** एक व्यक्ती जेव्हा दुसऱ्या व्यक्तीच्या संपर्कात येते तेव्हा एकमेकांच्या भावना,विचार कल्पना, याचाप्रभाव त्यांच्यावर पडतो त्यांच्यावर पडतो त्याचा परिणाम त्यांच्या कृतीवर, वर्तनावर होत असतो. म्हणजेच या ठिकाणी परस्पर परिणामाची क्रिया त्यांच्यामध्ये होते आणि यातूनच आंतरक्रिया घडून येते. शाळेत अनेक प्रकारच्या आंतरक्रिया घडत असतात विद्यार्थी- विद्यार्थी,विद्यार्थी-शिक्षक, शिक्षक-पालक इ. शिक्षक विद्यार्थी यांच्यात होणाऱ्या आंतरक्रियेतून शिक्षकाच्या व्यक्तीमहत्वाचा प्रभाव विद्यार्थ्यावर पडत असतो. शिक्षक विद्यार्थ्यावर संस्कार करीत असतात शिक्षक देखील विद्यार्थ्याच्या प्रतिक्रिया किंवा प्रतिसादानुसार आपल्यामध्ये बदल करीत असतात शिक्षक विद्यार्थी आंतरक्रियेतून विद्यार्थ्यांचे समाजजीवन घडत असते

**व्याख्या – ब्राऊन (Brown)**'' सामाजिक आंतरक्रिया ही दुतर्फा प्रक्रिया आहे. प्रत्येक व्यक्ती व समुह हे एकमेकांना प्रेरणा देत असतात. त्याचप्रमाणे एकमेकांच्या वर्तनात कमी –अधिक प्रमाणात बदलही घडून आणतात.

" Social interaction is a two way process where by each individual or group stimulates the other and in varying degree modifies the behaviour of the participants.

**शेपर्ड, ओडोम आणि ब्रुटन –** जेव्हा दोन किंवा अधिक व्यक्ती परस्परांचे वर्तन प्रभावित करतात तेव्हा सामाजिक आंतरक्रिया अस्तित्वात येते.'' "social interaction exists when two or more persons mutually influence each others be haviour - Shepard, Odam & Bruton)

समाजशास्त्र कोश – व्यक्ती व समुह यांना परस्पराकडून मिळणाऱ्या प्रेरणा व त्यांना परस्पराकडून मिळणाऱ्या प्रेरणा व त्यांना परस्पराकडून दिले जाणारे प्रतिसाद ह्यातून निर्माण होणाऱ्या सामाजिक प्रक्रियांचे विशेष म्हणजे आंतरक्रिया होय ("social interaction means social processes when analysed from stand point of the interstimulation and responses of personalities and groups - Dictionary of Sociology)

**सामाजिक आंतरक्रिया स्वरूप :–** एकापेक्षा अधिक व्यक्ती जेव्हा एकत्र येतात तेव्हा त्यांच्यामध्ये आंतरक्रिया घडून येते सामाजिक आंतरक्रिया एकमार्गी नसते तर ती द्विधृत्वात्मक प्रक्रिया असते. दोन्ही घटकांचा एकमेकांवर कमी अधिक प्रमाणात प्रभाव पडत असतो शाळेत विद्यार्थी व शिक्षक एकत्र असतात त्यांच्यात आंतरक्रिया घडत असतात आणि दोन्ही घटकांचा एकमेकांवर परिणाम होत असतो. शिक्षकास विद्यार्थ्यांनुसार आपल्या अध्यापनात बदल करावा लागतो. म्हणजेच सामाजिक आंतरक्रिया घडून येण्यासाठी दोन व्यक्ती त्यांच्यामध्ये परस्पराविषयी जाणीव असणे आणि चर्चा घडून येणे महत्वाचे आहे.

सामाजिक आंतरक्रियेमुळे सामाजिक संबंध विकसित होतात. त्यामुळे व्यक्तिचे जीवन विकसित व गतीमान होते

**१.३.२ सामाजिक आंतरक्रियेचे महत्व –**

i) व्यक्तीमध्ये जेव्हा आंतरक्रिया घडून येते तेव्हा त्यांचे विचार, भावना कल्पना यांचा प्रभाव पडल्याने व्यक्तीच्या वर्तनात बदल होतो

ii) सामाजिक आंतरक्रियेतून सामाजिक संबंध विकसित होण्यास मदत होते.

iii) व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचा विकास होण्यास मदत होते

iv) व्यक्ती व समाज गतीमान होण्यास मदत होते

v) व्यक्तीच्या जीवनात स्थिरता निर्माण होण्यास मदत होते

**३.३ सामाजिक आंतरक्रिया प्रकार**

सामाजिक आंतरक्रियेचे ब्राऊन याने ५ प्रकार सांगितले आहेत

i) सहकार्य    ii) संघर्ष    iii) स्पर्धा    iv) समायोजन    v) सात्मीकरण

i) **सहकार्य – (Co-operation)** समान उद्दिष्ट – हेतू साध्य करण्याच्या दृष्टीने व्यक्ती जेव्हा एकत्र येतात तेव्हा त्यांच्यामध्ये सहकार्य एकोपा निर्माण होतो. एकमेकांच्या मदतीने कार्य करीत असतात येथे त्यांच्यामध्ये सहकार्याची वृत्ती दिसून येते. यातून समाजाची राष्ट्राची व व्यक्तीची स्वतःची प्रगती होते

**ग्रीनच्या मते** – ‘‘ सहकार्य हे दोन किंवा दोनापेक्षा अधिक व्यक्तीद्वारे कोणतेही कार्य करणे अथवा सामान्य रूपात इच्छित अशा उद्दिष्टापर्यंत पोहचविण्यासाठी केला जाणारा निरंतर आणि सामुहिक प्रयत्न होय.

ii) **संघर्ष (Conflict)** - समाजाच्या विकासासाठी सहकार्य एकोप्याची भावना आवश्यक असते. परंतू समुहातील व्यक्तीच्या मध्ये एकवाक्यता नसेल, एकमेकांना विरोध केला जात असेल तर तेथे संघर्ष निर्माण होतो. जाती–धर्मातील, पक्षातील किंवा राष्ट्रा–राष्ट्रातील विरोध ही संघर्षाची उदा. सांगता येतील.

संघर्षामुळे समाजात अस्थिरता निर्माण होते समाजातील एकता नष्ट होते व समाजात गोंधळाची परिस्थिती निर्माण होते. गिलिन आणि गिलिन– संघर्ष ही अशी सामाजिक प्रक्रिया आहे की जिच्यामागे व्यक्ती किंवा समूह आपल्या उद्देशपूर्तीसाठी विरोध करणाऱ्यांना प्रत्यक्ष हिंसेद्वारे किंवा धाक अथवा भय दाखवून विजय मिळविला जातो.

iii) **स्पर्धा (Competition)** – स्पर्धा ही संघर्षाचा एक प्रकार आहे. स्पर्धा ही गतीशील असते त्यामुळे ती वैयक्तिक सामाजिक विकासाला पोषक ठरते. एखादा गट किंवा व्यक्ती आपण इतरांपेक्षा श्रेष्ठ किंवा वरचढ ठरण्याचा प्रयत्न करतात त्यातूनच स्पर्धा निर्माण होते.

**इ. एस् बोगार्डसच्या मते,** ‘‘ सर्वाची मागणी पूर्ण होईल एवढ्या प्रमाणात उपलब्ध नसलेल्या वस्तूच्या प्राप्तीसाठी करावा लागणारा संघर्ष म्हणजे स्पर्धा होय.

iv) **समायोजन (Accommodation)** - व्यक्तीला जर संघर्षामुळे किंवा स्पर्धेमुळे अपयश आले तर ती तडजोड करण्यास तयार होते तेव्हा त्याला समायोजन म्हणतात. संघर्ष टाळण्यासाठी व शांतता निर्माण करण्यासाठी समायोजन केले जाते. व्यक्तीच्या विकासासाठी समायोजनाची आवश्यकता असते संघर्ष मिटविण्याचा व तडजोड करण्याचा समायोजन एक मार्ग आहे.

मॅकआयव्हरच्या मते समायोजन हा शब्द प्रामुख्याने अशा प्रक्रियेच्या दिशेने संकेत करतो की ज्यामध्ये व्यक्ती वातावरणाशी सामंजस्याची भावना ठेवते.

v) **सात्मीकरण** Assimilation - व्यक्ती जेव्हा इच्छा नसताना,नाईलजाने परिस्थितीशी समयोजन साधून समाज जीवनाशी हळू हळू समरस होण्याचा प्रयत्न करते या प्रक्रियेला सात्मीकरण असे म्हणतात सात्मीकरण हा समायोजनाचा एक प्रकार आहे.

**ऑगबर्न आणि निमकॉफच्या मते :–** सात्मीकरण ही एक अशी प्रक्रिया आहे की, ज्याद्वारे सुरूवातीला असमान असलेल्या व्यक्ती किंवा समूह आपले उद्देश व मनोवृतीने समान बनतात. स्वीकारलेल्या परिस्थितीशी एकरूप किंवा समरस होणे म्हणजे सात्मीकरण होय.

## १.४ सारांश –

दोन किंवा अधिक व्यक्ती जेव्हा एकत्र येतात तेव्हा त्यांच्यात आचार, विचार, भावना, कल्पना याची देवाणघेवाण होत असते. त्यांचा एकमेकांवर प्रभाव पडतो त्यातून त्यांच्या वर्तनात बदल घडून येत असतो. त्यांचा सामाजिक नैतिक,वैचारिक,भावनिक विकास होत असतो त्यामुळे व्यक्तीमध्ये होणाऱ्या आंतरक्रियेस अनन्य साधारण महत्व असलेले दिसून येते.

## १.५ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

१) सामाजिक आंतरक्रिया म्हणजे काय?

२) सामाजिक आंतरक्रियेची समाजशास्त्र कोषातील व्याख्या लिहा

३) सामाजिक आंतरक्रियेचे प्रकार कोणते?

### १.५.१ स्वयंअध्ययन प्रश्नाची उत्तरे

१) जेव्हा दोन किंवा अधिक व्यक्ती परस्परांचे वर्तन प्रभावित करतात तेव्हा सामाजिक आंतरक्रिया अस्तित्वात येते.

२) व्यक्ती व समूह यांना परस्पराकडून मिळणाऱ्या प्रेरणा, व त्यांना परस्परांकडून दिले जाणारे प्रतिसाद ह्यातून निर्माण होणाऱ्या सामाजिक प्रक्रियांचे विशेष म्हणजे आंतरक्रिया होय.

३) i) सहकार्य ii) संघर्ष iii) स्पर्धा iv) समायोजन v) सात्मीकरण

## १.६ सरावासाठी प्रश्न

१) सामाजिक आंतरक्रियेची व्याख्या सांगून अर्थ व स्वरूप स्पष्ट करा.

२) सामाजिक आंतरक्रियेचे प्रकार थोडक्यात स्पष्ट करा.

## १.७ अधिक वाचनासाठी पुस्तके.

१) आगलावे प्रदीप (१९९६) : समाजशास्त्रीय संकल्पना, नागपूर श्रीसाईनाथ प्रकाशन

२) साळुंखे सर्जेराव (१९९६) : समाजशास्त्रातील मुलभूत संकल्पना पुणे नरेंद्र प्रकाशन

३) नंदपुरे ईश्वर, वानखेडे अचल (२०१०) : प्रगत शैक्षणिक समाजशास्त्र नागपूर श्री अक्षरवेध

## घटक –४

## शिक्षण आणि संस्कृती – अर्थ,वैशिष्ट्ये आणि संस्कृतीसाठी शिक्षण

### घटक संरचना

१.१ प्रस्तावना

१.२ उद्दिष्टये

१.३ अभ्यासविषयाची मांडणी

१.३.१ संस्कृती अर्थ व्याख्या

१.३.२ संस्कृतीची वैशिष्टये

१.३.३ संस्कृती– शिक्षण संबंध

१.४ सारांश

१.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

१.५.१ स्वयं अध्ययन प्रश्नाची उत्तरे

१.६ सरावासाठी प्रश्न

१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

**शिक्षण आणि संस्कृती**

**१.१ प्रस्तावना –** संस्कृती हे मानवी समाजाचे एक महत्वाचे वैशिष्टये आहे.मानव हा समाजात राहत असतो समाजाशिवाय मानवाचे अस्तित्व शून्य. मानवाचे जीवन हे समाजाच्या संस्कृतीवर अवलंबून असते मानव व मानवेत्तर प्राणी यातील मुख्य फरक संस्कृती आहे. मानव हाच फक्त संस्कृती निर्माण करू शकतो व टिकवू शकतो. शिक्षण व संस्कृती यांत जवळचा संबंध आहे शाळेत विद्यार्थ्यांना संस्कृती सरंक्षण व संवर्धनाचे मुल्य शिक्षण दिले जाते तसेच कुटुंबातूनही विद्यार्थ्यांना संस्कृतीचे धडे मिळत असतात.

संस्कृतीमधून आपल्याला अनेक गोष्टी स्पष्ट होत असतात. आपण कसे रहावे, मोठ्या व्यक्तींशी कसे वागावे, कोणता वेश परिधान करावा, इतरांशी कसे वागावे. अशा अनेक गोष्टी संस्कृति मधून स्पष्ट होत असतात. समाजामध्ये व्यक्तीचे वर्तन, आचार हा संस्कृतीच्या प्रभावानुसार होत असतो त्यानुसार कुटुंबात रूढी,परंपरा ,चालीरिती या जोपासल्या जातात.

**१.२ उद्दिष्टये** : या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपल्यास

- संस्कृतीची व्याख्या अवगत होईल.
- संस्कृतीचा अर्थ व वैशिष्टये विशद करता येतील.
- संस्कृतीसाठी शिक्षण कसे उपयुक्त हे सांगता येईल.

**१.३ अभ्यासविषयाची मांडणी** – या घटकाची विभागणी दोन विभागात केली आहे.पहिल्या विभागात आपण संस्कृती म्हणजे काय त्याचा अर्थ व वैशिष्टये समजावून घेणार आहोत तर दुसऱ्या भागात संस्कृतीसाठी शिक्षण कसे उपयुक्त आहे याचा अभ्यास करणार आहोत.

**१.३.१ संस्कृती अर्थ, व्याख्या**

'संस्कृती हा शब्दा 'सं' सम्यक,चांगले व 'कृ' म्हणजे कार्य करणे या दोन मूळ शब्दापासून बनला आहे

संस्कृती मानव निर्मित असते तीचे हस्तांतरण होत असते संस्कृतीचा अर्थ समजावून घेण्यासाठी आपण विविध व्याख्यांचा अभ्यास करू

**टायलर इ.बी. (Tylor E.B)** ‘‘ समाजाचा एक घटक म्हणून माणसाने प्राप्त केलेले ज्ञान, विश्वास,कला, नीतीमत्ता,कायदे चालीरिती व इतर क्षमता व सवयी यांचे गुंतागुंतीचे सर्व समावेशकत्व म्हणजे संस्कृती होय.’’

" Culture is that complex whole which includes Knowledge, belief, art, morals, law custom & any other capabilities and habits acquired by man as a member of society."

सोरोकिन आणि मॅकआयव्हर (Sorckin and maclver)

‘‘ संस्कृती म्हणजे मानवाची नैतिक, आध्यात्मिक आणि बौद्धिक क्षेत्रातील संप्राप्ती होय.’’

"Culture stands for the moral Spiritual and intelectual attainments of men"

हरस्कोव्हिटस (Herskovits) संस्कृती वातावरणाचा मानव निर्मित भाग आहे.

"Culture is the man made part of the environment "

नॉर्थ सी.सी.(North C.C) ‘‘संस्कृती म्हणजे मानवनिर्मित अशी साधने की ज्यांच्यामार्फत मानवी गरजांची पूर्तता होत असते

"Culture consists in the instruments constitued by men to assist him in satisfying his wants

डॉ. इरावती कर्वे - मानवी समाजाची डोळ्यांना दिसणारी भौतिक वस्तुरूप निर्मिती व डोळ्यांना न दिसणारी पण विचारांना आकलन होणारी मनोमन सृष्टी म्हणजे संस्कृती होय.

वरील व्याख्यांचा विचार केला असता संस्कृती संकिर्ण व मानव निर्मित असल्याचे लक्षात येते. मनुष्य जन्माला आल्यापासून वेगवेगळ्या भूमिका पार पाडत असतो याला धर्माचे अधिष्ठान असते यादृष्टीने मानवी जीवन संस्कारित असते.

डॉ. आंबेडकरांच्या मते. ‘‘ संस्कृती म्हणजे व्यक्तिमत्व व सभ्यतेचा विकास होय.

संस्कृती ही समाजाची देणगी असून पर्यावरणाचा मानवनिर्मिती भाग आहे.

क्रोबर यांच्या मते संस्कृतीचे तीन स्तर आहेत

१) भौतिक (Material) - यांत व्यक्तीचा पोषाख, खाण्याच्या सवयी, वास्तू, दळणवळणाची साधने इ. चा समावेश

२) सामाजिक (Social) - यांत सामाजिक चालीरिती, परंपरा, रूढी, आचार, विचार इ. चा समावेश

३) आध्यात्मिक (Spiritual) - यांत तत्वज्ञान, धर्म, कला, नैतिक व आध्यात्मिक मूल्य इ. चा समावेश

संस्कृतीमुळे मानवाच्या गरजांची पूर्तता होण्यास मदत होते संस्कृतीचे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे

हस्तांतर होते. मानवाच्या सर्व क्रिया, वागण्याची, बोलण्याची पद्धत, त्याचे विचार, आचार यांचा समावेश संस्कृतीमध्ये होते म्हणजेच संस्कृती म्हणजे मानवाची जीवन जगण्याची पद्धत असे म्हणता येईल.

संस्कृतीमध्ये आपल्याला भिन्नता आढळून येते म्हणजे एक संस्कृती दुसऱ्या संस्कृतीसारखी नसते. उदा- भारतीय संस्कृती ही फेंच, अमेरिकन संस्कृतीपेक्षा भिन्न आहे.

संस्कृतीच्या मुळाशी काही आदर्श असतात. संस्कृती ही परिवर्तनशील तसेच सामाजिक बाब आहे. मूल्य, नीति, ज्ञान, श्रद्धा इ. अनेक घटकांमुळे संस्कृतीची निर्मिती होते.

आपल्या देशाचा विचार केला असता आपल्या देशाला फार प्राचीन अशी संस्कृती लाभली आहे.

ऑगबर्न यांनी संस्कृतीचे दोन प्रकार सांगितले आहे.

१) भौतिक संस्कृती Material Culture

२) अभौतिक संस्कृती Non-Material Culture

**१) भौतिक संस्कृती :** मानवाने आपल्या गरजांची पूर्तता करण्यासाठी ज्या गोष्टीची निर्मिती केली त्यांचा समावेश भौतिक संस्कृतीमध्ये होतो. उदा- घर, फर्निचर दळणवळणाची साधने तसेच अनेक जीवनोपयोगी वस्तुंची निर्मिती मानवाने केली. या आपण दृश्यस्वरूपात बघू शकतो. त्यांना स्पर्श करू शकतो. यासाठी मानवाने आपल्या बुद्धीचा वापर केला व गरजांची पूर्तता केली.

**२) अभौतिक संस्कृती :** अभौतिक संस्कृती मध्ये अदृश्य, अमुर्त व स्पर्श न करू शकणाऱ्या गोष्टींचा समावेश होतो. अभौतिक गोष्टी डोळ्यांना दिसत नाही. परंतू त्याचे आकलन मनाला होते असे इरावती कर्वे यांनी व्यक्त केले आहे. टायलरच्या मते अभौतिक गोष्टी मानव समाजाच्या दृष्टीने महत्वाच्या आहेत. त्याचा मानवी जीवनावर फार मोठा प्रभाव असतो. उदा. संस्कृतीमधील ज्ञान, मूल्ये, विचार, परंपरा यानुसार व्यक्ती आपले जीवन व्यक्त करीत असतो.

### १.३.२ संस्कृतीची वैशिष्ट्ये :

**१) संस्कृती ही मानवनिर्मित आहे –** आपल्या आजुबाजूला ज्या गोष्टी असतात. त्यापैकी काही निसर्गनिर्मित तर काही मानवनिर्मित असतात. संस्कृतीमध्ये मानवनिर्मित गोष्टींचा समावेश होतो. मानवाने आपल्या बुद्धीकौशल्याने निसर्गनिर्मित गोष्टीचा वापर करून त्याला आपल्या संस्कृतीचा एक भाग बनविले. उदा- मातीपासून विटा, वृक्षाच्या लाकडापासून फर्निचर, लाकडावर कोरीव काम करून निर्माण केलेले शिल्प-शिल्पकला हे संस्कृतीचे अंग.

मानवाने आपले जीवन सुसह्य व्हावे यासाठी भौतिक पर्यावरणाचा फायदा घेऊन त्यावर प्रक्रिया करून भौतिक वस्तू घडविल्या. अन्न, वस्त्र, निवारा यांचा संस्कृतीमध्ये समावेश होतो. म्हणून संस्कृती ही मानवनिर्मित आहे.

**२) संस्कृती अमुर्त असते –** संस्कृतीमध्ये आपल्या प्रथा, परंपरा, चालीरिती, मूल्य यांचा समावेश होतो. हे सर्व घटक अदृश्य, अस्पर्श आहेत. ते आपल्याला दिसत नाही किंवा दाखविता येत नाही. परंतू त्याचा बोध

आपल्याला होत असतो. हे सर्व घटक अमुर्त आहे. संस्कृतीमध्ये अमुर्त घटकांचा समावेश होत असल्यामुळे संस्कृती ही अमुर्त आहे.

टायलर, हॅरी जॉन्सन यांनी संस्कृती अमुर्त असल्याचे म्हटले आहे.

**३) संस्कृती परिवर्तनशील असते –** काळानुसार संस्कृतीमध्ये परिवर्तन होत असते. मानवाला जसजसे नवीन ज्ञान प्राप्त झाले. तसतसे नविन ज्ञानाची भर त्यात टाकून बदल केला. जुन्या पिढीकडून नविन पिढीकडे संस्कृतीचे हस्तांतरण होत असताना संस्कृतीमधील सर्व गोष्टी जशाच्या तशा स्विकारल्या जात नाही. त्यात बदल होत असतो. परंतू संस्कृतीमध्ये परिवर्तन होण्यासाठी बराच काळ जावा लागतो. परिवर्तनाची गती कमी–जास्त असू शकते. विकसित समाजात संस्कृती जलद गतीने परिवर्तीत होते. तर त्यामानाने अविकसित समाजात संस्कृती संथ गतीने परावर्तीत होते. परिवर्तन हे एक संस्कृतीचे महत्वाचे लक्षण आहे.

**४) संस्कृती प्रतिकात्मक असते –** संस्कृती ही अदृश्य स्वरूपाची आहे. ती आपल्याला दाखवता येत नाही. परंतू प्रतिकांच्या माध्यमातून संस्कृतीचा बोध होण्यास मदत होते. प्रत्येक धर्माची संस्कृती वेगळी असते. त्यांची काही प्रतिके असतात. ख्रिश्चन धर्माचे चर्च, मुस्लिम धर्माची मस्जिद तर हिंदू धर्माचे देऊळ किंवा मंदिर ही त्या–त्या धर्माची प्रतिके आहेत.

अशोक चक्र हे बौद्ध धर्माचे प्रतिक आहे. तर ॐ हे हिंदू संस्कृतीचे प्रतिक आहे. म्हणून संस्कृती ही प्रतिकात्मक आहे.

**५) संस्कृती संचयशील असते –** संस्कृतीचे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतर हात असते. त्यामुळे संस्कृती टिकून राहते. परंतू हस्तांतरण होत असताना त्यात नविन ज्ञानाची भर पडते. त्यामुळे संस्कृती विकसित होते. मानव आपल्या बुद्धीचा वापर करून जुन्या गोष्टी आत्मसात करून नविन ज्ञान मिळवत असतो. आवश्यकतेनुसार त्यात बदल केला जातो. त्यामुळे संस्कृतीत अनेक नवीन गोष्टींचा संचय केला जातो.

**६) संस्कृती हस्तांतरित होत असते –** प्रत्येक समुहात संस्कृती जुन्या पिढीकडून नव्या पिढीकडे संक्रमित केली जाते. सामाजिक आंतरक्रियेच्या माध्यमातून संस्कृती शिकली जाते. आई–वडील, शाळा, प्रसारमाध्यमे याद्वारे संस्कृती प्रवाहित होत असते. संस्कृतीचे हे हस्तांतर एका पिढीकडून दुसऱ्या पिढीला सातत्याने होत असते. त्यामुळे नव्या पिढीला जगण्याचा मार्ग सापडण्यास मदत होते. म्हणून एका पिढीकडून दुसऱ्या पिढीला संस्कृतीचे हस्तांतर होण आवश्यक आहे.

**७) संस्कृती शिक्षित व्यवहार –** मानवाला संस्कृती जन्मत: प्राप्त होत नाही तर ती शिकावी लागते. त्यामुळे संस्कृती हा एक शिक्षित व्यवहार मानला जातो. नविन जन्माला आलेल्या बालकाला समाजाबद्दल काहीच कल्पना नसते. परंतू जसजसा तो मोठा होतो. तसतश्या कळत–नकळत अनेक गोष्टी शिकल्या जातात. समाजाचा एक घटक म्हणून सांस्कृतिक व्यवहार शिकले जातात. म्हणून संस्कृती ही एक शिक्षित व्यवहार आहे.

**८) संस्कृतीमुळे गरजांची पुर्तता –** मानवाच्या अनेक गरजा आहेत. या गरजांची पुर्तता मानव स्वत: करू शकत नाही. त्याला इतर व्यक्तींच्या व समाजाच्या मदतीनेच आपल्या गरजांची पुर्तता करावी लागते. आपल्या या गरजांची पुर्तता कोणत्या माध्यमातून करावी या संदर्भात संस्कृती मार्गदर्शन करीत असते. या गरजांच्या

पूर्ततेसाठीच संस्कृतीची निर्मिती झाली आहे.

९) **संस्कृती समुहासाठी आदर्श असते –** समुहातील व्यक्तीचे वर्तन हे संस्कृतीनुसार असले पाहिजे. अशी समाजाची धारणा असते. संस्कृतीमधील मूल्य, प्रथा, चालीरिती या व्यक्तीकरीता आदर्श असतात. समुहाच्या संस्कृतीप्रमाणे व्यक्तीचे वर्तन असावे. असा समुहाचा आग्रह असतो म्हणून लहानमुलांना संस्कृतीचे धडे दिले जातात. आपली संस्कृती आदर्श आहे यावर समुहाचा विश्वास असतो. त्यामुळे प्रत्येक समुहाकरीता आपली संस्कृती आदर्श असते.

१०) **संस्कृतीचे स्वतंत्र अस्तित्व –** संस्कृती ही मानवनिर्मित असल्याने ती नष्ट होत नाही. संस्कृतीचे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरण होत असते. त्यामुळे जुनी पिढी नष्ट झाली तरी संस्कृती नष्ट होत नाही. कारण संस्कृतीला स्वतंत्र असे अस्तित्व आहे.

इरावती कर्वे यांच्या मते संस्कृतीला व्यक्तिनिरपेक्ष असे निराळेच स्वतंत्र जीवन असते.

**१.३.३ संस्कृती व शिक्षण :** प्रत्येक पिढी आपल्या नंतरच्या पिढीला संस्कृती संक्रमण करीत असते. ही संक्रमणाची क्रिया शिक्षण या नावाने ओळखली जाते. १९८६ च्या शैक्षणिक धोरणामध्ये १० गाभाभूत घटक सांगितले आहेत. त्यात संस्कृती संरक्षण व संस्कृती संवर्धन हा एक महत्वाचा घटक आहे. शिक्षण ही एक जटील व गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. भावी पिढीला आपल्या संस्कृतीचे शिक्षण देणे. तसेच आपल्या संस्कृतीचे जतन-संवर्धन कसे करायचे याचे धडे देणे हे एक उद्दिष्ट साध्य करण्याची जबाबदारी शाळा व शिक्षण यांवर येते. शिक्षणामध्ये जर सांस्कृतिक दृष्टीकोन असेल तर खऱ्या अर्थाने शिक्षण होऊ शकेल.

संस्कृती व शिक्षण एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. शिक्षण ही संस्कृतीची गतीमान बाजू आहे. सत्यम, शिवम्, सुंदरम् ही तीन शाश्वत मुल्ये संस्कृतीशी जोडली आहेत. संस्कृतीमुळे मानवाला आध्यात्मिक, नैतिक वारसा प्राप्त झाला आहे. प्रेम, सहिष्णुता, सहकार्य, मानवता या मुल्यांचा जोपासना होण्यास मदत झाली आहे.

आपल्या परंपरागत चालीरिती, आचार, मुल्ये, कौशल्य, साहित्य तत्वज्ञान, धर्म, वाङ्.मय समजण्यास संस्कृतीमुळे मदत होते. संस्कृती संक्रमणामुळे व्यक्तीवर योग्य संस्कार होतात. शिक्षणाच्या माध्यमातून हे घडू शकते.

भौतिक संस्कृती आत्मसात करण्यासाठी शिक्षणाचा मोलाचा वाटा आहे. प्रत्येक मानवी समाजाची संस्कृती वेगळी आहे. पण काही बाबतीत त्यात साम्य आढळून येते. शिक्षणाद्वारे हे साम्य जर व्यक्तीच्या लक्षात आणून दिले तर संस्कृतीबद्दल दूषित ग्रह निर्माण होणार नाही. एकमेकांच्या संस्कृतीबद्दल आदर निर्माण करणे हे शिक्षणाचे ध्येय असले पाहिजे व मुल्यशिक्षणातून हे विद्यार्थ्यांच्या मनावर रूजविले पाहिजे.

संस्कृतीच्या दृष्टीने समाजात गरीब-श्रीमंत, नागरी-ग्रामीण, शिक्षित-अशिक्षित असा भेद करणे योग्य नाही. सर्वसामान्य लोक सांस्कृतिक जीवन निष्ठापूर्वक जगत असतात. आपला जो सांस्कृतिक ठेवा आहे त्याची काळजीपूर्वक जपणूक करतात.

ज्ञानाच्या विस्फोटामुळे सामाजिक बदल घडून येत आहे. सांस्कृतिक बदलाचा शिक्षणावर प्रभाव पडत आहे. मुल्यशिक्षणातून विद्यार्थ्यांना आपल्या प्रथा, परंपरा, सांस्कृतिक ठेवा, प्रतिके याचे शिक्षण दिले जाते. यातून

आपल्या संस्कृतीचे संवर्धन होण्यास मदत होते. विद्यार्थ्यांना आपले ज्ञान व आदर्श पटवून देणे आवश्यक आहे.

आधुनिक युग हे स्पर्धेचे युग म्हणून ओळखले जाते. शिक्षणात फार मोठ्या प्रमाणात स्पर्धा दिसून येते. प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंत विद्यार्थ्यांवर प्रचंड अभ्यासाचा ताण दिसून येत आहे. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांना योग्य असे मार्गदर्शन करणे ही शिक्षणाची जबाबदारी आहे. विद्यार्थ्यांच्यामध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण करणे आवश्यक आहे.

पूर्वीची शिक्षणपद्धती शिक्षक केंद्रीत होती. परंतू सध्या शिक्षकाच्या भूमिकेत बदल झाला आहे. सध्या विद्यार्थी केंद्रीत शिक्षणपद्धती आहे. विद्यार्थ्याला केवळ मार्गदर्शन करणे, मार्गदर्शकाची भूमिका या पद्धतीत शिक्षकाला पार पाडावी लागते. त्यामुळे स्वयंअध्यापनाला जास्तीत जास्त महत्व आहे. औपचारिक शिक्षणाबरोबरच समाजात विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या संधी उपलब्ध आहेत. त्यामुळे अनौपचारिक शिक्षणाची औपचारिक शिक्षणाला जोड मिळत आहे. विद्यार्थ्यांचा केवळ बौद्धिक नव्हे तर सर्वांगिण विकास होण्यास मदत होत आहे.

तंत्रज्ञानामुळे विविध साधनांचा शिक्षणात वापर केला जातो. इंटरनेट, संगणक, दूरदर्शन, इ. तसेच कृषीकेंद्रीत अभ्यासावर,  प्रकल्प पद्धतीवर भर दिला जातो. स्वयंअध्ययन, चर्चापद्धती, इ-लर्निंग समस्या-निराकरण ही शिक्षणाची साधने निर्माण होऊ लागली. संस्कृतीचे जतन करताना व संस्कृती संक्रमित करताना शिक्षण व शाळा यांचे योगदान महत्वाचे आहे.

### १.४ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न :

१. संस्कृतीची कोणतीही एक व्याख्या लिहा.

२. क्रोबर यांच्या मते संस्कृतीचे तीन स्तर कोणते ?

३. संस्कृतीचे दोन प्रकार कोणते ?

### १.४.१ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

१. मानवी समाजाची डोळ्यांना दिसणारी भौतिक वस्तुरूप निर्मिती व डोळ्यांना न दिसणार पण विचारांना आकलन होणारी मनोमन सृष्टी म्हणजे संस्कृती होय. - डॉ. इरावती कर्वे

२. क्रोबर यांच्यामते संस्कृतीचे तीन स्तर

१) भौतिक २) सामाजिक ३) अध्यात्मिक

३. संस्कृतीचे दोन प्रकार

१) भौतिक संस्कृती २) अभौतिक संस्कृती

### १.५ सारांश :

संस्कृती हे मानवी समाजाचे एक महत्वाचे अंग आहे. आपल्या संस्कृतीमधून आपल्याला संपूर्ण समाजाचे चित्र स्पष्ट होण्यास मदत होते. या घटकात संस्कृती या संकल्पनेचा अर्थ, संस्कृतीचे स्तर, संस्कृतीचे प्रकार तसेच संस्कृतीच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास केला आहे.

संस्कृतीमुळे व्यक्तिचा सर्वांगिण विकास होण्यास मदत होते. संस्कृती टिकविण्यासाठी आपल्या संस्कृतीचे संवर्धन संरक्षण व जपणूक करण्यासाठी शिक्षणाचा उपयोग होतो. मुल्यशिक्षणातून याची कशी जोपासना करायची याचे धडे विद्यार्थ्यांना दिले जातात.

**१.६ सरावासाठी प्रश्न :**

१. संस्कृती म्हणजे काय सांगून संस्कृतीचा अर्थ स्पष्ट करा ?

२. संस्कृतीची वैशिष्ट्ये सांगा ?

३. संस्कृतीसाठी शिक्षण कसे उपयुक्त आहे थोडक्यात स्पष्ट करा.

**१.७ अधिक वाचनासाठी संदर्भ :**


१) आगलावे प्रदीप (१९९६) : समाजशास्त्रीय संकल्पना, नागपूर श्री साईनाथ प्रकाशन

२) नंदपुरे ईश्वर, वानखेडे अचला (२०१०) : प्रगत शैक्षणिक समाजशास्त्र, नागपूर श्री अक्षरवेध

३) रजपूत एन. आर. (२००२) : समाजशास्त्र मुलभूत संकल्पना व सिद्धांत, नागपूर अंशुल प्रकाशन


***

# घटक – ४

# भारतातील शिक्षणाच्या संदर्भातील सामाजिक समस्या

# Current Social Problems relating to Education in india


४.० उद्दिष्ट्ये :

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

  ४.२.१ सामाजिक समस्या : अर्थ व वैशिष्ट्ये

  ४.२.२ शैक्षणिक संधीची समानता

  ४.२.३ नागरी आणि ग्रामीण भागातील शिक्षणाच्या विशिष्ट समस्या

  ४.२.४ शिक्षण क्षेत्रातील सामाजिक समस्या सोडविण्यामध्ये समाजाची/ लोकसमुहाची भूमिका

४.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

४.४ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.५ सारांश

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


**घटक ४**

**भारतातील शिक्षणाच्या संदर्भातील सामाजिक समस्या**

**उद्दिष्टे :**

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणांस खालील बाबी स्पष्ट करता येतील.

* सामाजिक समस्येचा अर्थ व वैशिष्ट्ये स्पष्ट करता येतील.
* शैक्षणिक संधीची समानता, शैक्षणिक संधीची आवश्यकता व शैक्षणिक संधीच्या समानतेसाठी उपाययोजना करता येईल.
* नागरी आणि ग्रामीण भागातील शिक्षणाच्या विशिष्ट समस्या स्पष्ट करता येतील.
* शिक्षण क्षेत्रातील सामाजिक समस्या सोडविण्यामध्ये समाजाची / लोकसमुदायाची भूमिका स्पष्ट करता येईल.

## a) Social problems : Meanning and Characteristics

**भारतातील समस्या : अर्थ व वैशिष्ट्ये**

**प्रास्ताविक :**

जगातील प्रत्येक देशामध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या समस्या आहेत. भारत देशामध्ये आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, सामाजिक या समस्या प्रामुख्याने आहेत. प्रत्येक व्यक्तीच्या जीवनामध्ये समस्या असतात तशा समाजातसुद्धा काही समस्या असतात. समस्याविरहित समाजाचा आपण सध्या विचार सुद्धा करू शकत नाही.साधी आपली कुटुंबसंस्था विचारात घेतली तरी त्या संस्थेत आपल्याला काही समस्या असलेल्या दिसून येतात. त्यामुळे समाजासारख्या व्यापक यंत्रणेत समस्या निर्माण झाल्यास त्यात विशेष असे काही नाही. समाजामध्ये जीवन जगत असताना मानवाने सगळ्यांच्या सोयीसाठी काही नियम तयार केलेले असतात. आचारसंहिता तयार केलेली असते. ही तयार केलेली नियमावली व आचारसंहितेचे प्रत्येकाने पालन केल्यास काही समस्या निर्माण होत नाहीत. पालन केल्यास काही समस्या निर्माण होत नाहीत. याउलट या नियमांविरूद्ध आचरसंहितेविरूद्ध वर्तन केल्यास समाजामध्ये अनेक सामाजिक समस्या निर्माण होतात. परंतु या सामाजिक समस्या निर्माण होतात. परंतु या सामाजिक समस्यांचे समाजातील प्रत्येक घटकाने आकलन करून घेवून त्या आपणाला कशा सोडविता येतील याचा विचार करणे गरजेचे आहे.

सामाजिक समस्येचा अर्थ समजावून घेण्यापूर्वी समस्येविषयी थोडक्यात जाणून घेणे आवश्यक आहे.

'समस्या' ही संकल्पना अतिशय व्यापक स्वरूपाची आहे. समाज हा परिवर्तनशील असतो. काळानुसार समाजरचनेमध्ये बदल घडवून आणणे आवश्यक आहे व हा कोणताही बदल समाजात समस्या निर्माण करतोच.

समस्या या एखाद्या रोगाप्रमाणे असतात. एखाद्या व्यक्तीच्या शरीरात जर एखादा रोग झाला तर त्यावर उपचार करावे लागतात. त्याप्रमाणे समाजात समस्या निर्माण झाल्यानंतर त्यावर सामुहिक उपचार करावे लागतात. समाजस्वास्थ्यासाठी या सामाजिक समस्या सोडविणे गरजेचे असते. अन्यथा समाज विकासाची गती मंदावल्याशिवाय राहत नाही. म्हणून या सामाजिक समस्या सोडविण्यासाठी समाजाने जागरूक राहणे गरजेचे आहे.

**सामाजिक समस्या–अर्थ :**

सामजिक समस्येचे स्वरूप हे जटिल आहे. समाजातील जटिलता वाढली की समस्येचा उदय होतो. तसेच सामाजिक समस्यांमध्ये काळानुसार बदल होतात. पंचवीस वर्षापूर्वी जी गोष्ट समस्या वाटत होती ती आज कदाचित समस्या वाटणार नाही. तर ती व्यवस्था वाटेल.

सामाजिक समस्या या सगळीकडे सारख्या नसतात. उदा– भारतातील आदिवासी, ग्रामीण तसेच नागरी समाजातील समस्या विभिन्न प्रकारच्या असतात. आदिवासी समाजात पारंपारिकता, मंदगतीने होणारे परिवर्तन, नातेसंबंधव्यवस्थेतील मजबुती, व्यक्तिगत आणि प्राथमिक संबंधांचा प्रभाव या विविध कारणांमुळे सामाजिक समस्या कमी आहेत. याउलट शहरी समाजात विजातीय लोकसंख्या, दुय्यम गटांचा प्रभाव, अर्थिकतेला प्राधान्य देणारे सामाजिक संबंध या विविध कारणांमुळे सामाजिक समस्यांची संख्या वाढलेली दिसते.

**१) हर्बर्ट ब्लूमर : (Herbert Blumer)**

सामाजिक समस्या म्हणजे असा वर्तनप्रकार आहे की तो सुधारला जाऊ शकतो व तो वर्तनप्रकार हा बहुसंख्य लोकांना समाजविघातक, सामाजिक मूल्यांचे उल्लंघन केल्यासारखे मानले जाते.

**२) सी. एम. केस :**

'समाजातील बहुसंख्य जबाबदार निरीक्षकांची योग्य अशी तडजोड करण्यासाठी किंवा सामाजिक इलाज करण्यासाठी जी सामाजिक परिस्थिती लक्ष वेधून घेत असते तिला, सामाजिक समस्या असे म्हणतात.'

**३) हॉरटॉन व लेस्ली : (Horton & Leslie)**

'सामूहिक सामाजिक क्रियांद्वारे काहीतरी करून बहुसंख्य लोकांना अवांच्छनीय पद्धतीने प्रभावित करणारी परिस्थिती म्हणजे सामाजिक समस्या होय.'

**४) फुलर व मेयर्स : (Fuller and Myres)**

'सामाजिक समस्या म्हणजे अयोग्य वर्तन प्रकार किंवा स्थिती होय.'

**५) रॉबर्ट निस्बेटे :**

'समाजातील लक्षात घेण्यायोग्य व्यक्ती जेव्हा समाज स्वीकृत व्यवहारप्रणालीचा भंग करतात आणि त्यांचे गंभीर परिणाम बहुसंख्य समाजसदस्यांना भोगावे लागतात तेव्हा त्या प्रमाणबद्ध नसलेल्या वर्तनास सामाजिक समस्या म्हणतात.'

**६) हर्टन व लेस्ली :**

'जेव्हा समाजातील लक्षात घेण्यायोग्य बहुसंख्य व्यक्तींवर परिणाम करणाऱ्या व अनिच्छेने लादल्या गेलेल्या परिस्थितीच्या संदर्भात सामूहिक क्रियेद्वारे काहीतर उपाययोजना करण्याची आवश्यकता प्रत्ययास येते तेव्हा त्या परिस्थितीला सामाजिक समस्या असे म्हणतात.'

**सामाजिक समस्येचे स्वरूप :**

समाजातील सामाजिक समस्या या वेगवेगळ्या पैलूंशी संबंधित असतात. समाजामधील सर्व व्यक्तींना सामाजिक समस्यांना सामोरे जावे लागते. असा एकही समाज नाही की ज्या समाजात समस्या नाहीत. फक्त परिस्थितीप्रमाणे व काळाप्रमाणे समस्यांचे स्वरूप वेगवेगळे असते.

**१) व्यक्तिगत व सामाजिक समस्या :**

समाजातील वैयक्तिक समस्या या विशिष्ट व्यक्तीपुरत्या मर्यादित असतात. त्या व्यक्तीच्या हिताशी किंवा अहिताशी संबंधित असतात. उदा. एस. टी. ने प्रवास करीत असताना बसण्यास जागा न मिळणे. ही वैयक्तिक समस्या आहे. पण अनेक व्यक्तींना एस. टी. ने प्रवास करताना उभे राहूनच प्रवास करावा लागला तर तीच व्यक्तिगत समस्या सामाजिक समस्येचे रूप धारण करेल.

२) **सामाजिक व नैसर्गिक समस्या :**

सामाजिक समस्यांच्या मुळाशी नैसर्गिक समस्यादेखील असतात. नैसर्गिक घडामोडींचा परिणाम व्यापक अशा सामाजिक व्यवस्थेवर झाल्याशिवाय राहत नाही. नैसर्गिक समस्यांचे रूपांतर लगेचच सामाजिक समस्यांमध्ये होत असताना दिसून येते. उदा- भूकंप, महापूर या नैसर्गिक समस्या असल्या तरी त्यांचे परिणाम सामाजिक आहेत.

३) **अंतर्मुखी व बहिर्मुखी सामाजिक समस्या :**

ज्या समस्या समाजात उघडपणे दिसतात त्यांना बहिर्मुखी सामाजिक समस्या म्हणतात. उदा- हुंडाबळी, बालविवाह, आतंकवाद, दहशतवाद इ.

ज्या समस्या समाजातील लोकांच्या मनात आतल्या आत धुमसत असतात, परंतु ज्यांचा उद्रेक कधी होतो तर कधी होत नाही अशा समस्यांना अंतर्मुखी सामाजिक समस्या म्हणतात. उदा- धार्मिकवाद, जातीयवाद इ.

**सामाजिक समस्येची वैशिष्टये : (Characteristics of Social Problems)**

सामाजिक समस्येचा अर्थ व सामाजिक समस्येचे स्वरूप अभ्यासल्यानंतर सामाजिक समस्येची वैशिष्ट्ये आपणाला पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) **सार्वत्रिकता –** सामाजिक समस्या या सार्वत्रिक असतात. सर्व प्रकारच्या समाजात सामाजिक समस्या असतात. लहान-मोठ्या, प्रगत-अप्रगत, पारंपरिक-आधुनिक अशा सर्व समाजात सामाजिक समस्या असतात.

२) **सामूहिक स्वरूपाचे –** सामाजिक समस्या या व्यक्तिगत स्वरूपाच्या नसतात तर त्या सामूहिक स्वरूपाच्या असतात. एखाद्या ठिकाणी अतिरिक्त लोकसंख्या आहे किंवा दारिद्र्य आहे. बेरोजगारी आहे. पण बेरोजगारी हा घटक व्यक्तिगत असूनसुद्धा आपण 'बेरोजगारी' ही सामूहिक स्वरूपात विचारात घेतो.

३) **सापेक्षता –** सामाजिक समस्या या स्थळ, काळ किंवा व्यक्तिसापेक्ष असतात. एका स्थळी एखादी समस्या असेल तर ती दुसऱ्या ठिकाणी असेलच असे नाही. उदा- भारत व चीन या देशात 'लोकसंख्यावाढ' ही सामाजिक समस्या आहे. पण याउलट रशिया, ऑस्ट्रेलिया या देशामध्ये लोकसंख्यावाढ असणे गरजेचे आहे. म्हणजेच एका ठिकाणी असलेली समस्या दुसऱ्या ठिकाणी असेलच असे नाही.

४) **लोकमान्यता –** बहुसंख्य लोकांनी असा कोणता तरी वर्तनप्रकार समाजात केलेला असतो. त्याला लोकमान्यता मिळालेली असते. उदा- आदिम समाजामध्ये मद्यपान करणे यास लोकमान्यता असते. तर काही समाजामध्ये मद्यपान करणे हे आक्षेपार्ह वर्तन असते. पण काही समाजाने 'मद्यपान' ही समस्या आहे हे मान्य केले पाहिजे.

५) **समाजापासून उत्पत्ती –** सर्व सामाजिक समस्यांचे उगमस्थान हे समाज आहे. सामुहिक प्रयत्नांद्वारे सामाजिक समस्या सोडविणे शक्य आहे. सामाजिक समस्या या त्यांच्या परिणामाच्या आधारे स्पष्ट केल्या जातात. अस्पृश्यता, अंधश्रद्धा, जातीयवाद, निरक्षरता, हुंडाबळी या सर्व समस्यांचे उगमस्थान समाजच आहे.

६) **परस्परसंबंधित असतात –** सामाजिक समस्या या परस्परसंबंधित असतात. समाजामध्ये अनेक सामाजिक

समस्या आहेत आणि त्या एकमेकांशी परस्परसंबंधित असतात. उदा– 'लोकसंख्या वाढ' ही सामाजिक समस्या आहे. दरवर्षी पदवी प्राप्त करणारे अनेक विद्यार्थी आहेत. त्यांना नोकरी मिळतेच असे नाही. म्हणजेच बेरोजगारी वाढते. बेरोजगारी वाढली की आपोआप 'गुन्हेगारी' वाढते. यावरून आपणास असे म्हणता येईल की, लोकसंख्या वाढ, बेरोजगारी, दारिद्र्य, गुन्हेगारी या सर्व सामाजिक समस्या एकमेकांशी संबंधित आहेत.

७) **सामूहिक उपाययोजना –** समाजामधील सामाजिक समस्या सोडविणे ही वैयक्तिक जबाबदारी नसून ती एक सामुहिक जबाबदारी आहे. सर्व घटकांनी एकत्रित येऊन ती समस्या सोडविणे गरजेचे आहे. यासाठी समाजातील प्रत्येकाने प्रत्येक समस्येकडे डोळसपणे व शास्त्रीय दृष्टीकोनातून पाहणे गरजेचे आहे.

**स्वयंअध्ययन प्रश्न :**

**थोडक्यात उत्तरे लिहा**

१) सामाजिक समस्येचा अर्थ व स्वरुप स्पष्ट करा.

२) सामाजिक समस्येचा अर्थ व वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

## b) Equalization of Educational Opportunities

**शैक्षणिक संधीची समानता :**

**प्रास्ताविक :**

भारत देशाने शिक्षण, आरोग्य, कृषी, संरक्षण, अवकाश, तंत्रज्ञान, विज्ञान या सर्व क्षेत्रात प्रगती केलेली आहे. या सर्व क्षेत्रात भारताने प्रगती केलेली असली तरी आपल्या भारत देशासमोर अनेक समस्यांनी उग्र रूप धारण केलेले आहे. शिक्षण क्षेत्राचा जर आपण विचार केला तर देशातील प्रत्येक व्यक्तीला शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याचे मोठे आव्हान आपल्या देशासमोर आहे.

भारत देशामध्ये जन्मलेल्या प्रत्येक व्यक्तीला शिक्षण मिळणे हा भारतीय राज्यघटनेने दिलेला हक्क आहे. या शिक्षणाच्या हक्कानुसार प्रत्येक व्यक्तीला स्वत:च्या अंगी असलेल्या सुप्त शक्तीच्या आविष्काराला, अभिव्यक्तीला, प्रकटीकरणाला, स्वत:च्या वैशिष्ट्यपूर्ण विकासाला प्रगतीची संधी मिळाली पाहिजे. ही संधी व्यक्तीला शिक्षणाच्या माध्यमातून मिळते. सर्वप्रथम आपण 'शैक्षणिक संधीची समानता' ही संकल्पना समजावून घेऊया.

**शैक्षणिक संधीची समानता :**

**डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन :**

'सर्व विद्यार्थ्यांना त्यांचा नैसर्गिक कल, पात्रता, क्षमता, पूर्वतयारी यांचा विचार न करता एक प्रकारचे शिक्षण देणे असा नव्हे. समान संधी म्हणजे एकरूप अथवा एकाच प्रकारची सर्वांना संधी असा अर्थ नव्हे.'

'प्रत्येक मुलाला स्वत:च्या क्षमतेनुसार, अभिरूचीनुसार आणि अभिवृत्तीनुसार शिक्षण घेण्यात आर्थिक, सामाजिक किंवा राजकीय अडथळा न येता शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध करून देणे म्हणजेच शिक्षणाची समान संधी होय.'

**शैक्षणिक संधीची समानता :**

'भारतीय राज्यघटनेनुसार समाजातील सर्व तळागाळातील लोकांना शिक्षण घेण्याची समान संधी उपलब्ध करून देणे व त्यासाठी विशेष सवलती देऊन सर्वांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे. विशेषकरून ज्यांना संधी नाकारली गेली त्यांना संधी मिळण्यासाठी न्याय देणे म्हणजे शैक्षणिक संधीची समानता होय.'

**शैक्षणिक संधीच्या समानतेचे हेतू :**

१. प्रत्येकाला आपल्या सुप्त शक्तीचा अधिकाधिक विकास करून घेण्याची तरतूद करणे.

२. प्रत्येकाला विकासाची संधी मिळताना लिंग, आर्थिक परिस्थिती, सामाजिक स्थिती, वातावरण, धर्म, प्रदेश, जन्मस्थान, संप्रदाय, प्रांत, विभाग अशा कोणत्याही बाबीचा अडसर न आणणे.

३. स्वत:च्या प्रतिभेचा विकास करण्याची संधी प्राप्त करून देणे.

४. प्रत्येकाच्या प्रज्ञेला समान संधी व प्रोत्साहन देणे.

**शैक्षणिक संधीची समानता-गरज/आवश्यकता :**

भारतीय राज्यघटनेत प्रत्येक व्यक्तीला शिक्षणाचा मूलभूत हक्क दिलेला आहे. असे असताना सुद्धा आजही देशातील प्रत्येक कानाकोपऱ्यापर्यंत शिक्षण पोहोचलेले नाही. शिक्षण देशाच्या कानाकोपऱ्यापर्यंत न पोहोचण्याची अनेक कारणे आहेत. आज सुद्धा भारतीय समाजातील ६ ते १४ वयोगटातील सर्व मुला-मुलींना मोफत व सक्तीचे शिक्षण असूनसुद्धा अनेकजण शिक्षणापासून वंचित आहेत. शिक्षणाची फक्त समान संधी देऊन चालणार नाही. कारण ज्याच्याकडे पैसा आह ते लोक पुढे जातील पण जे दबलेले, पिचलेले लोक आहेत. त्यांना समान संधीबरोबर आणखी काही गोष्टी द्याव्या लागतील. त्या म्हणजे आरक्षण आणि विशेष सवलती आजही शैक्षणिक संधीची समानता अनेक गोष्टींसाठी आवश्यक आहे.

शैक्षणिक संधीची समानता गरज

लोकांच्या गरजानुरूप शिक्षण देण्यासाठी

विकासाच्या प्रक्रियेत सर्वांना सामावून घेण्यासाठी

शिक्षणाची संधी सर्वांना उपलब्ध करून देण्यासाठी

शिक्षणाचा मूलभूत हक्क उपलब्ध करून देण्यासाठी

सामाजिक अन्याय दूर करण्यासाठी

भविष्य उज्ज्वल करण्यासाठी

प्रत्येकाला आधुनिक विचारांचा स्वीकार करण्यासाठी

शारीरिक व मानसिक दुर्बल घटकांचा विकास करण्यासाठी

समाजातील विषमता कमी करण्यासाठी

मानवतेचा विकास करण्यासाठी

**१) लोकांच्या गरजानुरूप शिक्षण देण्यासाठी :–**

भारत देशामध्ये शिक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणात विषमता आहे. देशातील काही राज्ये उच्च शिक्षित आहेत तर काही राज्यात आजसुद्धा मोठ्या प्रमाणावर निरक्षरता आहे. समाजातील श्रीमंत व्यक्ती त्यांना पाहिजे ते शिक्षण घेऊ शकतात. याउलट जे पिढ्यानपिढ्या गरीब आहेत ते शिक्षणापासून वंचित राहतात. या सर्व गोष्टींचा देशाच्या विकासावर प्रतिकूल परिणाम होतो. समाजातील ही विषमता खऱ्या अर्थाने आपणास कमी करावयाची असल्यास शिक्षण हे समाजातील तळागाळातील लोकांच्यापर्यंत पोहोचले पाहिजे. तसेच ही विषमता कमी करण्यासाठी लोकांच्या गरजांनुरूप शिक्षण देणे गरजेचे आहे.

**२) विकासाच्या प्रक्रियेत सर्वांना सामावून घेण्यासाठी :–** भारतामध्ये आज ही विविध भागांमध्ये लोक राहतात. डोंगर दऱ्यांत, जंगलात, दुर्गम भागात अनेक आदिवासी जमाती राहतात. देशातील विकासापासून कोसो दूर अनेक जाती जमातीचे लोक आहेत. या लोकांना विकासाची संकल्पनाच माहीत नसते. या लोकांना विकासाची संकल्पनाच माहीत नसते. या विकासाच्या वाटचालीत सर्व घटकांना सामावून घेण्यासाठी शिक्षणाची आवश्यकता आहे.

**३) शिक्षणाची संधी सर्वांना उपलब्ध करून देण्यासाठी :–** भारत देशामध्ये अनेक जाती– धर्माचे लोक राहतात. भारतीय राज्यघटनेनुसार जन्माला येणाऱ्या प्रत्येकाला शिक्षणाची संधी मिळणे हा त्याचा मूलभूत हक्कच आहे. समाजातील प्रत्येक घटकाला त्याच्या क्षमता व गरजेनुसार शिक्षण हे मिळालेच पाहिजे. आपल्या राज्य घटनेत सार्वत्रिक व मोफत शिक्षणाचे तत्त्व आहे. परंतु हा हक्क आजही प्रत्येक व्यक्तीला पप्त झालेला नाही. त्यामुळे त्यांचा म्हणावा तसा विकास झालेला नाही.

**४) शिक्षणाचा मूलभूत हक्क प्राप्त करून देण्यासाठी :–** आपल्या देशात जो कोणी जन्माला येईल त्या प्रत्येकाला शिक्षणाची संधी मिळणे हा त्याचा मूलभूत हक्क आहे. हा मूलभूत हक्क खऱ्या अर्थाने प्राप्त करून देण्यासाठी शैक्षणिक संधीची समानता गरजेची आहे. मूलभूत हक्कांमध्ये शिक्षणाचा समावेश केल्यामुळे शासनाने देशातील प्रत्येक व्यक्तीला शिक्षण देणे बंधकारक आहे. परंतु आजही हा हक्क देणे बंधनकारक आहे. परंतु आजही हा हक्क अनेकांना प्राप्त झालेला नाही.

**५) सामाजिक अन्याय दूर करण्यासाठी :–** आजही भारतीय सामाजाच्या पुढे गरीबी, दारिद्र्य या समस्या उभ्या आहेत. समाजाच्या विविध स्तरांमध्ये अनेक बुद्धिवंत मुले विखुरलेली आहेत. या बुद्धिवंत विद्यार्थांना स्वतःचे कर्तृत्व दाखवण्याची संधी दिली जात नाही. त्यांना कधीच पुढे येऊ दिले जात नाही.त्यांना कधीच पुढे येऊ दिले जात नाही.परंतु हा त्याच्यावरती केलेला समाजाने अन्यायच असतो. हा सामाजिक अन्याय दूर करण्यासाठी शैक्षणिक संधीची समानता आवश्यक आहे.

**६) भविष्य उज्ज्वल करण्यासाठी :–** प्रत्येक व्यक्तीला स्वतःचे भविष्य उज्ज्वल करण्यासाठी त्याच्या ठिकाणी असणारे अंगभूत, गुण कलाकौशल्यास योग्य चालना संधी दिली पाहिजे. अशी संधी दिल्यास त्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होतो. त्याचा व्यक्तिगत विकास चांगला झाल्यास आपोआप सामाजिक विकासाला चालना मिळते. सामाजिक विकास चांगला झाल्यास आपोआप देशाचा विकास चांगला

होतो. म्हणून देशातील प्रत्येक व्यक्तीला शिक्षणाची समान संधी देणे गरजेचेच आहे.

**७) प्रत्येकाला आधुनिक विचारांचा स्वीकार करण्यासाठीः-** सध्याचे युग हे जागतिकीकरण खाजगीकरण, उदारीकरण व आधुनिकीकरणाचे आहे. या युगामध्ये आपले स्वतःचे वेगळे अस्तित्व टिकवून ठेवायचे असेल तर आपण सुद्धा कालानुरूप बदल स्वतःमध्ये करून घेतले पाहिजेत. जागतिक स्पर्धेमध्ये टिकण्यासाठी आधुनिकीरणाचा स्वीकार आपण केला पाहिजे. शिक्षणाच्या माध्यमातून आधुनिकीकरण करणे सहज शक्य आहे.म्हणून प्रत्येक व्यक्तीला शिक्षणाची समान संधी उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

**८) शारीरिक व मानसिक दुर्बल घटकांचा विकास करण्यासाठी :-**

**९) समाजातील विषमता कमी करण्यासाठी :-**

आपल्या भारत देशात आजही गरीब आणि श्रीमंत, स्त्री आणि पुरूष, उच्चवर्णीय आणि कनिष्ठवर्णीय, मालक आणि कामगार तसेच जातीय भेद मोठ्या प्रमाणावर केला जातो. आजही समाजामध्ये कित्येक घटक शिक्षणापासून वंचित आहेत. या सर्व घटकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी शैक्षणिक संधीची समानता देणे गरजेचे आहे. दिवसेंनदिवस सामाजिक विषमता वाढत जात आहे. ही सामाजिक विषमता खऱ्या अर्थाने कमी करावयाची असेल तर समानतेवर आधारित समाजरचना विकसित करून सर्वांना शिक्षणाची समान संधी उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

**१०) मानवतेचा विकास करण्यासाठी :-**

मानवतेचा खऱ्या अर्थाने विकास करण्यासाठी शिक्षणाची समान संधी देणे गरजेचे आहे. जसा एखादा मूर्तीकार नको असलेला भाग काढून टाकतो त्याचप्रमाणे शिक्षण एखाद्या व्यक्तीमध्ये असलेले दोषांचे निराकरण करते. व्यक्तीला मानवतावादी मूल्यांची शिकवण शिक्षणाच्या माध्यमातून देता येते. मानवातील हिंसाचार शिक्षणाच्या माध्यमातून कमी करता येतो. विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी शासन विविध शिष्यवृत्या देत असते. पैशा अभावी कोणत्याही घटकांचे शिक्षण थांबू नये हा हेतू त्याच्यापाठीमागे असतो. हे सर्व जरी असले तरी समाजातील प्रत्येक घटकांपर्यंत शासनास पोहोचता आलेले नाही. म्हणून शासनाने शिष्यवृत्ती योजनांमध्ये भरीव वाढ करून शिक्षणाची समान संधी देता येईल.

**शैक्षणिक संधीच्या समानतेसाठी उपाययोजना :-** भारत देशातील जे विविध घटक शिक्षणापासून वंचित आहेत त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी पुढील उपाययोजना करता येतील.

- शैक्षणिक संधीच्या समानतेसाठी उपाययोजना
- शिक्षण प्रक्रियेत सामील करून घेणे
- शिष्यवृत्ती योजनांमध्ये वाढ करणे
- व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या संस्थांमध्ये वाढ करणे
- शाळा व महाविद्यालयांची संख्या वाढविणे

* विद्यार्थी कल्याण योजनांमध्ये वाढ करणे
* मोफत शिक्षणाची व्यवस्था करणे
* वंचित घटकांपर्यंत शिक्षण पोहोचविणे
* वसतिगृहांची संख्या वाढविणे
* समाज प्रबोधन करणे
* शिक्षण योजनांचा प्रचार आणि प्रसार करणे
* आवश्यक शैक्षणिक साहित्य पुरविणे

**१) शिक्षण प्रक्रियेत सामील करून घेणे :-**

भारतामध्ये अनेक जाती- जमातीचे धर्माचे लोक राहतात. यामध्ये भटक्या जाती व जमाती, अनुसूचित जाती व जमातीचे लोक (SC,ST, NT,SBC,OBC) हे मागास मानले जातात. बऱ्याच जमातीचे लोक डोंगराळ व दुर्गम भागात राहतात. ते शिक्षणापासून वंचित आहेत. तेथील लोकांसाठी शिक्षणाची व्यवस्था करणे, शिक्षण मोफत देणाऱ्या शाळा सुरू करणे, मोफत शैक्षणिक साहित्य पुरविणे, जेवणाची मोफत व्यवस्था करणे.यामुळे या सर्व घटकांना शिक्षणाच्या प्रक्रियेत सामील करून घेता येईल.

**२) शिष्यवृत्ती योजनांमध्ये वाढ करणे** : शिक्षणापासून वंचित असणाऱ्या भारत देशाचा विचार केला तर आपल्या देशात शारीरिकदृष्ट्या अपंग व मानसिकदृष्ट्या दुर्बल तसेच मतिमंद, अध्ययन अकार्यक्षम, गतिमंद, विकलांग, अंध, कर्णबधीर इ. व्यक्तींची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. या शारिरिक दुर्बलतेमुळे ते शिक्षण प्रक्रियेत मागे पडतात. म्हणून शारीरिकदृष्ट्या व मानसिकदृष्ट्या दुर्बल घटकांना शिक्षणाची योग्य संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. ही शिक्षणाची संधी त्यांना प्राप्त करून दिल्याशिवाय या घटकांचा विकास चांगल्या पद्धतीने होत नाही.

**३) व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या संस्थांमध्ये वाढ करणे :-** आपण व्यावसायिक शिक्षणाचा स्वीकार केलेला असला तरी सुद्धा शिक्षणाचे व्यावसायीकीकरण १००% झालेले नाही. शिक्षणाच्या सैद्धांतिक भागावरच जास्त भर दिला जातो. प्रशिक्षण संस्थांची संख्या विद्यार्थ्यांच्या तुलनेत कमी असल्यामुळे हुशार व गुणवंत विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षण घेता येत नाही. म्हणून व्यवसाय शिक्षण देणाऱ्या संस्थांची संख्या वाढवली पाहिजे. तरच सर्व घटकांना शिक्षणाची समान संधी उपलब्ध होईल.

**४) शाळा व महाविद्यालयांची संख्या वाढविणे :-** भारत देशामध्ये लोकसंख्या प्रचंड प्रमाणात वाढलेली आहे.तसेच शिक्षण घेणाऱ्यांच्या संख्येत पण वाढ झालेली आहे, परंतु तेवढ्या प्रमाणात शाळा, महाविद्यालयांची संख्या वाढलेली नाही. परिणामी अनेक घटक शिक्षणाच्या प्रवाहापासून दूर राहतात. म्हणून शाळा व महाविद्यालयांची संख्या वाढवली पाहिजे.

**५) विद्यार्थी कल्याण योजनांमध्ये वाढ करणे :-**विद्यार्थ्यांच्या विकासासाठी शासन विविध योजना

राबवित असते. विद्यार्थ्यांना विविध शिष्यवृत्ती, शैक्षणिक कर्ज,प्रवासासाठी सवलत, विद्यार्थी कल्याण निधी संशोधन शिष्यवृत्ती इ. विविध योजना शासनामार्फत पुरविल्या जातात. विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात कार्य करण्यासाठी प्रेरणा मिळते व ते गुणवत्तापूर्ण शिक्षण घेऊ शकतात.

६) **मोफत शिक्षणाची व्यवस्था करणे :–** भारतीय समाजात ज्या अनेक सामाजिक समस्या आहेत त्यामध्ये दारिद्र्य ही एक समस्या आहे. भारतातील अनेक मुलांना दारिद्र्यामुळे, गरीबीमुळे शिक्षण घेता येत नाही. आपल्या मुलाला प्राथमिक सोयी-सुविधा काही पालक पुरवू शकत नाहीत. म्हणून भारतात सर्वत्र मोफत शिक्षणाची सुविधा देणे गरजेचे आहे. शिक्षण फी, शैक्षणिक साहित्य व शिक्षणासाठी लागणारा संपूर्ण खर्च शासनाने केल्यास सर्व घटक शिक्षण घेतील.

७) **वंचित घटकांपर्यंत शिक्षण पोहोचविणे :–** शासनाकडून ज्या शिक्षणविषयक योजना आहेत त्या मागास घटकांपर्यंत पोहोचविल्या पाहिजेत. उदा. साखर शाळा, वस्तीशाळा ,मोबाईल शाळा, पाड्यांवरील शाळेच्या माध्यमातून विविध घटकांपर्यंत शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली जात आहे.अशा विविध शिक्षण योजना देशाच्या शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचल्या तर निश्चितच देशात सर्वत्र शिक्षणाची समान संधी उपलब्ध होईल.

८) **आवश्यक शैक्षणिक साहित्य पुरविणे :–** समाजातील बरेच पालक पैशा अभावी मुलांना शाळेत पाठवित नाहीत. दोन वेळची पोट भरण्याची भ्रांत पालकांना असते. ते मुलांना आपल्याबरोबर कामाला घेऊन जातात. तेवढीच आपल्याला आर्थिक मदत होईल असे पालकांना वाटते. मुलांना वर्षभर शाळेमध्ये लागणारे वह्या, पुस्तके, गणवेश,पेन, कंपास बॉक्स, बॅग इ. साहित्य शासनाने विद्यार्थ्यांना पुरविणे गरजेचे आहे. त्यामुळे पैशाअभावी शैक्षणिक साहित्य खरेदी न करून शकणारे पालक आपल्या मुलाला नियमित शाळेत पाठवतील. या योजनेच्या माध्यमातून शिक्षणाची संधी सर्वांना उपलब्ध करून देता येईल. शासनाने शिक्षणासाठी ज्या योजना सुरू केलेल्या आहेत त्या खूप चांगल्या आहेत. खरी गरज आहे ती या योजना गरजू लोकांच्यापर्यंत पोहोचवण्याची. परंतु दुदैवाने या योजनांमध्ये एकवाक्यता दिसून येत नाही. या योजनांमध्ये भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात केला जातो. भारतामध्ये शिक्षणाची समान संधी सर्वत्र उपलब्ध करून दिल्यामुळे त्याचे अनेक फायदे दिसून आलेले आहेत.शैक्षणिक संधीची समानता या संधीमुळे आपोआप व्यक्तिगत विकास चांगला होतो. व्यक्तिगत विकास चांगला झाला की सामाजिक विकास चांगला होतो. सामाजिक विकास चांगला झाला की आपोआपच राष्ट्र-विकासास हातभार लागतो.

**स्वयंअध्ययन प्रश्न २ :**

**थोडक्यात उत्तरे लिहा**

१) शैक्षणिक संधीची समानता ही संकल्पना स्पष्ट करा.

२) शैक्षणिक संधीच्या समानतेचे हेतू व गरज स्पष्ट करा.

## C) Specific Problems of Eduction in Urban and Rural

**प्रास्ताविक :-**

शिक्षण क्षेत्राचा विचार केल्यास मागच्या ७० - ७१ वर्षांत आपण खूप प्रगती केली आहे. प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व उच्च शिक्षण घेणाऱ्यांची संख्या वाढली आहे. शिक्षणाची संख्यात्मक वाढ व गुणात्मक विकास खूप मोठ्या प्रमाणावर झालेला आहे. परंतु याचबरोबर आपणाला अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. यामध्ये आपण प्रामुख्याने नागरी आणि ग्रामीण भागातील शिक्षणाच्या विशिष्ट समस्या कोणकोणत्या आहेत याचा अभ्यास करणार आहोत.

अ) शहरी भागातील शिक्षणाच्या विशिष्ट समस्या

ब) ग्रामीण भागातील शिक्षणाच्या विशिष्ट समस्या

**अ) शहरी भागातील शिक्षणाच्या विशिष्ट समस्या :-** आज खेड्यांमधून अनेक लोक आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी शहरात येऊन राहतात. शहरामध्ये शिक्षणाच्या सोयी-सुविधा चांगल्या असतात. हे जरी खरे असले तरी सुद्धा शहरी भागातील शिक्षणाच्या काही विशिष्ट समस्या आहेत त्या पुढीलप्रमाणे.

**१) इंग्रजी माध्यमांच्या शाळांकडे मुलांचा व पालकांचा ओढा :-** इंग्रजी माध्यमाचा ओढा आणि प्रभाव यामुळे मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये विद्यार्थी संख्येचा प्रश्न 'आ' वासून उभा आहे. मराठी शाळांमध्ये काम करणाऱ्या शहरी व ग्रामीण भागातील सर्वच शिक्षकांना ही समस्या प्रामुख्याने भेडसावते आहे. अशा वेळी खरे तर शासनाने मराठी माध्यमाच्या शाळांबद्दल अतिशय उदार, सजग दृष्टिकोन ठेवायला हवा. परंतु शासनाने मराठी माध्यमाच्या नव्या शाळांना मान्यता देण्याचे नाकारून इंग्रजी माध्यमाच्या शाळांना त्वरित मान्यता देण्याचे धोरण अनुसरले आहे. महाराष्ट्रात मराठी माध्यमातील शिक्षणाबद्दलची ही अनास्था केवळ शिक्षकांनाच नव्हे तर शिक्षणक्षेत्रातील सर्व घटकांना बेचैन करणारी आहे.

**२) गर्दीचे वर्ग :-** शहरी भागातील ज्या नावाजलेल्या शाळा आहेत त्या शाळांमधील प्रत्येक वर्गात विद्यार्थी संख्या मर्यादेपेक्षा कितीतरी जास्त असते. प्रत्येक पालकांना वाटते की आपल्या मुलाला याच शाळेत प्रवेश मिळावा. त्यामुळे विद्यार्थी संख्या वाढते. विद्यार्थी संख्या जास्त झाल्यामुळे शिक्षकांना वर्ग नियंत्रणामध्ये अडचणी येतात. तसेच गर्दीच्या वर्गांना एखादी कृती द्यायची झाल्यास अडचणी येतात.

**३) राजकीय पुढाऱ्यांचा हस्तक्षेप :-** शहरामधील शाळा, महाविद्यालयांमध्ये विविध विद्यार्थी संघटनेचे विद्यार्थी असतात. या सर्व विद्यार्थी संघटना विविध राजकीय पक्ष पुरस्कृत असतात. राजकीय लोक आपला राजकीय स्वार्थ साधण्यासाठी या विद्यार्थी संघटनांचा वापर करून घेतात. ही एक शहरातील शिक्षणाची समस्या आहे.

**४) खाजगी शिकवणीचे फॅड :-** सध्या शहरांमध्ये अनेक खाजगी शिकवणीचे क्लासेस सुरू आहेत. प्रत्येक पालक आपल्या मुलाला खाजगी शिकवणीला पाठवितात. ते एक समाजात फॅड झालेले आहे. आपल्या मुलाला जर आपण खाजगी क्लास लावला नाही तर लोक आपल्याला नावं ठेवतील या भीतीपोटी प्रत्येक मुलाला क्लासला पाठवले जाते. या खाजगी क्लासच्या माध्यमातून पालकांची आर्थिक पिळवणूक केली जाते. दिवसेंदिवस ही समस्या अधिक गंभीर बनत चालली आहे.

५) **व्यसनाधीन पालक** :- ग्रामीण भागातून शहराकडे अनेक कुटुंबे मुलांच्या शिक्षणासाठी स्थलांतरीत झालेली आहेत. त्याचबरोबर नोकरी, व्यवसाय करणारे पण पालक आहेत. कुटुंबामध्ये फक्त आई- वडील आणि मुले एवढाच परिवार असतो. त्यामुळे मुलांवर लक्ष द्यायला पालकांकडे वेळ नसतो. मुलांचे मित्र कोण आहेत? ते व्यसनी आहेत का? ते शाळेत जातात का? हे पाहण्यास सुद्धा पालकांना वेळ नसतो. त्यामुळे मुले एकमेकांच्या संगतीने गुटखा, तंबाखू, ब्राऊन शुगर, गर्द अशा व्यसनांच्या आहारी जातात. तसेच काही पालकांना व्यसन असते. ते मुलांच्या समोर व्यसन करतात. मुले सुद्धा मग हळूहळू व्यसनाकडे वळतात.

६) **बेशिस्त विद्यार्थी** :- सध्या शिक्षणपद्धती मधून परीक्षेचे महत्त्व कमी झाल्यामुळे शिक्षणाची गुणवत्ता खालावली आहे. विद्यार्थ्यांमध्ये बेशिस्तपणा वाढला आहे. चंगळवाद वाढला असून मुले पालकांपासून दुरावत चालली आहेत. प्रत्येक शाळा महाविद्यालयातून बाहेर पडलेली मुले-मुली सुरक्षित घरी पोहोचतीलच याची शाश्वती देता येत नाही. शाळा महाविद्यालयांमध्ये स्नेहसंमेलनासारख्या कार्यक्रमावेळी हुल्लडबाजी, दगडफेक सारखे प्रकार घडतात. महाविद्यालयातील विद्यार्थी कल्याण मंडळाच्या निवडणुकी वेळी सुद्धा अपहरण, भांडणे मारामाऱ्या होतात. बेशिस्त विद्यार्थी ही समस्या दिवसेंदिवस गंभीर बनत चालली आहे.

७) **भौतिक सोयी - सुविधांची कमतरता** :- शहरांमध्ये लोकसंख्या वाढल्यामुळे अनेक शाळा व महाविद्यालयांमध्ये विद्यार्थी संख्या वाढली आहे.विद्यार्थी संस्थेच्या प्रमाणात भौतिक सोयी. सुविधांमध्ये मात्र वाढ झालेली दिसून येत नाही. जागेच्या कमतरतेमुळे इमारतीचा विस्तार करता येत नाही.तसेच अगोदर बांधलेले वर्ग मोठे करता येत नाहीत. शिवाय इमारत पाडून त्या ठिकाणी दुसरी बांधायची ठरवल्यास निधीचा प्रश्न निर्माण होतो. वर्गामध्ये जादा फर्निचर सुद्धा ठेवता येत नाहीत. शहरातील शाळांसाठी शाळा व महाविद्यालयांसाठी पुरेसी जागा उपलब्ध नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांचा शारीरिक विकास करताना अडचणी निर्माण होतात.

८) **नवसमाज माध्यमांचा तरूणांवर पगडा** :- संवाद -संपर्कक्रांती घडवून आणणाऱ्या सोशल मीडियाने आज जगभरातील बहुतांश नागरिकांचे जीवन व्यापून टाकले आहे. भारतासारख्या देशामध्ये तर या नवसमाज माध्यमांचा वापर आणि पगडा तरूणांवर दिवसेंनदिवस वाढत चालला आहे.फेसबुक, व्हॉटस ॲपचा वापर हा जीवनावश्यक सवयींचा भाग बनत चालला आहे. पण सोशल मीडियाच्या आभासी जगतामध्ये वावरताना आपले विचार आचार संकुचित मानसिकतेचे होत आहेत याचा विसर तरूणांना पडत आहे.

सोशल मीडियामुळे चांगल्या गोष्टी इतरांपर्यंत पोहचवता येतात पण त्याचबरोबर सामाजिक सलोखा बिघडवणे, हिंसक कृत्य करण्यास, चुकीचे वर्तन करण्यास प्रवृत्त करणे असे प्रकार घडतात. सतत स्नॅप चॅट, इन्स्टाग्राम आणि फेसबुक पाहणे, तसेच आयुष्यातील प्रत्येक गोष्टीचे अपडेट सोशल मीडियावर टाकण्याच्या सवयी या तरूणांना जडल्या आहेत. तसेच सोशल मीडियाच्या नियमित वापरामुळे चिंता, एकटेपणा आणि आत्मविश्वासात कमतरता जाणवणाऱ्यांचे प्रमाण दिवसेंनदिवस वाढत चालले आहे. शिक्षण क्षेत्रामध्ये शहरी भागात अनेक समस्या आहेत. परंतु या समस्येवरती सर्वांनी एकत्रित येऊन मात करणे गरजेचे आहे. शिक्षण क्षेत्राशी संबंधित शिक्षणतज्ज्ञ, शिक्षक, पालक, विद्यार्थी, शासन, समाज यांनी सामूहिक प्रयत्न केल्यास या समस्या आपण नक्कीच कमी करू शकू.

**ब) ग्रामीण भागातील शिक्षणाच्या विशिष्ट समस्या :–**

आपल्या भारत देशामधील ७०% लोक खेड्यांमध्ये राहतात. शिक्षण हे खेड्यापर्यंत पोहोचले पाहिजे. परंतु आजसुद्धा आपण सर्वांच्यापर्यंत शिक्षण पोहोचवू शकलो नाही. शिक्षणाच्या प्रवाहात सर्वांना आणता आलेले नाही.म्हणून ग्रामीण भागातील शिक्षणातील समस्या कोणकोणत्या आहेत याचा आपण अभ्यास करूया.

**१) शाळेची हजेरी व पटसंख्या वाढवणे :–** ग्रामीण भागातील अनेक शाळांचे अस्तित्वच धोक्यात आले आहे. ग्रामीण भागातील सर्वच शाळांमध्ये विद्यार्थ्यांची पटसंख्या दिवसेंनदिवस कमी होत असल्याचे चित्र आहे. प्रत्येक पालक आपल्या मुलाला शहरातील नावाजलेल्या शाळेमध्ये दाखल करतो आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील अनेक शाळांना विद्यार्थी मिळेनासे झाले आहेत. पटसंख्येअभावी अनेक शाळा पडण्याच्या अवस्थेत आहेत. अनेक अनुदानित तुकड्या विद्यार्थी संख्येअभावी बंद पडल्या आहेत. दिवसेंनदिवस ग्रामीण भागातील शाळांना पटसंख्येची समस्या मोठ्या प्रमाणावर जाणवू लागली आहे.

**२) शाळांचे अस्तित्व धोक्यात :–** ग्रामीण भागातील अनेक नावाजलेल्या शाळा बंद पडण्याच्या अवस्थेत आहेत. ग्रामीण भागातील पालकांचा आपल्या पाल्यांना शहरातील नामांकित असलेल्या शाळांमध्ये दाखल करण्याकडे अधिक कल दिसत असल्यामुळे तसेच कधीकाळी नामवंत व गुणवान विद्यार्थी घडविणाऱ्या शाळांच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ग्रामीण भागात अनेक ठिकाणी इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरू झाल्या आहेत. त्याचाही फटका मराठी माध्यमांच्या शाळांना बसला आहे.

**३) शिक्षणापासून वंचित असणाऱ्या मुलांना मुख्य प्रवाहात आणणे :–** आजही ग्रामीण भागात शिक्षणापासून वंचित असणाऱ्या मुलांचे प्रमाण जास्त आहे. वीटभट्ट्या, शेतमजुरांची मुले, खाणकामगारांची मुले, झोपडपट्टीतील मुले शाळेच्या मुख्य प्रवाहापासून दूर आहेत. राज्यात बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याची तरतूद असलेल्या कायद्याची अंमलबजावणी मागील काही वर्षापासून सुरू आहे. त्यानुसार प्रत्येक मुलाला शिक्षणाचा अधिकार आहे. या भावनेने शासनाने शालाबाह्य मुलांना प्रवेश देण्याचा निर्णय घेतलेला आहे. पण त्याची १००% अंमलबजावणी झालेली नाही.

**४) शिक्षकांवर सतत अशैक्षणिक कामांचा ताण :–** ग्रामीण व शहरी भागातील शिक्षकांवर सतत अशैक्षणिक कामांचा ताण खूप मोठ्या प्रमाणावर येतो. अध्यापन हे शिक्षकांचे आद्य कर्तव्य आहे; परंतु सध्या शिक्षकांना अनेक अशैक्षणिक कामांमध्ये गुंतवले आहे. जनगणना करणे, निवडणुकीची कामे, ऑनलाईन माहिती भरणे, विद्यार्थी नोंदी ऑनलाईन करणे, शालेय पोषण आहार, उपस्थिती भत्ता या सर्वांची माहिती व त्याच्या नोंदी ठेवाव्या लागतात. शिवाय दररोज शासनाची अनेक परिपत्रके येतात. त्याची माहिती ताबडतोब पाठविणे गरजेचे असते. त्यामुळे साहजिकच शिक्षकांचे अध्यापनाकडे दुर्लक्ष होते. याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या व शाळेच्या गुणवत्तेवर होतो.

**५) ग्रामीण भागात नोकरी करण्याची मानसिकता नाही :–** आज शिक्षक होऊ पाहणाऱ्या जवळजवळ ९०% लोकांना शहरी भागात नोकरी हवी आहे. सर्व सोयीसुविधांनी युक्त अशी शाळा हवी आहे.सुगम भागातील शाळांमध्ये नोकरी हवी आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील दुर्गम भागातील अनेक शाळांना

शिक्षक नाहीत. नोकरी केली तर ती शहरी भागातच करेन ही मानसिकता बदलणे गरजेचे आहे.

**६) संस्था प्रमुखांचे आडमुठे धोरण :–** ग्रामीण भागातील शाळांमध्ये काम करणाऱ्या शिक्षकांना विविध जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. ह्या जबाबदाऱ्या पार पाडत असताना त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. ग्रामीण भागातील बहुतेक शाळा त्या त्या भागातील स्थानिक पुढाऱ्यांच्या वर्चस्वाखाली असतात. त्यामुळे शिक्षकाला त्यांच्या दबावाखाली काम करावे लागते. इच्छा असो वा नसो त्यांची वैयक्तिक कामे करावी लागतात. ते सतत शाळा व महाविद्यालयांच्या कामकाजात ढवळाढवळ करतात. कोणत्याही गोष्टीचे निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य प्राचार्य, मुख्याध्यापक व शिक्षकांना नसते याचा परिणाम शिक्षकांच्या कामकाजावर होतो.

**७) गळती व स्थगिती :–** ग्रामीण भागात आजही इयत्ता पहिलीला १०० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला तर त्यातील ५०–६० च विद्यार्थी इयत्ता दहावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण करतात. विद्यार्थ्यांच्या गळतीची गरिबी, शेतीकाम, घरकाम, लहान भावंडांचा सांभाळ करणे, आईवडिलांना कामामध्ये मदत करणे, आर्थिक परिस्थिती अशी अनेक कारणे आहेत. गळतीप्रमाणेच ग्रामीण भागातील शाळांमधील स्थगिती ही एक मुख्य समस्या आहे. ‘ज्यावेळी एखादा विद्यार्थी एकाच वर्गात एक वर्षाहून अधिक काळ राहतो त्यास स्थगिती म्हणतात. विद्यार्थी एखाद्या वर्गात नापास झाल्याने त्याच वर्गात राहतात. त्यांची शिक्षणाची आवड कमी होते.स्थगितीची आर्थिक परिस्थिती, अभ्यासासाठी वेळ नसणे, मार्गदर्शनाचा अभाव, शैक्षणिक साहित्याची कमतरता, अभ्यासाची स्वतंत्र सोय नसणे अशी अनेक कारणे आहेत. या विविध कारणांमुळे मुले नापास होतात व स्थगितीची समस्या निर्माण होते.

**८) विजेचे भारनियमन :–** ग्रामीण भागामध्ये मोठ्या प्रमाणात विजेचे भारनियमन केले जाते. सध्या शिक्षकांना विविध माहिती संगणकावर भरून शासनास पाठवावी लागते. परंतु विजच नसेल तर शिक्षक ती माहिती भरू शकत नाहीत. तसेच संगणक शिक्षणासारखा विषय शिकवायचा म्हटले तरी विजेची आवश्यकता असते. विज नसेल तर तो विषय शिकवता येत नाही.

**९) शासनाची रोज येणारी नवनवीन परिपत्रके :–** ग्रामीण व शहरी भागातील शाळांना भेडसावणारी समस्या म्हणजे शासनाची दररोज नवनवीन येणारी परिपत्रके. त्या परिपत्रकानुसार शासनास तातडीने माहिती पाठविणे सक्तीचे असते. ती माहिती पाठवेपर्यंत शासनाचे दुसरे दुरूस्तीचे परिपत्रक येते आणि वेगळीच माहिती मागविली जाते. ही माहिती काढण्यामध्ये आणि शासनास पाठविण्यामध्ये बराच वायफळ खर्च होतो.

**१०) शाळांमध्ये विद्यार्थ्यांना प्राथमिक सुविधा उपलब्ध करून दिल्या जात नाहीत:–** त्यांना आवश्यक असणाऱ्या प्राथमिक सुविधा उपलब्ध करून घाव्यात ही अपेक्षा असते. परंतु ग्रामीण भागातील बहुतांश शाळा विद्यार्थ्यांच्या प्राथमिक गरजा पूर्ण करण्यास असमर्थता दर्शवितात. त्याचा परिणाम पटसंख्येवर होतो. विद्यार्थ्यांना शाळेमध्ये बसण्यासाठी पुरेसे फर्निचर, आरामदायी बैठक व्यवस्था, वर्गामध्ये पुरेशी वायुविजन व प्रकाशव्यवस्था, स्वच्छतागृहे, पिण्याचे शुद्ध पाणी या सोयी सुविधा पुरवाव्यात अशी अपेक्षा असते. परंतु या ही सोयी –सुविधा बऱ्याच शाळा पुरवू शकत नाहीत. भारतामध्ये ग्रामीण आणि शहरी भाग ही देशाची अविभाज्य अंगे आहेत. नागरी वातावरण समाजप्रगतीला पोषक असले तरी या प्रगतीच्या प्रवाहात जुन्या संस्कृतीमधील मूल्ये, श्रद्धा, आदर्श हे सर्व वाहून जाण्याची भीतीही निर्माण झाली आहे. भारत देशामधील ग्रामीण व शहरी

भागांचा विचार करता तेथील भौगोलिक परिसर, लोकांचे आचार-विचार भाषा, चालीरीती परंपरा यासारख्या अनेक बाबतीत विविधता असते. यादृष्टीने विचार करता तेथील समस्या देखील वेगवेगळ्या आहेत. या समस्या सर्वांनी एकत्रित येऊन सोडविणे गरजेचे आहे.

**स्वयंअध्ययन प्रश्न ३ :**

**थोडक्यात उत्तरे लिहा**

१) शहरी भागातील शिक्षणाच्या कोणत्याही ५ समस्या स्पष्ट करा.

२) ग्रामीण भागातील शिक्षणाच्या विशिष्ट समस्या कोणकोणत्या ?

**D) Role of Community in Solving Social Problems in the field of Education**

**शिक्षण क्षेत्रातील सामाजिक समस्या सोडविण्यामध्ये समाजाची भूमिका/ शिक्षण क्षेत्रातील समस्यांचे निराकरण करण्यात लोकसमुदायाची भूमिका**

**प्रास्ताविक :** समाज हा प्रगतीशील व गतिमान व्हावयास हवा असेल तर समाजातील सर्व स्तरातील व्यक्ती या सुजाण व डोळस बनल्या पाहिजेत. चारित्र्यवान व क्रियाशील बनल्या पाहिजेत. आज असे कोणतेही क्षेत्र नाही की त्या क्षेत्रामध्ये समस्या नाहीत. मग शिक्षण क्षेत्र तरी याला अपवाद कसे असेल. परंतु शिक्षण क्षेत्रातील सामाजिक समस्या सोडविण्यासाठी समाजाची भूमिका खूप महत्वाची आहे. म्हणून आपण या ठिकाणी समाजाने कोणकोणत्या भूमिका पार पाडणे गरजेचे आहे. याविषयी चर्चा करणार आहोत.

**शिक्षण क्षेत्रातील सामाजिक समस्या सोडविण्यामध्ये समाजाची भूमिका :**

शिक्षण क्षेत्रातील सामाजिक समस्या सोडविण्यामध्ये समाजाची भूमिका पुढीलप्रमाणे आहे.

**१) समाजातील सर्व व्यक्ती सुजाण व डोळस बनविणे :**

शिक्षण क्षेत्रातील सामाजिक समस्या आपणाला सोडवायच्या असतील तर समाजातील लहानांपासून ते वृद्धांपर्यंत सर्व व्यक्ती सुजाण व डोळस बनविणे ही समाजाची मुख्य भूमिका आहे. समस्यांचे गांभीर्य लक्षात येण्यासाठी सर्व व्यक्ती सुजाण व डोळस बनल्या तर त्यावरती उपाययोजना करणे सोपे जाते. त्या समस्यांचे मूळ लक्षात घेणे गरजेचे आहे.

**२) सामाजिक जबाबदारीची जाणीव :**

समाजामध्ये राहत असताना प्रत्येक व्यक्तीला विशिष्ट जबाबदारी पार पाडावी लागते. समाजातील सामाजिक नीतिनियम, रूढी, परंपरा प्रत्येक व्यक्ती पाळण्याचा प्रयत्न करीत असतो. समाजाशिवाय व्यक्तीला माणूसपण प्राप्त होत नाही. मी समाजाचा एक महत्वपूर्ण घटक आहे. या नात्याने प्रत्येकाची समाजाशी बांधिलकी असणे गरजेचे आहे. समाजाने माझ्यासाठी काय केले यापेक्षा मी समाजासाठी काय केले हे अधिक महत्वाचे आहे. म्हणून समाजातील प्रत्येक घटकामध्ये सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करण्याची भूमिका समाजाने पार पाडायची आहे. शिक्षण क्षेत्रातील सामाजिक समस्या आपोआप कमी होण्यास मदत होईल.

### ३) कर्तव्याची जाणीव :

आज प्रत्येक व्यक्ती आपल्या हक्काबद्दल नको तितकी जागृत झालेली आहे. परंतु दुर्दैवाने कर्तव्याबद्दल मात्र प्रत्येकजण उदासीन आहे. आपल्यातील बेफिकिरीची वृत्ती व्यक्तीविकासाला मारक ठरते. आई, वडील, शिक्षक, समाज, राष्ट्र यांचा प्रत्येक व्यक्तीच्या विकासामध्ये कमी अधिक प्रमाणात हातभार लागलेला असतो. या सर्वांबद्दल आपले काही कर्तव्य आहे याची जाण समाजाने निर्माण करणे गरजेचे आहे.

### ४) सामाजिक वास्तवाची जाणीव :

समाजाच उच्च-निच भेदभाव मोठ्या प्रमाणात असल्यामुळे निम्न वर्गियांचे व गरिबांचे मोठ्या प्रमाणावर शोषण होते. सर्वत्र भ्रष्टाचार पसरलेला आहे. मजुरी करणाऱ्यांना पूर्ण मजुरी मिळत नाही. सावकार कर्ज देऊन सर्वसामान्यांना फसवतात. शेतजमिनी हडप करतात. स्त्रियांचा समाजात आतोनात छळ केला जातो. अज्ञान व अंधश्रद्धेमुळे फसवणूक केव्हा केली जाते हेच कळत नाही. म्हणून समाजातील ह्या वास्तवाची जाणीव प्रत्येकाला करून देणे ही समाजाची भूमिका आहे.

### ५) सामाजिक समस्यांचे निराकरण :

स्त्रिया ह्या कुटुंबाचा मूलाधार असतात. त्यामुळे त्यांच्या वागण्या बोलण्याचा परिणाम सतत कुटुंबावर होत असतो. तिचे विचार कसे आहेत यावर समाजरचना विकसित होत असते. समाजातील अनेक वाईट रूढी, परंपरा, प्रथा, अंधश्रद्धा, सामाजिक शोषण यांचे प्रमाण वाढण्याचे मूळ कारण स्त्रियांचे अज्ञान आहे. अज्ञानामुळे स्त्रिया अंधश्रद्धेला सतत खतपाणी घालत असतात. त्यांच्या भावनिकतेमुळे त्या या समस्यांमध्ये अडकत जातात व कुटुंबालाही यात अडकवतात. उदा- भगत, साधू, जादूटोणा, नजर लागणे, चेटूक इत्यादींवर त्या विश्वास ठेवतात. या सर्व सामाजिक समस्यांचे निराकरण करण्यात समाजाची भूमिका महत्वपूर्ण आहे.

### ६) राष्ट्रीय स्तरावर विचारविनिमय :

सध्या आपल्या भारत देशामध्ये शिक्षणात विविध सामाजिक समस्या दिसून येतात. शासकीय व खाजगी स्तरावर मोठ्या प्रमाणावर प्रयत्न होत असले तरी त्याची अंमलबजावणी उत्तम प्रकारे होण्याची गरज आहे. राष्ट्रीय स्तरावर या सर्व सामाजिक समस्यांची चर्चा होऊन त्यावर काय उपाययोजना करता येईल याचा मार्ग काढणे गरजेचे आहे.

### ७) सामाजिक संतुलन टिकवून ठेवणे :

भारतीय समाज हा विविधतेने नटलेला आहे. या समाजात धर्म, पंथ, जात, वंश, वर्ण, भाषा, संस्कृती व परंपरा या सर्व बाबतीत विविधता दिसून येते. त्यामुळे या सर्व समस्यांसंदर्भात वेळोवेळी संघर्षही उद्‌भवतात. यामुळे सामाजिक विषमता वाढते व त्यातून समाजाचे संतुलन बिघडते. सामाजिक शांतता व समाजातील दुषित वातावरण कमी करण्यासाठी तसेच समाजाचे संतुलन टिकवून ठेवणे ही समाजाची भूमिका आहे.

### ८) समाजाला विधायक वळण :

समाज संघटित करण्यासाठी अनेक सामाजिक शक्ती कार्य करीत आहेत. समूहाच्या शक्ती आपापल्या

परीने सामाजिक प्रश्न संघटित होऊन सोडविण्याचा प्रयत्न करीत असतात. त्यासाठी समाजात अनेक सेवाभावी संस्था कार्यरत आहेत. उदा- लायन्स क्लब व रोटरी क्लब. काही व्यवसायांशी निगडित संघटना असतात. त्या व्यवसायाशी संबंधित प्रश्न सोडवितात. कामगार संघटना, शेतकरी संघटना तसेच ग्रामीण जीवन व शहरी जीवनात एकता कशी टिकून राहील याचादेखील विचार करतात. समाजातील जातीभेद नष्ट करण्यासाठी प्रयत्नशील असतात. तसेच समाजात नैतिक मूल्यांची रूजवणूक करण्यासाठी धडपड करीत असतात. या सर्व सामाजिक संघटनांना विधायक वळण लावणे हे समाजाचे मुख्य कार्य आहे. तरच समाजात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित होते.

**९) ग्रामीण भागातील शिक्षणाकडे गांभीर्याने पाहण्याची गरज :**

शहरी भागात त्यामानाने बऱ्याच सोयीसुविधा दिल्या जातात. शहरांच्या मानाने ग्रामीण भागात शिक्षणाची परिस्थिती फारच कठीण पाहायला मिळते. ग्रामीण भागात आजही अनेक ठिकाणी विद्यार्थ्यांना शोधून शोधून शाळांत शिकविण्याकरिता आणावे लागते. अनेक कुटुंबात आई-वडील दोघेही अशिक्षित असल्यामुळे त्यांना शाळांचे महत्त्व फारसे कळत नाही. त्यामुळे आपल्या मुलांना मिळणाऱ्या सोयी-सुविधा, तज्ज्ञ शिक्षक याविषयीही ते अनभिज्ञ असतात. यामुळे ग्रामीण भागातील शिक्षणाकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे.

**१०) शिक्षणाची गोडी लावण्याची भूमिका :**

शिक्षण व्यवस्थेमध्ये शिकवण्याच्या अंगाने विचार होण्यापेक्षा शिकण्याच्या अंगाने विचार व्हावा. शाळेचे कार्य शिकवण्याचे नाही, तर शिक्षणाची गोडी लावण्याचे आहे. याचा विचार करून शासनाचे धोरण हे विद्यार्थिभिमुख असावे. शिक्षण हे पुढील समाज घडवत असते, त्यामुळे शिक्षण व्यवस्थेचा विचार करताना आपल्या डोळ्यासमोर पुढील समाजाचे काही चित्र आहे का, ते महत्वाचे आहे. भारत हा येत्या काळात तरूणांचा देश असणार आहे. या गोष्टीचा विचार शिक्षण व्यवस्थेबाबत धोरणे ठरविताना होतो का ? विकासासाठी शिक्षणव्यवस्था सक्षम असणे आवश्यक आहे. शिक्षण हक्क कायद्याने मुले, पालक आणि शासन या तिघांनाही जबाबदारी दिली आहे. मुलांनी शिकवले पाहिजे. पालकांनी त्यांना शिकण्याची मुभा दिली पाहिजे आणि शासनाने सुविधा उपलब्ध करून दिली पाहिजे.

**११) सामाजिक विकासासाठी संपन्न अनुभव :**

शालेय शिक्षणात गरीब मुलांना सर्वतोपरी सामावून घेण्यासाठी शाळेचंही रूप बदलून नवं रूप आणण्याची गरज आहे. शाळेत 'शिक्षण' म्हणून जे काही दिलं जातं, त्याचाच विस्तार करून नव्या, शास्त्रशुद्ध अशा अनेक गोष्टी शाळांमधून धीटपणे आणण्याची गरज आहे. अनेक संशोधन अभ्यासांतून पुढे आलेल्या निष्कर्षात्मक गोष्टींना एकत्र करून त्यांना शालेय स्तरावर व्यावहारिक रूप देऊन, शाळा आमुलाग्र बदलता येतील. शाळांचे रूप केवळ सर्व विद्यार्थ्यांना संधी देणारे म्हणून 'सर्वसमावेशक' असणार नाही, तर त्या मुलांना त्यांच्या त्यांच्या बहुविध बुद्धिमत्तांना वाव दिला पाहिजे. त्याचबरोबर बुद्धी, भावना, भाषा आणि सामाजिकता यांच्या विकासासाठी संपन्न अनुभव देणारी नवी शिक्षणव्यवस्था योग्य ठरणार आहे.

**१२) मुलांच्या अंगभूत सुप्त गुणांचा शोध व विकासासाठी संधी उपलब्ध करून देणे :**

नुसते अध्ययन-अध्यापन म्हणजे शिक्षण नव्हे. प्रत्येक मुलामध्ये असणाऱ्या अंगभूत सुप्त गुणांचा शोध घेऊन त्यांच्या विकासासाठी संधी उपलब्ध करून देणे, त्यांच्यातील क्षमतांचा पुरेपूर विकास होण्यासाठी आवश्यक ती परिस्थिती सभोवताली निर्माण करणे ही समाजाची भूमिका महत्त्वाची आहे. शिक्षण हे मानवाच्या विकासाचे अत्यंत महत्त्वाचे साधन आहे. शिक्षणामुळे माणसाची अस्मिता जागृत होते. शिक्षणामुळे माणसाला आत्मभान येते. त्याची आकलनशक्ती वाढते.

**१३) विद्यार्थ्याला त्याच्या परिसराशी जोडणाऱ्या, सामाजिक बांधिलकीचे भाव जपणारे शिक्षण :**

शिक्षण हे परिवर्तनाचे प्रभावी माध्यम मानले गेले आहे. शिक्षणामुळे समाजात शांतीयुक्त क्रांती निर्माण होते. आजच्या प्रचलित शिक्षण पद्धतीत बदल घडला पाहिजे, याविषयी सर्वांचेच एकमत आहे. हे परिवर्तन घडत असताना भारताचा धार्मिक व सांस्कृतिक वारसा, इतिहास, ज्ञान, परंपरा यांच्या बरोबरीनेच आधुनिक जगातील वैज्ञानिक प्रगती आणि भविष्यकाळाची आव्हाने यांचाही समग्रतेने विचार होण्याची आवश्यकता आहे. माणूस भौतिक सुखाच्या मागे लागून सुखासीन बनतो. तो आपल्या गावापासून दूर शहरांत किंवा अन्य देशात स्थलांतरित होतो. त्याला आपल्याच देशातील पूर्वापार परंपरा, चालीरिती याविषयी घृणा वाटू लागते. म्हणून विद्यार्थ्याला त्याच्या परिसराशी जोडणाऱ्या, जोडून ठेवणाऱ्या, सामाजिक बांधिलकीचे भाव जपणाऱ्या शिक्षणाची गरज आहे.

भारताच्या शिक्षण व्यवस्थेपुढील समस्या या केवळ आजच्याच नाहीत, तर त्या स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच्या आहेत. यासाठी शाळा, महाविद्यालयांना नेहमीच संघर्ष करावा लागला आहे. असे असले, तरी आता लोकांमध्ये शिक्षणाच्या प्रती एक महत्वाचा बदल होताना दिसत आहे. लोकांमधून आता गुणवत्तापूर्ण शिक्षणाची मागणी होत आहे. शिक्षणाच्या महत्तेसंबंधी लोकांच्या जाणिवा खोलवर रूजत आहेत. काही वर्षापूर्वी कामगार व कष्टकरी वर्गातील गरीब लोकांचे शिक्षणाबद्दल बोलणे अतिशय मोघम होते. शिक्षणासंबंधी पूर्वी त्यांच्या कल्पना म्हणजे शिकलेला हा न शिकलेल्यापेक्षा पात्र असतो इथवर मर्यादित होत्या. मात्र नाही शिकलो तर रोजगार नाही आणि रोजगार नाही तर अर्थप्राप्ती नाही झाली तर आपल्याला आपल्या दारिद्र्यावस्थेतून बाहेर पडता येणार नाही, या जाणिवेमुळेच शिक्षण क्षेत्रातल्या महत्वाच्या सुधारणांना गती मिळाली आहे. उच्च-नीचतेच्या पारंपरिक भावनेतून जनतेला स्वतंत्र करण्याचे आणि भारतीयत्वाच्या धर्मनिरपेक्ष मूल्यांशी त्यांचे नाते जोडण्याचे महत्वाचे काम शिक्षणाच्या माध्यमातून होते. या देशाला एक भाषा व एक धर्म नाही. अशा अवस्थेत धर्मनिरपेक्षता हीच आपल्या देशाची सामाजिक भाषा आहे आणि कायद्यासमोर समानता हाच धर्म आहे. हे मूल्य जनमाणसांत रूजविण्याची शिक्षण क्षेत्राची मोठी जबाबदारी आहे.

देशाच्या नजरेसमोर असणारी शैक्षणिक स्वप्ने प्रत्यक्षात उतरविण्यासाठी आपण नेमके काय करता आणि किती वेगाने करतो, यावर आपल्या मुलांच्या नशिबी भविष्यात काय येणार हे अवलंबून असेल. देशातल्या शिक्षण क्षेत्रातील सुधारणाच शेवटी या देशाचे आर्थिक भवितव्य ठरविणार, घडविणार आणि बिघडविणार आहेत. एकीकडे भारत वेगाने तरूण होतो आहे. तर दुसरीकडे त्याच वेगाने शिक्षणाच्या भोवतीचा प्रश्नांचा गुंताही वाढत आहे. या प्रश्नांना आपण कसे सामोरे जातो, यावर आपले भवितव्य ठरेल.

**स्वयंअध्ययन प्रश्न ४ :**

**थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) शिक्षण क्षेत्रातील सामाजिक समस्या सोडविण्यामध्ये समाजाची भूमिका स्पष्ट करा.

**४.६ सरावासाठी स्वाध्याय :**

१) भारत देशातील विविध घटकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी कोणकोणत्या उपाययोजना करता येतील?

२) भारतातील ग्रामीण भागातील प्रमुख शैक्षणिक समस्यांची चर्चा करा.

३) शिक्षण क्षेत्रातील सामाजिक समस्या सोडविण्यामध्ये समाजाची भूमिका का महत्त्वाची आहे?

**संदर्भ ग्रंथ :**

१) करंदीकर सुरेश, मंगरूळकर मीना (२००२), उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण. कोल्हापूर : फडके प्रकाशन.

२) धनवडे नंदकुमार, धनवडे सुरेखा (२०११), शिक्षणशास्त्र, कोल्हापूर : फडके प्रकाशन.

३) पाटील विनोद (२०१०). उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षक व शिक्षण. नाशिक : इनसाईट पब्लिकेशन्स.

४) मायी सुनिल (२००९). भारतीय समाज प्रश्न आणि समस्या. पुणे : डायमंड पब्लिकेशन्स.

५) साळुंखे सर्जेराव (१९९८). समाजशास्त्रातील मुलभूत संकल्पना. पुणे : नरेंद्र प्रकाशन.

६) सांगोलकर अरूण (२०११). नवीन जागतिक समाजातील शिक्षणाचे विचारप्रवाह. नाशिक : इनसाईट पब्लिकेशन्स.

***